# श्रीअक्कलकोट स्वामीमहाराज चरित्र

स. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १३१८
१०८२.

★

REFBK-0012434
REFBK-0012434

रा. शि. सहस्रबुद्धे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ......... वि: .........
क्रमांक ......... नोंदि: .........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

# श्रीअक्कलकोटस्वामीमहाराज चरित्र

REFBK-0012434

लेखक

रा. शि. सहस्रबुद्धे
( माजी सहसंपादक 'केसरी' )

*मूल्य साडेतीन रुपये*

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली, सप्टेंबर १९६२

सर्व हक्क प्रकाशकाधीन


मूल्य साडेतीन रुपये

प्रकाशक
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार पेठ, पुणें २

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिवपार्वती ’
४६१/१० सदाशिव
टिळक रोड, पुणें २

॥ श्रीगुरुदेवदत्त की जय ॥

परमपूज्य श्री गजानन महाराज ( अक्कलकोट )



महाराजांचा आशीर्वादः—तो कवि ' सहस्रबुद्धीचा '

स्तंभित सहस्रवदनें स्तविता सद्‌गुरु सहस्रबाहूचा ॥
वाङ्मय बिल्व दलानें पूजी तो कवि ' सहस्रबुद्धीचा ॥१॥
नास्तिक आस्तिक होती महिमा वर्णी अपार सद्‌गुरुंचा ॥
गुरुभक्तीचा यशोध्वज उभारि तो कवि ' सहस्रबुद्धीचा ॥२॥

अक्कलकोट : दि. ४-५-६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३६५९ वि: चरित्र
क्रमांक १०६८ नों: दि: २१९५८

# लेखकाचें हृद्गत

गेलीं कांहीं वर्षें **श्रीस्वामीसमर्थमहाराज अक्कलकोट** यांच्या सेवेंत घालविली असल्यानें श्रींचें चरित्र आपल्या हातून लिहिलें जावें अशी तळमळ लागली. या कामीं माझे स्नेही समर्थभक्त श्रीयुत **जनार्दन तथा भाऊसाहेब पेठे**, वकील, यांचा सल्ला घेतला. त्यांनीं होकार दिल्यामुळें हें चरित्र गेल्या वर्षाच्या चैत्र शुद्ध प्रतिपदेसच लिहून तयार झालें यामुळें मनास आनंद वाटून प्रकाशनाची तजवीज चालू झाली. श्रींच्या कृपेनें पुढील चक्रें फिरून पुस्तकाचें हस्तलिखित अक्कलकोट येथील परमपूज्य **श्रीगजाननमहाराज** यांना वाचून दाखविण्याचा सुयोग गेल्या परशराम जयंतीस आला व तेथून परत आल्यावर प्रकाशनाचे बाबतींत माझे निकटवर्ती आप्त **श्री. सदाशिवराव पाध्ये** ( व्हीनस प्रकाशनचे मालक ) यांच्यापाशीं सहज गोष्ट काढली व ती त्यांनीं लगेच अमलांत आणून श्री गणेश चतुर्थीच्या सुमुहूर्तावर छापून प्रसिद्धीसाठीं तयारहि केली. याप्रीत्यर्थ त्यांचे किती आभार मानावे तितके कमीच होत. तसेंच पुस्तक छापण्यासाठीं जी तयारी करावी लागते त्या कामी माझे सांप्रदायी स्नेही श्री. **रामचंद्र दामोदर लकडे जोशी**, श्री. **श्रीधर वामन राहाळकर** श्री. **श्री. भा. रानडे**, व श्री. **आबाराव ओक** यांनीं प्रोत्साहन दिलें नसतें तर हें चरित्र तसेंच पडून राहिलें असतें. तेव्हा त्यांचें आभार मानणें हें माझें कर्तव्यच ठरतें. 'कल्पना' मुद्रणालयाचें मालक सर्वश्री **लाटकर** यांनीं सुबकरीतीनें व काळजीपूर्वक या पुस्तकाची छपाई केली याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

श्रीगणेशचतुर्थी
सोमवार दि. ३।९।६२

रा. शि. सहस्रबुद्धे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... दि: ....................
क्रमांक .......................... नों दि: ....................

# अनुक्रमणिका


| अध्याय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | | प्रस्तावना | १ |
| १ | : | अवताराचें रहस्य | ११ |
| २ | : | श्रीमहाराजांचें मंगळवेढ्यास आगमन | १७ |
| ३ | : | सोलापुरास आगमन | २७ |
| ४ | : | अक्कलकोटास महाराजांचें आगमन | ३३ |
| ५ | : | महाराज कोण होते ? | ४३ |
| ६ | : | लोकोद्धाराची तळमळ | ४७ |
| ७ | : | अवताराचें रहस्य | ५५ |
| ८ | : | परमेश्वर आहे तरी कसा ? | ६१ |
| ९ | : | सद्‌गुरुंचें मार्गदर्शन | ७० |
| १० | : | सद्‌गुरुंचें मार्गदर्शन ( पुढे चालू ) | ७९ |
| ११ | : | सद्‌गुरुंची भाषा कोणाला कळेल ? | ८६ |
| १२ | : | महाराजांकडे आलेल्या विभूति | ९३ |
| १३ | : | महाराजांकडे आलेल्या विभूति ( पुढें चालू ) | १०३ |
| १४ | : | महाराजांकडे आलेल्या विभूति ( पुढे चालू ) | १२२ |
| १५ | : | कांदेवाडी मठाचे संस्थापक स्वामीसुत | १३० |
| १६ | : | महाराजांच्याकडे आलेल्या विभूति | १३७ |
| १७ | : | उपसंहार | १४२ |


• • •

॥ श्री अक्कलकोट स्वामीसमर्थ महाराज ॥



अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ॥

तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३८६५ वि: चरित्र
क्रमांक १०६५८ नों: दि: २५/१/५८

# प्रस्तावना

उपासनेचे सेवटीं । देवा भक्तांअखंड भेटी ।
अनुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ॥ श्रीसमर्थ ॥

अर्वाचीन वेदांत ग्रंथांत ब्रह्मविद्यासंपादन करण्यास योग्य असा अधिकारी कसा असावा, याविषयींचीं पुष्कळ वर्णनें आढळून येतात. त्या सर्वांचा इत्यर्थ इतकाच कीं, वेद-वेदांगांचें अध्ययन, नित्य, नैमित्तिक, प्रायश्चित्त इत्यादि कर्मांचें अनुष्ठान, काम्य व निषिद्ध कर्मांचा त्याग व ईश्वरोपासना इतक्या गोष्टी ज्याचे हातून घडल्या असतील, आणि ज्याचें अंतःकरण निष्पाप व शांत झालें असेल व जो साधन चतुष्टय संपन्न आहे, तोच ब्रह्मविद्येच्या उपदेशाला योग्य आहे असें समजावें. असा मनुष्य संसारतापानें तप्त झाला असतां त्यानें सद्गुरूकडे जावें, म्हणजे त्याच्या अंगीं वरीलप्रमाणें सर्व लक्षणें आहेत असें पाहून सद्गुरुनें त्यास ब्रह्मोपदेश करावा, असें वेदान्तग्रंथांत अधिकाऱ्यासंबंधीं वर्णन केलेलें असतें. या सर्व लक्षणांवरून वृद्धापकाळींच हा योग येणार. कारण वरील सर्व गोष्टी तारुण्यसुलभ नाहींत. कारण त्या दशेंत सामान्य प्रवृत्ति ही निराळी असते, यालाहि अपवाद आहेत, नाहीं असें नाहीं. परंतु सामान्य सिद्धान्त असा कीं तरुणपणांत मनुष्याची वृत्ति परमार्थपर होऊं शकत नाहीं, म्हणून वृद्धच ब्रह्मज्ञानाचा अधिकारी होऊं शकतो. तरुण होऊं शकत नाहीं असें मानण्याचें कारण नाहीं. तसें असतें तर साधुसंतांचीं चरित्रें निराळींच झालीं असतीं. उपनिषदांचें वाचन व मनन केल्यास आपल्या ध्यानांत एक गोष्ट येऊं शकेल कीं तारुण्यांतसुद्धां महान अधिकारी होऊन गेले आहेत. कठोपनिषदांत

नचिकेताची कथा काय सुचविते ? नचिकेत यमधर्माकडे गेला तेव्हां त्याचा विवाह अद्यापि झाला नव्हता. अगदीं अपक्व अशा तारुण्यावस्थेंत असलेल्या नचिकेताला ब्रह्मज्ञानाचा उपदेश देतांना यमधर्मांनीं "तूं लहान आहेस, तुझ्या हातून नित्य, नैमित्तिक, प्रायश्चित्त व उपासना हीं अनुष्ठानें अद्यापि घडलेलीं नाहींत, तरी हीं सर्व अनुष्ठानें करून साधनचतुष्टय संपन्न होऊन ये म्हणजे मी तुला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करीन" असें सांगितलें नाहीं. त्याची तें ज्ञान ग्रहण करण्याची तयारी पाहूनच त्यास यमधर्मांनीं उपदेश केला. कठोपनिषदांत, यमधर्मांनीं त्याची कसून परीक्षा घेऊनच त्यास ब्रह्मविद्यासंपन्न केलें, असें दिसून येतें. कठोपनिषदांतील नचिकेत, योगवासिष्ठांतील राम व नारसिंहाख्यानांतील प्रल्हाद, हे वयानें अगदीं लहान, तर भारतीय युद्धांतील अर्जुन, भागवतांतील परिक्षिती व मरणाच्या द्वारांत बसलेला खट्वांग हे वयानें त्यामानानें अगदीं वृद्ध. या सर्वांचा विचार केल्यास विशिष्ट वयोऽवस्था हें ज्ञानाच्या योग्यतेचें कारण म्हणून मानतां येत नाहीं. वयाच्या प्रश्नाबरोबरच विशिष्ट कर्माचें महत्त्व देखील साहजिकच कमी होतें. नचिकेताच्या चरित्रावरून अधिकारी लक्षणांतील मुख्य गुण दिसतात ते असे; बलवत्तर उत्साह, उत्कृष्ट ज्ञानलालसा, विवेकशील वैराग्य, व सतत सावधानता व उत्कट ध्येयनिष्ठा. ब्रह्मविद्या हें उच्चत्तम ज्ञान असल्यानें परिस्थितीला अनुसरून योग्य त्या प्राथमिक विद्याभ्यासांचा अधिकारी लक्षणांत समावेश करणें क्रमप्राप्तच होतें. नचिकेत एवंगुण विशिष्ट अधिकारी होता. त्याच्या अंगचें प्रसंगावधान इत्यादि सद्‌गुण त्याच्या अधिकारास पोषकच होते. त्याचें वैराग्य वैतागाच्या स्वरूपाचें नसून तें विवेकशील होतें हें त्याच्या यमधर्माशीं झालेल्या परिसंवादावरून सिद्ध होण्यासारखें आहे. कांहीं संन्यासमार्गी वेदान्तग्रंथकारांनी संसाराला वैतागलेला मनुष्य ब्रह्मज्ञानाकरितां अधिक पसंत केला आहे. परंतु उपनिषदांना ही कल्पना मान्य दिसत नाहीं. नचिकेताचें उदाहरण आपण घेऊं. तो अद्यापि संसारांत पडलेला नव्हता. पण त्याच्या ठिकाणीं दिसून येणारें वैराग्य ज्ञानलालसेमुळें किंवा ध्येयनिष्ठेमुळेंच उत्पन्न झालें असलें पाहिजे हें उघड होय. "विषयोपभोग जरी सामान्यतः सुखदायक असलें तरी ते परिणामीं अहितकारी असतात. विषयोपभोगानें इंद्रियांचें सामर्थ्य क्षीण होऊन मानवी जीवनास निस्तेजपणा येतो" वगैरे उद्‌गार नचिकेताच्या दिव्य सामर्थ्याचेच द्योतक आहेत. या प्राचीन कथेवरून वयाची आडकाठी ब्रह्मज्ञानाच्या आड येत

नाहीं असें म्हणणें सयुक्तिक नाहीं काय? सबब मनुष्यानें उभ्या आयुष्यांत कधींहि निराश होऊं नये. "अपिचेद् सुदाराचारो भजते माम अनन्यभाक्। स साधुरेव मन्तव्यः सम्यक् व्यवस्थितोहिसः" अशी भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत ग्वाही दिली आहे. ब्रह्मज्ञानाची उत्कट इच्छा व त्यास लागणारी वैराग्य प्रवृत्ति व इतर गुण यांची उपासना केल्यास कोणत्याहि मानवी जीवास ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्यास अडचण नाहीं असा मूलभूत सिद्धान्त पूर्वींच्या द्रष्ट्यांनीं लोकांसमोर ठेवला आहे. या गोष्टीचें साधकांनीं मनन करावें.

"उत्कट भव्य तेंचि घ्यावें। मळमळीत अवघेचि टाकावें" (श्रीसमर्थ) मनुष्याचें ध्येय उत्कट व भव्य असावें. तें मळमळीत असू नये असें श्रीसमर्थ रामदास म्हणतात. असें ध्येय असणें योग्य पण हें ध्येय साध्य करण्यासाठीं साधकास अनेक पथ्यें संभाळावीं लागतात असा साधुसंतांनीं इषारा दिला आहे. मनुष्यानें आपल्या ध्येयाची कल्पना नुसती उराशीं बाळगतां कामा नये. कारण जोंपर्यंत कृति होऊं शकत नाहीं तोंपावेतों भव्य आणि उदात्त ध्येय याची जगांत कांहीं किंमत नाहीं. भव्य आणि उदात्त कल्पनेची उभारणी करणें सोपें आहे. मनोराज्य करावयाचें तें साधें कां ठेवावें? अत्यंत रमणीय, सुखकर, प्रभावी आणि सर्व ऐहिक सुखें प्राप्त करून देणारें आहे असें मनानें घेतलें तर त्यांस कोणी नांवें ठेवणार नाहीं. खरी अडचण अशी आहे कीं आपण जें ध्येय उराशीं बाळगलें तें अमलांत आणून तदनुसार वर्तन ठेवून लोकांना एक प्रकारें योग्य तो धडा घालून देण्याचें जोंपावेतों घडत नाहीं तों पावेतों त्यास कांहींच किंमत देतां येणार नाहीं. मनोराज्याची उभारणी करण्यांत जरी मानसिक सुख लाभलें तरी तें आभासिक सुख असतें, खरें नव्हे. तेव्हां अशा निष्फळ मनोराज्यांत बिनमोल अशा मनःसामर्थ्याचा व कालाचा अपव्यय होत असल्यानें मनुष्याची ती एक मोठी हानीच होतें असें शेवटीं मानणें भाग पडतें. कैफाचें व्यसन मनुष्याला जसें सहजासहजीं सोडवत नाहीं, त्याचप्रमाणें आभासिक सुखाचा छंद सोडणें कठीण जातें. तीच गोष्ट रमणीय ध्येयवादाची आहे. ध्येयवादाच्या रमणीय कल्पनेंत मनुष्य स्वतः रंगतो इतकेंच नव्हे तर प्रसंगविशेषीं दुसऱ्यालाहि रंगवू शकतो. म्हणून ध्येयवस्तु उत्कट व भव्य आणि दिव्य असली तरी तिच्या रमणीय कल्पनेंत अंतःकरण रममाण होऊन तें कर्तव्यच्युत न होईल अशाविषयीं अत्यंत सावधपणा

ध्यावयास पाहिजे. कारण ध्येय नसेल तर अभ्यास, दृढनिश्चय, चिकाटी, तितीक्षा व पराक्रम आदि गुण मनुष्याच्या अंगीं उत्पन्न होऊं शकत नाहींत आणि त्या सद्गुणांच्या अभावीं पारमार्थिक उन्नतीच काय पण ऐहिक उन्नतीची आशा करणें अगदीं व्यर्थ ठरतें. ध्येयनिष्ठेनेंच अनेक संकटांशीं झुंज घेणें, हालविपत्ति सोसणें व प्रसंगविशेषीं प्राणत्यागाचें दिव्य करण्याचें लोकोत्तर सामर्थ्य अंगीं प्रकट होणें दुर्लभच होय. पुराणांतरीं व इतिहासांत अशा थोर सद्गृहस्थांचीं शेकडों उदाहरणें आहेत. तेव्हां वर्तमानकालांतहि असें लोकोत्तर सामर्थ्य प्रकट झाल्याचींहि अनेक उदाहरणें आहेत. पाषाणहृदयास देखील धक्का मारणारें बुद्धीचें हें दिव्य सामर्थ्य ध्येयनिष्ठेनेंच प्रकट होतें, हें कबूल करणें प्राप्त आहे. संकुचित किंवा असंस्कृत बुद्धीला उच्चतम ध्येयाचा निश्चय करतां येत नाहीं. तेव्हां मनुष्यानें आपल्या प्रयत्नानें योग्य दिशेनें पाऊल टाकावें म्हणजे त्यास पारमार्थिक वा ऐहिक सुखाची जोड घेता येईल. समर्थांनीं प्रापंचिक मनुष्यास या जन्मांतच आपल्यास परमार्थाची जोड करून घेतां येईल असेंच केवळ सांगितलें नाहीं, तर "याच देहीं येणेचि काळें। संसारी होईजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें॥" असें स्पष्ट मार्गदर्शन केलें आहे. म्हणून मनुष्यानें चांगली बुद्धि वापरून साधुसंतांच्या मार्गदर्शनाचें महत्त्व लक्षांत घेऊन आपलें पाऊल टाकावें हें विहित नव्हे काय ? साधुसंत वा मोठे अधिकारी केवळ मार्गदर्शन करतात पण अभ्यासाचा मार्ग साधकासच चोखाळावा लागतो. मुलगा मोठा होऊन चालूं लागला म्हणजे आईबाप त्याच्याकडे केवळ लक्ष देतात. तो पडत नाहीं ना अशी खात्री करून मगच त्याचा हात सोडतात. तीच गोष्ट सद्गुरूंची आहे. समर्थ म्हणतात, "तेजाइषारत। तद्वाफोका धरिती।" हें लक्षांत घेतलें पाहिजे. स्वामीमहाराजांसारखे जगद्गुरु आपल्या उपदेशानें साधकाचें समाधान करतात. हीच गोष्ट महाराजांचें चरित्र समग्र वाचल्यास दिसून येईल. त्यांच्या बोलण्यांत पाल्हाळ नाहीं, केवळ इषारा असतो. साधकानें हें समजून घेऊन वागलें पाहिजे असें श्रीसमर्थांचे चरित्रकार श्रीवामनबुवा ब्रह्मचारी यांनीं जें म्हटलें आहे तें योग्यच होय.

ध्येयवस्तूचा विचार करतांना पारमार्थिक व व्यावहारिक असे दोन प्रकार डोळ्यांसमोर उभे राहतात. परंतु आपल्यास या खोल पाण्यांत शिरण्याचें कांहीं एक कारण नाहीं. व्यक्तिमात्राचें ध्येय त्याच्या त्याच्या मानानें अनेकविध असूं शकतें. परंतु

शास्त्रीय दृष्टि लाविली तर त्या ठिकाणीं हरेक व्यक्तीच्या स्वतंत्र ध्येयवादाचा विचार करावयाचा नसतो. मानवी जीवित कसें सुखावह होईल या कामींच धर्मप्रवर्तक व धर्मसंस्थापक आपली बुद्धि खर्चित असल्याचें दिसून येतें. ज्या राष्ट्रांत जन्मास आलो त्या राष्ट्राचें ऋण फेडणें हें आद्यकर्तव्य ठरतें. धर्माचीहि तीच गोष्ट. पूर्वापार आलेले धर्मसंस्कार जीवमात्राच्या हाडींमांसीं खिळलेले असतात. ते दृढ करूनच योग्य मार्गावर गाडी आणणें क्रमप्राप्त असल्यानें राष्ट्रांतील महान नेते या कामीं तनमनधन अर्पण करतात. असलेली घडी विसकटून नवीन घडी बसविण्याचें तें करीत नाहींत. गाडी ज्या ठिकाणीं रुळावरून घसरली असल्याचें दिसून आलें असेल त्याच ठिकाणची स्थिति लक्षांत घेऊनच झालेली चूक सुधारण्याचें काम ते प्रथम करतात. अर्थात् या गोष्टीस अतिशय श्रम लागतात, हें लक्षांत घेणें अगत्याचें आहे. या कामीं विद्यमान जनतेचा त्यांना पाठिंबा असावा लागतो. सद्धर्मप्रवर्तक एकाकी, असें कार्य करूं शकतात. नाहीं असें नाहीं. त्यांच्याहि सामर्थ्यास कांहीं मर्यादाहि राहतेच, परंतु असे महान नेते आपल्या नैतिक बळावर धर्माचा सांधा बेमालूम जुळवितात. म्हणूनच जगाची राहणी स्थिर पायावर उभी राहते. जी गोष्ट सद्धर्मप्रवर्तकांची असते तीच महान साधुसंतांची असते. पण या ठिकाणीं सामुदायिक सुधारणेचा प्रश्न येत नाहीं. कारण कांहीं साधकांना हाताशीं धरून त्यांच्याकडून ते धर्मप्रसाराचें कार्य करवून घेत असतात. श्रीज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, तुकाराम व श्रीसमर्थ रामदास यांच्या कार्याचें समालोचन केल्यास आपल्यासहि खात्री वाटेल. सत्पुरुषांचा अवतार लोकांना भक्तिमार्गावर आणून त्यांच्याकडून पूर्वापार जतन केलेलें आर्यसंस्कृतीचें धन योग्य प्रकारें रक्षून ऐहिक व पारमार्थिक उन्नति साधून द्यावी यासाठींच असतो. देशांत जेव्हां अत्यंत धर्महानि झाली, सर्व बाजूंनीं उच्छेद झाला, राज्यकर्तें धर्मलंड झाले, राष्ट्रांतील बहुजनसमाज सामाजिक कर्तव्यापासून च्युत होऊन उन्मार्गगामी बनला तर त्याला ताळ्यावर आणण्यासाठीं कोणी तरी एक महान नेता उत्पन्न होतो व तो या सर्व गोष्टी ताळ्यावर आणतो असा आजवरचा इतिहास सांगतो. श्रीस्वामीमहाराजांच्या वेळीं सामान्य जनता अशाच प्रकारचें जीवन कंठीत होती हें त्या वेळची परिस्थिति लक्षांत घेतल्यास दिसून येईल. म्हणून अशा लोकांना मार्गावर आणण्यासाठीं श्रीसमर्थांनीं अवतार घेतला असें म्हटलें तर कुठें बिघडलें? प्रसंगविशेषीं खडतर बोलून स्वामीसमर्थ लोकांना

इषारा पुष्कळ वेळां देत असत. जे सुबुद्ध असत त्यांना महाराजांच्या बोलण्याचा आशय समजत असे. इतरेजन आर्त असल्यानें आपलें दैन्य दूर झाल्याचें समाधान मानून ते निघून जात. यावरून लोकांची बौद्धिक पातळी निःसंशय खालावलेली होती हें सहज दिसून येईल असें महाराजांचे एक चरित्रकार श्री. भागवत यांनीं आपल्या चरित्रांत म्हटलें आहे. त्यांत तें पडलें संस्थान ! तेव्हां सन १८०० ते १८७८ च्या कालांतील लोकस्थिति कशी होती हें "**आमच्या देशाची स्थिति**" या सुविख्यात निबंधमालेंतील प्रबंधावरून लक्षांत येईल. अशा विपन्नकाळीं श्रीस्वामीमहाराजांचा सहवास ज्यांना लाभला ते खरोखरीच दैववान होत. सबब त्या कालाचें यथार्थ दर्शन घडणें शक्य असल्यास तें करावें व महाराजांनीं तशा विपरीतकालीं कोणत्या प्रकारें लोकजाग्रति केली हें समजावें या उद्देशानें हें चरित्र लिहिण्याची आंस धरली; व ती स्वामी-महाराजांच्या कृपेनें आम्ही आमच्या शब्दांत जें काय म्हणावयाचें होतें तें या चरित्रांत लिहिलें आहे.

साधुसंतांच्या कामगिरीचें समालोचन एका विशिष्ट दृष्टिकोनांतून न्याहाळावें व परमेश्वरानें दिलेली बुद्धि वापरून मगच त्यांच्या लीलांकडे पाहावें अशी आमची प्रार्थना आहे. साधकाने चिकाटी, श्रद्धा, नित्य अभ्यास, चिंतन, दृढ-भक्ति, सद्गुरूपदिष्ट मार्गावर नितांत निष्ठा ठेवूनच आपलें ध्येय गांठावें एवढें तरी वाचकांच्या ध्यानांत आलें तर आम्हांस समाधान वाटेल. कांहीं तरी नवी गोष्ट लोकांपुढें मांडून आम्ही त्यांच्या बुद्धीचा भेद करूं इच्छित नाहीं. पण डोळस दृष्टि ठेवून जे विद्यमान अवतारी (?) पुरुष प्रकट झाले आहेत त्यांच्या बारीकसारीक गोष्टीवर लक्ष ठेवून त्यांचा उपदेश कितपत फलदायी होऊं शकेल याचें चिंतन करावें. कारण 'जयासि एकांत मानवला । सर्वांआधि कळे त्याला' हा मूलभूत सिद्धान्त श्रीरामदासांनीं लोकांपुढें मांडला आहे. याचें योग्य मनन झालें पाहिजे.

आजच्या घटकेस अवतारकृत्याचे पोरखेळ चालू आहेत. कोणी 'लिंबू-महाराज' म्हणून नांवाजले जात आहेत; तर कांहीं 'फुगडीमहाराज' या नांवानें ओळखले जात आहेत. कांहीं श्रीदत्ताचे अवतार म्हणवितात ! तर कांहीं प्रत्यक्ष श्रीरामदासस्वामीच असें भासवितात ! व कांहीं महाराजांनीं

आपल्यास प्रत्यक्ष अनुग्रह दिल्याचें सांगून लोकांची दिशाभूल करतात. पण शिष्य व भक्त यांतील भेद अज्ञ जनांना कळत नाहीं. कांहीं संन्यासी यतीधर्मास फांटा देऊन सुवर्णादि वस्तूंचा संग्रह करतात; व त्यांचे शिष्य आपल्या गुरूंच्या सामर्थ्याची अवास्तव स्तुति करून लोकांस भुलवितात. कांहीं भुतेंखेतें काढून टाकतों असें सांगून नादीं लावतात. असे महंत आपल्या पदरीं दोन-चार पंडे बाळगतात. या पंड्यांना कांहीं विद्या दिल्याचा त्यांच्या शिष्यांकडून बकवा होतो. मग हे शिष्य जो मनुष्य कष्टमय स्थितींतून बाहेर पडण्यासाठीं अशा महाराजांकडे जातो तेव्हां हे लुच्चे शिष्य त्यास "तुझ्या घरीं झोटिंग आहे, मुंज्या आहे, तुझा पूर्वज कोणीतरी संन्यासी झाला आहे तो त्रास देतो, मागील जन्मीं तूं असा असा होतास तें पातक या जन्मीं उपटलें आहे तेव्हां या सर्वांच्या शांत्यर्थ सहस्र ब्राह्मणांना श्रीगाणगापुरीं भोजन दे, हजार-पांचशें रुपयांचा संकल्प करून ते महाराजांच्या चरणीं अर्पण कर म्हणजे तुझी स्थिति चांगली सुधारूं लागेल." अशा प्रकारे नानाविध उपाय सांगून त्या अगतिक जीवाकडून शेंकडों रुपये उकळतात. त्या सर्वांचा हेतु इतकाच कीं महाराजांचे व त्यांच्या परिवारांतील परिचारकांचें जीवन विनामूल्य व विनायासानें चालावें असें असतें. श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनीं "जनस्वभावगोसावी" हें प्रकरण लिहिलें आहे. तें आजहि लोकांना मार्गदर्शक होऊं शकेल. साधकांनीं अत्यंत साक्षेपानें व सावधान चित्तानें तें वाचावें म्हणजे चालू घडींतील अवतार-कृत्याचा पोरखेळ करणाऱ्या आणि ढोंगधत्तुरा माजविणाऱ्या बुवांच्या लीला तपासून पाहण्यास निःसंशय हितकारक होईल व वर आम्ही जीं विधानें केलीं आहेत त्यांची सहज प्रचिती येईल. महंताकडे येणारी व्यक्ति कशानें तरी पछाडली असली पाहिजे असा सिद्धान्त हे जवळ असणारे पंडे उराशीं बाळगून एकेकाला १०।१०।१२।१२ भुतें लागल्याचें दडपून सांगतात. श्रीक्षेत्रवाडी, औदुंबर वा श्रीगाणगापूर या ठिकाणीं गेल्यावर आपण पाहावें. एक भूत लागलें म्हणजे त्या मानवी प्राण्याची काय त्रेधातिरपिट होते हें लक्षांत घेतल्यास दडपून १०।१२ भुतें लागल्याचें ऐकिल्यांवर त्या हतभागी जीवांचा मुडदाच पडला पाहिजे. पण असें सांगितल्याशिवाय पंड्यांचे चाळे कसे चालणार ? त्यांची पोळी कशी पिकणार ? कांहींना साधुश्रेष्ठ समजून त्यास आपल्या निवासस्थानांत आणवून आपली वास्तु कशी काय आहे असेंहि विचारतात. कांहीं महंतांनीं

तुमच्या वास्तूंतून १०।१५ कृष्णसर्प आम्ही समुद्रास पाठविले आहेत असें दडपून सांगितल्याचें आम्हांस माहीत आहे ! ! त्या वास्तूच्या मालकास इतके काळसर्प असतांना ते कसे दिसले नाहींत असा कोणीं प्रश्न विचारल्यास ते लोकांना दिसल्यास फार त्रास होईल म्हणून रात्रींच्या वेळीं त्यांस काढून लावलें असें सांगून हे महंत मोकळे होतात ! असा प्रकार आम्हांस आमच्या एका स्नेह्याकडे घडल्याचें ठाऊक आहे. एवंच आजच्या विपत्कालीं असे वेढूट प्रकार होत असल्यानें लोकांच्या संपत्तीची नासधूस होऊन ते परत भिकारीच राहतात. भुतेंखेतें सुटत तर नाहींत पण पैशाचा दुरुपयोग होऊन अधांतरीं लोंबकळत बसण्याची या दुर्दैवी जीवास पाळी येते ! तेव्हा या सर्व खाचाखोची नीट ध्यानांत घेऊन अवतारकृत्याचा बाजार चालविणाऱ्या विद्यमान साधुसंतांकडे जातांना फार जागरूक राहावें. अंतरज्ञानी पुरुष अशा भानगडींत पडत नाहीं. पंडे जवळ बाळगीत नाहीं, प्रचारकार्य करीत नाहीं, ध्येयांवरील पकड ढिली करीत नाहीं, आपल्यास सर्वांपेक्षां जास्त कळतें म्हणून भलभलते सिद्धान्त लोकांपुढें मांडत नाहीं, हें लक्षांत घ्यावें. समर्थांचा अशा गोष्टींवर अत्यंत कटाक्ष होता. लीलावतारी श्रीसमर्थमहाराज, अक्कलकोट, अशा भोंदूंची कशी हबेलंडी उडवीत असत हें त्यांच्या चरित्रावरून दिसून येईल. बुवा, बैरागी, लफंगे, संन्यासी, वावदूक, विद्वान, घमेंडखोर वेदांती हे त्यांच्यापुढें जाण्यास भीत असत. महाराज ज्यांना जें ज्ञान पचेल तेंच त्यांस देत. लोकोद्धाराची तळमळ असल्यानें त्यांना वेडेंवांकडें कांहीं खपत नसे. ताडकन ते कसें वागावें व आपलें वर्तन कोणत्या प्रकारें ठेवावें याची योग्य वेळीं चर्चा करून जाणत्या लोकांना सदुपदेश पाजीत असत. महाराजांचें असें हें नितांत उद्‌बोधक चरित्र आहे. त्यांच्या चरित्राचे धागेदोरे नीट समजून घेऊन आपली गाडी योग्य मार्गावर आल्याचें समाधान खात्रीनें वाटेल, यांत तिळमात्र शंका नाहीं. महाराजांकडे आलेल्या विभूति, सामान्य व्यक्ति, संन्यासी आणि जिज्ञासू साधक यांचीं त्रोटक चरित्रें आज उपलब्ध आहेत. तरी तेवढ्यावरून या लोकांमध्यें आमूलाग्र कसा फरक पडत गेला हें समजेल. श्रीस्वामी महाराजांनीं लौकिक दृष्ट्या आपला अवतार शके १८०० मध्यें संपविला तरी पुष्कळांना त्यांच्या साक्षित्वाची आजहि खात्री पटत आहे. ही गोष्ट औपनिषदिक सिद्धान्तांना अनुसरूनच घडत आहे. तसे नसते तर उत्कट साधकांना अनुभव येता ना ? श्रीस्वामीरायांनीं शेवटीं आपल्या

कृपेची पखरण भक्तांवर असते असें गीतेंतील श्लोकानें दिली आहे. " अनन्याश्चितयन्तो मामयेजनाः पर्युपासते । त्वेषांनित्याभियुक्तानां योगक्षेमं भवाम्यहं " दासाचे ते कधींहि कमी पडूं देत नाहींत. असो.

शेवटीं महाराजांच्या उपासनेंत साधकांचा जो काल जाईल तो अत्यंत सुखाचा आणि आनंदमय असाच जाईल. समर्थ म्हणतात, ज्या वस्तूच्या शोधार्थ मानवी जीव खटपट करतो ती वस्तूच त्याला शेवटीं खाऊन टाकते. परब्रह्मस्वरूपाचा अनुभव आल्यानें तो ब्रह्मानंद भोगतो. हा ब्रह्मानंद कशा प्रकारचा असतो यासंबंधानें तैतिरीयोपनिषदांतील 'आनंदवल्ली' हा भाग वाचावा. उपनिषद द्रष्टे आपल्या आठव्या अनुवाकांत म्हणतात, " ते ये शतं मानुषाआनंदाः । स एको मनुष्यगन्धर्वाणामानंदाः । श्रोत्रियस्य चा कामहतस्य । ते ये शतं मनुष्यगन्धर्वाणामानन्दा । स एको देवगन्धर्वाणामानंदः । श्रोत्रियस्य चा कामहतस्य । ते ये शतं देवगन्धर्वाणामानंदाः । " इत्यादि; याचा थोडक्यांत अर्थ असाः--पृथ्वीचें राज्यपद मिळाल्यास जो आनंद होईल तो मनुष्य आनंद होय, असे शंभर मानुषानंद म्हणजे मनुष्यगंधर्वांचा एक आनंद होय. मनुष्यगंधर्वांचे शंभर आनंद म्हणजे देवगंधर्वांचा एक आनंद होय. देवगंधर्वांचे शंभर म्हणजे चिरलोक पितरांचा एक आनंद. चिरलोक पितरांचे शंभर म्हणजे आजाननामक देवांचा एक आनंद; याचे शंभर म्हणजे कर्मदेवांचा एक; याचे शंभर म्हणजे देबाचा एक; देवांचे शंभर म्हणजे इंद्राचा एक आनंद; इंद्राचे शंभर म्हणजे बृहस्पतीचा एक, बृहस्पतीचे शंभर आनंद म्हणजे प्रजापतीचा एक आनंद होय. प्रजापतीचे शंभर आनंद म्हणजे ब्रह्मानंद होय. या ब्रह्मानंदाची प्राप्ती करून घेणें म्हणजे निरतिशयानंदस्वरूपाची प्राप्ती करून घेणें होय. मानवी आनंदापासून ब्रह्मानंदापर्यंत सरासरी १०।१२ पायऱ्या या ठिकाणीं दाखविल्या आहेत. मनुष्य साधनचतुष्टयसंपन्न असेल तर या सर्व पायऱ्या चढून जातो. तसेंच ज्ञानविज्ञान यांच्या साह्यानें सर्व पायऱ्या चढून ब्रह्मानंदाची अनुभूति घेऊं शकतो असें उपनिषदें सांगतात. तेव्हां मानवास सद्गुरूंवर श्रद्धा ठेवून हे साध्य साधण्याची बुद्धि श्रीसमर्थांच्या कृपाप्रसादानें त्यास होवो अशी आम्ही श्रीचरणीं प्रार्थना करून श्रीज्ञानराज माऊलींनीं म्हटल्याप्रमाणें " आतां विश्वात्मकें देवे । एणेवाग्यज्ञे तोषावें । तोखौनि मज देयावें । पसायदान हें ॥ ७२ ॥ जें खलांची वाकुडैमोडे । तेया सत्संगीरतिवाढे । भूतापरस्परें पडे

मैत्रजीवांचे ॥ ७३ ॥ दुरितांचे तिमिर जाओ । विश्व स्वधर्म सूर्यों पाहो । वांछिल तें तें लाहो । प्राणिजात ॥ ७४ ॥ " ( राजवाडेप्रत ) अशी प्रार्थना करून हंसक्षीरन्यायानें वाचक या ग्रंथांतील गुणदोषांकडे पाहतील अशी मनीषा बाळगून लांबलेली ही प्रस्तावना श्रींच्या चरण कमलीं अर्पण करतों.

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८८२<br>
" सद्गुरुभुवन " सदाशिव ३२७ पुणें

समर्थचरणरज<br>
रा. शि. सहस्त्रबुद्धे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.
अनुक्रम 33६८५ वि: ---
क्रमांक 90६५८ नों दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

॥ श्री अवधूत निरंजन श्रीगुरुदेवदत्त ॥

## अध्याय पहिला

# अवतारांचें रहस्य

श्रीदत्तावतार श्रीमत् जगद्गुरु श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांच्या चरित्रासंबंधानें जी माहिती आज उपलब्ध आहे त्या माहितीवरून श्रीस्वामींच्या लीलांचेंच वर्णन सर्वांनीं केल्याचें दिसून येईल. श्रीगुरुचरित्रांत श्रींच्या अनेक गोष्टी दिल्या आहेत. श्रींनीं आपल्या इहलोकाच्या अवतारांत अनेकांना पावन करून त्यांचा उद्धार केला आहे. भक्तांना धर्ममार्गाचें रहस्य समजावून देऊन त्यांना योग्य दिशेनें उपासना कशी करावी यासंबंधीं मार्गदर्शन केलें. श्रीगुरुचरित्र आपण बारकाईनें वाचलें तर आपल्यास भक्तीबरोबर ज्ञानाची माहिती किती मोठी आहे यासंबंधींचें पूर्ण विवेचन त्या ग्रंथांत मिळेल. मनुष्य कितीहि संकटांत असो त्यास श्रीगुरूंनीं आपला समजून अनुग्रह केला कीं त्याची मनःस्थिति पार पालटून जाऊन तो सन्मार्गप्रवर्तक होऊन स्वतः तरून जातो व तो दुसऱ्यासहि तारू शकतो. कारण श्रीमद्भगवद्गीतेनें म्हटल्याप्रमाणें 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्त देवेतरोजनः ॥ स-यत्प्रमाणं कुरूते लोकस्तदनुवर्तते (अ. ३–२१)' सामान्य माणसांना सत्प्रवृत्त लोकांकडून मार्गदर्शन होतें व त्यामुळें त्यांचाहि फायदा होतो. भारतवर्षांत अशीं शेकडों उदाहरणें देतां येतील. त्यांपासून आपण एवढाच बोध घेऊं कीं महान पुरुषांपासून सामान्यजनांच्या जीवनक्रमांत फरक होतो.

श्रीगुरुचरित्रावरुन आपल्यास श्रीदत्तात्रेयांनीं किती अवतार लोककल्याणासाठीं घेतले याची माहिती मिळते. श्रीसरस्वतीगंगाधरानें अत्यंत साक्षेपानें कथा गोळा करून लोकांवर अत्यंत उपकार केला आहे. अवतारी पुरुष आपल्या इहलोकींच्या वास्तव्यांत अनेकविध लीला करून लोकांच्या मनांत परमेश्वराविषयींचें नितांत प्रेम उत्पन्न करून 'परमेश्वर' म्हणजे काय व त्याची प्राप्ती व्हावी असें वाटत असेल तर मानवानें काय केलें पाहिजे यासंबंधीं मार्गदर्शन करीत असतात. मार्गदर्शनाचे अनेक प्रकार आहेत. ते स्वतः होऊन कोणास दाटून उपदेश देत नाहींत. श्री रामदासस्वामींनीं आपल्या दासबोधांत म्हटल्याप्रमाणें "दाटून उपदेश देऊं नये." कारण उघड आहे. उपदेश ज्याला करावयाचा त्याची पात्रापात्रता प्रथम विचारांत घेऊनच नंतर त्यास उपदेश देणें वाजवी ठरतें. कारण, सवंग उपदेश वांया जातो, व लोकांना त्याचें महत्त्व वाटत नाहीं. म्हणून सत्पुरुष असे सवंग होऊं शकत नाहींत. गीताग्रंथांत सांगितल्याप्रमाणें "गुरूची सेवाचाकरी केल्यावर अथवा त्यास शरण जाऊन कांहीं प्रश्न विचारून आपल्या शंकांचें समाधान करण्याबद्दल आग्रहपूर्वक विनंती केल्यावर मगच ते त्यास मार्ग दाखवितात व प्रसंगीं उपदेश देतात." असें जरी असलें तरी त्यांसहि कांहीं मर्यादा आहेच. कारण जो विचारणारा आहे त्याची मानसिक तयारी कितपत आहे, त्यास खरोखरीच परमार्थाची तळमळ वा आंच आहे कीं नाहीं, कां भलत्याच्या नादीं लागून परीक्षा घेण्याची इच्छा आहे, याची सद्गुरु मनाशीं शहानिशा करून मगच त्यास त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें देतात, श्रीतुकाराममहाराज म्हणतात, "अधिकार तैसा करू उपदेश." या न्यायानें श्रीगुरुदेव त्यास जवळ करून बोध करतात. या सर्वांचें मंथन श्रीगुरुचरित्रावरून सामान्य वाचकांना समजण्यासारखें आहे. हा ग्रंथ अत्यंत सुलभ असून तो सर्वांना समजेल असा असल्यानें त्या ग्रंथांतील श्रीदत्तात्रेयाच्या अवतारांचें रहस्य आपल्यास समजेल.

या ग्रंथावरून आपल्यास आणखी एका गोष्टीकडे लक्ष देणें भाग आहे. ती म्हणजे गुरूंच्या ठिकाणीं अत्यंत निष्ठा असणें. निष्ठा नसेल तर उपासना व्यर्थ होय. कारण उपासना याचा अर्थच असा आहे कीं सद्गुरूजवळ बसणें. म्हणजे त्यांच्या सान्निध्यांत आपलें जीवित व्यतीत करणें होय. प्रसंग कसाहि येवो त्यांतून तारून नेण्याचें काम श्रीसद्गुरूचें असल्यानें साधकास याबाबतींत कोणत्याहि प्रकारची काळजी करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण "साधक भावें नमस्कार घाली ।

त्याची चिंता साधूस लागली। सुगमपंथें नेऊन घाली। जेथील तेथें।" या श्रीसमर्थोक्तीप्रमाणें आपण त्यांच्या कृपेवर विसंबून असावें. श्रीगुरुचरित्रांत या निष्ठेला प्राधान्य दिलें असल्यानें साधकांनीं आपलें अंतःकरण तपासून पाहावें. आणि मगच या निष्ठेचा अर्थ त्यांच्या ध्यानांत येईल. कारण 'सद्गुरु' ही वस्तु अशी नाहीं कीं ती सहजासहजीं आढळून येईल. "सद्गुरु" म्हणजे आत्मज्ञान, आत्मपरिचय, स्वरूपसाक्षात्कार, आत्मानुभूति, होय. याचा अर्थ "साधक" आत्मप्रत्यय वा आत्मज्ञान झाल्यावर निराळा राहूं शकतच नाहीं. श्रीसमर्थांच्या भाषेंत म्हणावयाचें झाल्यास "वस्तूस पाहूं गेल्यास ती साधकाचीच आहुती मागते." स्वरूपज्ञान झाल्यावर साधकाचें अस्तित्व संपलें. विभक्त म्हणजे भक्त-नव्हे. तर याच्या उलट ती स्थिति असते. देवाभक्तांचें ऐक्य म्हणजे आत्मज्ञान होय. तें प्राप्त करून घेण्यासाठीं मनुष्यानें अतिशय कष्ट केले पाहिजेत. स्वतःस जो विसरूं शकेल तोच टिकेल. जे उगमा अलिकडे आले ते तरले नाहींत पण जे उगमापलीकडे गेले ते मात्र तरले. याचा अर्थ अत्यंत उघड आहे. प्रवाहपतित सर्वच आहेत पण त्या प्रवाहाबरोबर वाहत न जातां उलट दिशेनें गेले म्हणजे आपण योग्य मार्गावर जातो. तो स्वतः तरतो व तो दुसऱ्यासहि तारून नेतो. यांत तिल-प्राय शंका घेण्याचें कारण नाहीं.

याच दृष्टीनें आपण साधुसंतांच्या चरित्राकडे पाहतों व त्यांच्या सान्निध्यांत जे लोक आले व त्यांनीं जे आपले अनुभव लिहून ठेविले त्यावरून आपल्यास बोध घेण्याचा मार्ग सांपडतो. श्रीनरसिंह सरस्वतींनीं जेव्हां अवतार धारण केला होता त्या वेळीं यावनी सत्तेचा प्रार्दुभाव झाला होता तरी त्यांच्या महनीय व अतुल प्रभावानें व सामर्थ्यानें यावनी सत्तेचा जोर होता तरी त्यांनीं आपली छाप लोकांवर बसवून त्यांस योग्य ती दिशा दाखविली. अशीं पुष्कळ उदाहरणें लोकां-पुढें आहेत. ते स्वतः होऊन कोठे संचारास गेल्याचें दिसत नसलें तरी ते शैल्याकडे गेल्याचें दिसतें. पण तें त्यांचें कार्य नव्हे. तरी सुद्धां त्यांच्या संचारा-मुळें लोकांमध्यें यदृच्छया जी जागृति होते त्यामुळेंच त्यांचें उद्दिष्ट सिद्धीस जातें. अवतारी पुरुष व त्यांचें अंशावतार यांच्यामध्यें जो एक महत्त्वाचा भेद आहे तो आपण लक्षांत घेत नाहीं. त्यामुळें बराच घोटाळा होतो. अवतारी पुरुषांचें कार्य कोणास तरी हातीं धरून त्याच्याकरवी समाजाची घडी बसविण्याचेंच आहे. प्रत्यक्ष जनांत संचार करून उपदेश देऊन त्यांना नित्य मार्गदर्शन करणें ते

स्वतः करीत नाहींत. त्यांचें शिष्य वा प्रशिष्य हें कार्य करतात. अशा लायक शिष्यांची पारख करूनच मग ते त्यांस अनुज्ञा देतात असा आजवरचा इतिहास आहे. महाभारतांतील श्रीकृष्णाचे उदाहरणावरून आपल्यास काय समजून येतें? श्रीकृष्णांना जेव्हां स्वतःच काम करावयाचें होतें तेव्हां त्यांनीं तें केलें. याचा अर्थ सामान्य माणसाकडून त्यावेळीं जे राक्षसाधम व समाजकंटक होते त्यांचा बंदोबस्त इतरांकडून होणें शक्य नसल्यानें श्रीकृष्णांना स्वतःच त्यांकडे लक्ष पोंचविणें भाग पडलें व त्यांनीं कंसादि नतद्रष्टांचा संहार केला; व पुढील भूमिका सुकर करून अर्जुनास आपल्या पंखाखालीं घेऊन उरलेल्या कंटकांचा समाचार घेवविला. ही गोष्ट आपण गीतेचा ११ वा अध्याय वाचल्यास चटकन लक्षांत येईल. त्या ठिकाणीं परमेश्वराच्या सामर्थ्याचा केवढा मोठा पसारा आहे व त्यांतून कोणताही प्राणी सचेतन वा अचेतन सुटूं शकत नाहीं किंवा सुटूं शकणार नाहीं ही गोष्ट विशद झाली. या एका महनीय उदाहरणावरून अवताराचें रहस्य आपल्या ध्यानांत येईल. म्हणून श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांच्या चरित्राचें अवगाहन नीटपणें केलें तर आम्ही वर जो सिद्धान्त मांडला आहे त्याचें रहस्य आपल्या ध्यानीं येईल.

श्रीस्वामीमहाराजांच्या ठावठिकाणाबद्दल पुष्कळ तर्ककुतर्क आहेत. कांहींचें म्हणणें ते अमक्या एका खेड्यांत जन्मास आले व तेथून त्यांनीं आपल्या कार्यास प्रारंभ केला. एक गोष्ट खरी कीं श्रीनरसिंहसरस्वती जेव्हां कर्दळीवनांत गेले व तेथें ते कांहीं काल अज्ञात अवस्थेंत राहिले; तेथून ते दुसरीकडे गेले. त्यांचीच परंपरा श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांनीं चालविली. तेव्हां श्रीनरसिंह-सरस्वती म्हणजेच श्रीअक्कलकोटस्वामीमहाराज होत यांत आम्हांस शंका वाटत नाहीं. कारणें तशींच बलवत्तर आहेत. श्रीगाणगापुरास अनेक भक्त जेव्हां अनुष्ठानास जात तेव्हां त्यांपैकीं कित्येकांना अक्कलकोटास जाण्याची आज्ञा झाल्याचें माहीत आहे. विद्यमान युगांत अशी दोनतीन उदाहरणें घडल्याचें प्रत्यक्ष माहीत आहे. यावरून श्रीगाणगापूरचें पीठ व श्रीअक्कलकोट येथील पीठ हीं एकच होत. याहिपुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं श्रीदत्तगुरूंचीं जीं अनेक पीठें भारतांत आहेत तीं सर्व एकाच विभूतीचीं आहेत. कारण योगबलाचें रहस्य ज्यांना माहीत आहे त्यांना अवतारी विभूति आपल्या इच्छेप्रमाणें भूलोकावर रहातात व अवतार संपविण्याचा काल आला म्हणजे कांहीं तरी निमित्त

काढून लौकिकरीत्या तो समास करतात. अशीच गोष्ट श्रीनरसिंहसरस्वती यांच्या कृतींत झाली हें उघड होय. साधकांनीं या गोष्टीचा नीट विचार करून मनन करावें म्हणजे त्यास या गोष्टीची प्रचीति येण्यास वेळ लागणार नाहीं असा आमचा पूर्णतया विश्वास आहे.

श्रीस्वामीमहाराज अक्कलकोटास येण्यापूर्वी ते ठिकठिकाणीं गेल्याचे उल्लेख श्रीगुरुलीलामृतांत आहेत. महाराजांचे एकनिष्ठ शिष्य श्रीवामनबुवा ब्रह्मचारी वैद्य हे महाराजांच्या सान्निध्यांत पुष्कळ दिवस होते. महाराजांनीं त्यांची सेवा व भक्ति लक्षांत घेऊन त्यांस अनुग्रह देऊन कृतार्थ केलें होतें. महाराजांच्या सान्निध्यांत असतांना शेंकडों लोक महाराजांच्या दर्शनास आले व त्यांना जे कांहीं अनुभव आले त्यासंबंधीं त्यांनीं माहिती गोळा करून एक ५६ अध्यायाचे सुंदर चरित्र लिहिलें आहे. ते गुरुचरित्राप्रमाणें सर्व भाविकभक्त आजहि मोठ्या भक्तिभावानें पठन करीत आहेत. या गुरुलीलामृतांत सर्व तऱ्हेची माहिती समाविष्ट केली आहे. त्यावरून महाराजांच्या येथील वास्तव्यांत त्यांनीं केलेल्या अनेक लीला व अनेक भक्तांनीं आपल्यास आलेले अनुभव यांची माहिती मिळते. श्रीवामनबुवांचें हें चरित्र विश्वसनीय आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. महाराजांचीं चरित्रें अनेक भक्तांनीं लिहून ठेविली आहेत. श्रीअवधूतस्वामी आज हयात आहेत. अवधूतस्वामींचे गुरूवर श्रीस्वामीमहाराजांची कृपा झाली होती. त्यांनीं आपल्यास आलेल्या अनुभवाचें टांचण ठेवल्याचें माहीत आहे. तें हस्तलिखित टांचण व श्रीस्वामीसुतांच्या परंपरेंतून एक नगरकडील शिष्यानें कांहीं टांचण व टिपणें करून ठेवल्याचें समजतें. हें टिपण आमच्या एका स्नेह्याजवळ पाहावयास मिळालें. तसेंच श्रीतातामहाराज यांच्या परंपरेंतील एक हस्तलिखित श्री घोत्रे ( पुणें ) यांच्याकडे होतें. तें त्यांनीं कृपा करून अवलोकनास दिलें होतें. दुसरीं एकदोन हस्तलिखितें या चरित्रग्रंथाचें कामीं पहावयास मिळालीं. या सर्व चरित्रग्रंथांतून ( प्रसिद्ध व अप्रसिद्ध ) श्रीवामनबुवा ब्रह्मचारी यांनी लिहिलेल्या श्रीगुरुलीलामृतांतीलच गोष्टींचें कथन आढळून येते. स्वतंत्र असें चरित्रलेखन नाहीं. मागें मुंबईस " जगत्‌हितेच्छू " नांवाचें एक पत्र निघत होतें. त्यामधून श्रीस्वामींच्या संबंधानें पुष्कळ माहिती आली होती. तशाच प्रकारची माहिती " पुणेंवैभव " यांत व " ज्ञानप्रकाशांत " प्रसिद्ध झाली होती. या दोन पत्रांतील माहिती उपलब्ध नसल्यानें त्यांचा उपयोग करतां आला नाहीं

याबद्दल फार वाईट वाटतें. असें असलें तरी यांतून मार्ग काढणें अत्यंत जरूरीचें आहे असें मनानें ठरविलें. मुंबईचे एक सद्‌गृहस्थ श्रीस्वामीभक्त कै. गणेश बल्लाळ मुळेकर यांनीं एक विस्तृत चरित्र प्रसिद्ध करून स्वामीभक्तांवर मोठे उपकार केले आहेत. त्या ग्रंथाची सुधारून काढलेली आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाल्यामुळें तिचा प्रस्तुत चरित्र लिहिण्याचें कामीं पुष्कळ उपयोग झाला हें नमूद करणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों. तसेंच महाराजांचें कांहीं भक्त आहेत. त्यांनींहि आम्हांस आपले अनुभव सांगून उपकृत केलें आहे. या सर्वांचा उपयोग फार झाला. एवंच या सर्व गोष्टी जमेस धरून हें चरित्र लिहिण्याचें धाडस करीत आहोंत. श्रीसमर्थांच्या अगम्य लीलांचें माझ्यासारख्या पामरास वर्णन करतां येणार नाहीं. कारण महाराजांची प्रकृति दिसावयास अत्यंत उग्र असल्यानें त्यांच्या सान्निध्यांत असणाऱ्यांना त्यांना ठावठिकाणा विचारण्याचें धैर्य झालें नाहीं. फणसासारखी वरवर खरबडींत दिसणारी त्यांची उग्र प्रकृति अत्यंत हळवी व क्षमाशील होती. महाराजांच्या परिवारांत जे लोक आले त्यांचा असाच अनुभव आहे. त्यांतून निवड करून कांहीं भागांचें विवरण करतां आलें तर तें करावें असा मनाचा उद्देश असल्यानें जसें जमेल तसें लिहिणें असें ठरवून हें चरित्र तयार केलें आहे. तेव्हां वाचकांना यांत कांहीं चांगला भाग दिसला तर ती महाराजांची कृपाच समजेन.

## अध्याय दुसरा

# श्रीमहाराजांचें मंगळवेढ्यास आगमन

श्रीस्वामी महाराज हे अक्कलकोटास सन १८५७ सालचे आरंभीं आल्याचें मुळेकर यांनीं आपल्या चरित्रांत नमूद केलें आहे. महाराजांचें आगमन अक्कलकोटास होण्याचे अगोदर ते मंगळवेढ्यास व सोलापुरास कांहीं काल होते. यासंबंधीं ऐतिहासिक माहिती मिळते. मंगळवेढ्याचे सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीसीतारामहाराज यांच्यावर श्रीस्वामीमहाराजांची पूर्ण कृपा झाल्याची माहिती पुष्कळ लोकांना अवगत नाहीं. श्रीसीतारामहाराजांचा इतिहास अत्यंत बोधप्रद आहे. यासंबंधायें कैलासवासी लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनीं त्यांची भेट पंढरपुरास घेतली होती. त्यासंबंधीं एक त्रोटक टांचण उपलब्ध आहे. श्री. पांगारकर यांनीं आपल्या आत्मचरित्रांत यासंबंधी उल्लेख केला आहे. त्यावरून श्रीसीताराम म्हणजेच प्रतिश्रीस्वामी असें समजून येईल. श्रीसीतारामहाराज यांचें एक त्रोटक चरित्र उपलब्ध आहे त्यावरून श्रीसीतारामांना ५–६ वर्षें श्रीस्वामीमहाराजांच्या सान्निध्यांत अक्कलकोटास राहण्याचें भाग्य लाभलें होतें. श्रीस्वामीमहाराज मंगळवेढ्यास बरेंच दिवस होते. त्यासंबंधी बरीच माहिती लोकांना होती. परंतु त्या कालच्या सज्जनांनीं महाराजांसंबंधानें कांहींएक लिहून ठेवलें नाहीं हें पाहून अत्यंत विषाद वाटतो. मंगळवेढ्यास महाराज श्री. पटवर्धन यांच्या मळ्याचे बाजूस राहात होते. तेथील वास्तव्यांत त्यांनीं अनेकांवर कृपादृष्टि केली होती. परंतु माहिती नसल्यानें त्यांचें निवेदन करणें योग्य नाहीं आपल्याकडील लोकांत चिकित्सक बुद्धीच कमी असल्यानें जी एक ज्ञानलालसा

असावयास पाहिजे ती नसल्यानें भारतांतील अनेक सिद्धमहंतांची माहिती अज्ञात राहिली ! ! सुदैवानें महाराजांच्या बाबतींत तसें झालें नाहीं. एक दोन गोष्टींचा पत्ता लागतो. इसवी सन १८३८ सालीं महाराज मंगळवेढ्यास प्रथम प्रकट झाले. या ठिकाणीं ते कमीतकमी १२ वर्षें होतें. तेथील पटवर्धन इनामदार यांच्या कुरणांत ते हमेषा राहात असत. एखादे वेळीं गांवांत येत. परंतु भलंत्याच ठिकाणीं बसत व कोणी कांहीं दिलें तर तें भक्षण करीत असत. कांहीं वेळ गांवांत राहात. लगेच ते कुरणाचा रस्ता धरीत असत. सामान्य लोकांच्या दृष्टीनें ते वेडे असावेत असें दिसे. महाराजांचा मुक्काम मंगळवेढ्यास असतांना बाळकृष्णबोवा नांवाचें एक महान सत्पुरुष राहत होते. ते मोठे विठ्ठलभक्त होते. श्रीस्वामीमहाराजांना ते वरचेवर भेटावयास जात असत. बाळकृष्णबुवा आले म्हणजे महाराजांची स्वारी दोन्ही हात कमरेवर ठेवून उभी राही व नंतरच श्रीबाळकृष्णबुवा त्यांचे चरणावर मस्तक ठेवून जात असत. या बाळकृष्णबुवांनीं तेथें बरेच चमत्कार केल्याचें समजतें. आंधळ्या मुलांस दृष्टि देणें, विहिरीस पाणी आणणें वगैरे गोष्टींची नोंद आहे. एवढें असून तेथील लोकांनीं त्यांच्या चरित्राची माहिती लेखरूपानें ठेविली नाहीं. यामुळें महाराजांचा व त्यांचा संबंध कसा जडला, त्यांची उपासना कशी होती, त्यांनीं कोणास उपदेश दिला वगैरे बद्दल कांहींहि ज्ञान नाहीं ! बाळकृष्णबुवांची तेथें कांहीं शिष्यमंडळी असल्याचें वृद्धांचेकडून ऐकिलें होतें. यासंबंधानें आधुनिक चिकित्सकांनीं संशोधन करण्याचें मनावर घेतल्यास कांहीं गोष्टी उघडकीस येतील ! आमचे परमस्नेही कै. मायदेववकील यांना हा नाद होता. त्यांनीं तेथील सत्पुरुष भक्तश्रेष्ठ दामाजी यांची माहिती साक्षेपानें गोळी केली होती. या संशोधनावर इतर संशोधन करावें असें माझें व त्यांचें बोलणें झालें होतें, परंतु ते अकालीं निवर्तल्यानें तें कार्य अर्धवट राहिलें ! सीतारामममहाराज अलिकडेच झाले आहेत. मंगळवेढ्यास तेहि ३२ वर्षें होते. तेव्हां श्रीदामाजीच्या सुप्रसिद्ध गांवांत अशा सुप्रसिद्ध भक्तांची माहिती मिळेल असा भरंवसा आहे. हल्लींचें युग संशोधनाचें असल्यानें आज तसा कोणी प्रयत्न केल्यास तो स्वागतार्ह ठरेल. या सत्पुरुषांची बाब सोडली तरी महाराजांनीं केलेले कांहीं चमत्कार लोकांना माहीत असल्यानें ते चरित्रग्रंथांत आधुनिकांनीं दिले आहेत; महाराज मंगळवेढ्यास " दिगंबरबुवा " या नांवानें ओळखले जात.

बाळकृष्णबुवा तेथें असतांना महाराज अधूनमधून गांवांत येत असत. महाराजांनीं १०१५ लोकांवर अनुग्रह केल्याचा पुरावा हातीं असल्यानें त्या गोष्टी नक्की घडल्या याबद्दल संशय घेण्याचें कांहीएक प्रयोजन नाहीं. सत्पुरुषाजवळ कांहीं चमत्कार असल्याशिवाय त्यांची प्रसिद्ध होत नाहीं अशी एक खुळी व अडाणी समजूत आहे. अधिकारी पुरुष चमत्कारांच्या पाठीमागें लागत नाहींत. त्यांचें वचन हें सिद्ध असते हें लक्षांत येण्यास बराच काल लागतो. कोणी कांहीं तरी सांगतो व त्या गोष्टीवर फाल्तू माणसांचा विश्वास बसतो. त्यामुळें कांहीं तरी अधिकृत व बाष्कळ माहिती पुढें येते. त्यामुळें लोकांची दिशाभूल होतें हें लक्षांत घेतल्यास अधिकारी पुरुषांचें कार्यक्षेत्र कसें सोज्वळ असूं शकतें हें चटकन लक्षांत येईल. महाराज एकदां गांवांत आले असतां एका ब्राह्मणाच्या घरीं गेले व त्यांनीं त्या ब्राह्मणास खाण्यास दशमी मागितली. ब्राह्मणानें विनियानें महाराजांना सांगितलें कीं “ महाराज, गाय आहे, परंतु ती दूध देत नाहीं. ” ब्राह्मणाचें म्हणणें ऐकून महाराजांनीं त्या ब्राह्मणाच्या गायीच्या अंगावरून हात फिरविला व तिला उद्देशून म्हणाले, “ बाई, ब्राह्मण कुटुंबवत्सल आहे, दूध देत जा ” एवढें म्हणून त्यांनीं त्या ब्राह्मणास गायीचें दूध काढण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें त्या ब्राह्मणानें गायीचें दूध काढलें. महाराजांनीं त्यास दुधांतील दशमी करावयास सांगून ते तेथून निघून गेले. संध्याकाळीं महाराजांनीं त्याच्या घरीं दशमी खाऊन त्यांस आशिर्वाद देऊन धन्य केलें. याच ठिकाणीं एक बसाप्पा तेली नांवाचा गृहस्थ होता. तो दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें दारिद्र्यांत पिचत होता. त्याची बायको मोलमजुरी करून पोट भरून असे. बसाप्पास मात्र महाराजांच्या ठिकाणीं कांहीं विलक्षण शक्ति असल्याची मनोमन खात्री झाली व तो त्यांच्या नादीं लागला. आपला नवरा या वेड्याच्या नादीं लागल्याचें पाहून त्याच्या बायकोनें त्याची कानउघाडणी केली होती. परंतु स्वामीचरणावर पूर्वसुकृतानुरूप त्याचा अत्यंत विश्वास असल्यानें त्यानें कशाचीहि पर्वा केली नाहीं. एके दिवशीं तो महाराजांच्या भेटीस पटवर्धनांच्या कुरणांत गेला असतां तेथें महराज एका कंटकाच्या शय्येवर मोठ्या आनंदानें झोपल्याचें दिसलें ! ! हें पाहून बसाप्पास अत्यंत विस्मय वाटला. महाराज हे साक्षात् ब्रह्मच होत अशी खात्री झाली व तेव्हांपासून त्यांच्या ठिकाणीं त्याची दृढ श्रद्धा बसली. महाराज. दिगंबर अवस्थेंत राहात असत, त्यांना कशाचीहि पर्वा नव्हती,

कोण आला, कोण गेला, त्याची यांनीं कधींहि वास्तपुस्त केली नाहीं. बसाप्पानें महाराजांवर विश्वास ठेवून चार पांच वर्षें सेवा केली. अशीं वर्षें गेल्यावर नेहमीं-प्रमाणें तो महाराजांच्या दर्शनार्थ पटवर्धनांच्या कुरणांत गेला असतांना महाराजांची मर्जी सुप्रसन्न दिसली. महाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवून बसाप्पा तेथें जवळच उभा राहिला. महाराजांच्या मनांत बसाप्पावर अनुग्रह करण्याचें आलें. लगेच त्यांनीं बसाप्पास आपल्याबरोबर चलण्यास सांगितलें. जवळच काटवण नांवाचें एक खेडेंगांव होतें. तेथील जंगलांत त्यास घेऊन गेले. महाराज पुढें व व बसाप्पा मागें अशा स्थितींत दिवस केव्हां गेला हें समजलें नाहीं. सूर्यास्त झाल्यावर त्या जंगलांत हजारों सर्प सर्वत्र दिसू लागले!! हें पाहून बसाप्पाची पांचावर धारण बसली. परंतु महाराज जवळ असल्यानें तो निर्भयपणें महाराजां-बरोबर निघाला. श्रीस्वामीचरणांवर पुनः एकदां त्यानें तेथें मस्तक ठेविलें. श्रींनीं त्यास अभय देऊन ‘ तुझी इच्छा असेल तितके सर्प यांतून घे ’ अशी आज्ञा केली. पण किती झालें तरी मानवच तो! त्यानें महाराजांच्या वचनावर विश्वास ठेवून आपल्या अंगावरील वस्त्र एका सर्पावर भीत भीत टाकून त्यास पकडलें! त्यास बगलेंत ठेव असें म्हणतांच त्यानें तो आपल्या बगलेंत धरला. तेव्हां तेथें दिसणारे सर्व सर्प एकदम नाहींसे झाले!! नंतर महाराज व बसाप्पा परत मंगळ-वेढ्याच्या कुरणांत दाखल झाले. तेथून ते पुनः उभयतां गांवांतील एका बागेंत येऊन बसले. गांवाशेजारींच बाग असल्यानें लोकांची जा-ये त्या ठिकाणीं असे. महाराजांनीं इतरांकडे लक्ष न देतां बसाप्पास घरीं जाण्यास आज्ञा देऊन कांखें-तील गांठोडें बायकोच्या स्वाधीन करण्यास सांगितलें. महाराजांची अनुमति मिळाल्यावर तो मोठ्या आनंदानें घरी गेला व आपण आणलेलें धन बायको-पुढें टाकलें. नवरा परत आल्याचें पाहून तिला मोठा हर्ष झाला व पुढें पडलेली सोन्याची लगड पाहून अत्यंत हर्ष पावली. उभयतांचा आनंद गगनांत मावेना. श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेची धन्यता वाटून उभयतांचें देहभान हरपलें. श्री-स्वामींच्या कृपें करून उभयतांचा संसार सुखमय झाला हें सांगावयास नकोच! ही गोष्ट सन १८४४ मध्यें घडल्याचा दाखला मिळाला असल्यानें संशय घेईल तो पापी असेंच म्हणणें प्राप्त आहे.

या बसाप्पाप्रमाणें महाराजांनीं अनेकांवर अशी कृपादृष्टि केली होती. बाबाजी भट नांवाचा एक वैदिक ब्राह्मण त्या वेळीं मंगळवेढ्यास राहात असे. श्रींची स्वारी

मधूनमधून जेव्हा गांवांत येई तेव्हां तेव्हां विश्रांतीसाठीं महाराज या गृहस्थाच्या घरीं बसत. एके दिवशीं तिसरे प्रहरीं ऐन उन्हाच्या वेळीं श्रीस्वामीमहाराजांची स्वारी आली व त्यांनी भटजीच्या कुटुंबापाशीं पाणी मागितलें. महाराजांना त्या माउलीनें अत्यंत विनयानें सांगितलें कीं "महाराज, पाटावर बसा. मी इतक्यांत पाणी घेऊन येतें." घरीं विहीर होती परंतु तींत पाणी नव्हतें. पण त्या माऊलीस महाराज म्हणाले, 'घरीं विहीर असतां बाहेरून पाणी कां आणतेस?' बाईनें 'आड आहे खरा पण तो अगदीं कोरडा आहे. उन्हाळ्यांत पाणी आटून जातें' असें सांगितलें. तेव्हां महाराज म्हणाले, 'बाई आडात पाणी विपुल आहे. चल तुला दाखवितों' असें म्हणून महाराज आडाजवळ गेले. महाराजांनीं आंत डोकावून पाहिलें मात्र तों पाण्याचा संचय सारखा वाढला. मुळेकर यांनी लिहिलेल्या चरित्रांत असें म्हटलें आहे कीं, "महाराजांनीं त्या विहिरींच्या कट्ट्यावर उभें राहून लघुशंका केली त्यामुळें त्या आडांत पाणीच पाणी झालें." पंचभूतांवर ज्यांची असामान्य सत्ता असते त्यास आपल्या अंगांतील प्रवाही शक्तीचा उपयोग करण्याचें अद्भुत सामर्थ्य प्राप्त झालें असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. विहीर भरल्यावर महाराजांनीं त्या बाईस आडांत घागर सोडून पाणी काढण्यास सांगितलें. महाराजांच्या शब्दावर तिचा विश्वास बसून, तिनें आडांत घागर सोडली व पाहाते तों ती घागर पाण्यांत बुडून पाणी आल्याचें दिसलें! अर्थात् स्वामींची लीला पाहून त्या बाईस अत्यंत विस्मय वाटला! इतक्यांत त्या बाईचे यजमान घरीं आले व त्यांना ही हकीकत समजली. तेव्हां त्यांनाहि अत्यंत कौतुक वाटून त्यांनीं स्वामीचरणीं मस्तक ठेविलें. आडांत पाणीं विपुल झालें. नंतर महाराजांची स्वारी तेथून निघून गेली. या बाबाजी भटाचे वंशज तेथें असण्याचा संभव असल्यानें त्यासंबंधीं कोणी तरी शोध करून माहिती घेतल्यास कांहीं इतर घटनांवर प्रकाश पडेल. मंगळवेढ्याहून हें कुटुंब पुढें पंढरपुरास गेल्याचें चरित्रांत नमूद आहे. पंढरपुरींसुद्धां खटपट केल्यास माहिती मिळण्याचा संभव आहे.

मंगळवेढ्यांत एक साळी महाराजांचा महान भक्त होता. तो भिक्षेवर चरितार्थ चालवीत असे. महाराजांची व त्याची सुदैवानें भेट झाली व तो पुढें महाराजांचें तेज पाहून त्यांचा एकनिष्ठ भक्त बनला. कांहीं काल गेल्यावर व त्याच्या भक्तीची कसोटी पाहिल्यावर स्वामीमहाराजांच्या मनांत त्याचें दारिद्र्य दूर करावें

असें आलें. महाराज एके दिवशीं गांवांत आले व गांवांतच त्यांनीं वस्ती केली. हें साळ्यास कळतांच तोहि महाराजांसन्निध जाऊन उभा राहिला. महाराजांना नमन करून तोहि तेथेंच विश्रांतीसाठीं टेकला. कांहीं वेळानें त्यास झोंप लागली. महाराजांनीं त्या साळ्यास स्वप्नांत दर्शन देऊन त्याच्या पूर्वजांची हकीकत सांगितली. तो दृष्टान्त असा, " तुझा बाप पूर्वी मोठा व्यापारी होता. पंढरपुरास यात्रेनिमित्त जात असतां एकाएकीं गेला. तुझी आई तुझ्या बापाच्या पूर्वींच वैकुंठवासी झाली होती. तुझ्या घरांतील परसांत जें वृंदावन आहे त्याच्याखालीं तुझ्या बापानें बरेंच द्रव्य पुरून ठेविलें आहे. तें काढून घेऊन सुखानें संसार कर. " दृष्टान्त झाल्यावर साळी एकदम गडबडून जागा झाला. दृष्टान्ताप्रमाणें त्यानें वृन्दावनाखालीं खणून पाहिलें तेव्हां त्यास बरेंच द्रव्य मिळालें. द्रव्य मिळाल्याबद्दल त्यास अत्यानंद झालाच परंतु स्वप्नांत झालेली गोष्ट सत्यसृष्टींत उतरलेली पाहून त्यास महाराजांच्या अघटित लीलेचें कौतुक वाटलें. लगेच ही गोष्ट घडल्यावर त्यानें कुरणाचा रस्ता धरला. तेथें नमन करून महाराजांना ही हकीकत त्यानें कथन केली. महाराजांच्या चरणीं मस्तक ठेवून आनंदाश्रूनें त्यांचे चरण अक्षरशः त्यानें भिजविले. महाराजांचा आशीर्वाद घेऊन तो मोहोळास येऊन राहिला, व तेथेंच त्यानें आपलें उर्वरित आयुष्य अत्यंत आनंदानें घालविलें.

मंगळवेढ्यास एक यवन होता तो पिशाचवृत्तीनें गांवांत हिंडत असे. कुरणांत जाऊन महाराजांचें दर्शन घेऊन पुनः गांवांत येई. हा वेडापिसा असाच गांवांत भटकत होता. परंतु एक दिवस महाराजांनीं त्याच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून त्यास ज्ञानसंपन्न केलें. पुढें त्याची मोठी अवलिया म्हणून ख्याति झाली. हा पुढें पंढरपुरास गेला व तेथून तो सातारा जिल्ह्यांत कृष्णातटाकीं पिशाचवृत्तीनें राही. कोणी भेटावयास आले म्हणजे दगड फेंकून तो कोणास येऊं देत नसे. गंमत ही कीं फेकलेले दगड कोणासहि लागत नसत. पुढें याच्या गांवाचा व नांवाचाहि पत्ता लागला नाहीं. महाराज, सत्पात्र पाहूनच अनुग्रह करीत हेंच खरें.

भोसे येथील सत्पुरुष यशवंतराव यांच्यावरहि श्रीसमर्थांची कृपा झाली होती. ते पुढें देव मामलेदार या नांवानें प्रसिद्धीस आले. श्रीमद् गुरुराज महाराजांचा मंगळवेढ्यास मुक्काम असतां ते वरचेवर इकडेतिकडे खेड्यापाड्यांतून हिंडत असत. पंढरपूर, बेगमपूर, चळआंबे वगैरे अनेक नजिकच्या गांवीं जात असत.

चळआंबे हा गांव पूर्वीं पटवर्धनांकडे होता. एके दिवशीं स्वारी तेथें गेली असतां रामदासीबुवाच्या मठांत गेली. तेथें भोजन करून महाराजांनीं थोडा वेळ वामकुक्षी केली. त्या अवधींत मठांतील रामदासीबुवांना कांहीं काम होतें म्हणून त्यांनीं मठाचें द्वार बंद करून कुलूप लावून ते बाहेर पडले. "या निशा सर्व भूतानां" या कोटींतील महाराजांची स्वारी आहे ही गोष्ट या रामदासीबुवांच्या ध्यानीं आली नाहीं. म्हणूनच त्यांनीं द्वार बंद केलें होतें. पुढें कांहीं वेळानें महाराज खोलीबाहेर पडून भीमा नदीचे वाळवंटांत खेळत बसलेले पुष्कळ लोकांनीं पाहिलें. लोकांना महाराज आल्याचें पाहून अत्यानंद झाला. व त्यांची भेट घेण्यासाठीं लोक धावून तिकडे गेले. ही कुणकुण रामदासीबुवांना समजल्यावर त्यांस मोठेंच आश्चर्य वाटलें! लगेच ते आपल्या मठाकडे वळले. पाहतात तों कुलूप तसेंच बाहेर असल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें. कुलुप उघडून आंत जातात तों तेथें श्रींची स्वारी नव्हती!! मठास दुसरा दरवाजा नसतांना महाराज कसे बाहेर पडले याबद्दल त्यांचा तर्कच चालेना! तडक ते बुवा वाळवंटांत गेले. तेथें महाराजांची स्वारी आनंदानें खेळत असलेली पाहून त्यांच्या लीलांचें अत्यंत कौतुक वाटलें. महाराजांच्या चरणीं त्यांनीं मस्तक ठेवून व प्रार्थना करून महाराजांना परत गांवांत आणलें. वे. शा. सं. परशरामशास्त्री भट गोरे या नांवाचे गृहस्थ त्या वेळीं सोलापुरास होते. त्यांनीं ही गोष्ट समक्ष पाहिली असल्याचें नमूद आहे तेव्हां कोणासहि या अघटित घटनेबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. श्रीमोरयागोसावी यांची अशीच एक गोष्ट आहे ती त्यांच्या चरित्रवाचकांस अवगत असेलच.

मंगळवेढ्यास महाराजांचा मुक्काम असतांना ते कधीं कधीं पंढरपुरासहि जात व कधीं कधीं तेथून मोहोळासहि जात असत. मोहोळास महाराजांचा मुक्काम असतांना एक गमतीदार प्रसंग घडून आला. सोलापूरच्या रस्त्यावर मंगळवेढ्यास करमरकराचें एक शेत आहे. तें शेत वे. शा. सं. पंढरीनाथ व एकनाथ भटजी दिवासकर यांनीं सन १८५५।५६ सालीं वांट्यानें घेतलें होतें. एके दिवशीं ऐन दुपारच्या कडकडीत उन्हांत स्वामीमहाराजांची व वरील दोघांची वाटेंत गांठ पडली. महाराजांनीं पंढरीनाथाजवळ त्यांच्या पायांतील जोडा आपल्या पायांत घालण्यासाठीं मागितला. पाय अतिशय भाजूं लागल्यामुळें श्रीस्वामींनीं पंढरीनाथाजवळ तो मागितला. त्यांनीं तो लगेच महाराजांच्या पायांत घालण्या-

साठीं दिला. जोडा घातल्यावर महाराजांनीं कांहीं गंमत करून अशी जलद् चाल केली कीं ते क्षणभरांत दोघांनाहि दिसेनासे झाले. पंढरीनाथ व एकनाथ यांना महाराजांच्या या कृतीचें अतिशय आश्चर्य वाटलें. महाराजांकडे पाहिलें तर ते इतके वयातीत असतांना त्यांनीं एखाद्या तरुणाला लाज वाटेल अशा तारुण्यसुलभ वेगानें चालून ते नाहींसे झाले हें पाहून उभयतां बंधूंच्या मनांत महाराजांच्या कृतीबद्दल आश्चर्य वाटलें व त्यांच्याबद्दलचा भक्तिभाव जागृत झाला. पण प्रापंचिक जे असतात ते व्यावहारिक असतात असा साधा सिद्धान्त आहे. त्यांना आपल्या स्वार्थापुरतेंच चांगलें ज्ञान असतें. त्या न्यायानें व सहज प्रवृत्तीनें एकनाथ म्हणाले, " अरे, त्या वेड्यास आपला जोडा देऊन टाकलास, तो आतां दिसेनासा झाला. आणि जोडा दिल्याची गोष्ट काकांना जर कळली तर ते आपली कावड काढतील. " एकनाथानें घेतलेली शंका पाहून पंढरीनाथास चिंता पडली. असा संवाद दोघांमध्यें होत आहे इतक्यांत महाराजांची स्वारी त्या ठिकाणीं अचानक दाखल झाली व ते पंढरीनाथास म्हणाले, " घे आपला जोडा, आतां काका कांहीं रागावणार नाहींत. " इतकें बोलून पुनः महाराज झपाट्यानें चालते झाले. हें झाल्यावर दोघांपैकीं एकानें शंका काढली कीं हा वेडा येथेंच कोठें आडाच्या मागें लपला असावा व आपलें बोलणें त्यानें आडून ऐकिलें असलें पाहिजे म्हणून त्यानें जोडा परत दिला असावा! अशी समजूत होऊन ते उभयतां (पंढरीनाथ व एकनाथ) आपल्या शेताकडे चालते झाले. पुढें सोलापुराहून कांहीं मंडळी वाटेंत त्यांना शेताकडे जातांना भेटली. त्यांनीं हा वेडा इतक्या लगबगीनें कां आला याची चौकशी त्यांच्यापाशीं केली. अर्ध्या तासाच्या पल्ल्यावर हा वेडा मार्गक्रमण करीत असतां त्यास आमच्यामधील संवाद् कसा समजला व त्यानें एकदम येथें येऊन जोडा दिला याबद्दल ते अत्यंत आश्चर्यचकित झाले !! लोक समजतात तसा हा गृहस्थ वेडा नाहीं अशी उभयतांच्या मनाची खात्री झाली. परंतु या गोष्टीकडे मंगळवेढ्यांतील लोकांचें लक्ष लागलें नाहीं याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. सत्पुरुषांना ओळखणें हें अत्यंत कठीण होय. पुढें महाराजांची स्वारी मंगळवेढ्याहून गेली त्यामुळें मंगळवेढेकर स्वामींच्या सहवासास मात्र कायमची अंतरली !

या ठिकाणीं महाराजांच्या चरित्रांतील एक प्रसंग सांगणें अत्यावश्यक आहे. त्याची साक्ष असल्याचें कै. मुळेकर यांच्या चरित्रांत नमूद आहे. सोलापुरास

आगमन होण्यापूर्वीं मंगळवेढ्यांतील लोकांना कांहींएक चमत्कारिक दृश्य दिसल्याचा उल्लेख मुळेकर यांनीं लिहिलेल्या चरित्रांत आहे. मंगळवेढ्यास गांवाजवळ एक लहान टेकडी आहे. डोंगर मात्र फार मोठा नाहीं. त्या डोंगरानजिक भीमा वाहते. नदीचा प्रवाह ज्या ठिकाणीं आहे तें स्थान अत्यंत रम्य आहे. त्या ठिकाणीं चांगली झाडी असल्यानें त्या भागास चांगली शोभा आली आहे. एके दिवशीं श्रीस्वामीमहाराजांची स्वारी या नयनमनोहर ठिकाणीं गमतीनें बसली असतां नदीच्या पलीकडील तीरावरून महाराजांच्यासारखे दोन तेजस्वी पण भव्य पुरुष तेथें आले. तिघांनीं एकमेकांकडे पाहिलें. पुढें तिघे डोंगरावर चढले. त्यांचीं कांहीं गूढ भाषेंत बोलणीं चालणीं झालीं. हें दृश्य मंगळवेढ्यांतील एका गृहस्थानें पाहिलें व त्यानें या गोष्टीचा बोभाटा गांवांत केला. महाराज व आलेले ते दोन महान् तेजस्वी पुरुष यांची सर्व हालचाल लोकांना सांगितली. एका यतीने " कां रडतोस ? " असें विचारलें. दुसऱ्यानें " कां हांका मारतोस ? " असें म्हटलें व तिसऱ्यानें " असें कां करतोस ? " असा सवाल केला. तिघांनीं मनःपूत भाषणें केलीं. आलेल्या यतीनें पुनः डोंगराचा रस्ता सुधारला व त्या ठिकाणीं ते उभयतां अदृश्य झाले ! महाराज मात्र त्या ठिकाणाहून परत आपल्या पूर्वीच्या जागीं आले. या कूट संभाषणाचा उलगडा कोणासहि झाला नाहीं. यावरून एक गोष्ट सिद्ध होऊं पाहात आहे कीं ज्या इसमानें हा प्रकार पाहिला त्याचें भाग्य अत्यंत थोर होय. त्यास त्रैमूर्तींचें दर्शन झालें यावरून त्या गृहस्थास दर्शन देण्याचें निमित्त करून महाराजांनीं हा एक मोठा चमत्कार दाखविला. भूतलावर निरनिराळ्या वेषांत येऊन भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठींच भगवंताचा अवतार असल्यानें ही गोष्ट घडून आली. गोरक्षनाथ, शिवप्रभू व श्रीदत्तात्रेय हे लोकांना दर्शन देण्यासाठींच प्रकट होतात असा उल्लेख श्रीगुरुचरित्रांत व श्रीमत् दासबोधांत असल्याचे वाचकांना विदित असेलच. या अद्भुत घटनेवरून महाराज म्हणजेच " श्रीगुरुदेवदत्त " होत असा कोणीं तर्क केल्यास तो अयोग्य व अवास्तव असें म्हणतां येणार नाहीं. यासंबंधीं एक उल्लेख कै. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्रांत आढळतो त्याकडे वाचकांचें लक्ष वेधावें या हेतूनें तो भाग पुढीलप्रमाणें आहे. स्वतः अण्णासाहेबांची अशी श्रद्धा होती कीं श्रीगुरुचरित्रांत परमेश्वराचा " नरसिंहसरस्वती " म्हणून जो पूर्णावतार झाला तो श्रीदत्तात्रेयांनीं त्या वेळीं समास

केला नाहीं. श्रीशैल्य पर्वतावर गुप्त होऊन महाराज तेथून हिमालयांत प्रकट झाले, आणि तेथें कांहीं वर्षे राहून यदृच्छेनें स्वैर संचार करीत नाना सोंगांनीं आणि नाना रूपांनीं जगदुद्धार करीत, कोठें अल्पकाल तर कोठें बहुकाल् असें वास्तव्य करून वऱ्हाड, खानदेश, मालेगांव, पिंपळगांव वगैरे ठिकाणीं गेले असल्याचा उल्लेख आहे. " निरनिराळ्या ठिकाणीं चंचल भारती, जगदानंद-स्वामी, दिगंबर, नृसिंहभान वगैरे नांवांनीं त्यांची प्रसिद्धि होती. असें " श्रीगुरु-लीलामृत " या श्रीवामनबुवा ब्रह्मचारी यांच्या ग्रंथावरून कळून येईल. महाराजांनीं अखिल भरतखंडांत प्रवास केला. ठिकठिकाणीं तीर्थक्षेत्रांना पावन केलें. अनेक शिष्यांना सनाथ करून शेवटीं दक्षिणेंत संचार करून मोंगली मुलखापैकीं निजामशाहींत ठिकठिकाणीं मठ स्थापन केले. तेथें शिष्यांची संस्थापना करून स्वारी शेवटीं मंगळवेढ्यास दाखल झाल्याचें त्या ग्रंथाच्या वाचकांस विदित आहे. त्याचा पाल्हाळ करणें या ठिकाणीं युक्त होणार नाहीं. या वरील हकीकतींवरून श्रींच्या भारतभ्रमंतीवरून बोध घेतां येण्याजोगा आहे. या भारतभ्रमंतींत महाराजांनीं अनेक भक्तिमान् इसमांना अनुग्रह देऊन श्रीदत्त-संप्रदायाची उज्ज्वल परंपरा चालविली हें लक्षांत घेतल्यास अवतारी पुरुषांचें कोणतें कार्य असतें व तें बिनबोभाट कसें पार पाडलें जातें हें यावरून कळून येईल.

● ● ●

## अध्याय तिसरा

# सोलापुरास आगमन

श्रीस्वामीमहाराज मंगळवेढ्याहून जे निघाले ते पंढरपूर व तेथून ते मोहोळास आले. हा गांव तालुक्याचा होता. पंढरपुराहून निघतांना भीमा दुथडी भरली होती पण महाराजांना कोणी नावेंत घेईनात म्हणून ते तसेच नदींत शिरले व पाण्यांतून चालत चालत पलीकडे गेले ! या गोष्टीमुळें अनेकांना आश्चर्य वाटलें. अलीकडच्या साधुश्रेष्ठांत श्रीटेंभेस्वामी यांनींहि असाच चमत्कार केला. श्रीमध्वाचार्यांनीं नदी भरली असतां आपली छाटी टाकून आपल्या शिष्यपरिवारासह नदीचें पैलतीर गांठलें. कांहीं गोष्टी योगसिद्धीमुळें होतात पण जे सत्पुरुष अंशावतार अगर स्वयमेव परब्रह्मस्वरूपी असतात त्यांना पंचभूतें मान देतात व त्यांच्या अलौकिक आणि अतिमानुषीय सामर्थ्यानें या सर्व गोष्टी आपाततः घडून येतात. अनेकांना म्हणजे सामान्य माणसांना फार गूढ वाटण्यासारखा हा भाग आहे. पण रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, महर्षि लाहिरीबाबा, स्वामी रामतीर्थ, श्रीस्वामीमहाराज टेंभे, श्रीशिरडीचे साईबाबा अगर श्रीगोंदवलेकर महाराज, यांचीं चरित्रें बारकाईनें वाचल्यास गूढ वाटणाऱ्या गोष्टींचा उलगडा होण्यास मदत होईल. श्रीगौरांग प्रभूचें चरित्र असेंच अलौकिक घटनांनीं भरलेलें आहे. श्रीएकनाथ, श्रीतुकाराम, श्रीनामदेव महाराजांची रसाळ व भक्तिप्रधान चरित्रें वाचल्यास आपल्यास हीं चरित्रें वरील गूढ गोष्टीची उकल होण्यास उत्तम प्रकारें मदत करतील. श्रीज्ञानेश्वरमाउलीचें चरित्र काय सुचविते. श्रीचांगदेवाचे चरित्रावरून कोणता बोध घ्यावयाचा याची चिकित्सा साधकांनीं करावी. मुक्ताबाईनें या सत्पुरुषाची भेददृष्टि घालवून त्यास ताळ्यावर आणलें व त्याच्या

मनांतील द्वैतभावना आपल्या उपदेशानें पार उडविली ! या गोष्टी काय दर्शवितात ? श्रीज्ञानेश्वरमाउलींनीं आपल्या अमरग्रंथांत योगी काय करूं शकतो याची सहाव्या अध्यायांत पूर्ण माहिती दिली आहे. श्रीज्ञानेश्वरी ग्रंथाचें अत्यंत मननपूर्वक साधकांनीं पारायण करून त्यांतील घटनांचा सामंजसवृत्तीनें उलगडा करून घेऊन तो हृदयसंपुटांत सांठवावा, म्हणजे गुरुकृपेचें सामर्थ्य किती अफाट असतें हें समजण्यास उशीर लागणार नाहीं.

महाराज मोहोळास गेले असल्याचा उल्लेख वर आला आहे. त्या ठिकाणीं श्री. गणेश हरि सोहोनी नांवाचे एक मामलेदार होते. महाराज त्यांच्या घरीं गेले. ज्या ज्या वेळीं महाराज मोहोळास जात त्या त्या वेळीं त्यांचा मुक्काम त्यांच्याकडे होत असे. त्या गांवांत एक गवेस्वामी नांवाचा लिंगायत साधू होता. तो बराच वृद्ध होता तरी त्याची कांति सतेज होती. तो चांगला योगी असल्यानें त्याचें नांव त्या परिसरांत सर्वतोमुखीं झालें होतें. तो समाधि अवस्थेंत अधर राही. पुढें एके दिवशीं या लिंगाईतस्वामींनीं महाराजांचा मुक्काम असतांना त्यांची भेट घेतली. महाराजांच्या आज्ञेवरून त्यानें योग-साधन बंद करून भक्तिमार्गाचा अवलंब करून शिवस्वरूपीं विलीन झाला. समाधि-अवस्थेंत जाऊन त्यानें आपलें आयुष्य पळापळानें वाढविलें होतें. चांगदेवहि चौदाशें वर्षें हयात होते. " जातस्यहि ध्रुवो मृत्युः " या न्यायानें प्रत्येक प्राणिमात्रास मृत्यु हा गांठतोच तेव्हां त्याची उपेक्षा करून चालणार नाहीं. हा बोध श्रीस्वामींनीं व मुक्ताबाईनीं अनुक्रमें गवेस्वामी व चांगदेव यांना देऊन त्यांची यमपाशांतून सुटका करविली असें या गोष्टींचें तात्पर्य आहे. कोणीहि अमर नाहीं. मग मनुष्यानें असा दीर्घसंकल्प करून परमेश्वरानें जी नियति आंखून दिली आहे तिची प्रतारणा करणें अन्यायमूलक असल्याची जाणीव या वरील द्वोघांना देऊन ' मृत्योः माम् अमृतंगमय ' या उच्च पंथाकडे नेलें. असा चमत्कार, असे अधिकारसंपन्न पुरुषच करूं शकतात.

महाराजांचा मुक्काम मोहोळास असतांना त्यांनीं एक गोष्ट गमतीनें घडवून आणून मामलेदारांचें अंगवस्त्र दूर केलें. श्रीगणपतीच्या ऐन उत्सवप्रसंगीं म्हणजे भाद्रपद मासांत पाऊस झिमझिम पडत असतांना त्याच्या घराची दिंडी एकदम उघडून महाराज त्याच्या घरांतून बाहेर पडले. हें पाहून गणेशपंतहि

गडबडून उठले. महाराजांना पावसांत बाहेर न जाण्याबद्दल प्रार्थना केली. परंतु महाराजांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं; आणि शेवटीं जंगलचा रस्ता सुधारला. गणेशपंतांना या गोष्टीचा खेद वाटून ते स्वतः मशाल पेटवून त्यांच्या मागोमाग बाहेर पडले. आणि त्यांनीं महाराजांना परत येण्याबद्दल आग्रह केला. पुष्कळ विनवणी केली पण एक नाहीं, दोन नाहीं – महाराज मुकाट्यानें तसेच पुढें चालले. शेवटीं याचें कारण काय असें विचारतां महाराजांनीं त्यांस आपल्यास विटाळ होतो असें सांगितलें. याचा अर्थ गणेशपंतांच्या लक्षांत आला. पण रखेली सोडण्याचें धैर्य होईना. शेवटीं सन १८५१।५२ सालाचे सुमारास जिल्ह्याचे कलेक्टरांनीं त्यांस बोलावून अंगवस्त्रास सोडून द्यावें, अंमलदारास हा कलंक आहे अशी त्याची कानउघाडणी केली! त्यावर गणेशपंतांनीं "साहेबांनीं खासगी गोष्टीकडे लक्ष देऊं नये" असें उत्तर दिलें. पुढें अनेक किटाळें आलीं त्यांतून ते निर्दोषी सुटले पण मामलेदारीच्या जागेवरून त्यांस बडतर्फ केलें गेलें!! तेथून त्यांची स्वारी सोलापुरास राहावयास आली. महाराजांनीं आंब्याच्या दिवसांत भेट होईल असें आश्वासन दिलें होतें ही गोष्ट लक्षांत असल्यानें महाराजांची भेट घेऊन त्यांची क्षमा मागावी या हेतूनें ते गेले. महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांचें अंगवस्त्र दूर होतांच दोन आंबे त्यांच्या पदरांत टाकून नाहींसे झाले. महाराज नाहींसे झाले याबद्दल गणेशपंतांना थोडें वाईट वाटलें. पण चमत्कार असा झाला कीं पुढें कांहीं दिवसांनीं त्यांस बडोद्याच्या महाराजांनीं मामलतीची नोकरी देऊन त्यांचा गौरव केला. अंगवस्त्र सोडल्यावरच ही गोष्ट घडली यावरून साधकांनीं आपलें वर्तन सुधारल्याशिवाय महाराज त्याच्यावर कृपा करीत नसत हें गोष्टीचें मर्म आहे. आपलें आचरण व वर्तन चोख असल्याशिवाय सद्गुरुकृपा होणार नाहीं अशीं धर्मशास्त्रें कंठरवानें सांगत आहेत. सुबुद्ध माणसें हें लक्षांत न घेतां भक्तीचा अवडंबर करतात पण त्यांच्या हातीं कांहीं लागत नाहीं. अशीं उदाहरणें अलीकडच्या काळांत पुष्कळच आहेत.

महाराज मोहोळाहून निघाले ते १८५४।५५ च्या सुमारास सोलापुरास आले. तेथील श्री. रामभाऊ गुर्जर यांच्याकडे त्यांचा मुक्काम होता. एके दिवशीं श्रीस्वामीमहाराजांची स्वारी श्रीदत्तमंदिरांतील सोप्यांत आनंदानें बसली होती! अंगावर कपड्यांचा विटाळहि नव्हता. अशा विदेही अवस्थेंत असतांना श्रींचें

मंदिरांत अनेक लोक दर्शनास येऊन गेले. पण महाराजांचें कोणाकडे लक्ष नव्हतें व त्यांचेंहि कोणाकडे लक्ष गेलें नाहीं. पूर्वसुकृत असेल तरच अशा अतुलनीय व्यक्तींचें दर्शन व्हावयाचें. त्यास भव्य भाग्य लागतें. महाराज वरील स्वरूपांत स्वच्छंदांत गुंग असतांना श्री. चिंतोपंत टोळ या नांवाचे एक दत्तभक्त त्या मंदिरांत दर्शनास आले असतां त्यांचें लक्ष एकदम या भव्य मूर्तीकडे गेलें. प्रदक्षणा संपवून चिंतोपंत टोळ येत असतांना स्वामीमहाराजांची दिव्य मूर्ती त्यांस दिसली. त्यांचें देहभान हरपून गेलें. मनांत म्हणाले, हे कोणी सिद्ध पुरुष असले पाहिजेत. फार भाग्यानें दर्शन झालें. असें मनांत येतें न येतें तो महाराज म्हणाले, " आम्ही सिद्धपुरुष असो कीं कोणी फालतु असो, तुला त्याचें काय करावयाचें आहे? आलेल्या लोकांनीं कोणीं चौकशी केली नाहीं. तूं आपल्या मार्गानें जा. " हे शब्द महाराजांच्या तोंडांतून ऐकल्यानंतर त्यांस फार विस्मय वाटला. पुनः टोळ मनांत म्हणाले, हे कोणी मनकवडे विरक्त पुरुष दिसतात. त्यावर महाराजांनीं चिंतोपंतांच्या मनांतील हेतु जाणून उत्तर दिलें, " आम्ही मनकवडे असो किंवा कोणी कां असेना आपल्या वाटेनें जा कसा! " महाराजांच्या मुखांतील ही अमृतधारा ऐकून महाराजांच्या दिव्य शक्तीबद्दल व परब्रह्म स्वरूपीं लीन झालेल्या महान् व्यक्तीबद्दलचा आदर द्विगुणित होऊन टोळांनीं पायांवर मस्तक ठेवून त्यांस आपल्या घरीं येण्याबद्दल प्रार्थना केली. चिंतोपंतांची निर्मळ निष्ठा पाहून महाराज त्यांच्याकडे गेले. महाराजांना भोजनास आग्रहानें बसवून नंतर त्यांची मनोभावानें टोळांनीं सेवा केली. पुढें ते महाराजांचे एकनिष्ठ भक्तच बनले.

महाराजांची भेट झाल्यापासून चिंतोपंत टोळांना त्यांच्या अंतर साक्षित्वाबद्दल अनेक अनुभव आले. महाराजांना मधून मधून ते आपल्या घरीं आग्रहानें भोजनास घेऊन जात. एरव्हीं ते जात नसत. एके दिवशीं महाराजांना घेऊन टोळ घरीं आले. स्वारी आनंदानें सोप्यावर बसली होती. टोळांचे एक स्नेही ते स्नान करीत असतांना तेथें आले. त्यांचें नांव जिवा सोहनी. ते सहज टोळांना म्हणाले " महाराज कांहीं विधिनिषेध धरीत नाहींत, कोठेंहि जेवतात व कोणाचेंहि खातात तेव्हां त्यांचें पान ब्राह्मणाचें पंक्तीस न ठेवतां दुसऱ्या पंक्तींत ठेवावें " असा सल्ला या गृहस्थांनीं दिला! टोळांची अंघोळ झाल्यावर ते धोतर नेसीत नेसीत महाराज बसल्या ठिकाणीं आले. लगेच आंतरसाक्षी महाराजांनीं, " तुझ्या

मनांत विकल्प आला. आतां आम्ही जेवणार नाहीं " असें म्हणून स्वारी लगेच चालू लागली ! झालेली चूक कबूल करून टोळांनीं महाराजांची क्षमा मागून मोठ्या मिनतवारीनें त्यांनीं महाराजांस आपल्या घरीं परत आणून भोजन दिलें. या गोष्टीचें मनन केल्यास आपल्यास, शुद्ध भावाच्या ठिकाणींच परमेश्वराचा वास राहतो हें चटकन् लक्षांत येईल. अनेक वर्षांची तपश्चर्या केवळ विकल्प आल्यानें नाहींशी होते, असे अनेक आत्मे आम्हीं पाहिले आहेत. म्हणून साधकानें अत्यंत शुद्ध मनानें व शुद्ध उपासनेनें श्रीसद्गुरूंची सेवाचाकरी केल्यासच त्याचा उद्धार होऊं शकतों हें नीट लक्षांत घ्यावें.

भक्तसारथी श्रीस्वामीमहाराज यांनीं एके दिवशीं मोठी गंमत केली. टोळांचा मुलगा विष्णु हा सोलापूरच्या कलेक्टराच्या कचेरींत दप्तर शाखेंत कारकुनाचे जागेवर होता. गोल्डफिंझ नांवाचे जिल्हाधिकारी त्यावेळीं सोलापुरास कामावर होते. दप्तरदाराचे हुद्यावर हणमंतराव पीतांबरे या नांवाचा एक गृहस्थ होता. या दोघांची अत्यंत कडक अशी ख्याति होती. कचेरीच्या वेळींच नोकरांनीं हजर असलेंच पाहिजे अशी त्यांची शिस्त होती. अशा कचेरींत टोळांचा मुलगा नोकर असतांना एके दिवशीं सर्व मंडळी जेवावयास बसली असतांना महाराज पानावर बसले पण कांहीं केल्या जेवीनात. कचेरीची वेळ झाल्यानें चिंतोपंतांनीं आपल्या मुलास, तुला उशीर होईल, तूं लौकर जेवून जा, असें सांगितलें. पण विष्णुपंत अत्यंत निष्ठावान असल्यानें त्यांनीं महाराज जेवावयास लागल्याशिवाय आपण कांहीं खावयाचें नाहीं असा निश्चय केला. जें व्हावयाचें तें होईल. असें मनांत आणून तोहि पानावर हात आंखडून बसला ! ! अकरा वाजण्याच्या सुमारास महाराजांनीं आपल्या तोंडांत घांस घेतला. तेव्हां विष्णुपंतांनीं भोजन सारून ते लगबगीनें कचेरीस गेले. कलेक्टराचे अव्वल कारकून बाळकृष्ण देवराव यांना भेटून झालेली हकीकत सांगावी आणि आजच्या उशीराबद्दल रदबदली करावी म्हणून ते अव्वल कारकुनाकडे गेले. विष्णुपंतांची ही विनंती ऐकून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें ! ! ते म्हणाले, " विष्णुपंत, तुम्ही आज माझ्या अगोदर कचेरींत आलां व तुमची हजेरीपूर्वींच भरली असल्यानें रदबदली कशासाठीं ? " इतकें बोलून त्यांनीं हजेरी बुकच विष्णूपंतास दाखविलें. मग त्यांनीं झालेली सर्व हकीकत निवेदन करून महाराजांनीं काय लीला दाखविली हें सांगितल्यावर सर्वांनाच मोठें

आश्चर्य वाटलें. महाजरा अशी गंमत एखादेवेळीं करीत "भक्तकामकल्पतरु" असें महाराजांची कृति पाहून एखाद्यास वाटल्यास नवल काय ?

वरीलप्रमाणें कांहीं काल गेल्यावर चिंतोपंत जरी पेन्शनर होते तरी त्यांस अक्कलकोटचे महाराज श्री. शहाजी महाराज यांनी कारभारी नेमले. एके दिवशीं टोळ अक्कलकोटाहून सोलापुरास कांहीं कामानिमित्त आले असतां राजेसाहेबांचें त्यांस अचानक बोलावणें आलें. तेव्हां टोळांनीं महाराजांस अक्कलकोटास येण्याबद्दल विनंती केली. पण महाराजांनीं तेथें उन्हाळा फार आहे, पावसाळ्यांत येऊं असें उत्तर दिलें. याचा अर्थ त्या वेळीं त्यांना समजला नाहीं. आग्रह करूनहि महाराज येत नाहींत हें पाहून टोळांनीं महाराजांची आज्ञा घेऊन अक्कलकोटाचा रस्ता धरला. त्या वेळीं अक्कलकोटास उन्हाळा जबरदस्त झाला व पावसाळ्याच्या दिवसांतहि पावसाचा एकहि थेंब पडला नाहीं. आषाढमासांत शहाजीराजे यांची प्रकृति बिघडून त्यांत त्यांचा अंत झाला. पाऊसहि पडला नाहीं. तेव्हां पावसाळ्यांत कडक उन्हाळा लोकांच्या अनुभवास आला. पुढें मात्र कार्तिकमासीं मेघराजानें कृपा केली व पिकेंहि चांगली आली. दिपवाळी झाल्यानंतर श्रीस्वामी महाराजांची स्वारी सांगितल्याप्रमाणें अक्कलकोटास दाखल झाली. त्याच सुमारास श्रीमंत मालोजीराजे गादीवर आले. श्रीस्वामीमहाराज यांच्या म्हणण्याचा अर्थ या वेळीं टोळांच्या लक्षांत आला. महाराजांची लीला अगाध आहे हें लक्षांत आल्यावर टोळांनीं महाराजांची भेट घेऊन त्यांस अत्यंत भक्तिभावानें व विनम्रपणें साष्टांग नमस्कार घातला.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३३५६७ दि० ५।१।२१
क्रमांक १०६५४ नों० दि० २१।५।५१

अध्याय चौथा

# अक्कलकोटास महाराजांचें आगमन

महाराज अक्कलकोटास आल्यावेळेपासून त्यांच्याकडे अनेक साधुसंतांचें येणें-जाणें सुरू झालें. पुढें "**श्रीअक्कलकोटचे महाराज**" म्हणूनच त्यांची प्रसिद्धि झाली. ब्रह्मचारी श्रीवामनबुवा वैद्य यांनीं आपल्या "गुरुलीलामृतां'त महाराज शके १७७९ आश्विन शुद्ध ५ बुधवार रोजीं दाखल झाल्याची नोंद केली आहे. महाराजांची स्वारी तेथें प्रकट झाल्यावर अनेकांची महाराज हे कुठून आले वगैरे संबंधानें साहजिकच विचारपूस सुरू झाली. कांहींनीं प्रत्यक्ष महाराजांस याबद्दल माहिती विचारावी असें ठरविलें. कांहींनीं तसा प्रयत्न केला. पण विशेष माहिती त्यांनीं दिली नाहीं. भीमातीरीं मैसलगी येथील ह. भ. प. श्रीमाधवशास्त्री यांना श्रींचा अनुग्रह झाल्यामुळे ते वरचेवर तेथें येऊन जात त्यामुळें त्यांनी महाराजांची दिनचर्या वगैरे जवळून पाहिली होती. या दृढ सहवासानें त्यांनीं 'संस्कृत भाषेंत' महाराजांचें स्तवन केल्याचें प्रसिद्ध आहे. त्यावरून महाराजांसंबंधीं थोडी-बहुत कल्पना तेथील लोकांस आली असली पाहिजे. वे. शा. सं. माधवशास्त्री महाराजांच्या अवताराचें प्रयोजन काय यासंबंधीं पुढील उद्गार काढले आहेत. तो श्लोक पुढीलप्रमाणें—

मत्स्यकूर्म देवास्तु जन्म-निर्याण-भाविताः ॥
बभूवुः पद्मसद्माया जन्मनिर्वाणमाश्रितः ॥ १ ॥

इतिस्मृत्या पुराणोक्तया गुरुमूलं न विद्यते ॥
कस्मात् देशात् समायातो यत्केनापि न विद्यते ॥ २ ॥

मत्स्यकूर्मवराहादि अवतार कां झाले यांसंबंधीं पुराणांतरी माहिती मिळते; परंतु 'महाराज' हे कुठून आले, कोठें जन्मले हें कांहींच कळण्यास मार्ग नाहीं. वे. शा. सं. माधवशास्त्री यांनीं महाराजांचें जे श्लोकबद्ध चरित्र लिहिलें आहे त्यावरून थोडीबहुत कल्पना येऊं शकते. त्यांनीं पुढीलप्रमाणें महाराजांचें वर्णन केलें आहे. "महाराजांची शरीरयष्टी अत्यंत धिप्पाड होती. कांति तेजःपुंज होती. शरीराचा वर्ण गोरा होता. ते अजानुबाहू होते. त्यांचा चेहरा अत्यंत उग्र असल्यानें त्यांच्याकडे टक लावून पाहण्याचें कोणास धैर्य नसे. संत्र्याच्या रंगाप्रमाणें तोंडावर तेज झळकत असे. कानाच्या पाळ्या अत्यंत विशाल होत्या. ऊरहि विशाल होतें. महाराज खांबास टेकून बसले म्हणजे त्यांच्या अंगलोटाचा विस्तार खांबापेक्षां मोठा होता. ते वयातीत दिसत पण चालू लागले म्हणजे त्यांच्या मागे मागे इतरांना धांवावें लागे. यावरून त्यांच्या चालण्याची गति किती जलद होती हें लक्षांत येईल. ते बहुधा लंगोटी नेसत. एकादे वेळीं तीहि फेकून देऊन दिगंबरस्थितींत राहत. चोळाप्पा नांवाचा एक भक्त त्यांस प्रातःकालीं स्नान घालून केशरकस्तुरीचें गंध लावी. नंतर महाराज दोन आचमनें घेत. ते स्वतः आपल्या हातानें जेवीत नसत. त्यांस लहान मुलाप्रमाणें भरवावें लागत असे. माधवशास्त्री म्हणतात, त्या मूर्तीचें वर्णन करणें आपल्या बुद्धीक्षेत्राच्या पलीकडे आहे. तें बुद्धिगम्य नाहीं. माधवशास्त्री यांनीं जवळून पाहिलें असल्यानें त्यांनीं त्यांचें वर्णन वरीलप्रमाणें केलें आहे. आजहि महाराजांचीं छायाचित्रें वा तसबिरी आहेत त्यावरूनहि महाराज उग्र प्रकृतीचे असावेत अशी खात्री पटते. वे. शा. सं. माधवशास्त्री मैसलगीकर म्हणतात,

"जन्मशून्यो दिव्यरूपो रविभाःसुर वंदितः ॥
आदर्शवत् दृश्य–सूक्ष्म–गंड–युग्म सुमंडितः ॥ १ ॥
सुनासोऽनिमिषः सुभ्रूः करुणापूर्ण लोचनः ॥
शरद् पूर्णेंदु वदनो स्फाटिक्य मणिभूषितः ॥ २ ॥
सुंदरांगो दिव्य बाहुः कटिमेखल शोभितः ॥
कौपीनधारी रंभोरूः कंज कोमल पादकः ॥ ३ ॥"

'या वर्णनावरून त्यांची प्रतिमा कशी होती हें लक्षांत येईल.

"कैसी नीलोत्पलातें रावित । आकाशा रंगु लावित । तेजाचि वोज दावित ।

इंद्रनील ॥ " ( ११-५९० श्रीज्ञानेश्वरी ) अशा या अनादि मूर्तीचें वर्णन कोण करूं शकेल ? श्रीस्वामीमहाराजांसारख्या योगेश्वराची कांति कशी असूं शकते यासंबंधीं श्रीज्ञानराजमाउलीनें ६व्या अध्यायांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. तें देण्याचा मोह या ठिकाणीं होतो. माउली म्हणते " जैसि आभालाचि बूंथि । करूनि राहे गभस्ति । मग फीटलेया दीती । धरूनैए ॥ २५१ ॥ तैसा आहाचुवरिकोरडा । त्वचेचा असे पातवडा । तो झडौनि जाये कोंडा । जैसा होये ॥ २५२ ॥ मग काश्मिराचें स्वयंभ । कां रत्नबीजा निगाले कोंभ । अवेवकांतिची भांभ । तैसी दीसे ॥ २५३ ॥ नातरि संध्यारागिचे रंग । काढुनि वळिलें तें आंग । किं अंतर्ज्योतिचें लिंग । निर्वाळिलें ॥ ५४ ॥ कुंकुआचे भरिव । सिद्ध रसाचें ॐतिंव । मज पाहातां सावेव । शांतीचि तें ॥ ५५ ॥ तें आनंदचित्रिचें लेप । ना तरि महासुखाचें रूप । किं संतोष तरूचें रोप । थांवलें जैसें ॥ ५६ ॥ तो कनकचंपकाच्या कळा । किं अमृताचा पूतळा । नाना सांसिनला मळा ॥ कोवळिकेचा ॥५७॥ हों काज शारदियेचेनि ॐलें । चंद्रबिंब पालटलें । कांतेजचि मूर्त बैठलें । आसनावरि ॥ ५८ ॥ तैसें शरीर होये । जेव्हलि कुंडलिणी चांद्रपिए । मग देहाकृती बिहे । कृदांतु गा ॥ ५९ ॥ वृद्धाप्यतऱ्हीं बाहुडे । तारुण्याचि गांठि विघडें । लोपली उघडे । बाळदशा ॥ ६० ॥ वयसा तरी येतुली वेऱ्हीं । जें बळाचा बाळार्थुकरी । धैर्याची थोरी । निरुपम ॥ ६१ ॥ कनकद्रुमाची पालवीं । रत्नकळिकांची नवी । वानी तैसी बरवीं । नाखें निगति ॥ ६२ ॥ दांत हिआन होंती । परिअपाडे सानेजांती । जैसी दों बाही बैसे पांती । हीरेयांची ॥ ६३ ॥ माणिकुले यांचिया कणियां । सावियांचि अणुमाणियां । तैसिया सर्वांगीं उधवति अणियां । रोमेचिया ॥ ६४ ॥ करणचरणतळें । जैसीं का रातोत्पळें पखाली होथि डोळे । काइसांघो ॥ ६५ ॥ " श्रीज्ञानेश्वरमाउलीनें केलेलें वर्णन महाराजांना किती लागू पडते हें पडताळून पाहण्यासाठीं श्रीसाखरे-महाराजांच्या प्रतींतील वरील ओव्यांचा अर्थ दिल्यास पुष्कळसा उलगडा होईल म्हणून देत आहे. महाराज म्हणतात, सूर्य अभ्राच्या बुरख्यांत दडून राहिलेला असतो, परंतु तेंच आभाळ नाहींसें झाल्यावर तो ज्याप्रमाणें आपले तेजानें वर येतो; त्याचप्रमाणें, शरिरावर त्वचेचा जो उगाच पापुद्रा असतो, तो कोंड्याप्रमाणें निघून जातो, मग केशराच्या स्वयमेव रंगासारखी, अथवा रत्नरूपी बीजाला निघालेल्या कोंबासारखी त्या

अवयव कांतीची झांक दिसते. नाहींतर संध्याकाळच्या आकाशाच्या रंगाची लाली काढून तें अंग बनविलें असावें, अथवा आत्मचैतन्याच्या तेजाचें लिंग केलें असावें, किंवा तें कुंकुमानें भरलेलें आणि आत्मरसानें ओतलेलें अथवा ती मूर्तिमंत शांतीच असावी असें मला वाटतें. तें आनंदरूपी चित्राचा रंग, किंवा परब्रह्म सुखाचें रूप, अथवा संतोषरूपीं वृक्षाचें रोप आहे असें भासतें. तो सोनचाफ्याचा कळा किंवा अमृताचा पुतळा, अथवा नाजूकपणाचा भर आलेला असा मळाच. शरदऋतूच्या पौर्णिमेच्या ओलाव्यानें चंद्रबिंब शोभावें, किंवा जणूं काय मूर्तिमंत तेजच आसनावर बसावें, त्याप्रमाणें कुंडलिनी चंद्रामृताच्या तळ्यांतील अमृत प्याल्यावर शरीर दिसूं लागते, मग त्या शरीराला यम देखील भितो! वृद्धपणा मागें फिरतो, तारुण्याची ज्वानी मोडते, आणि गेलेली बाल्यावस्था पुनः प्राप्त होते. वयानें पाहिलें तरी एवढासाच दिसतो; परंतु अतिशय पराक्रम करतो; व त्याचें धैर्य अनुपम असतें. सुवर्णवृक्षाच्या पालवींतून रत्नाची कळी सतत नवीं निघावी, त्याप्रमाणें नवीं नखें निघून तीं सतेज दिसतात. दांतहि दुसरे होतात, परंतु अतिशय बारीक बनतात, जणूं का दोही बाजूला हिऱ्यांच्या पंक्तीच मांडल्या आहेत! सर्व अंगावरील रोमांचीं अग्रें माणकांच्या कण्याप्रमाणें लहान अशीं सतेज उद्भवतात. हातपायांचे तळवे कमळाप्रमाणें लाल बनतात आणि डोळे स्वच्छ होतात. आणखी काय सांगावें?" श्रीज्ञानेश्वर-माउलींचें हें वर्णन पाहिल्यास वे. शा. सं. माधवशास्त्री यांनीं केलेलें महाराजांचें वर्णन यांत वाचकांना बरेच साम्य असल्याचें दिसून येईल. माधवशास्त्र्यांनीं एके ठिकाणीं महाराजांच्या जन्माचा ठावठिकाणा लागत नाहीं असें लिहिलें आहे. तेव्हां याहि गोष्टीसंबंधानें आपण पुढील ओव्यांचें मनन करावें. श्रीसमर्थ रामदास-स्वामी यांनीं श्रीदासबोधाच्या पहिल्या दशकाच्या चौथ्या समासांत सद्‌गुरूचें वर्णन करतांना पुढील उद्‌गार काढले आहेत. ते म्हणतात, "जयजयाजि सद्‌गुरुराजा। विश्वंभरा विश्वबीजा। परम पुरुषा मोक्षध्वजा। दीन बंधु ॥ ८ ॥ तुझीयेन अभयंकरे। अनावर माया हे ओसरे। जैसे सूर्यप्रकाशें अंधारे। पळोन जाय ॥ ९॥ आदित्यें अंधकार निवारें। परंतु मागुते ब्रह्मांडभरे। नीसीजालियानंतरें। पुन्हा काळोखें ॥ १० ॥ तैसा नव्हे स्वामीराव। करी जन्म-मृत्युवाव। समूळ अज्ञानाचा ठाव। पुसून टाकी ॥ ११ ॥" या ओव्यांत म्हटल्याप्रमाणें माधवशास्त्र्यांनीं श्रींचें वर्णन जें केलें आहे तें यथार्थच होय. जन्ममृत्यूचा फेरा मानवाच्या मागे

असतो. अवतारी पुरुषांना हा नियम लागू नाहीं. अर्जुनानें अशीच शंका ईश्वराच्या जन्माबद्दल घेतली होती. तेव्हां श्रीकृष्णांनीं त्यास जें उत्तर दिलें तें मनन करण्यासारखें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, "तव कृष्ण पांडुसुता। तो वैवस्वतु जै होता। तैं आम्ही नसो ऐसी चित्ता। प्रतीति तुज (अ. ४-४०)॥ तरी तूं गा हें नेणसी। पै जन्में आम्हां तुम्हांसी। बहुतें गेलीं परि नस्मारसी। आपली तूं ॥४१॥ मी जेणें जेणें अवसरें। जें जें होऊनि अवसरे ते समस्तहिस्मरें धनुर्धरा ॥ ४२ ॥ म्हणोनि मी आघवें ॥ मागील मज आठवें। मी अजुहि परि-संभवें। प्रकृतियोगें ॥ ४३/४ ॥" अवतारी पुरुषांना जन्ममरण नाहीं. ते मागें होते व आजहि आहेत. असा भाव पूर्वींच्या अनेक साधुसंतांनीं मनांत ठेवून श्रीसद्गुरूंचीं वर्णनें केलीं आहेत. त्याचें मर्म वाचकांनीं समजून घेण्याची आस्था बाळगावी म्हणजे त्याप्रमाणें अनुभव येईल. विकल्प न आल्यास प्रत्यय येण्यास उशीर लागणार नाहीं असें संत छातीवर हात ठेवून स्पष्ट आदेश देतात. कै. गुरुदेव रामभाऊ रानडे यांनीं आपल्या अलीकडच्या पुस्तकांत असाच निर्वाळा दिला आहे. संत जागृतावस्थेंत देवाचें दर्शन रोज घेतात व मीहि घेतों असें त्यांनीं लिहिलें आहे. तेव्हां साधकांनीं शंका घेण्याचें कांही प्रयोजन नाहीं. अवतारी पुरुषांचा अवतार कशासाठीं असतो याचेंहि मनन करणें योग्य होईल. श्रीज्ञानेश्वरमाउलींनीं पुढील उद्गार काढले आहेत— "जें धर्मजात आघवें। युगीं युगीं मियांचि रक्षावें। ऐसा हा ओघु स्वभावें। आद्यु असे ॥ ४-४८ ॥ म्हणौनि अजत्व परौ ते ठेवीं। मी अव्यक्तपण ही नाठवी। जेव्हलि धर्मातें अभिभवी अधर्मु हा ॥ ४-४९ ॥ तेव्हलि आपुले याचे नि कैवारें ॥ मी साकारू होऊनि अवतरे। मग अज्ञानाचें अंधारें। गिळूनि घाली ॥ ४-५० ॥ अधर्माची अवधि तोडी। दोषांचें लिहीलें फेडी। सज्जनाकरवी गुढी। उभवी मीं ॥ ४५१ ॥" शांतीब्रह्म श्रीएकनाथ महाराज म्हणतात, "धर्माची वाट मोडे। अधर्माची शीग चढे। तै आम्हां येणें घडे" ॥ श्रीस्वामीमहाराज व त्यांच्या समकालीन अनेक सत्पुरुष एकदम कां प्रकट झालें हें सहज लक्षांत येईल. श्रीजंगलीमहाराज, बेलापूरचे श्रीविद्यानंदसरस्वती, या पूजनीय व्यक्ति याच वेळीं कशासाठीं प्रकट झाल्या हें पाहावें. धुळ्याचे बुवासाहेब, पुण्यांतील नरहर-स्वामी, श्रीपादस्वामी, आळंदीचे श्रीनरसिंहसरस्वती, श्रीमाणिकप्रभु हुमणाबाद, मद्रासेकडील कंचीस्वामी यांची माहिती आपण मिळविल्यास देशकालपरिस्थिति

लक्षांत येण्यास विलंब लागणार नाहीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यास ग्रहण लागून परकीयांची सत्ता येथें दृढमूल झाली होती. ती सत्ता उखडून टाकण्यासाठीं राष्ट्रांतील अनेक थोर व्यक्तींनीं आपल्यापरी प्रयत्न केले होते. परंतु दैवगतीमुळें यश आलें नाहीं. परकी सत्तेखालीं जनता कशी स्वाभिमानशून्य बनते हें न सांगतांच कळेल. तेव्हां लोकांना उपदेश करण्याच्या निमित्तानें असे श्रीस्वामीमहाराजांसारखे अवतारी पुरुष निरनिराळ्या ठिकाणीं कार्य करीत असतात. श्रीकृष्णांनीं म्हटल्याप्रमाणें सज्जनाकडून लोकांचा उद्धार करण्यासाठीं योग्य भूमि शोधून श्रीस्वामीमहाराजांनीं अनेक लोकांकडून कार्य करविलें. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्यावरहि श्रीस्वामीरायांचा अनुग्रह झाला होता हें पुष्कळांस माहीत नाहीं. गंगासागरास जाण्याच्या मिषानें महाराजांनीं महर्षि रामकृष्ण परमहंस यांना भेट दिली. व भेटींतच त्यांना अनुग्रह देऊन कृतार्थ केलें. देशाचा ऊर्जितकाल यावयाचा असतो तेव्हां असे अवतारी महात्मे येतात व ते आपलें कार्य बिनबोभाट करून जातात. ही गोष्ट श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या चरित्रावरून वाचकांना अवगत होईल. तेव्हा श्रीस्वामीमहाराज हे आपला अवतार संपविण्यापूर्वी अक्कलकोटास कां आले हें ध्यानांत येईल.

या ठिकाणीं महाराजांच्या वर्णनपर एकदोन उतारे देणें प्राप्त आहे. या उताऱ्यांचें मनन केल्यास त्यांच्यासंबंधानें यथार्थ कल्पना येईल. महाराजांचें वर्णन करतांना त्यांचें एक चरित्रलेखक श्री. भागवत लिहितात, "चर्मचक्षूंना सहन न होण्यासारखें जरी महाराजांचें तेज होतें तरी भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां ते सौम्य तेज प्रकट करीत असत. अशी तेजःपुंज मूर्ति पाहण्याबरोबर कोणाचेंहि मन ह्या मूर्तीला सोडून जाण्याविषयीं प्रवृत्त होत नसे. चेहरा मोठा भव्य, आकर्ण नेत्र, सरल नाक, विशाळ कपाळ, आजानबाहू व कांति लिंबासारखी सतेज असून फार नाजूक असे. हे शरीरावयव व त्यांचा तो नाजुकपणा आणि भव्यपणा पाहण्याबरोबरच समाधान वाटण्यासारखें होतें. अशी अवयवरचना व तेजःपुंज कांति अन्य ठिकाणीं दृष्टीस पडत नाहीं." श्रीगुरुलीलामृतकर्ते वामनबुवा ब्रह्मचारी त्यांचें वर्णन पुढीलप्रमाणें करतात— "रक्तशामलांग प्रसन्नवदन। वक्षविशाल कंबूग्रीवासमान शोभायमान। चंपकवत्नासाग्रकमलदलनयन। आजानुबाहू सरल शोभती ॥ ७४॥ सुकुमारजन्मजरारहित। सुपादस्वंगुली सुजघन विराजित। सुनाभीशुभ उरुशुभलिंग सहित। आच्छादित

कौपिनवस्त्रे ॥ ७५ ॥ सुपार्श्वजघनोत्तम विशाल। महास्कंध शोभती कोमल। दीर्घ पृष्ठोत्थ सर्वदा निश्चल। सुहसा देखा लक्ष्मीवान साजती ॥ ७६ ॥ बिंब्रोष्ट स्वच्छ शुभदंत झळकती। विद्युज्जिव्ह सुतालक शोभती। दीर्घ चंपकनासा सतेजती। प्रकाशती सुकपोल सुकर्ण ते ॥ ७७ ॥ मीलीतोन्मीलीत नेत्र शुभ्र विशाल। सुभ्रूमध्य कोमल। सुंदर दिव्य प्रकाशित भाल। भस्म सुगंध युक्त ते ॥ ७८ ॥ कंठी रुद्राक्ष तुलसी माला स्फटिक। विलसत असे हेम मुक्त प्रवाळक। कर्णी चारचार कुंडलरूप अमोलिक। ऐसे अलौकिक ध्यान ॥ ७९ ॥"

या वर्णनावरून महाराजांच्या शरीरयष्टीची व त्यांच्या अंगलोटाची चांगली कल्पना येईल कै. भागवत व कै. वामनबुवा ब्रह्मचारी यांना महाराजांचे सान्निध्यांत राहण्याचें भाग्य लाभलें होतें त्यामुळें त्यांनीं त्यांचें वर्णन केलें असल्यानें या ऐतिहासिक घटनेस मोटें महत्त्व प्राप्त झालें आहे. आपल्या भारतांत अनेक महात्मे होऊन गेले. त्यांच्यासंबंधाची माहिती कोणी जतन करून ठेवली नसल्यानें त्यांची माहिती नष्ट स्मृति साम्राज्यांत अंतर्धान पावल्यामुळें भारताची फार हानि झाली आहे. ही गोष्ट सर्वांनाच पटेल. व्यक्तीचें कार्य व त्याचा जनमनावर परिणाम यांची स्मृति नष्ट झाली असेल तर राष्ट्रांतील जीवनावर त्याचा अनिष्ट परिणाम घडून महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांची विस्मृति होते. असो, परंतु महाराजांच्या चरित्रलेखकांनीं त्यांच्यासंबंधानें थोडी माहिती जतन करून ठेवल्यानें त्यांचें आम्हां वाचकांवर व साधकांवर अत्यंत उपकार झाले आहेत. आतां महाराजांच्या दिनचर्येच्या संबंधीं थोडासा ऊहापोह करून हें प्रकरण संपवूं. कै. भागवत आपल्या चरित्रांत त्यांच्या दिनचर्येसंबंधीं म्हणतात, "महाराजांची वृत्ति फारच विलक्षण प्रकारची असे. त्यांच्या वृत्तीस कित्येक लोक पिशाच वृत्ति म्हणत. प्रातःकाळ होण्याबरोबर नित्य नेमानें उठून संन्यासमार्गास योग्य असा प्रातःस्नादिक जप, तप किंवा अनुष्ठान अथवा ध्यानधारणा वगैरे कांहींएक करण्याचा त्यांचा नेम नसून स्वच्छंदानें व दुसऱ्याचे हातानें सर्व कारभार होत असे. महाराजांना दुसऱ्यानें स्नान घालावें, परंतु स्नान व्हावें असें त्यांच्या मर्जीस आल्यास, महाराजांना दुसऱ्यांनींच जेवण घालावें, परंतु जेवावे अशी महाराजांची लहर लागल्यास, महाराजांच्या अंगावर पांघरूण दुसऱ्यांनींच घालावें. परंतु तें अंगावर असावें असें त्यास वाटल्यास; महाराजांनी चाहील त्या ठिकाणीं जावें, ती जागा मग राजाचा

रंगमहाल असो, अगर स्मशान भूमि असो, वाळवंट असो, निवडुंग असो; महाराजांस प्रतिबंध करण्यास कोणीहि धजत नसत. महाराज चाहील त्याच्या हातचें अन्न खात. परंतु महाराज अधर्मी होते, अशी कल्पनाहि कोणास करवत नसे. महाराज दिवसांतून कधीं कधीं दोन-दोनदां स्नानें करीत. केशराच्या व चंदनाच्या उट्या अंगाला लावून घेत. आणि आरती करून घेत. कधीं कधीं आठ-आठ दिवस स्नानच करीत नसत. कोणास न कळत एकाद्या बागेंत अगर स्मशानांत अगर जंगलांत जाऊन राहत, महाराज चालू लागले म्हणजे त्यांच्या-बरोबर कोणाच्यानेही चालवत नसे. ते बोलू लागले म्हणजे ते एकसारखे कांहीं तरी बोलत असत. हुक्का ओढूं लागले म्हणजे एकसारखा हुक्काच ओढीत बसत. लहान मुलाबरोबर खेळूं लागले म्हणजे एकसारखा खेळच चालावा. एखादें वेळीं स्वारी रागावली म्हणजे सातसात दिवस त्यांचा रागच हालूं नये. आनंदांत स्वारी असली म्हणजे सर्वकाळ सर्वांजवळ मधुरवाणीनें बोलावें. अशा प्रकारची महाराजांची दर घटकेस वृत्ति बदलणारी असल्यानें त्यांच्याविषयीं खरी परीक्षा खऱ्या पारख्यावाचून कोणालाच झाली नाहीं." यावरून सामान्य माणसाच्या मापानें सिद्ध पुरुषांना मापण्याचा मोह धरूं नये. ते वर्णाश्रम धर्मातीत असतात. त्यांची वृत्ति बालोन्मत्त पिशाचवत् असते असें जें म्हणतात तेंच खरें. ही गोष्ट श्रीस्वामीमहाराजांच्या ठिकाणीं हरघडी दिसून येईल.

श्रीअवधूतचिंतन श्रीस्वामी समर्थ मंगळवेढ्यास आले व तेथें त्यांनीं सुमारें १२ वर्षें वास्तव्य केलें. त्या कालांत कांहीं विशिष्ट लोकांनाच त्यांच्या अवताराचें महत्त्व समजलें त्यामुळें त्यांची प्रसिद्धि झाली नसल्याचें एक चरित्रकार सांगतात. पण तसें घडल्याचें दिसत नाहीं. कारण महाराजांचा संचार सर्वत्र असल्यानें लोकांना त्यांची महती जशी पटावी तशी पटली नव्हती. एके ठिकाणीं वास्तव्य असते तर समजून आलें असतें. मंगळवेढ्यास ते पटवर्धनाच्या कुरणांत राहत व मनास आलें तरच गांवांत येत. यांत त्यांचा कांहीं विशिष्ट हेतु असावा असें त्यांच्या तेथील वास्तव्यावरून दिसून येई. ज्यांचें भाग्य असेल त्यांच्या-वरच महाराजांची कृपा होई. मंगळवेढ्यांतील सत्पुरुष श्रीसीतारामबुवा यांच्या-वर महाराजांची पूर्ण कृपा होती. श्रीसीतारामहाराज हे लहान असतांनाच अक्कलकोटास गेले. सीतारामबुवा घरांतील सापत्न आईच्या जांचामुळें अक्कल-कोटास गेल्याचें कै. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनीं एके ठिकाणीं लिहून ठेवलें

आहे. हे सीतारामबुवा जेव्हां अक्कलकोटास गेले तेव्हां ते येत आहेत असें पाहून श्रीस्वामीमहाराज जवळ असलेल्या चोळाप्पा भक्तास म्हणाले, " पोरगें उपाशी आहे. त्याला जेवावयास घेऊन जा." पुढें तो लहान मुलगा तेथेंच राहिला. त्याचा नेहमींचा क्रम महाराजांच्यापुढें सारखें बसणें. तेथून त्यांच्या आज्ञेप्रमाणेंच हलणें, एरव्ही शांत बसणें. सहासात वर्षें गेल्यावर महाराजांनीं त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून त्यास आतां मंगळवेढ्यास जावें असा आदेश दिला. त्यावरून ते मंगळवेढ्यास कायम राहिले. सीतारामबुवांच्या अनेक महत्त्वाच्या आठवणी तेथील लोकांस आहेत. प्रतीमहाराज असेच तेथील लोक समजत. पांगारकर यांनीं आपल्या आत्मचरित्रांत या सत्पुरुषाची पंढरपुरास कशी भेट झाली व ओळखदेख असतांना आतां यापुढें विशेष लेखन न करता ध्यानाकडे लक्ष द्यावें" अशी आज्ञा केली होती. मंगळवेढ्यांतील ही व्यक्ती महाराजांच्या दृष्टीनें लायक ठरली हेंच खरें.

महाराज मंगळवेढ्याहून सोलापूर व तेथून अक्कलकोट येथें आल्याचें वर लिहिलें आहे. या ठिकाणीं महाराज आले असतां श्रीक्षेत्र गाणगापूर येथील कांहीं भाविक पुजारी तेथें महाराजांच्या दर्शनार्थ आले होते. त्यांनीं महाराजांचें दर्शन घेतलें. तेव्हा सहज महाराजांनीं त्यांस विचारलें "कुठून आलांत?" त्यांनीं गाणगापूराहून आल्याचें सांगितलें महाराजांची स्वारी प्रसन्न होती. महाराजांनीं त्या पुजाऱ्यांना तेथें कोण देव आहे असें विचारलें. त्यांनीं आपले देवाचें नांव "श्रीनरसिंहसरस्वती" आहे असें सांगितलें. तेव्हां महाराज म्हणाले, " माझें नांव नृसिंहभान आहे बरें. कित्येक प्रसंगीं मीच राम, मीच कृष्ण, असे अनेक अवतार धारण केले" असें म्हणून गप्प बसले. तेव्हां एका भक्तानें प्रसन्न मुद्रा पाहून त्यास "आपण कोण?" असें भीतभीत विचारलें. "दत्तनगर मूळ पुरुष, वडाचें झाड" असे उद्गार महाराजांच्या मुखांतून निघाले. कै. मुळेकर यांनी आपल्या चरित्रांत एका प्रसंगाचा उल्लेख केला आहे. ही हकीकत त्यांच्या मित्रानें त्यांना कळविली होती. ते गृहस्थ त्या वेळीं हजर होते. म्हणून मुळेकरांनीं त्यांचें वाक्य प्रमाण मानून दिली आहे. ती गोष्ट अशी "कलकत्त्याहून एक इंग्रजी बॅरिस्टर व त्याचे बरोबर एक पारशी सद्गृहस्थ असे कांहीं कामानिमित्त मुंबईहून पुण्यास आले होते. त्यांनीं महाराजांची कीर्ति तेथें ऐकिली. ही मूर्ति कशी आहे हें पाहण्याच्या उद्देशानें ते अक्कलकोटास गेले. जुळल्यास त्यांनीं

योगसाधन काय केले वगैरेबद्दल विचारपूस करून माहिती घ्यावी या उद्देशानें त्यांनीं महाराजांचें दर्शन घेतलें. तेव्हां महाराजांची स्वारी बुधवार पेठेंतील राचापा मोदी यांच्या चौसोपींत बसली होती. वरील गृहस्थ येण्याचे अगोदर महाराजांनीं मोदी यांस तीन खुर्च्या मांडण्यास सांगितलें. महाराजांच्या आज्ञे-प्रमाणें त्यांनीं तेथें खुर्च्या ठेविल्या. तो बॅरिस्टर व पार्शी दर्शनास आल्यावर महाराजहि एका खुर्चीवर बसले. समर्थांची दिव्य कांति पाहून दोघेहि विस्मित झाले. काय विचारावयाचें हें लक्षांत न राहतां साहेबानें 'आपण कोठून आला?' एवढाच काय तो प्रश्न महाराजांस केला. ते म्हणाले, "प्रथम आम्ही कदली-वनांतून निघालों. फिरत फिरत कलकत्ता वगैरे शहरें पाहिलीं. बंगाल हिंडून कालीचें दर्शन घेतलें. गंगातटाकानें फिरत फिरत हरिद्वार व बद्रीकेदारेश्वरास जाऊन आलों. नंतर तेथून गोदातटाकास आलों. गोदावरींत स्नान करून दक्षिणेस हैदरा-बादेस गेलों. तेथें कांहीं दिवस वास्तव्य करून नंतर पंढरपूर, बेगमपूर येथून मोहोळास आलों. तेथून सोलापुरास आलों." पुढें सर्वांचें कांहीं भाषण होऊन व थोडासा विचारविनिमय झाल्यानंतर भेटण्यास आलेल्या सद्गृहस्थांनीं महाराजांची आज्ञा घेऊन आपल्या गावाकडे प्रयाण केलें!

● ● ●

## अध्याय पांचवा

# महाराज कोण होते ?

श्रीस्वामी महाराजांचे भक्त त्यांस साक्षात् दत्तप्रभूच समजत व त्यास कांहीं बलवत्तर कारणें घडलीं. अनेकांना श्रीगाणगापूर, श्रीनरसोबाचीवाडी, श्रीऔदुंबर वगैरे ठिकाणीं अनुष्ठान करीत असतांना त्यांना अक्कलकोटास जाण्याची आज्ञा दिली गेली. खुद्द अक्कलकोटचे राजेसाहेब गाणगापुरास गेले असतां त्यांस तुझ्या गांवांत दत्तप्रभू आले असतां तूं इकडे कां आलास, असा दृष्टान्त झाल्यानें तेहि परत अक्कल्कोटास आले. त्याबाबतींत अनेकजणांची दिशाभूल होण्यासारखी आहे. जे स्वामीभक्त आहेत ते भोळ्या भावानें त्यांस साक्षात् परब्रह्मरूपी प्रभू दत्तात्रेयच मानतात. कांहीं सुशिक्षित भक्तहि त्यांना ते दत्तात्रेयच वाटतात. पण समाजांत विशेषतः हल्लींच्या युगांत असा एक वर्ग आहे कीं तो तसें मानीत नाहींत. महाराजांनी अक्कलकोट येथें लौकिक दृष्ट्या देह विसर्जन केला. साध्या माणसाप्रमाणें त्यांचें देहावसान झालें. तेव्हां देवाधिदेव म्हणणें योग्य होणार नाहीं. याबाबतींत ते एक गोष्ट विसरतात. अवतारी पुरुषांचा संकल्प देह असतो व मानवाचा कर्म देह असतो. अवतारी पुरुषांच्या मागें बंधन नसतें. पण मानवास त्याच्या पूर्वकर्मानुसार पापपुण्याचा जो कांहीं परिपाक असेल तो भोगावाच लागतो. भारतांत असे अनेक साधु होऊन गेले आहेत कीं त्यांचें ते गेल्यानंतरहि साधकांना दर्शन झालें आहे. आजहि बुद्धिप्रामाण्य युगांत श्रीज्ञानेश्वरादि साधुसंतांचें दर्शन होतें. ही गोष्ट काय दर्शविते ? जगाची धारणा अशा महात्म्यांकडूनच होते असा सिद्धान्त आमच्या उपनिषद्कारांनीं मांडला आहे. तो आजच्या घटकेस मागें पडला असला तरी त्याच्या मौलिक प्रकृतीस बाध येऊं

शकत नाहीं. श्रीरामकृष्ण परमहंस यांचें चरित्र काय सुचवितें? श्रीविवेकानंदांनींहि श्रीरामकृष्ण परमहंसांस देवाच्या अस्तित्वाबद्दल आपली शंका विचारली होती. त्यांनीं त्यांस अस्तिपक्षीं उत्तर देऊन होय तो देव दाखवितो असें आश्वासन देऊन त्यांची इच्छा परिपूर्ण केली. विवेकानंद हे अत्यंत बुद्धिवादी गृहस्थ असल्याची ख्याति होती. त्यांनीं आपली बुद्धि कोणास विकली नव्हती. सबब जगांत अशी नियामक शक्ति वास करते हें नाकबूल करून चालणार नाहीं. त्या शक्तीला आपण शरण गेलेंच पाहिजे. आणि अशा शक्तीचा कांहीं महात्म्यांच्या ठिकाणीं आविष्कार झाला तर त्यांचें म्हणणें कसें खोटें होईल? मनुष्यानें कोणत्याहि गोष्टींचा शास्त्राप्रमाणें पडताळा पाहून नंतर आपलें मत द्यावें. शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति व आत्मप्रचीति असे तीन मार्ग पूर्वाचार्यांनीं सांगितलें आहेत. ते कोणासाठीं सांगितलें आहेत? बुद्धिवादी म्हणून कोणत्याहि अतींद्रिय गोष्टींचा उपहास न करतां त्याच्या मुळाशीं कोणतें तत्त्व आहे याचा धिम्मेपणानें व डोळस दृष्टीनें शोध घ्यावा हेंच उपयुक्त ठरेल. संशोधक एकदम आपलें मत देत नाहीं. तो सर्व बाजूंनीं साधकबाधक प्रमाणें पाहून संशोधन करीत असतांना त्यांस अनेकविध विचारांच्या प्रवाहांत जावें लागतें. जी गोष्ट सिद्ध करावयाची असते ती व्यवस्थित सिद्ध व्हावयाची असेल तर तिचें पृथक्करण करूनच ( सिंथेटिक वा ॲनॅलिटिक ) निष्कर्ष काढणें शेवटीं उपयुक्त असते. असा त्या शास्त्रांतील तज्ज्ञांचा सल्ला आहे. तो डावलून आपणांस चालणार नाहीं. हीच गोष्ट अतींद्रिय गोष्टींचे संशोधनाच्या कामीं लागू करणें न्यायतःच योग्य ठरतें. असामान्य बुद्धीच्या मनुष्यास एखादी गोष्ट चटकन ध्यानांत येते. पण ती सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेर असते हें आजहि आपल्यास कळून येते. तेव्हां आपली बुद्धि नीट वापरून कोणत्याहि शास्त्राकडे पाहिल्यास आपणांस त्या शास्त्राची कसोटी लावतां येईल. हीच कसोटी योगाभ्यासी लोकांच्या शक्तीसंबंधानें वापरली तर आपल्यास ( शोधकांस ) त्यांच्या ठिकाणीं अतिमानुषीय शक्तीचा प्रादुर्भाव. कसा झाला व त्या जोरावर ते भूत भविष्य वर्तमान कालांतील गोष्टी कशा सांगू शकतात हें ध्यानांत येईल. योगाभ्यासी महात्म्यांनीं कोणतें साधन केलें, उपासना कशी केली व त्यासंबंधीं कोणतीं पथ्यें पाळलीं यांचें ज्ञान करून घेणें अगत्याचें आहे. साध्या परीक्षेचा अभ्यास करावयाचा झाल्यास आपला विषय किती तयार पाहिजे याची माहिती चांगल्या विद्यार्थ्यांना सांगण्याची जरूरी नाहीं.

साधी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीं हा खटाटोप करावा लागतो. मग परमेश्वराची प्राप्ती करून घेण्यासाठीं आपल्या आयुष्याचा वेंच किती करावा लागेल याचें मनन बुद्धिप्रामाण्यवादींनीं करावें. हल्लींच्या युगांतील विद्वान कै. गुरुदेव रामभाऊ रानडे यांनीं लिहिलेले ग्रंथ या लोकांनीं पाहावे म्हणजे तो प्रांत किती कष्टमय व कसा कष्टसाध्य आहे हें लक्षांत येईल. एका गृहस्थानें कै. गुरुदेव रानडे यांच्या अध्यात्मज्ञानाविषयीं एक गमतीदार गोष्ट सांगितली आहे. सांगणाराहि जबरदस्त तत्त्वज्ञ आहे. तो म्हणतो, “आम्ही तत्त्वज्ञानाचीं पुस्तकें वाचतों व लिहितों पण गुरुदेव रानडे तत्त्वज्ञानांत अवगाहन करून जीवनांत त्याचा अनुभव अनुभवीत काळ कंठतात.” या म्हणण्याचा आशय ध्यानांत येण्यास विलंब लागणार नाहीं. तेव्हां अर्थवादाकडे लक्ष न देतां अशा महात्म्याच्या जीवनाच्या बुडाशीं कोणतीं चिरंतन तत्त्वें आहेत याचें शोधक बुद्धीनेच नव्हे तर आस्तिक्य बुद्धीनेंच मनन केल्यास त्या वस्तूचें खरेंखुरें ज्ञान प्राप्त होईल यांत संदेह बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं.

याप्रमाणें आपली बुद्धि चालवून विचारास एकदां चालना मिळाली म्हणजे एकेक धागादोरा उकलण्यास मदत होते व जगाचें आदिकारण काय असावें व त्याचा नियंता कसा असतो हें समजण्यास मदत होईल. मानवी प्रयत्न शुद्ध हेतूनें केला तर तो कधींहि वांया जात नाहीं. साधी वस्तु मग ती चैतन्ययुक्त असो अगर जड स्वरूपांत असो कायमची नष्ट होत नाहीं असा त्रिकालाबाधित सिद्धान्त आहे. तिचें अस्तित्व निराळ्या स्वरूपांत भासमान होतें. ही गोष्ट आजच्या भौतिक विज्ञानशास्त्राच्या युगांत कसोटीस लागणारी आहे. लहरींचें ज्ञान झाल्यानें आपल्यास टेलिव्हिजन, रेडियो आदि शास्त्रांचें महत्व पटावयास लागलें आहे. तीच गोष्ट अतींद्रिय वस्तूंचा शोध करण्याच्या हेतूनें अमलांत आणल्यास ती साध्य होऊं शकेल. ज्याप्रमाणें सर्व संशोधक यशस्वी होऊं शकत नाहींत तद्वत प्रत्येक अतींद्रियशक्तीचा शोधपूर्वक अभ्यास करणारा मानव यशस्वी होईलच हे सांगतां येणार नाहीं. तरी पण प्रयत्नशील मनुष्यानें या सर्व गोष्टींचा सर्व बाजूंनीं विचार करून ईश्वरानें दिलेली बुद्धि वापरून जगाच्या नियामकाचा शोध करण्याचा प्रयत्न करावा म्हणजे त्यास थोडें तरी ज्ञान प्राप्त होईल असा इतिहास आहे. उपनिषद्द्रष्ट्यांनीं असाच प्रयत्न करून आपल्या बुद्धीची झेंप लांबवून मूलतत्त्वाचें संशोधन केलें तेव्हां त्यांस त्या वस्तूचा लाभ

होऊन त्यांनीं छातीठोकपणानें सांगितलें, " होय. अरे, मीं त्या नियामक शक्तीचा अनुभव घेतला. ती अशा अशाप्रकारें दिसून येते. तेव्हां जें ज्ञान अगर जे वर परमेश्वरानें दिले आहेत ते समजून घेऊन मग प्रयत्न कर. म्हणजे तो मार्ग दिसेल. " या वरील विवेचनाचा अन्वयार्थ लक्षांत घेऊन मग श्रीस्वामीमहाराजां-सारखें जे अवतारी पुरुष हिंदुस्थानांत झाले त्यांच्या लीलांविषयीं अगर त्यांच्या अतिमानुषीय सामर्थ्याविषयीं शंका येणार नाहीं.

एवढा उपन्यास केल्यानंतर आपणांस कांहीं गोष्टींकडे वळणें प्राप्त आहे. श्रीस्वामींची दिनचर्या आम्हीं वर्णिली आहेच. श्रीस्वामीमहाराजांसारख्या लोक-विलक्षण महापुरुषाच्या जीवनाकडे सामान्य " नरदेही " या भावनेनें कोणींहि पाहूं नये. " स्मशानांतील राख हीच ज्यांची पुष्पशय्या, माध्यान्हकाळाचा चंड-किरण हेंच ज्यांचें छत्र, निवडुंगाच्या फडांचे ढीग ह्याच ज्यांच्या पायघड्या, शरपंजर हा ज्यांचा बिछाना, आनंदगुहा हाच ज्यांचा रंगमहाल, दिशा हेंच ज्यांचें वसन, मेलेल्या ढोरांचीं हाडकें हींच ज्यांचीं खेळणीं " असे या महात्म्याचें वर्णन करतांना श्री. स. कृ. फडके यांना 'शिवमहिम्न' स्तोत्र आठवलें व त्यांतील शिवशंकर प्रभूसंबंधानें पुष्पदंताचें वर्णन ताडून पाहण्यास सांगितलें. पुष्पदंत म्हणतो, " स्मशानेष्वाक्रीडा स्मरहर पिशाचाः सहचराश्चिता भस्मालेपः स्रगपिनृकरोटीपरिकरः । अमंगल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलं तथाऽपिस्मर्तॄणांवरद परमंमंगलमसि ॥ " पुष्पदंतानें श्रीशंकराचें जसें वर्णन केलें त्याप्रमाणेंच श्रीस्वामी-महाराजांच्या वास्तव्यांत अनेक मंगलप्रद घटना घडल्या आहेत. त्यांचा विचार करणें आमच्या आटोक्याबाहेर आहे. ज्या घटना आहेत त्या मूलग्राही आहेत. त्यांची संगति लावणें योग्य होईल. सामान्यजनांच्या दृष्टीनें त्या असामान्य व अलौकिक लीला दिसल्या तरी त्याभागें कांहींएक विशिष्ट गूढतत्त्व आहे याची जाणीव ठेवून त्याचा उलगडा करावयाचा प्रयत्न कोणीं केल्यास तें योग्य होईल.

● ● ●

## अध्याय सहावा

" अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोतियः "
" स सन्यासी च योगी च निरग्निर्नचाक्रियः " ॥

# लोकोद्धाराची तळमळ

श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ केवळ भाविकांसाठींच असल्यामुळें तो सर्वांना सुलभ झाला आहे. त्यांतील कथानकांवरून आपल्यास आचारधर्मांबरोबर सामान्य माणसांचीं संकटें दूर कशीं केलीं जातात याची माहिती मिळते. पण याहिपेक्षां अधिक महत्वाचें असें अवतारकार्य श्रीगुरुचरित्रांतील श्रीदत्तप्रभु, श्रीपाद्वल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांनीं आपल्या अवतारकाळांत केलें हें विशेष होय. तें कार्य अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें होतें. उच्च प्रतीचे जे साधक व श्रेष्ठ सिद्धपुरुष होते त्यांना दर्शन देऊन कृतार्थ केलें आणि भेटीच्या मिषानें त्यांच्या द्वारा धर्म-संजीवनाचें कार्य अविरत चालेल अशी तजवीज केली. या सर्व तजवीजी सर्वांस सारख्या उघड नसल्यामुळें क्वचित कोठें उल्लेखाखलीकडे त्यासंबंधीं तपशीलवार माहिती कोठेंच सांगितली गेली नाहीं. पण श्रीदत्तगुरु, श्रीपादयति व श्रीनृसिंह-सरस्वती यांनीं आपलें स्वरूप प्रकट करतांच ते प्रथम हिमालयांतील सिद्धांकडे गेले असें कांहीं ठिकाणीं वर्णन आढळतें. हे महात्मे हिमालयाच्या गुहेतून बाहेर आले न आले तरी ते जगाच्या योगक्षेमाची तजवीज करतात असें थिऑसोफी-च्या वाङ्मयावरून दिसून येईल. या विचारसरणीचा विचार करणें योग्य होईल. कारण असे महात्मे लोकसंग्रहाचें कार्य आपल्या मनांतहि आणीत नाहींत अशी शंका प्रदर्शित करण्याचें प्रयोजन धाडसाचें होईल. श्रीगुरूंच्या शिष्यांपैकीं पहिले

तीन शिष्य हिमालयांत तपश्चर्येसाठीं गेले व बाकीचे श्रीगाणगापुरांत राहिले असें एकावन अध्यायावरून समजतें. कारण श्रीनरसिंहसरस्वती श्रीशैल्यास जाण्याच्या अगोदर त्यांना तेथें पाचारण केलें होतें व तेच श्रीस्वामी समागमें होते. या चौघांनाच पुष्पें मिळालीं यावरून या उरलेल्या चौघांसच महाराजांनीं कोणतें कार्य करावयास सांगितलें हें समजण्यास मार्ग नाहीं. पण महाराजांनीं देशकाल परिस्थिति लक्षांत घेऊनच त्यांची कोणत्या तरी कामगिरीवर योजना केली असली पाहिजे असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. श्रीनृसिंहसरस्वतींनीं भारतभर भ्रमंती करून अनेक शिष्यांना दीक्षा दिली होती हें श्रीगुरुचरित्रावरून स्पष्ट दिसतें. तेव्हां त्यांस कांहींतरी निश्चित काम सांगितलें असलेंच पाहिजे. श्रीगुरुचरित्राच्या १५ व्या अध्यायांत त्यांच्याजवळ जे अनुग्रहीत यती होते त्यांना तीर्थयात्रा करून श्रीशैल्यास एका वर्षांनीं येण्यास आज्ञा दिली; व यतींनीं प्रत्येक गांवीं किती दिवस राहावें हाहि दंडक सांगितल्यामुळें त्यांची सर्व शिष्य-शाखा तीर्थयात्रेच्या मिषानें बाहेर पडली. श्रीनृसिंहसरस्वतीपाशीं एकच सिद्ध राहिले व ते महाराजांच्याबरोबर शैल्यास गेले. या सर्व हकीकतीवरून देशोद्धाराची कामगिरी विषम परिस्थितींत बिनबोभाट पार पाडण्यासाठीं कशी योजना केली होती हें लक्षांत येईल व हाच आदर्श पुढें ठेवून पुढील सर्व संत-महंतांनीं लोकोद्धाराची कामगिरी कोणत्या प्रकारें पार पाडली हें श्रीएकनाथ, श्रीरामदास, श्रीतुकाराम, श्रीनामदेव, श्रीज्ञानेश्वर वगैरे साधुसंतांच्या अतुलनीय कामगिरीवरून ध्यानांत येईल. यासंबंधींचा ऊहापोह एका स्वतंत्र अध्यायांत करावयाचा असल्यानें या ठिकाणीं फारसा विचार करण्याची गरज नाहीं.

श्रीनृसिंहसरस्वती हे कदलीवनांत गुप्त झाले व तेथें म्हणजे श्रीशैल्यावर कांहीं काल त्यांनीं अज्ञातवासांत काढल्याचें दिसून येतें. व तेथून स्वारी हिमालयांत गेली असावी. कारण श्रीअक्कलकोट महाराजांनीं "आपण हिमालयांत कांहीं काळ घालविला व तेथून खालीं यात्रेसाठीं आलों" अशी माहिती त्यांच्या चरित्रकारांनीं दिली आहे. ती खोटी असणें शक्य नाहीं. परमेश्वर अज्ञात आहे. मग तो ज्ञात कसा होतो ? साधुसंतांनीं त्याचें स्वरूप पाहिलें व त्याच्याशीं बोलणें करून आपल्या जन्माचें सार्थक करून घेतलें असा आपल्या सनातन अनादि धर्मांचा इतिहास कंठरवानें लोकांना सांगत आहे. उपनिषद्द्रष्टयांनीं जगांतील अमोलिक ज्ञान आपल्या दर्शनांत सांठवून परमेश्वरप्राप्तीचे मार्ग किती प्रकारचे

असूं शकतात यासंबंधींचें विवेचन अत्यंत मुद्देसूद व तर्ककर्कश पद्धतीनें केलें असल्यानें शंका घेण्यास जागाच ठेविली नाहीं. हा भारताचा अत्यंत बहुमोल ठेवा त्यांनीं जतन करून पुढील पिढीस उपलब्ध करून दिला याबद्दल सर्व पुढील पिढी त्यांचें ऋण विसरेल तर तिच्या पदरीं कृतघ्नपणाचा महान दोष येईल. आज विज्ञानानें भूषित केलेले पाश्चिमात्य पंडित उपनिषद्द्रष्ट्यांनीं दिलेलें ज्ञान पाहून दिङ्मूढ झाल्याचे उद्गार त्यांच्या ग्रंथांवरून दिसून येतात. या गोष्टी कशाच्या द्योतक आहेत ? तेव्हां श्रीनृसिंहसरस्वतींनीं लौकिक दृष्ट्या आपला अवतार संपवून श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांना पुढील वारसा चालविण्यास सांगितलें असें म्हणणें समुचित होईल असें आम्हांस वाटतें. योगाभ्यासाच्या दृष्टीनें त्यांनीं कायापालट करून पुढें श्रीअक्कलकोटचे स्वामीमहाराज म्हणून तेच प्रकट झाले असें कां म्हणूं नये ? महाराज हिंदुस्थानांत सर्वत्र हिंडले. त्यांनीं निरनिराळीं नांवें धारण केल्याचें त्यांचें चरित्रकार भागवत, माधवशास्त्री मैसलगीकर, वामनबुवा ब्रह्मचारी आदि सर्व चरित्रकार म्हणतात. ते सर्व गुरुभक्ती-निष्ठ असल्यानें त्यांच्या शब्दांस कांहीं तरी किंमत देणें भाग आहे. श्रीसमर्थ-रामदासस्वामीहि भारतांत निरनिराळ्या नांवानें हिंडले. धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेजवळ श्रीस्वामीसमर्थांसंबंधानें हस्तलिखित बाडें आहेत त्यांतील पदावरून सप्रमाण दिसून येईल. तेव्हां श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांनीं भारतभ्रमंतीमध्यें अनेक नांवें धारण करून व त्या त्या भागांत ते कोणत्या नांवानें ओळखले गेले यासंबंधींची माहिती उपलब्ध असल्यानें महाराजांनीं लोकोद्धारासाठीं निरनिराळीं नांवें धारण केलीं हें योग्यच होय.

श्रीगुरुदेव हिमालयांत संचार करीत असतां कांहींएक गमतीदार गोष्टी घडल्या याचें विवेचन या ठिकाणीं अप्रस्तुत होणार नाहीं. महाराज हिमालयांत असतांना कांहीं चिनी स्त्रीपुरुष वनौषधि शोधण्यासाठीं फिरत होते. त्यांनीं महाराजांची स्वारी एका ठिकाणीं अगदीं शांतपणें बसलेली पाहिली. त्यांना हा यति अगदीं निरुपद्रवी व निरुद्योगी असावा अशी त्या प्रवाशांची भावना होऊन त्यांनीं महाराजांची चेष्टा आरंभली व एका झाडाच्या आड जाऊन शृंगारचेष्टा करण्यास सुरवात केली. परक्या मनुष्यापुढें त्यांना अशा कामुकपणें वागण्याचें कांहींच वाटलें नाहीं. " कामातुरणां न भयं न लज्जा " या न्यायानें त्यांची

वागणूक झाली. पण असा चमत्कार झाला कीं जे पुरुष होते ते सर्व स्त्रिया बनले !! पुण्यास बऱ्याच वर्षांमागें रास्ता पेठेंत एका मुसलमान फकिरानें एका पुरुषाचें लिंगच नाहींसें करून टाकण्याचा चमत्कार केल्याचें माहीत आहे. तेव्हा या महान यतिवर्याच्या दृष्टिक्षेपानें आपोआपच असा चमत्कार झाला असला पाहिजे अशी त्यांची खात्री पटून ते सर्व महाराजांस शरण आले व त्यांनीं त्यांस असे वेडगळ चाळे न करण्याबद्दल ताकीद देऊन त्यांना पूर्ववत् पुरुष करून निरोप दिला !!

याच ठिकाणीं आणखी एक गोष्ट घडून आली. व्याधांनीं तेथील श्वापदांना त्रस्त करून सोडलें होतें., तेव्हां एका हरिण बालकानें महाराजांपर्यंत धांव घेऊन त्यांच्यापाशीं तें निर्भय अंतःकरणानें स्वस्थ बसलें. तें पाहून मागें धावलेले व्याध यांना अत्यंत नवल वाटलें. व त्यांनीं महाराजांची क्षमा मागितली. अपराधी असतांनाहि त्यांना महाराजांनीं कृतार्थ केलें. महाराजांच्याजवळ बसलेल्या हरिण बालकाची माता शोध करीत करीत श्रीस्वामींपाशीं आली. यासमयीं तिलाहि तिच्या पूर्वजन्माचें स्मरण देऊन त्या अवस्थेंतून मुक्त केलें असें चरित्रकारांनीं लिहून ठेविलें आहे. यांत नवल वाटण्याचें कांहींएक कारण नाहीं. पुढे महाराज दुसऱ्या एका गुहेपाशीं गेले. तेथें एक तपस्वी दत्तदर्शनासाठीं पुष्कळ वर्षें तपश्चर्या करीत होता त्यालाहि भेट देऊन उपदेश केला. एका तपस्याची घोर तपश्चर्या पाहून त्यांस दया आली. त्यासहि उपदेश करून मार्गास लाविला. चरित्रकारानें महाराजांनीं पुढीलप्रमाणें त्यास उपदेश केल्याचें ग्रंथांत लिहिलें आहे. तो उपदेश पुढीलप्रमाणें "येथें मुख्यत्वें देहाकृति। बाह्य जडदृश्य मनोवृत्ति। त्यागूनि वासना निश्चिती। हृदयीं पाहावें आपणा ।। भूत येऊन अंगांत, द्विज। कल्पिते बोले मी अत्यंज। वेदोक्त धर्मी ब्राह्मणवंशज। मिथ्या अंत्यज म्हणविसी। शरीरप्रारब्धकर्मक्षय। तोंवरी आत्मानुसंधानअक्षय। श्रीगुरुहरीभक्तप्रिय। असावे अभय साधूनि ॥ श्रीस्वामींच्या तोंडची ही अमृतमय वाणी ऐकून तो कृतार्थ तर झालाच पण तेथें वास्तव्य करीत असलेले कोणी पूर्वजन्मीचें परोक्षज्ञानी उन्मत्त पंडित व्याघ्रजन्म पावून त्या तपोवनांत राहात होते, तेहि ही उपदेशवाणी श्रवण करून तटस्थ झाले !! पुढील जन्मीं तुम्ही नरजन्म पावून परमपुरुषार्थता साधाल असाहि श्रीगुरुंनीं त्यांना आशीर्वाद दिला. या ठिकाणीं आमचे वाचक या अहंमन्य पंडितास व्याघ्र जन्म कसा आला व त्यास हें ज्ञान कसें झालें अशी

72838

शंका घेतील. सबब अशा वाचकांनीं कृपा करून श्रीदत्तावतारी वासुदेवानंद टेंबे-स्वामी यांचें चरित्र अवलोकन करून त्यांत आणावकर संमधानें श्रीटेंबेस्वामींना स्वमुखानें सांगितलेली हकीकत वाचावी म्हणजे त्यांची शंका निर्मूल होईल.

हिमालयांत महाराजांचें वास्तव्य असतांना तेथील एका गुहेंत एक तपस्वी अनंत काल तपश्चर्या करीत बसला होता. त्याचा हेतु आपल्यास श्रीदत्तप्रभूंचें दर्शन व्हावें! परंतु त्याची आजवर इच्छा फलद्रुप झाली नाहीं तेव्हां त्यास फार उद्वेग वाटला व स्वतःचा त्यानें परोपरीनें उपहास करून घेतला. त्यामुळें त्याचा बुद्धिभ्रंश होऊन तो वेड्यासारखा इतस्ततः भटकूं लागला. स्वतःची तपश्चर्या निष्फळ झाल्याचें पाहून त्यांस अत्यंत खेद होऊन अनुताप झाला. तेव्हां त्यास श्रीगुरुदेवांनीं दृष्टान्त देऊन आपण ज्या गुहेंत होतों तेथें येण्यास सांगितलें. दृष्टान्ताप्रमाणें सदर तपस्वी महाराजांना भेटला व त्यास इच्छित दर्शन देऊन पावन केलें. याच्या उलट एक गोष्ट तेथें घडली असें कांहीं चरित्रांवरून दिसतें. हरिद्वारचे दोन ब्राह्मण मल्लविद्या शिकून आपल्या दुर्वर्तनानें लोकांस नाहक छळूं लागले. पुढें त्यांस दैवगतीमुळें रक्तपिती झाली व त्यांचे हाल कुत्राहि खाईना!! एकें दिवशीं महाराज भोजनास बसले असतां या दोन ब्राह्मणांची करुणावाणी ऐकून ते तसेंच पानावरून उठले व त्यांस आपल्या पादस्पर्शानें व्याधिमुक्त करून त्यांची शरीरकांति पूर्ववत् केली!! याहि गोष्टी अलीकडच्या कालांत होऊ शकतात. कै. डॉ. वि. म. भट यांनीं हुबळींचे सुप्रसिद्ध साधुवर्य श्रीआरूढस्वामी यांनीं येवल्याचे एकाचा गॅंगरिन केवळ स्पर्शानें दूर करून त्यास आरोग्य दिले. श्री. कै. भट यांनीं त्या मनुष्याची वैद्यकीय तपासणी करून व मुंबईसहि पाठवून सर्वतोपरी औषधयोजना करण्याचें ठरविलें होतें. परंतु व्याधि असाध्य ठरल्यानें त्यांनी त्या गृहस्थास हुबळीच्या श्रीस्वामीमहाराजांकडे पाठविलें. ब्रह्मीभूत श्रीआरूढस्वामींनीं त्यास आपल्यासमोर तीन दिवस बसा-वयास सांगून एक भाकरी खाण्यास सांगितलें व तिसरे दिवशीं रात्रीं त्यांचे सर्व नित्यक्रम पार पडल्यावर त्यास एकांतीं बोलावून त्याच्या पाठीवर हात फिरवून या असाध्य रोगांतून मुक्त केलें. डॉ. वि. म. भट यांनीं आपल्या "योगसिद्धि" या पुस्तकांत पाश्चिमात्य राष्ट्रांतील साधुसंतांना असे अलौकिक सामर्थ्य होते याची उदाहरणें पुष्कळ दिलीं आहेत त्यावरून हल्लींच्या बुद्धिवादी युगांत या गोष्टी आजमितीस घडत आहेत. तेव्हां महाराजांच्या कृपाप्रसादानें

वरील गोष्ट घडली याबद्दल संशय प्रकट करण्याचें कांहींएक प्रयोजन नाही श्रीनरसोबाच्या वाडीस श्रीदत्तभक्त नारायणमहाराज नांवाचें महान सत्पुरुष होऊन गेले. महाराजांचें वास्तव्य वाडीस असतांना तेथें एक गलितकुष्ठ बहुत दिवस सेवेस राहत असे. या मनुष्यास एके दिवशीं असा दृष्टान्त झाला कीं "नारायणमहाराज ज्या ठिकाणीं स्नान करतील त्यासमयीं त्यांच्या-वरून आलेल्या पाण्याच्या ओघानें तुझा रोग जाऊन व्याधिमुक्त होशील." या सेवेकऱ्याचा श्रींच्या ठिकाणीं पक्का विश्वास असल्यानें तो अगदीं पहाटेस श्रीनारायणमहाराज नदीस स्नानास केव्हा जातात याची वाट पहात बसला. नित्याप्रमाणें नारायण महाराज पहाटेस ४ वाजतां स्नानास निघाले. त्यांच्या मागोमाग हाहि गृहस्थ निघाला. त्यांना चाहूल लागल्यामुळें त्यांनीं त्यास विचा-रले "तूं माझ्या मागून कशास येतोस?" त्यानें आपल्यास झालेल्या दृष्टांताची हकीकत सांगितली. नारायणमहाराजांनीं तेथल्या तेथेंच महाराजांना प्रार्थना करून विचारून घेतलें व खात्री पटल्यावर त्यांनीं त्या व्याधिग्रस्तास आपल्या मागें येऊं दिलें. श्रीकृपेनें तो व्याधिमुक्त होऊन गेला व श्रीचरणीं आपलें उर्वरित आयुष्य वेचून तो भाग्यवान झाला. याहि गोष्टीची कोणास खात्री करून घ्याव-याची झाल्यास पुण्यास नारायण पेठेंत गोवेकरांच्या वाड्यांत श्रीदत्तभक्त वामनरावजी गुळवणीमहाराज यांना भेटून खुलासा करून घ्यावा.

एकदां महाराज स्वस्थ बसले असतां एका कुटिल ब्राह्मणानें स्वामींस "तुम्ही कोण, इकडे कशासाठीं आलां" वगैरे प्रश्न विचारून आपला स्वभाव प्रगट केला. महाराजांनीं त्याचा मनोदय जाणून ते म्हणाले, "मी कोण हें सांगण्यापूर्वी अगोदर तूं कोण आहेस तें सांगतों ऐक" ते पुढें म्हणाले "तूं पूर्वजन्मींचा एक हिंसक व्याघ्र आहेस. त्या पूर्वसंस्कारानें तूं काल रात्रीं गोहत्त्या केलीस, प्रचीती पहा-वयाची असल्यास त्यास आपल्या मागील परसांत जाऊन पाहण्यास सांगितलें. महाराजहि त्याच्याबरोबर गेले व त्यांनीं त्यास त्यानें मारलेली गाय दाखविली! या गुह्य स्फोटामुळें तो कुटिल ब्राह्मण अत्यंत लज्जित होऊन मेल्याहून मेला झाला. पुढें श्रींच्या चरणोदकानें ती मृत गाय उठली. या कुटिल ब्राह्मणास अनुताप झाल्याचें दिसून आलें व कृतकर्माचा खरोखर पश्चात्ताप झाला हें पाहून दया येऊन त्यास उपदेशपर गोष्टी सांगून सन्मार्गास लावले. पुढें त्यानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर दिलें. ते म्हणाले "आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण।

आमचें नांव नृसिंहभान। मूळ पुरुष वटवृक्षस्थान। दत्त नगर निवासी हो।" असे वामनबुवा ब्रह्मचारी वैद्य यांनीं आपल्या श्रीगुरुलीलामृतांतील अध्याय ८ वा ओवी १२८ मध्यें लिहिलें आहे.

श्रीगुरुलीलामृतांतील १३ व्या अध्यायांत वामनबुवांनीं या कलियुगांत देवदर्शन दुर्लभ असते म्हणून भक्तकाम कल्पद्रुम श्रीस्वामीमहाराजांनीं अवतार धारण करून अनेक आर्तांना दर्शन दिलें असें म्हटलें आहे. कृष्णगिरी मारुतीबुवा, रामपुरी खाकीबुवा, अवघडदास, अघोरीबुवा, द्वारकावनांतील मुत्यानामक संत, चरणदास वगैरेंना दर्शन देऊन त्यांची मनोवासना तृप्त केली. चरणदासास त्याची संशय-निवृत्ति करण्याच्या हेतूनें त्यांनीं उपदेश केला. याची संगतवार हकीकत वामन-बुवांनीं दिली आहे. त्यावरून उपदेशाचें महत्त्व वाचकांनाहि कळून येईल. महाराज म्हणाले, "चित्तनिग्रहाचे दोन प्रकार आहेत. एक हठनिग्रह व दुसरा क्रमनिग्रह. हठनिग्रह व्यर्थ आहे. क्रमनिग्रह योग्य आहे. त्याचा क्रम पुढीलप्रमाणें (१) अध्यात्मविद्याधिगम (२) महात्माजनांचा सहवास (३) वासनांचा परित्याग (४) प्राणस्पंदनिरोध योग. ज्यास पहिला मार्ग साधेल त्यानें दुसरा आचरावा. प्राणस्पंदास अभ्यास (म्हणजे आसन भोजनादिकांचे नियम पाळले पाहिजेत) व वासनात्यागास वैराग्य. प्राणस्पंद (निरोच) आणि वासना (त्याग) हीं चित्तवृत्तीचीं दोन बीजें आहेत. त्या एकाचा नाश झाला म्हणजे दुसरा आपोआप नष्ट होतो. वामनबुवा म्हणतात, "स्ववर्णाश्रम निष्काम कर्म-धवल। करिता ईश्वर प्रणिधान सर्वकाल। परमेश्वराशीं शरण गेल्या निर्मल। मनोजय होतसे।" असा उपदेश करून श्रीस्वामी कमंडलूतीर्थाच्या ठिकाणीं अदृश्य झाले. अदृश्य होतांना म्हणाले, "सदासर्वदा अंतर्यामीं अंतर्बाह्य असून स्मरणगाभीं। तिष्ठत आहे। संतहो ॥१३–१५३॥" असा श्रीदत्तप्रभूनीं माता अनुसयेस उपदेश केला होता. यावरून श्रीस्वामीसमर्थ हे साक्षात श्रीनृसिंहसरस्वतीच होते यांत शंका घेऊं नये. निरंजन रघुनाथ यांनीं आपल्या "साक्षात्कार" या प्रकरणांत (अ. ६ वा) असेच उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "मी सर्व व्यापकपण असे तुझे हृदयीं बसून। मजवेगळा ठिकाण। नाहीं कोठें रिकामा ॥७४॥ क्षणेक होतो मी सगुण। परीं अक्षयीपणें मी निर्गुण। माझें सत्यस्वरूप जाण। निराकार सर्वही ॥ ७५ ॥" हें सांगून शेवटीं स्मृतृगामित्वाची चुणुक दाखवून अदृश्य झाले!! या अलिकडच्या कथानकावरून पूर्वीं ज्या घटना घडल्या त्या नितांत खऱ्या

असल्याची वाचकांची खात्री होईल. श्रीटेंभेमहाराज यानीं श्रीचा जो मंत्र दिला आहे त्यांतहि " स्मर्तृगामी स्वभक्तांना उद्धर्ताभवसंकटांत " अशीच महती सांगितली आहे.

श्रीस्वामीमहाराजांचा संचार सर्व भारतांत झाला असल्यानें अनेकांना महाराजांनीं पावन केलें असें गुरुलीलामृतकार सांगतात. महाराज बडोद्यास आल्यावेळीं त्यांनीं अलवणीबुवास आत्मज्ञानाची प्राप्ती करून दिली. व आपण गिरिनार, काशी, मातापूर, करवीर, पांचाळेश्वर, द्वारका, अबू, श्रीगिरी, गिरिकर्णिका, मेरू वगैरे ठिकाणीं गेल्याचें या अलवणीबुवांना त्यांनीं सांगितलें ही गोष्ट वामनबुवांनीं आपल्या चरित्रांत ग्रथित केली आहे. कच्छ भागांत श्रीकृष्णत्रिविक्रम क्षेत्रीं तेथील स्नानाधिपति दक्षणा घेतल्यावाचून यात्रेकरूंना स्नान करून देत नसत आणि निर्धनांना गचांडी देऊन त्यांची हेटाळणी करीत. श्रीस्वामीहि त्या ठिकाणीं गेले असतां त्यानांहि त्यांनी अडविलें. तेव्हां महाराज योगबलानें त्या स्नान करण्याच्या तीर्थांत शिरून पाण्यावरच आसन घालून बसले. हें पाहून तेथील महंत लज्जित झाला व त्यानें श्रीस्वामीमहाराजांची क्षमा मागितली. श्रीस्वामीमहाराजांनीं त्यांस यात्रेकरूंना छळूं नये अशी आज्ञा केली. श्रीरामेश्वरास गेले असतांना तेथील ब्राह्मण पुजारी कमी करून जंगम-पुजाऱ्यांची तेथील अधिकारी वर्गानें नेमणूक केली तेव्हां महाराजांनीं पूर्वींच्या हक्कदार पुजाऱ्यांचा वारस मुलगा व सुदेवभट याचा शोध करून त्यास पुजारी-पणाच्या सनदा देवविल्या. तसेंच शिवकांचीचा शिलालेख नदींत गाडला गेला होता त्याचा शोध करून बाहेर आणला आणि शिवकांचीहि स्मार्त व शैव या उभयतांची आहे असें प्रमाणपत्राच्या द्वारें महाराजांनीं लोकांची खात्री पटविली. या सर्व प्रकारावरून महाराजांचा संचार किंनिमित्त होता हें सहज लक्षांत येईल. अन्यायाचें परिमार्जन करणें हा अवतारहेतु त्यांनीं अनेक ठिकाणीं प्रगट करून लोकांना न्याय देवविला. सामान्य माणसास जें जड गेलें तें महाराजांनीं आपल्या सामर्थ्यानें सुलभ करून दाखविलें. तेव्हां महाराजांना लोकोद्धाराची तळमळ कशी होती हें दिसेल. गाजावाजा न करितां हें काम कसें बिनबोभाट होत असें हें पाहिलें म्हणजे अवताराचें प्रयोजन समजून येईल.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33265 दि: ...
क्रमांक 1068 नों दि: 20/6/62

## अध्याय सातवा

# अवताराचें रहस्य

" यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत " ।।
" अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् " ।। ४७ ।। गीता.

बालमुकुंद हे प्रलयकालीं वटपत्रावर शयन करून आपला आंगठा चोखण्याची बाललीला करीत होते असें ऋषींनीं परमेश्वराचें वर्णन केलें आहे. या वेळीं परमेश्वर झोंपला असावा असें कोणी रूपक केलें तर तें वावगें नाहीं. परमेश्वर त्या वेळीं ' एकोहं ' अशा अवस्थेंत आपल्याच आनंदांत मग्न होता, पृथ्वीचा अंत झाला आतां कांहीं उरलें नाहीं अशी अवस्था त्याचीहि झाली असली पाहिजे. पुढें त्यास स्फुरण होऊन ' एकोहंबहुस्याम् ' असेंहि सुखमय स्वप्न पडलें असावें अथवा भक्तांच्या करुणवाणीनें आळविल्यामुळें त्यांस जाग आली असावी व तो त्यामुळें खडबडून जागा झाला असावा असेंहि वाटल्यास म्हणतां येईल किंवा " एकोहंबहुस्याम् " या प्रसंगामुळें धर्मग्लानी झाल्यामुळें पृथ्वीवर ऋषीजनांनीं अगर पृथ्वीनें त्याचा धावा केला असला पाहिजे. नाहींतर सुखनिद्रेंत तंद्री लागल्यास जाग कशी येणार ? परमेश्वराची सर्वच कृति अचिंत्य असल्यानें तो योगनिद्रेंत होता हें म्हणणें वाजवी होईल. अशा योगनिद्रेचा भलत्याच वेळीं कोणी भंग केल्यास ईश्वराच्या तृतीय नेत्रांतील अग्नीचा प्रसाद मिळावयाचा या भीतीनें परमेश्वरास साक्षात जागृत करण्यास कोणी धजला नसावा. तसें झालें असतें तर निराळाच प्रकार दिसून आला असता. पण भक्तांच्या हृदयाची आर्त किंकाळी ऐकून भक्तकामकल्पद्रुमाचे हृदय कळवळलें

म्हणूनच तो जागृत होऊन भक्तसंरक्षणासाठीं बद्धपरिकर झाला असला पाहिजे आणि हेंच खरें. असो.

आर्यांच्या पुराणांत पृथ्वीवर अनंत पातकें होऊं लागलीं म्हणजे ती गोरूप धरून परमेश्वरास शरण जाते व त्याची प्रार्थना करून त्यास अवतार घेण्यास भाग पाडतें असें वर्णन आढळतें. पृथ्वीची भीड पडल्यामुळें तो अवतार घेतो आणि तो अवतार कशासाठीं घेतो हें अध्यायाच्या शिरोभागीं लिहिलेल्या श्लोकावरून कळून येईल. अनेक साधुसंत-महंत यांनीं याचें वर्णन अतिशय हृदयंगम पद्धतीनें केलें आहे. सर्वांची याबाबतींत एकवाक्यता आहे. धर्मग्लानि झाली, साधूंचा छळ झाला, तरच त्यांच्या साहाय्यास तो धांवून येतो व दुष्टांचें निर्दालन करून सृष्टांचें परिपालन करतो. श्रीएकनाथमहाराज म्हणतात " अधर्माची शीग चढे । तेव्हां आम्हां येणें घडे." श्रीतुकाराममहाराजांनीं तसेच उद्गार काढले आहेत. श्रीज्ञानराजमाउली म्हणते,

" जें धर्मजात आघवें । युगीं युगीं मियांचि रक्षावें । ऐसा ओघु हा स्वभावें । आद्यु असे ॥ ४८।४ ॥ म्हणौनि अजत्व परौते ठेवी । मी अव्यक्तपण ही नाठवीं । जेव्हली धर्मातें अभिभवी । अधर्मु हा " ॥ ४९।४ ॥ परमेश्वर जेव्हां अवतार धारण करतो तेव्हां तो सर्व बाजूंनीं ग्रासलेल्या भक्तांना सुख व शांति लाभेल अशी योजना व्यवस्थितपणें आंखून त्याप्रमाणें कार्य घडवून आणतो. तेव्हां त्याच्या अलौकिक शक्तीमुळें धर्माची व समाजाची घडी पूर्ववत बसते असें आपलीं शास्त्रें आजवर सांगत आलीं आहेत. खरोखर लोकव्यवहारांत, सामाजिक परिस्थितींत व देशाच्या राजकारणांत क्वचित अत्यंत दारुण असा संकटकाल येतो. भारताच्या नशिबीं असा संकटकाल अनेकदां आला आहे. व अशा प्रसंगीं मानवी प्रयत्न तोकडे पडतात. बुद्धिवानांची अक्कल गुंग होते. ज्यांनीं रक्षण करावें तेच नाशास कारणीभूत होतात ! आगंतुक कारणेंच इतकीं बलवत्तर होतात कीं जिवाला जिणें नकोसें होतें. सत्यादि गुणांची पायमल्ली होते. " बळी तो कान पिळी " असाच खाक्या असतो. अशा परिस्थितींत हे प्रभो तुझा अवतार होतो. तूं अवतार धारण करशील कीं नाहीं याविषयीं त्या गरीब गोरूपधारी पृथ्वीस शंकाहि येत नाहीं. केवळ तुझ्याकडे ती जगदुद्धाराची याचना करते. काळोखांत आणि अरण्यांत सांपडलेलें बालक (अर्भक) माझी

आई येईलच अशा भरंवशानें ज्याप्रमाणें "आई, आई धांव ग" असा आक्रोश करतो ( करते ) त्याचप्रमाणें अशा वेळी हीन दीन झालेल्या लोकांची मनःस्थिति होते. तेथें युक्तीचापाल्याची गरज लागत नाहीं. आपद्ग्रस्त प्रजा तुझ्या अवतारकार्यावर विसंबून तूं आतां प्रगट होऊन आम्हांस संकटांतून खचित मुक्त करणार अशा आतुरतेनें तुझी मार्गप्रतीक्षा करूं लागते, व त्याप्रमाणें तूं अवतार घेऊन सर्व ठाकठीक करतोस. या प्रसंगावरून तुझ्या सामर्थ्याची अचाट शक्ति लोकांच्या नजरेस येते. अशीच अचाट शक्ति पृथ्वीतलावर तुझ्या अंशानें अवतीर्ण झालेल्या महात्म्याच्या अंगीं असतें. तुझ्यासारखेच अचाट सामर्थ्य लोकोत्तर बुद्धिमत्तेचे, अत्यंत परोपकारी असे शूर, धीर, उदार महात्मे व नरपुंगव आणि रणगाजी जगाचा कारभार आपल्या चातुर्याच्या व सामर्थ्याच्या बळावर चालवीत असलेले पहात असतांहि हे प्रभो, देवाधि देवा श्रीदत्तात्रेया, तुला मधून मधून अवतार कां घ्यावा लागतो ? भक्तांचें प्रेमासाठीं आणि समाजाच्या स्वास्थ्यासाठीं तुला तुझ्या प्रकृतींत कां अवतारावें लागतें, त्याचें कारण लक्षांत येतें. ही सुद्धां तुझीच कृपा. मनुष्य कितीहि मोठा झाला-नराचा नारायण झाला-माणसाचा देवमाणुस झाला, तरी हे श्रीगुरो, हा चिज्जडाचा समास तुझ्या विग्रहावांचून चटकन सुटत नाहीं असें भारतीयांच्या वाङ्मयावरून दिसून येते.

मनुष्य आपल्या प्रयत्नानें रंकाचा राव होईल, साधकाचा सिद्ध होईल, पण साक्षात् ईश्वराचा विग्रह हा वेगळाच. अवतारी पुरुषाच्या ठिकाणचा ब्रह्मांश ठळक आणि स्पष्ट असतो असें सांगतात. जीवनमुक्तांचा आत्मा प्रकृति गुणांनीं आच्छादला जातो. एकांत पुरुषोत्तमाचें तेज तर दुसऱ्यांत प्रकृतीच्या गुणाची छाया अधिक असावी लागते. सिद्ध पुरुषाची तनु ईश संकल्पाच्या शक्तीनें घडलेली असते. ती त्रिगुणात्मक असते. ती प्रारब्ध कर्मानें घडलेली असते, पूर्व संस्काराचीं पुटें तीवर असतात; म्हणून महात्म्याचें अंतरंग ओळखतां येत नाहीं. उलट अवतारी पुरुषास आपले दिव्य तेज झांकण्यासाठीं क्वचित आयास करावे लागतात. तें तेथें सारखें अनस्यूत असतें. यामुळें महात्मे व अवतारी पुरुष यांचा प्रपंच कसा वेगळा असूं शकतो हे समजून येईल. आपण परमेश्वरास मायायुक्त असें म्हणतों. त्याच्या अवताराची महती आपणांस समजून येत नाहीं. तो कधीं सामान्य माणसाच्या पोटीं जन्मास येतो. कधीं तो अयोनिज

असतो. किंवा एकाद्या अधिकारी व्यक्तीच्या शरीरांत प्रवेश करून त्यासहि आपल्याप्रमाणें शक्ति देऊन कार्य प्रवण करतो. हें पाहिलें म्हणजे सामान्य माणसाची बुद्धि कुंठित होते. अशा प्रसंगीं तुझें चिंतन केलें तरच महान साधक कांहीं जाणूं शकतो. एरव्ही नाहीं असा मूलभूत सिद्धान्त आहे.

वरील सर्व विवेचनाच्या रोखावरून श्रीस्वामीमहाराजासारखी अलौकिक सामर्थ्यानें नटलेलीं मूर्ती भूलोकांत कां अवतरली हें ध्यानांत येईल. महाराजांचें वेळीं इंग्रजांचें राज्य दृढमूल झालें होतें. त्यामुळें लोकांची लोकोद्धाराची तळमळहि त्यांना माहित होती. महर्षि अण्णासाहेब यासारखे राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं तळमळणारे आत्मे त्यांच्या सन्निध गेले. वासुदेव बळवंताप्रमाणें क्रांतिकारकहि स्वामीमहाराजांना जाऊन भेटले. त्याप्रसंगीं त्यांनीं देशकालपरिस्थिति पाहून त्यांस जो उपदेश केला तो चिंतनीय आहे. ' परमेश्वरानें जी नियति घालून दिली आहे ती मोडणें योग्य नाहीं. त्याचें लक्ष भारताकडे आहे व वेळप्रसंगीं तो सारे करील अशी खात्री बाळग " असें श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांनीं महर्षि अण्णासाहेब यांस सांगितलें होतें. या बाबतींत त्यांना आळंदीच्या श्रीनृसिंहसरस्वतीकडे पाठवून त्यांची मनोमन खात्री केली होती. अण्णासाहेबांच्या चरित्रकारांनीं भारताच्या स्वातंत्र्याचा दिवस महर्षि अण्णासाहेब यांना पूर्णपणें अवगत होता. त्यासंबंधी त्यांचे चरित्रकार म्हणतात, ' मी एकदां हिंदुस्थानच्या स्वराज्याबद्दल अण्णासाहेबांना प्रश्न केला होता. त्या वेळीं लढाई सुरू असून तिच्याविषयीं अण्णासाहेबांना फार कळकळ आहे व आतां हिंदुस्थान स्वतंत्र होईल असें कित्येकांस वाटे. तेव्हां लढाईत तुमचा जीव खरोखरीच गुंतला आहे का ? या लढाईने ( पहिलें महायुद्ध ) आम्हीं खरेंच स्वतंत्र होणार कां ? असें स्पष्ट विचारलें. तेव्हां ते म्हणाले " मला त्यांत कांहीं महत्त्व वाटत नाहीं; काय व्हावयाचें आहे तें मला ठाऊक आहे. तरी पण एक गोष्ट खरी कीं, हिंदुस्थानच्या कल्याणाकरतां हें युद्ध सुरू झालें आहे. व हळूहळू सर्व राष्ट्रांची डोकीं या चरकास लागतील; व कांहीं झालें तरी इंग्रज लोकांच्या इभ्रतीस यामुळें कमीपणा येईल. " तेव्हां तुम्ही लोकांशीं याबाबतींत अशा तऱ्हेनें कां बोलतां " असा मुद्दा पुढें आला. त्यावर " तुम्हीं लोक इतके वचाळ आहां कीं, दुसऱ्या तऱ्हेनें वागण्याची सोय नाहीं, " ' उद्यां होईल ' असें जर म्हटलें तर हातपाय ताणून पडाल, आणि ' परवां होईल '

म्हणून सांगितलें तर, छाती फुटून मरून जाल, अगर बेताल व्हाल. एकूण कामाच्या नांवानें बोंब, आणि व्हावयास तर पाहिजे कोणीकडून तरी कर्म" असें अण्णासाहेबांनीं सांगितलें. त्यावर मी ( ग्रंथकार ) त्यांस विचारलें की, "सांगावयाचें नसेल तर सांगूं नका, पण असें चक्रांत टाकूं नका, महाराजांनीं तुम्हांस तर दाखविलें आहे ना?" ते म्हणाले "हो" पुनः मीं विचारलें, तर मग केव्हां होणार? त्यावर "मी सांगत नाहीं," असें स्पष्ट सांगितलें. "चक्रगति पालटली एवढें मात्र खरें. परंतु एवढ्यावरून एकदम संध्याकाळची सकाळ होईल, असें मानण्याचें कारण नाहीं. रात्र जावयाची आहे. पण चक्र फिरलें एवढें खास. कांहीं तरी फायदा होईल." इतक्या स्पष्टपणें या विषयावर पुन्हा केव्हांहि ते बोलले नाहींत. या संवादावरून हा प्रश्न कोणी सांगितला असा वाचक प्रश्न करतील त्यावर श्रीनरसिंहसरस्वती, आळंदी यांच्यावर श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोटमहाराजांनीं पूर्ण कृपा केल्यामुळें दोनीहि विभूति एकच होत असें आमचें स्पष्ट मत असल्यानें शंका घेण्याचें प्रयोजन नाहीं. तेव्हां भारतवर्षावर प्रभूची अलौकिक कृपादृष्टि असल्यानें त्यानें आतांपर्यंत अनेक अवतार घेऊन आपल्या या प्रिय देशास स्वास्थ्य दिलें आहे. मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा झाल्याशिवाय परमेश्वर आपल्यास मदत करूं शकत नाहीं असें श्रुति म्हणते. "न ऋते सख्याय श्रांतस्य वै देवा:" यांतील मर्म आज जनतेनें लक्षपूर्वक अभ्यासिलें तर आजच्या धर्मग्लानीच्या व राजकीय आंदोलनाच्या दोलाचल परिस्थितींतून बाहेर पडण्यास मार्ग दिसेल. **समर्थांनींहि** आपल्या अमोघ वाणीनें असाच उपदेश केला आहे. ते म्हणतात "मोठीं राजकरणें चुकती। राजकारणी वेढा लाविती। नाना चुकीची फजिती। चहूंकडे ॥६॥ या कारणें चुको नये। म्हणिजे उदंड उपाय। उपायाचा अपाय। चुकता होतो ॥७॥ अवघे फडची नासती। लोकांचीं मनें भंगती। कोठें चुकतें युक्ती। कांहीं कळे ना ॥८॥ येखादे मनुष्य ते सिळें। त्याचें करणेचि बावळें। नाना विकल्पाचें जाळें। करून टाकी ॥९॥ व्यापावीण आटोप केला। तो अवघाची घसरतचि गेला। अकलेचा बंद नाहीं घातला। दूर दृष्टीनें ॥१०॥ धांव धांवो उपाधिवेष्टि। आपण कष्टी लोकहि कष्टी। हें कामा नये गोष्टी। कस मुसेची ॥११॥ ज्यासी उपाधी आवरेना। तेणें उपाधी वाढवावीना। सावचित करूनिया मना। समाधान असावें ॥ १२ ॥ ( द. १९ समास ८ वरील ओव्या

आहेत ) अर्थ उघड असल्यानें त्याच्या स्पष्टीकरणाची आवश्यकता नाहीं. देशकालपरिस्थित्यनुरूप श्रीसमर्थरामदासस्वामी आणि श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांच्यासारख्या विभूति अवतार धारण करून लोकोद्धार करतात, हाच त्यांच्या अवतारामागील प्रधान हेतु आहे.

• • •

## अध्याय आठवा

# परमेश्वर आहे तरी कसा ?

" ॥ आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदतितथैवचान्यः ॥
॥ आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाऽप्येनंवेदनचैवकश्चित ॥ ११।२९ "

वैदिक वाङ्मयांत मुख्य देवता तीन मानण्यांत येतात. " तिस्रएवदेवताः। क्षित्यन्तरिक्षद्युस्थानाः अग्निवायुः सूर्य इति " या तीन देवांचे नामभेद अनेक आहेत. याच मूळवैदिक देवतांचे पुढें ब्रह्मा, विष्णु, महेश झाले. कौत्स्यायनानें केलेल्या ब्रह्मस्तुतींत " त्वंब्रह्मात्वचवै विष्णुसवं रुद्रस्त्वं प्रजापतिः " असें म्हटलें आहे. कौत्स्यायन म्हणतात, " हें सर्व जगत आरंभीं तममय होतें. तें परब्रह्मा मध्यें होतें. परब्रह्मानें प्रेरणा केल्यावर तें विषमत्व पावलें. तें रज झालें. त्या रजाला प्रेरणा केल्यावर तें विषमत्व पावलें, तें सत्त्वाचें रूप. त्या सत्त्वाला प्रेरणा केल्यावर त्यांतून रस, संकल्प, निश्चय आणि अभिमान हें ज्याचें लक्षण आहे असा प्रजापति. याला विश्व (विश्वात्माव्यष्टिदेवता) असें नांव आहे. हे ब्रह्मचारी मुनिजनहो, त्याचा तो तामस अंश तो हा रुद्र, त्याचा जो राजस अंश तो ब्रह्मा, आणि त्याचा जो सात्त्विक अंश तो विष्णु. तो एकच तीन प्रकार पावला आहे. " स्कंदपुराणाच्या सूतसंहितेंत " यथा प्राग्वापकः क्षेत्री पालको लावकस्तथा। स संज्ञायाति तद्वच्च ब्रह्मविष्णुत्व रुद्रताः " याचा अर्थ असा " ज्याप्रमाणें क्षेत्रांत बी पेरणारा, लावणारा, आणि कापणारा, अशीं तीन्ही नांवें एकाच शेतकऱ्याचीं असतात त्याप्रमाणें एकाच ईश्वराला क्रियाभिन्नत्वानें ब्रह्मा, विष्णु, महेश अशीं तीन नांवें पडलीं. " रुद्रोपनिषदांत असें म्हटलें आहे कीं " अंतरात्मा भवेद्-

ब्रह्मा परमात्मा महेश्वरः । सर्वेषामेव भूतानां विष्णुरात्मासनातनः अस्यत्रैलोकस्य वृक्षस्य भूमौविटपशाखिनः । अग्रं मध्यं तथा मूलं विष्णुब्रह्मा महेश्वरः । कार्यं विष्णुः क्रिया ब्रह्मा कारणं तु महेश्वरः । प्रयोजनार्थं रुद्रेण मूर्तिरेका त्रिधाकृता । धर्मोरुद्रोजगद्विष्णुस्सर्वज्ञानं पितामहः " ॥ म्हणजे, विष्णु हा आत्मा, ब्रह्मा हा अंतरात्मा आणि महेश्वर हा परमात्मा होय. त्रैलोक्य वृक्षाचा शेंडा, बुडखा आणि मध्याप्रमाणें विष्णु, रुद्र आणि ब्रह्मा हे होत. महेश्वर हें कारण, विष्णु हें कार्य आणि ब्रह्मा ही क्रिया होय. धर्म तोच रुद्र, ज्ञानच ब्रह्मा आणि जगत् हेंच विष्णुस्वरूप होय. कोठें कोठें ब्रह्मा हें मन, विष्णु हाच धर्म आणि रुद्र म्हणजे विवेक असें सांगितलें आहे. कोठें सत्वगुण, ज्ञानशक्ति आणि मन यांचें प्रतीक म्हणजे हिरण्यगर्भ ब्रह्मा, रजोगुण क्रियाशक्ति व प्राण यांचें प्रतीक सूत्रात्मा विष्णु आणि सर्व शक्तीचें अधिष्ठान अंतर्यामिन, सर्व साक्षी तो महेश्वर असें वर्णन आढळतें. आणि सर्वांचा अखेर " शिवस्य हृदयं विष्णुः विष्णोश्च हृदयंशिवः ॥ रुद्रोब्रह्मा उमावाणी तस्मै तस्यैनमोनमः ॥ " अशी ऐक्यबोधक मंगलांत केली आहे.

वेदांती म्हणतात " उत्पत्ति, स्थिति आणि लय, अशा कार्यार्थ परमात्म्याच्या प्रधान तीन विभूति निर्माण झाल्या. मायेच्या उपाधीनें परमात्म्यावर सगुण ईश्वरत्व आलें. त्यायोगानें सत्वरज व तम आणि सत् , चित् व आनंद अशा षड्गुणांनीं संपन्न मायापति भगवान् जगदात्मा झाला. शक्ति असल्यावांचून कोणतेंहि कार्य होत नाहीं. म्हणून परमात्म्याच्या सच्चिदानंद गुणांच्या प्रधानतेपासून पुरुष विभूति, आणि जगन्मातेच्या तम, रज व सत्त्व गुणांच्या प्रधानतेनें शक्तिरूप प्रकृतीच्या विभूति अशा त्रिविध द्वंद्वविभूति, सृष्टीचीं त्रिविध कार्यें अप्रतिहत आणि सुव्यवस्थित रीतीनें करण्यास समर्थ झाल्या. विराट स्वरूप परमात्म्याच्या आनंद गुण प्रधानतेनें आणि महामायेच्या सत्वगुणोपाधि प्रधानतेनें जगत्पालक अशी भगवान् महाविष्णूची आणि जगन्माता वैष्णवी ( ज्ञान ) शक्ति महालक्ष्मीची ऐक्यरूप द्वंद्व विभूति प्रगट झाली. ईश्वराच्या चैतन्यगुणप्रधानतेपासून आणि मायेच्या रजोगुणप्रधानतेपासून भगवान् प्रजापति जगदुत्पादक ब्रह्मदेव आणि ब्राह्मी ( क्रिया ) शक्ति महासावित्री अशा ऐक्यरूप द्वंद्वविभूति उत्पन्न झाल्या. त्या जगदात्म्याच्या सद्गुण प्रधानतेनें आणि आदिशक्तीच्या तमोगुण प्रधान उपाधिपासून भगवान् महादेव शंकर, शिव आणि शैवी ( द्रव्य ) शक्ती भगवती

महाकाली अशी ऐक्यरूप द्वंद्व विभूति जगत् संहारार्थ प्रगट झाली. अशा समर्थ-त्रिमूर्ति – जगदीश्वर – विराटस्वरूपाच्या चरण कमलीं महाविष्णु, जननेंद्रिय स्थानीं प्रजापति आणि ललाटस्थानीं महारुद्र असे विराजमान होऊन परमात्म-स्वरूपानंद भोग करीत ! सृष्टीची उत्पत्ति व लय हीं कार्ये अप्रतिहत करीत आहेत. ”

एथवर परमेश्वरासंबंधीं ज्या कांहीं कल्पना पूर्वाचार्यांनीं मांडल्या त्यासंबंधींचें विवेचन वर दिलेलें आहे. त्यावरून ( मासल्यादाखल कांहीं विचार दिले आहेत ) ज्या महान् व्यक्तींस जसें सुचेल तसें त्यानें आपले तत्संबंधि विचार प्रगट केले आहेत. त्यावरून निर्णायक असे विचार कोणीहि प्रगट करूं शकणार नाहीं. कारण निर्णायक विचार करणें कोणाहि व्यक्तीच्या शक्तीच्या आटोक्या-बाहेरचे असल्यानें त्याचा ‘ नेति नेति ’ या शब्दानें उच्चार होत असतो. तेव्हां अशा अचिंत्य परमेश्वराचें वर्णन करणें शक्य नाहीं असें उपनिषद्द्रष्टे व गीताकार सांगत आहेत. श्रीज्ञानेश्वरमाउलीनीं ९ व्या अध्यायांत स्वतः परमेश्वराचें म्हणणें काय आहे हें आपल्या प्रासादिक आणि अमर भाषेंत पुढील-प्रमाणें मांडलें आहे. ते म्हणतात, मायामोहित मनोवृत्तीनें संसारांतच मी आहे असें मानतात ती भ्रांतीच होय. तेथील जन्ममरणादि सर्व स्थिति मलाहि समजतात ! याप्रमाणें नामरहित, क्रियारहित व देहरहित असा जो मी त्याला नामधारी, कर्मकारी व देहधर्मांनीं युक्त असणारा असें समजतात. मला निरा-काराला आकार, निरूपाधिकाला उपचार, विधिनिषेधादिक अशा मला आचारादिक व्यवहार, मला जातिरहिताला जात, गुणातीताला गुण, चरणरहि-ताला चरण, हस्तरहिताला हस्त, मजपरिणामातीताला परिमाण, सर्व व्यापकाला ठिकाण, कर्णरहिताला कान, नेत्ररहिताला नेत्र, गोत्ररहिताला गोत्र, निराकाराला रूप, अव्यक्त असा जो मी त्या मला व्यक्ति, निरिच्छास इच्छा व जो मी स्वयं-मेव तृप्त आहे त्यास तृप्ति अशा कल्पना करतात. ” यावरून परमेश्वरानें काय म्हणावयाचें बाकी ठेविलें आहे. श्रीरामदासस्वामी समर्थ यांनीं त्याचें थोडक्यांत वर्णन करतांना म्हटलें आहे, “ नभीवावरे जो अणुरेणु कांहीं । रिता ठाव या राघवेवीण नाहीं । तया पाहतां पाहतां तेचि जालें । तेथें लक्ष आलक्ष सर्वै बुडालें ॥ जयावीण कोठें रिता ठाव नाहीं । तया शोधिता तोचि होऊनि राहे । म्हणे दास विश्वास भावे धरावा । खरा देव तो आदरें ओळखावा । ”

लोकमान्य टिळक यांनीं आपल्या 'गीतारहस्याच्या' अध्यात्म प्रकरणांत परमेश्वराबद्दलच्या अनेकविध कल्पना पूर्वाचार्यांनीं केलेल्या ग्रंथावरून मांडल्या आहेत. ऋग्वेदांत, इतर वाङ्मयांत व विसाव्या शतकापर्यंत साकल्यानें परमेश्वरासंबंधींच्या स्वरूपाचा ऊहापोह केला आहे, तो मुळांतून वाचकांनीं लक्षपूर्वक वाचावा. या ठिकाणीं कांहीं भागाचा ओझरता उल्लेख करण्याचें योजिलें आहे. रहस्यकार म्हणतात, "परमेश्वराचें श्रेष्ठ स्वरूप व्यक्त नसून अव्यक्त आहे तरी हें श्रेष्ठ अव्यक्त रूप सगुण का निर्गुण याचाहि थोडा विचार केला पाहिजे. कारण सांख्यशास्त्रांतील प्रकृति अव्यक्त म्हणजे इंद्रियांना अगोचर असूनहि सगुण म्हणजे सत्त्वरजस्तमोगुणमयी आहे. हें सगुण अव्यक्ताचें आपल्यासमोर एक उदाहरण असून, परमेश्वराचें अव्यक्त व श्रेष्ठ स्वरूपहि त्याचप्रमाणें सगुण मानलें पाहिजे असें कित्येकांचें म्हणणें आहे. आपल्या मायेनेंच कां होईना पण अव्यक्त परमेश्वरच ज्याअर्थी व्यक्तसृष्टि निर्माण करितो व सर्वांच्या हृदयांत राहून त्यांचे व्यापार त्यांचेकडून चालवितो, ज्याअर्थी तो सर्व यज्ञांचा भोक्ता आहे, प्रभूहि आहे, ज्याअर्थी प्राणीमात्राचे सुखदुःखादि सर्व "भाव" त्यापासून उत्पन्न होतात आणि ज्याअर्थी प्राणिमात्रांच्या ठायीं श्रद्धा उत्पन्न करणारा तोच असून "लभतेच ततः कामान् मयैव विहितान्हितान"— प्राण्यांच्या वासनांचें फळ देणाराहि तोच आहे, त्याअर्थी तो अव्यक्त म्हणजे इंद्रियगोचर नसला तरी दया, कर्तृत्व वगैरे गुणांनीं युक्त अर्थात् सगुणच असला पाहिजे असें सिद्ध होतें. पण उलटपक्षीं भगवान असेंहि सांगतात कीं, "नमांकर्माणि लिम्पन्ति"—मला कर्मांचा अर्थात् गुणांचाहि कधीं विटाळ होत नाहीं. प्रकृतीच्या गुणानें "मोह" पावून मूर्ख लोक आत्म्यास कर्ता मानतात. किंवा हा अव्यय व अकर्ता परमेश्वरच प्राणिमात्रांच्या हृदयांत जीवरूपानें असल्यामुळें प्राणिमात्रांचें कर्तृत्व व कर्म या दोहोंपासून वस्तुतः तो अलिप्त असतां अज्ञानानें गुरफटलेले लोक मोहांत पडत असतात; अव्यक्त म्हणजे इंद्रियांना गोचर न होणाऱ्या परमेश्वराचीं स्वरूपें याप्रमाणें सगुण व निर्गुण अशा दोनच प्रकारचीं वर्णिलीं आहेत असें नाहीं; तर कांहीं ठिकाणीं हीं दोन रूपें एकत्र मिसळून अव्यक्त परमेश्वराचें वर्णन केलें आहे. "भूतभृतन सत्वस्थो" मी भूतांचा आधार असून त्यामध्यें नाहीं असें नवव्या व तेराव्या अध्यायांत 'परब्रह्म सत् नाहीं आणि असत्हि नाहीं. "सर्वेंद्रियवान आहे असा भास होणारे पण सर्वेंद्रियरहित आणि निर्गुण व गुणोपभोग घेणारे"

"दूर आहे आणि जवळहि आहे," "अविभक्त आहे आणि विभक्तहि दिसतें" याप्रमाणें परमेश्वराच्या स्वरूपांचीं परस्पर विरुद्ध म्हणजे सगुण-निर्गुण वर्णनें आहेत. तथापि गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत "हा आत्मा, अव्यक्त, अचिंत्य व अविकार्य आहे" असें सांगून तेराव्यांत "हा परमात्मा अनादि निर्गुण व अव्यय असल्यामुळें तो शरीरांत असला तरी कांहीं करीत नाहीं व त्याला कशाचाहि गंध लागत नाहीं, असें शुद्ध, निर्गुण, निरवय व निर्विकार, अचिंत्य आणि अनादि अव्यक्त स्वरूपाचेंच श्रेष्ठत्व गीतेंत वर्णिलें आहे.

भगवद्गीतेप्रमाणें उपनिषदांतूनहि अव्यक्त परमेश्वराचें स्वरूप कधीं सगुण तर कधीं सगुण–निर्गुण असें उभयविध आणि कधीं शुद्ध निर्गुण असें तीन प्रकारें वर्णिलेलें आढळून येतें. उपासनेला नेहमीं प्रत्यक्ष मूर्तीच डोळ्यापुढें पाहिजे असें नाहीं. निराकार म्हणजे चक्षुरादि ज्ञानेंद्रियांना अगोचर अशा स्वरूपाचीदेखील उपासना होऊं शकतें. पण ज्याची उपासना करावयाची तोच चक्षुरादि इंद्रियांना गोचर नसला तरी मनाला गोचर असल्याखेरीज त्याची उपासना होणें शक्य नाहीं. उपासना म्हणजे चिंतन, मनन किंवा ध्यान होय; आणि चिंतित वस्तूंचें स्वरूप नाहीं तर दुसरें कोणतें तरी गुण मनाला कळल्याखेरीज मन चिंतन कशाचें करणार? म्हणून अव्यक्त म्हणजे डोळ्यांना न दिसणाऱ्या परमात्म्याचें ज्या ठिकाणीं चिंतन मनन किंवा उपासना उपनिषदांत सांगितली आहे, त्या ठिकाणीं अव्यक्त परमेश्वर सगुण कल्पिलेला आहे. परमेश्वराच्या ठायीं कल्पिलेले हे गुण उपासकाच्या अधिकाराप्रमाणें कमीजास्त व्यापक किंवा सात्विक असतात, आणि ज्याची जशी निष्ठा त्याप्रमाणें त्याचें फल त्यास प्राप्त होत असतें. "पुरुष हा ऋतुमय आहे; ज्याचा जसा ऋतु (निश्चय) त्याप्रमाणें त्याला मेल्यावर फळ मिळतें." असें छांदोग्योपनिषदांत (३-१४-१) आणि "देवाची भक्ति करणारे देवांस व पितरांची भक्ति करणारे पितरांस जाऊन मिळतात." (गीता ९-२५) किंवा "योयच्छ्रद्धः स एवसः" जो तो आपल्या श्रद्धेप्रमाणें सिद्धी पावतो (१७-३) असें भगवद्गीतेंतहि म्हटलें आहे. अर्थात् उपासकाच्या अधिकारभेदाप्रमाणें उपास्य अव्यक्त परमेश्वराचें गुणहि उपनिषदांतून निरनिराळे वर्णिले आहेत. उपनिषदांतील या प्रकरणास "विद्या" असें

म्हणतात. " विद्या " म्हणजे ईश्वरप्राप्तीचा ( उपासनारूप ) मार्ग आणि तो ज्या प्रकरणांत सांगितला असतो त्यालाहि 'विद्या' हेंच अखेर नांव देण्यांत येतें. शांडिल्या विद्या ( छां ३. १ ४ ) पुरुष विद्या छां. ( ३.१६.१७ ) पर्यंकविद्या ( कौषी. १ ) प्राणोपासना ( कौषी. २ ) इत्यादि अनेक प्रकारची उपासना उपनिषदांत वर्णिली आहे, त्या सर्वांचें वेदान्त सूत्रांच्या तिसऱ्या अध्यायाच्या तिसऱ्या पादांत विवेचन केलें आहे. या प्रकरणांतून अव्यक्त परमेश्वर मनोमय, प्राणशरीर, भारूप, सत्यसंकल्प, आकाशात्मा, सर्वकर्मा, सर्वकाम, सर्वगंध, सर्वरस, आहे, अशीं सगुण वर्णनें ( छां३-१४-२ ) असून तैत्तिरीयोपनिषदांत तर अन्न, प्राण, मन, विज्ञान, किंवा आनंद या रूपांनींहि ब्रह्माची चढती उपासना सांगितली आहे. ( तै. २-१-५, ३-२-६ ) बृहदारण्यकांत (२-१) गार्ग्यबालाकीनें अजात शत्रूस आदित्य, चंद्र, विद्युत, आकाशवायु, अग्नि, पाणी, किंवा दिशा यांतील पुरुषांची ब्रह्मस्वरूपानें उपासना प्रथम सांगितली आहे. पण खरें ब्रह्म यापलीकडे असें अजातशत्रूनें त्यास सांगून अखेरीस प्राणोपासना मुख्य असें प्रतिपादलें आहे. तथापि ही परंपरा येथेंच संपत नाहीं. वर सांगितलेल्या सर्व ब्रह्मस्वरूपांस 'प्रतीक' म्हणजे उपासनेकरितां घेतलेलें गौण ब्रह्मस्वरूप किंवा ब्रह्मनिदर्शक चिन्ह असें म्हणतात, व हेंच स्वरुप मूर्तीच्या डोळ्यांपुढे ठेविलें पाहिजे म्हणजे ती 'प्रतिमा' होते. पण सर्व उपनिषदांचा असा सिद्धान्त आहे कीं, वास्तविक ब्रह्मस्वरूप याहून भिन्न आहे (केन १२-२-८) या ब्रह्माचें लक्षण देतांना कित्येक ठिकाणीं "सत्यंज्ञानमनन्तं ब्रह्म" ( तैत्ति २-१) किंवा "विज्ञानमानंदं ब्रह्म" (बृह. ३-९-२८) ब्रह्मसत्य(सत्) ज्ञान (चित्) आणि आनंदरूप—किंवा सच्चिदानंद आहे, असें सर्व गुणांचा तीन गुणांत समावेश करून व्याख्यान केलेलें असतें. आणि दुसऱ्या ठिकाणीं भगवद् गीतेप्रमाणें "ब्रह्म सत् नाहीं आणि असत् नाहीं" (ऋ. १०-१२९-१) अथवा "अणोरणीयान्महतोमहीयान्" अणूपेक्षां धाकटें आणि मोठ्यापेक्षांहि मोठें (कठ २-२०) "तदेजति तन्नैजति तद्दूरे तदंतिके" तें हालते व हलतहि नाहीं, तें दूर आणि जवळहि आहे (ईश ५, मुंड. ३-१-७) अगर "सर्वेंद्रिय गुणाभास" होणारे तथापि "सर्वेंद्रिय विवर्जित ( श्वेता. ३. १७ ) याप्रमाणें परस्पर विरुद्ध गुणांचा त्यांत समावेश झालेला आहे, असें वर्णन आहे. अखेरीस हीं सर्व लक्षणें सोडून देऊन धर्म आणि अधर्म, कृत आणि अकृत, किंवा

भूत आणि भव्य याच्यापलिकडे जें आहे तें ब्रह्म समज, म्हणून मृत्यूनें नचिकेतास बोध केला आहे ( कठ २–१४ ) आणि त्याचप्रमाणें महाभारतांत नारायणीय धर्मांत ब्रह्मा रुद्राला ( मभा. शां. ३५१ – ११ ) व मोक्ष धर्मांत नारद शुकाला सांगत आहेत ( ३३१-४४ ) बृहदारण्यकोपनिषदांतहि ( २ – ३ – २ ) प्रथमतः ब्रह्माची पृथ्वी, जल व अग्नि हीं तीन मूर्त आणि वायू, आकाश हीं दोन अमूर्त रूपें सांगून या अमूर्तांच्या सारभूत पुरुषांचीं रूपें किंवा रंग पालटतात असें दाखविल्यावर अखेरीस " नेति नेति " म्हणजे एवढा वेळपर्यंत जें कांहीं सांगितलें तें नव्हे, तें ब्रह्म नव्हे, या सर्व नाम-रूपात्मक मूर्त किंवा अमूर्त पदार्थांपलिकडलें (पर) जें ' अगृह्य ' किंवा अवर्ण-नीय तें परब्रह्म समज असा उपदेश केला आहे. (ब्रह्म. २–३–६–, वे. सू. २२ ३२–२२ ) किंबहुना ज्याला ज्याला म्हणून कांहीं नांव देतां येतें त्या सर्व पदार्थांच्या जें पलिकडे आहे तें ब्रह्म असून त्याचें अव्यक्त व निर्गुण स्वरूप दाखविण्यास ' नेति नेति ' हा एक छोटासा निर्देश, आदेश, किंवा सूत्रच झालेलें असून बृहदारण्यकोपनिषदांतच तें पुनः चारदां ( बृह्म. ३–९–२६; ४–२४ ४–४–२२; ४–५–१५ ) आलेलें आहे. आणि त्याचप्रमाणें इतर उपनिषदां-तूनहि " यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्यमनसासह " (तैत्ति. २–९ ) " अद्रेश्यं (अदृश्य) अग्राह्यं ( मुं. १–१–६ ) " नचक्षुषा गृह्यतेना ऽ पिवाचां ( मुं. ३ १–८ ) डोळ्यानें न दिसणारें किंवा वाचेनें न सांगतां येणारें अगरः—

" अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं तथा ऽ रसंनित्यमगंधवच्चयत् ।
अनाद्यनन्त महतःपरंध्रुवं निचाय्यतन्मृत्युमुखात्प्रमुच्यते ॥ "

पंचमहाभूतांच्या शब्द, स्पर्श, रूप आणि गंध या पांच गुणांनीं विरहित, अनादि, अनंत, अव्यय ( कठ ३–१५ ) अशीं परब्रह्माच्या निर्गुण व अचिंत्य स्वरूपाचीं वर्णनें आहेत ( वे. सू. ३२–२२–३० पाहा ) महाभारताच्या शांति-पर्वांत नारायणीय किंवा भागवत धर्मांच्या वर्णनानंतरहि भगवंतांनीं आपलें वास्तविक स्वरूप " अदृश्य, अघ्रेय, अस्पश्य, निर्गुण, निष्कल ( निरवयव ), अज, नित्य, शाश्वत आणि निष्क्रिय आहे " असें नारदास सांगून त्यासच " वासुदेव परमात्मा " असें म्हणतात, व तोच सृष्टीची उत्पत्ति व लय करणारा त्रिगुणातीत परमेश्वर होय असें म्हटलें आहे. (म. भा. शां. ३३९–२१–२८)

भगवद्‌गीतेंतच नव्हे तर महाभारतान्तर्गत नारायणीय किंवा भागवत धर्मांत व उपनिषदांतहि परमेश्वराच्या व्यक्त स्वरूपापेक्षां अव्यक्त स्वरूपच श्रेष्ठ मानलें आहे; व हें श्रेष्ठ अव्यक्त स्वरूपहि पुनः सगुण, सगुण–निर्गुण आणि अखेर केवळ निर्गुण असें तीन प्रकारे वर्णिलें आहे.—सर्व संकल्पाचा दाता अव्यक्त परमेश्वर वास्तविक सगुण असून उपनिषदांत व गीतेंत **निर्गुण स्वरूपाचें जें वर्णन आहे तें अतिशयोक्तीचें किंवा उगाच प्रशंसापर आहे असें म्हणणें म्हणजे अध्यात्मशास्त्राच्या मूळ पायावर घाव घालणें होय. कारण, ज्या थोर ऋषींनीं मन एकाग्र करून सूक्ष्म व शांत विचारांनीं "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह" (तै. २–९)—मनाला सुद्धा जें दुर्गम असून वाणीहि ज्याचें वर्णन करूं शकत नाहीं. "तेंच अखेरचे ब्रह्मस्वरूप" असा सिद्धान्त केला त्याची आत्मप्रतीति अतिशयोक्तीची व माझ्या मनाला अनंत व निर्गुण ब्रह्माचें आकलन होत नाहीं म्हणून खरें ब्रह्म सगुणच असलें पाहिजे असें प्रतिपादन करणें म्हणजे सूर्यापेक्षां आपली दिवटी अधिक श्रेष्ठ असें म्हणण्याइतकें समंजस होय.**

कोणत्याहि रीतीनें विचार केला तरी बाह्य सृष्टींतील नामरूपाखालीं आच्छादित झालेलें ब्रह्मतत्त्व नामरूपात्मक प्रकृतीप्रमाणें जड नाहीं इतकेंच नव्हे तर वासनात्मक ब्रह्म, ज्ञानमय ब्रह्म, प्राणब्रह्म, किंवा ॐकाररूपी शब्दब्रह्म हीं ब्रह्मस्वरूपें सुद्धां खालच्या पायरीची असून खरें ब्रह्मस्वरूप यापलिकडचें व याहून अधिक योग्यतेचें म्हणजे शुद्ध आत्मस्वरूपी आहे. ब्रह्मात्मैक्याची बुद्धिगण्य उपपत्ति निघण्यापूर्वी अनादि सृष्टिप्रारंभ आमच्या प्राचीन ऋषींनीं 'नेहनानांऽसि किंचन" (बृ ४–४–१९, ३६–४१–४०) या सृष्टींत दिसून येणारे अनेकत्व खरें नसून त्याच्या बुडाशीं चोहोंकडे एकच अमृत, अव्यय व नित्य तत्त्व आहे (गीता १८–२०) असा प्रथम निर्णय करून अखेर बाह्य सृष्टींतील नामरूपानें आच्छादिलेलें अविनाशी तत्त्व आणि आपल्या शरीरांतील बुद्धीपलीकडचें आत्मतत्त्व हीं दोन्ही एकच म्हणजे एकजिनसी, अमर व अव्यय आहेत किंवा जें तत्त्व ब्रह्मांडीं तेंच पिंडीं म्हणजे मनुष्याच्या देहांतहि वास करीत आहे, हा सिद्धान्त आपल्या अंतर्दृष्टीनें शोधून काढला आहे. व हेंच काय तें सर्व वेदान्ताचें रहस्य असें बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य

मैत्रेयीस, गार्गी वारुणी प्रभृतीस व जनकास सांगत आहे. ( बृ. ३–५–८, ४–२–४ ) " अहं ब्रह्मासि " मीच परब्रह्म आहे हें ज्यानें जाणिलें त्यानें सर्व जाणिलें असें याच उपनिषदांत म्हटलें आहे.

या वरील सर्व विवेचनावरून 'परमेश्वरा'चें स्वरूप वर्णन करण्यास किती कठीण, तो निर्गुण का सगुण, व्यक्त का अव्यक्त, तो इंद्रियगोचर का इंद्रियांना अगोचर असा आहे हें ध्यानीं येईल. तेव्हां परमेश्वराचें स्वरूप बुद्धीनें आकलन करूनच त्याची उपासना करणें अगत्याचें नव्हे काय ? पूर्वीच्या साधुसंतांनीं, संतमहंतांनीं यासंबंधीं जे अडाखे, जे मार्ग सूचित केले आहेत त्या मार्गानें साधकानें प्रयत्न केल्यास त्याला परमेश्वराची प्राप्ती होईल हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. आपलें आचरण व वर्तन व त्याबरोबर आपली उपासना शुद्ध असेल तरच आपल्या मार्गांत येणारीं संकटें दूर होऊन अंतीं परमेश्वराचें स्वरूप साधकाच्या उपासनेप्रमाणें त्यास ज्ञात होऊन तें काय आहे हें जाणण्याचें सामर्थ्य येईल असा निर्वाळा सर्व उपनिषद्द्रष्ट्यांनीं व अलिकडील सर्व साधु-संतांनीं दिला आहे. सबब त्यांच्या वचनावर भक्ति, श्रद्धा व निष्ठा ठेवूनच आपण मार्ग चोखाळला पाहिजे हें क्रमानें येतें. साधकानें मात्र निरलसपणें आणि चिकाटीनें आत्मतत्त्वाचा शोध घेण्याचा निश्चय केल्यास तें त्यास निश्चित समजून येईल.

● ● ●

## अध्याय नववा

# सद्गुरूंचें मार्गदर्शन

" पुस्तकज्ञानें निश्चयें धरणें तरी गुरुकासया करणें " असा परखड सवाल श्रीरामदासस्वामींनीं "दासबोधां"तील (१२-६-३०) बाराव्या दशकांत केला आहे. पुस्तकांत सारें ब्रह्मज्ञान ओतप्रोत सामावलेलें असेल, पण तें आपल्याला प्राप्त होण्यास श्रीसद्गुरूंची कृपाच झाली पाहिजे. बाबा रे ! भांडारगृहांत अनेक रत्नें आहेत. त्यांची प्राप्ती त्या भांडारगृहाची किल्ली आपल्या हातीं आल्याशिवाय आंतील रत्नांचा आपल्यास उपयोग करतां येणार नाहीं, हें जसें खरें तर ब्रह्मज्ञानासारख्या अगम्य विषयाची प्राप्ती होण्यासाठीं आपल्यास त्या ज्ञानाची प्राप्ती ज्याला झाली आहे अशांची जोड करून घेतल्याशिवाय तरणोपाय नाहीं. " भांडारगृहें भरलीं। परी असती अडकिलीं। हातास न येतां किल्ली। सर्वहि अप्राप्त॥ " असें श्रीसमर्थांनीं स्वच्छ सांगून टाकलें आहे. पण त्याबरोबर " सद्गुरु कृपा तेचि किल्ली। जेणें बुद्धि प्रकाशली। द्वैत कपाटें उघडलीं। येकसरी॥ " असा सिद्धांत सातव्या दशकांतील दुसऱ्या समासांत मांडला आहे तो सर्वस्वीं चिंत्य आहे. साधक जो असतो तो एकदम भक्तिमार्गाला लागत नाहीं. त्याच्या आजूबाजूकडील परिस्थितीचा त्याच्यावर परिणाम होतो. घरांतील वातावरण देवधर्माविषयीं अनुकूल असेल तर अगर घरांतील वडीलधारे अत्यंत ब्रह्मनिष्ठ असतील तरच त्याचा परिणाम घरांतील कांहीं लोकांवर होतो. सर्वांवर तो होत नाहीं हें आपल्यास अनेक उदाहरणांवरून ध्यानांत येतें. ज्ञात अज्ञात असे मार्गदर्शक लाभल्याशिवाय कोणत्याहि प्रकारची उन्नति कोणत्याहि प्राण्याची व्हावयाची नाहीं. साधी अक्षराची ओळख जन्मास आलेल्या कोणत्याहि प्राण्यास होत नाहीं. हें आजहि प्रत्ययास येतें. याच्या उलट परिस्थिति असती तर जगांत

अक्षरओळख असलेले कोट्यवधि प्राणी आपणांस दिसलें असते व आजची जी समाजाची घडी आहे ती संपूर्णतया निराळ्या प्रकारेंच ज्ञात झाली असती हें उघड आहे. पण अनुभव मात्र याच्या उलट असल्यानें आपल्यास या प्रश्नाच्या मुळाशीं जाणें भाग आहे. इहलोकांतील कर्तव्यें कोणतीं या बाबतींत चर्चा करण्याचें कांहींएक प्रयोजन नाहीं. संसारास लागणाऱ्या गरजा कोणत्या, आपण कोठें राहतों व काय केल्यास संसार सुखाचा होईल याचें चिंतन करूनच विचारी मनुष्य आपलीं पावलें टाकीत असतो; व आपला संसार थाटण्याचा तो परोपरीनें प्रयत्न करीत असतो. या कामीं जाणत्या पुरुषाचीच कास धरावयाची असते. त्याच्या मार्गदर्शनाखालीं सर्व व्यवहार चालविणें इष्ट असतें हें विचारांतीं आपल्या लक्षांत येईल. संसारास उपयुक्त असणारा कोणताहि भाग जाणत्याची संगति धरूनच प्राप्त करून घ्यावयाचा असतो. तो मग नोकरीच्या रूपानें असो, व्यापारधंद्याच्या रूपानें असो, अगर शिक्षणाच्या रूपानें असो. सबब जाणत्याची संगत धरूनच आपल्यास स्वकर्तव्य-बोध करून घेतला पाहिजे. या गोष्टीची जाणीव आपल्यास पुस्तकांच्या वाचनानें होईल, व कर्तव्याचा बोधहि होऊं शकेल. पण तदनुसार आपण आपलें आचरण कसें ठेवावें याचें ज्ञान होणार नाहीं. तेव्हां आपल्यापेक्षां जास्त ज्ञानी मनुष्यास शरण जाणें भाग पडतें. पोहण्याची कला केवळ पुस्तकांचें वाचन केल्यानें अवगत होत नाहीं. त्या कलेंत जो निष्णात आहे त्याची जोड केल्याशिवाय ती कला अवगत होणार नाहीं. तेव्हां या सर्वांचा विचार करून श्रीसमर्थांनीं मोठ्या गमतीनें अठराव्या दशकाच्या दुसऱ्या समासांत याची बारकाईनें फोड केली आहे. तो समास वाचकांनीं मुळांतूनच वाचावा म्हणजे श्रीसमर्थांचें हृद्गत् कळून येईल. त्या ठिकाणीं अनेक विषयांचा ऊहापोह त्यांनीं विस्तारशः केला आहे. त्यांतील कांहींचा आम्ही ओझरता उल्लेख वाचकांसाठीं केल्यास तो अर्थशून्य होणार नाहीं. ते म्हणतात, " बाबा रे ! जाणत्यापाशीं काय काम शिकावें याची अडचण येते, ती दूर होण्यासाठीं पुढील गोष्टींचा विचार करा. बाप हो ! ऐका ! लिहिणें, वाचणें, पुसणें, गाणें, बजाविणें, तालीम करणें, बोलणें चालणें, युक्ति, पेंच, पीळ, प्रसंग, रंग, स्फूर्तीचे तरंग, साक्षेप, तर्कसंकेत, धूर्तपणा, राजकारण, वचनें, संवाद, तितीक्षा, सहिष्णुता, औदार्य, कल्पकता, दीर्घ सूचना, विवंचना, काळसार्थकता, भक्ति, वैराग्य, ज्ञान, ध्यान,

अलिप्तपणा, विदेह लक्षण, ब्रह्मविविरण इत्यादि इत्यादि." या सर्व विषयांचा चिकित्सकबुद्धीनें जाणत्यापाशीं अभ्यास केला तरच कांहीं हातीं लागेल. कारण " जाणता एक अंतरात्मा " हा सिद्धान्त समर्थांनीं शेवटीं उपसंहार करतांना मांडला आहे. त्याचें मर्म आपण ध्यानी घेतलें पाहिजे.

इहलोक साधण्यासाठीं जाणत्याची संगति धरावी व परलोकाची प्राप्ती व्हावी म्हणून श्रीसद्‌गुरुचरणाची सेवा करावी. आपणच आपला गुरु अशी जरी कोणी भावना उराशीं बाळगली तर ती केव्हांहि फलदायी होणार नाहीं. आपणच विचार करूं, बुद्धि चालवूं, तर्क लढवूं, असें म्हणून चालणार नाहीं. यानें आत्मघात होईल. असें उदाहरण जगांत झालें नाहीं व होणार नाहीं. तेव्हां साधकावस्थेंत आपणास दुसऱ्याच्या साहाय्याची व ज्ञानाची गरज लागते. एखादा व्यवहार करावयाचा झाल्यास मनुष्याजवळ पुरेसें भांडवल नसल्यास तो तें दुसऱ्या-कडून मिळविण्याचा प्रयत्न करतो, हें व्यवहारांतील साधें तत्व आपल्यास काय शिकवितें ? जी गोष्ट आपल्यामध्यें कमीअधिक प्रमाणांस वास करते तिची प्राप्ती होण्यासाठीं मानवी प्रयत्न करावे लागतात. तेव्हां परलोक साधण्यासाठीं याहून किती दुष्कर प्रयत्न केले पाहिजेत हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. कारण अध्यात्मविद्येची सहजासहजीं प्राप्ती होत नसते हें आपण जाणतों. यासाठीं अनेक संत, महंत व महात्मे यांचीं वचनें आपण आत्मसात करून या विषयाचें चिंतन करण्यास उद्युक्त झालें पाहिजे असें शेवटीं म्हणणें प्राप्त ठरतें.

'सद्‌गुरुविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।।' तेव्हां स्वतःच्या शहाण-पणाची घमेंड मानवानें बाळगूं नये असें श्रीसमर्थ सांगतात. श्रीस्वामीमहाराजांनीं अक्कलकोट येथील निवासांत असाच उपदेश अनेकांना केला आहे. हें गुरुलीलामृताच्या वाचकांना अवगत होईल. अध्यात्मविद्येसारख्या अत्यंत पवित्र विद्येची प्राप्ती सुलभ नसल्यानें कोणाहि जीवानें त्या विषयाची अवहेलना करूं नये. आजच्या परिस्थितींत तशी अवहेलना झालेली दिसते. याबद्दल मनाला अत्यंत खेद होतो. असें कां घडून येतें याचा विचार समाजांतील महान व्यक्तींनीं केला पाहिजे, व त्या विचारधारेचा समाजसंघटनेसाठीं उपयोग व्हावा म्हणून कांहीं उपाययोजना शोधून काढून त्याचा अवलंब केला पाहिजे हें त्यांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. आजच्या तरुण पिढीस अध्यात्माचें वावडें असल्यानें

त्या ज्ञानाची टर उडविण्याकडे त्यांचा कल आहे याचा सूक्ष्म विचार झाला पाहिजे. त्याला अनेक कारणें आहेत. पारतंत्र्याच्या कालांत आपल्या धर्मावर, राहणीवर, विचारसामुग्रीवर, राजनीतीवर, चातुर्वर्ण्यसंघटनेवर व आपल्या अध्यात्मज्ञानावर अनेक दुष्टांचे हल्ले झाले. हिंदु धर्माची सर्वतोपरी अवहेलना झाली. आपल्यांतील कांहीं विद्वानांनीं आपल्या कल्पनांना, चालीरीतींना व धर्मकल्पनांना नांवें ठेविलीं. त्यामुळें आजचा समाज विस्कळीत झाला आहे. पण असें जरी झालें होतें तरी आपल्यांतील कांहीं नामवंत व नाणावलेल्या विद्वद्वर्यांनीं त्या पंडितमन्यांचा समाचार घेऊन आर्यांचें तत्त्वज्ञान किती मौलिक आहे व जगांतील कोणत्याहि देशाच्या तत्त्वज्ञानापेक्षां आर्यांतील महान् ऋषींनीं जे मूलग्राही सिद्धान्त मांडले आहेत ते आजहि या भौतिक विज्ञानाच्या युगांत शास्त्रीय कसोटीस उतरून मान्यता पावत असल्यानें समाजांतील कांहीं सुबुद्ध माणसें आजच्या घडीस या बाबतींत विचार करीत आहेत, ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. आज ईश्वरी प्रेरणेनें व कृपेनें भारतवर्षास स्वातंत्र्याची प्राप्ती झाली असल्यानें देशांतील पदवीधरांनीं आपल्या धर्माचें स्वरूप काय होतें याचें अध्ययन करून लोकांना विशेषतः तरुणांना त्याची व्यवस्थित कल्पना द्यावी. म्हणजे कांहीं कालानें तरी त्यांच्या बुद्धीवर व वर्तनावर थोडा प्रकाश पडून ते कर्तव्योन्मुख होतील अशी उमेद आहे. कारण आज सर्व बाजूंनीं गांजलेली प्रजा हळूहळू देवाच्या कृपेकडे झुकूं लागली आहे. कित्येक तरुणांना आज नोकरी नसल्यानें जाणते व सुशिक्षित देवालयाचे उंबरठे झिजवितांना दिसून येतात. तेव्हां या संधिकालांत आर्यांचें मूलग्राही तत्त्वज्ञान किती श्रेष्ठ होतें व त्या तत्त्वज्ञानाचें मर्म लक्षांत घेऊन मग राष्ट्राची सेवा करण्याचें मनांत आणलें तर या विज्ञानयुगास साजेसें होईल. विश्वविद्यालयें व प्रशाला यांनीं आर्यांचें मौलिक वाङ्मय अभ्यासासाठीं आपल्या संस्थांतून उपलब्ध करून दिलें पाहिजे. तरुणांच्या मनांतील धर्माविषयींचें अज्ञान दूर करून सर्व जगांत श्रेष्ठ ठरलेल्या वेदान्तशास्त्रांतील बहुमोल ठेवा त्यांस समजावून दिला तर तें एक महान् कार्य होईल. आज तरुण आपल्या देशाबद्दल व धर्माबद्दल उदासीन आहेत. सबब हा ठेवा त्यांना उपलब्ध करून दिला तर ते चांगल्या मार्गावर येतील. जपान दुसऱ्या महायुद्धापासून शहाणपण शिकला. व त्यानें राष्ट्रांतील तरुणांनीं यापुढें कसें वागलें पाहिजे याच्यासंबंधीं एक छोटीशी पुस्तिका तयार केली आहे ती जाणत्या लोकांनीं अवश्यमेव

नजरेखालीं घालावी. राष्ट्रांच्या नेत्यांचें हें काम असल्याचें जपानी जनता जाणते. त्या पुस्तिकेंत प्राचीन परंपरा काय होती व राष्ट्रांतील तरुणांनीं त्या इतिहासाचें परिशीलन करून आपला मार्ग चोखाळावा असें त्यांत सुचविलें गेलें आहे. ज्या राष्ट्रास इतिहास अगर परंपरा नाहीं तें राष्ट्र जगांत मान्यता पावत नाहीं असा इतिहासाचा निष्कर्ष आहे. हा ऐतिहासिक सिद्धान्त नजरेआड करणें म्हणजे आत्मनाश होय, हें जपानी राष्ट्रधुरीणांना सुचवावयाचें आहे. या पुस्तिकेंत जपानी धर्माचें स्वरूप सांगून तरुणांनीं याकडे लक्ष पुरवावें अशी सूचना दिली गेली आहे. हें उदाहरण केंद्रीय सरकारानें आपल्यापुढें ठेवून हालचाल केली तर भावी तरुण पिढीस ती गोष्ट उपकारक होईल.

राष्ट्रांतील तरुण पिढी भलत्याच ज्ञानाच्या व तत्त्वप्रणालीच्या आहारीं गेल्यामुळें त्यांना धर्म ही अफूची गोळी असें वाटावयास लागलें आहे. आपल्या धर्मकल्पना खुळचट असून देवादिकांचें त्यांत अवडंबर माजविलें आहे असें म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. पाश्चिमात्य तत्त्वज्ञानी व आपल्याकडील तत्त्वज्ञ यांच्या विचारप्रणालींत फरक आहे. आपले तत्त्वज्ञ एक कांकणभर जास्त योग्यतेचे आहेत असा महत्त्वाचा सिद्धान्त कै. गुरुदेव रामभाऊ रानडे यांनीं ‘ दि भगवद्गीता ॲज ए फिलॉसोफी ऑफ गॉड रिअलायझेशन ’ या नागपूर विद्यालयानें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत मांडला आहे. आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी पावलेले प्रख्यात तत्त्ववेत्ते सर्वश्री डॉ. एस. राधाकृष्णन् यांनीं गुरुदेव रानडे यांच्यासंबंधानें जे उद्गार काढले आहेत त्यावरून कै. गुरुदेव रानडे यांची योग्यता आपल्यास कळून येईल. वरील पुस्तकाच्या ‘ फोरवर्ड ’मध्यें नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु यांनी पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे. “ As Dr. Radhakrishnan has elsewhere observed, Prof. Ranade not merely taught Philosophy but lived it.” या उद्गारावरून कै. रानडे यांची योग्यता कळून येईल. कै. रानडे यांनीं पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञांचे ग्रंथ पाहूनच आपल्या सर्वश्रेष्ठ ऋषींच्या दिव्यदृष्टीबद्दल व संतमहंताबद्दल त्यांनीं अत्यंत गौरवात्मक उद्गार काढले असून आपण त्याबद्दल कृतज्ञ असलें पाहिजे असा भारतीयांना इषारा दिला आहे. श्रीज्ञानेश्वरांनीं भगवद्गीतेवर जी टीका लिहिली त्यावरून त्यांनाच गीतेचें मर्म समजलें व या अपूर्व ग्रंथाची थोरवी त्यांनींच जाणली असेंहि गुरुदेव रानडे

म्हणतात. श्रीभगवद्‌गीतेसंबंधानें लोकमान्यांचें मत त्यांनीं उद्धृत करून आपला मतभेद दर्शविला आहे. " उपक्रमोपसंहारौ अभ्यासो ऽ पूर्वता फलम् । अर्थ वादोपपत्तीच लिंगं तात्पर्य निर्णये " ( जैमिनी सूत्र १·२ ) " All these critaria according to Lok. Tilak, point to the real meaning of the Bhagvadgita as consisting in spreading the gospel of Karmayoga. Karmayoga being the be all and end all of its teaching with Karmayoga, the Bhagwatgita begins, with Karmayoga the Bhagwatgita ends; and it is Karmayoga which pervades, the Bhagwatgita. From our point of view, we do not stress thissix fold criterian at all; we stress only one out of these, namely, Apurvata. Apurvata means novelty or originiality. What is the novelty or the original contribution of the Bhagwatgita ? That ought to be one chief question. It is not whether Arjun has been advised to fight at the beginning of the work or at the end of the work, whether the advise is respected from time to time, that constitutes its supreme teaching. What is the novelty or the originality which the Bhagawatgita has to offer to the world ? In our opinion as the title of the present work may show, God realisation constitutes the Apurvata the novelty or supreme contribution of the Bhagwatgita. The Bhagwatgita is one of the greatest work on mysticism that the world has ever seen and when God realization has been duly stressed, everything else will follow in the wake. "

या वरील सूचनेचा आधार घेऊन तरुणांनीं चांगल्या अध्यापकांच्या साहाय्यानें

हिंदु तत्त्वज्ञांचें तत्त्वज्ञान समजून घेण्याचा प्रयत्न करावा अशी आमची त्यांस आग्रहाची प्रार्थना आहे. कै. रामभाऊ रानडे यांच्या विवेचक दृष्टीनें धर्म ही अफूची गोळी नाहीं. तसेंच धर्ममतें व अध्यात्मविचारांची प्रणाली कुचकामाची आहे असे कदापि कोणी मानणार नाहीं. सबब राष्ट्रांतील 'नेते' म्हणून मार्गदर्शन करूं इच्छिणारांनीं समाजोन्नति कार्याची प्रतिष्ठा वाढवावयाची असेल तर त्यांनीं स्वतः धर्मग्रंथांचा व औपनिषदिक तत्त्वांचा मूलग्राही अभ्यास करून राष्ट्रांतील तरुण पिढी सुधारण्याचा मार्ग चोखाळावा म्हणजेच योग्य मार्गदर्शन होऊं शकेल. कारण आजच्या जमान्यांत कोणाहि फालतू गृहस्थानें उठावें व लोकविलक्षण कृतीचें आचरण करून 'मार्गदर्शन' या शब्दाचा अर्थ न समजतां 'मार्गदर्शन' करण्याचा संकल्प करावा !! ही आततायी वृत्ति सोडून वागावें. अंतरिक्षांत संचार करूं नये, पृथ्वीतलावरील मानवासाठीं आपण उपदेश करीत आहोंत हें त्यांनीं ध्यानीं घ्यावें.

एवंच योग्यसद्गुरु भेटल्याशिवाय कोणत्याहि साधकानें आपल्या जबाबदारीवर पुढील मार्ग चोखाळूं नये. त्यांत धोके आहेत. हें नेहमीं लक्षांत ठेवावें. श्रीसमर्थ रामदासस्वामी मनोबोधांत म्हणतात, "गुरु पाहता पाहता लक्ष कोटी। बहुसाल मंत्रावळी शक्ति मोठी। मनी कामना चेटकें धातमाता। जनीवेर्थरे तो नव्हे मुक्तिदाता ॥१८०॥" श्रीसमर्थांनीं "**जनस्थान गोसावी**" या नांवाचें एक अत्यंत उद्बोधक काव्य केलें आहे. त्याचें तरुणांनीं व सुशिक्षितांनीं चौकस-बुद्धीनें मनन करावें म्हणजे जगांत गुरुबाजी करणारांचा व्यवहार व सौदा कसा चालतो हें समजून येईल. अशा विषयलंपट व दुर्बुद्धि समाजकंटकापासून दूर राहून लोकांना जागृत करून जबाबदार व्यक्तीनें समाजास योग्य मार्गावर आणण्याचें मनोधैर्य दाखवावें अशी सूचना देणें भाग आहे. कारण आजहि समाजांत असे चेटकी, भुतेंखेतें काढणारे, लोकांना चाळविणारे, फसविणारे, द्रव्यभोंदू, निंदक, मत्सरी, भक्तिहीन, उन्मत्त, व्यसनी गुरु लक्षावधि आहेत, त्यांच्यापासून सावध असावें. समर्थ म्हणतात, "जव नाहीं ज्ञान प्राप्ती। तव चुकेना यातायाती। गुरुकृपेवीण अधोगती। गर्भवास चुकेना ॥३५॥ ध्यानधारणा मुद्राआसन। भक्तीभाव आणि भजन। सकळहि फोल ब्रह्मज्ञान। जव तें प्राप्त नाहीं ॥ ३६ ॥ सद्गुरुकृपा न जोडे। आणि भलतीचकडे वावडे। जैसे आंधळे चाचरोनि पडे। गारी आणि गडधरा ॥ ३७ ॥ जैसें नेत्रीं घालतां अंजन। पडे दृष्टीस निधान।

अनुक्रम ...३३६८५ दि. ...५८९...
क्रमांक ...९०६८... नों दि. ...२७५८... 

तैसें सद्गुरुवचनें ज्ञान। प्रकाश होये ॥ ३८ ॥ ( दास. ५ द. १ ला समास ) यावरून एक गोष्ट निश्चित समजून लक्षांत ठेवावी कीं " सद्गुरुवीण जन्मनिर्फळ। सद्गुरुवीण दुःख सकळ। सद्गुरुवीण तळमळ। जाणार नाहीं ॥ ( दा. ५ द. पहिला समास ) समर्थ म्हणतात, " आपला विश्वास सद्गुरुवर पूर्ण आहे. " मग आमच्यासारख्या पामराची कथा काय ? तेव्हां शास्त्रप्रतीति, गुरुप्रतीति, आणि सर्व प्राणीमात्रांची आत्मप्रतीतिहि असेंच सांगेल. सद्गुरुची कृपा झाली म्हणजे होणाऱ्या निरतिशय सुखाची कल्पना आम्हांस सांगतां येणार नाहीं. " मुक्यानें गूळ खादला। गोडी नये सांगायला " असा हा मामला असल्यानें स्वतःच याचा शेवटीं अनुभव घ्यावयास पाहिजे. देवाची प्राप्ती झाली याची कल्पना दुसऱ्यास करून देतां यावयाची नाहीं. गुरुकृपा जोंवर होत नाहीं तोंवर आपल्या जीवाची सारखी तळमळ होते. हा अनुभव मुमुक्षूंना येतो ना ? शास्त्रांचें असेंच सांगणें आहे. छांदोग्य उपनिषदाच्या ६ व्या अध्यायाच्या चतुर्दशखंडांत " आचार्यवान पुरुषोवेद। " असा सिद्धान्त दिला आहे. एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जावयास आपण निघालों आणि त्या गांवाची जर आपणास वाट माहीत नसली तर येणाऱ्याजाणाऱ्याला आपण ती वाट पुसत असतों. ही जशी अगदीं सामान्य व्यवहारांतील गोष्ट, तद्वत् परमार्थाची वाट दाखविणारा कोणी तरी ज्ञाता असावा लागतो. शहाण्याला विचारल्यावांचून किंवा माहितगारानें सांगितल्यावांचून आपला सामान्य व्यवहार जर चालत नाहीं, तर त्याच्या अनंत पटीनें गहन जें आत्मज्ञान तें आपल्यास श्रीसद्गुरुकृपेवांचून कळेल अशी अपेक्षा करणें योग्य होईल काय ? केनोपनिषदाच्या प्रथम खंडाची तिसरी कारिका आपण नीटपणें पाहिली तर, ब्रह्म कसें आहे तें सांगून शेवटीं श्रुति म्हणतात, " इति-शुश्रुम पूर्वेषांयेनस्तद्व्याचचक्षिरे " ज्या आचार्यांनीं आम्हाला त्या ब्रह्माचें अगदीं स्पष्टपणें कथन केलें, ब्रह्मोपदेश केला त्या पूर्वाचार्यांचें असें वचन आम्हीं ऐकिलें आहे. ( सर्व विशेषरहित चैतन्यमात्रज्योति सर्वात्म्याचें ब्रह्मत्व सांगणाऱ्या महावाक्याचें अर्थज्ञान आचार्योपदेश परंपरेनेंच संपादन करावें. तर्कानें किंवा प्रवचन, मेधा, बहुश्रुतत्त्व, तप, यज्ञ इत्यादिकांनींहि तें संपादन करण्याचा वृथा यत्न करूं नये, असें पूर्वाचार्यांचें वचन आम्ही ऐकिलें आहे. किंवा ते विदिता-विदिताहून विलक्षण आहे असेंहि आचार्यांच्या तोंडून आम्हीं ऐकिलें आहे. ) याचा अर्थ काय सुचवितो ? ब्रह्मज्ञान केवळ तर्कगम्य नव्हे ! ! हा अर्थ श्रीमत्-

शंकराचार्यांनीं स्पष्ट करून सांगितला आहे. असाच आशय कठोपनिषद अध्याय १ वल्ली २ कंडिका २३ चा आहे. "नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुधाश्रुतेन।" मुंडकोपनिषदाने तेंच सांगितलें आहे. मुंडकोषनिषदानें अगदींच स्पष्ट अभिप्राय दिला आहे. "तद्विज्ञानार्थं सगुरुमेवाभिगच्छेत" त्या नित्य वस्तूचें यथार्थ ज्ञान होण्यासाठीं त्यानें सद्‌गुरूलाच शरण गेलें पाहिजे. दुसरा मार्गच नाहीं. श्रीमत् शंकराचार्य म्हणतात, "शास्त्रज्ञोऽपिस्त्रातंत्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषेणं न कुर्यादित्येतग्दुरुमेवेत्य व धारण फलम्॥" तो प्रकांड पंडित झाला तरी त्यानें स्वतंत्रपणें ब्रह्मज्ञानाचा शोध न करावा हाच बोध 'सद्‌गुरुला'च यापासून होतो.

वरील श्रुतिवचनें जशीं आहेत तद्वत भारत, रामायण, भागवत, अध्यात्मरामायण, गीता, गुरुगीता इत्यादि सर्व अध्यात्मग्रंथांत याच सिद्धान्ताचें विवरण केलें आहे, भगवद्‌गीतेंतील पुढील श्लोकाची या ठिकाणीं आठवण होईल. गीता म्हणते "तद्विद्धि प्रणिपातेन, परिप्रेश्नन सेवया। उपदेक्षन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्व दर्शिनः॥ (४-३-३४) हें ज्ञान सद्‌गुरूला शरण गेल्याशिवाय मिळणार नाहीं. शिष्यानें अत्यंत विनयभावानें त्यांची सेवा केली, त्यांना वारंवार विचारणा करून शरण जाऊन प्रश्न केले तरच ते (सद्‌गुरु) प्रसन्न होऊन आत्मज्ञान देतील. श्रीमत् दासबोधांचा दशक ५ समास पहिला वाचावा. श्रीसमर्थ म्हणतात" मागे झाले थोर थोर। संत महंत मुनेश्वर। तयासिहि ज्ञान विज्ञान विचार। सद्‌गुरुचेनी॥४१॥ श्रीरामकृष्ण अदिकरूनि। अतितत्पर गुरूभजनीं। सिद्धसाधु आणि संतजनीं। गुरुदास्य केलें॥४२॥ सकलसृष्टीचे चालक। हरिहर ब्रह्मादिक। तेहिं सद्‌गुरुपदीं रंक। महत्वास चढती॥४३॥" सबब योग्य गुरूची कास धरुन जे चालले त्यांस नांवें ठेवण्याचें प्रयोजन नाहीं. श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांच्या ज्या भक्तांनीं त्यांच्यापुढें लोटांगण घालून अत्यंत विनम्र भावानें सेवा केली त्यांना वदंन करून इतरे जनांनीं आपला मार्ग अनुसरावा एवढेंच आम्ही या ठिकाणीं सुचवितों

● ● ●

## अध्याय दहावा

# श्रीसद्गुरूंचें मार्गदर्शन–( पुढें चालू )

मागील अध्यायांत श्रीसद्गुरूंच्या मार्गदर्शनाची आवश्यकता कां लागते यासंबंधीं थोडेसें विवेचन करण्यांत आलें आहे. यावरून जाणत्या लोकांची कास धरल्याशिवाय परमार्थमार्गाचें आकलन होणार नाहीं असा सर्व संतांचा अभिप्राय आहे. श्रीज्ञानराजमाउलींनीं सद्गुरुकृपा झाल्यावर काय चमत्कार घडतो याचें साद्यंत वर्णन आपल्या अमर काव्यांत केलें आहे. श्रीज्ञानेश्वरीमध्यें ज्या ठिकाणीं सद्गुरूंचा उल्लेख आला त्या ठिकाणीं माउलींच्या काव्यशक्तीस स्फुरण चढून ते आपल्या रसाळ वाणीनें सद्गुरुकृपेचा ओलावा म्हणजे काय याबद्दल अत्यंत हळुवार मनानें वर्णन करतात. हें आपल्यास श्रीज्ञानेश्वरीच्या अभ्यासावरून विदित होईल. श्रीज्ञानेश्वरमहाराज १२ व्या अध्यायाच्या प्रारंभीं म्हणतात, " जयजय सिद्धे । उदारे प्रसिद्धे । अनव्रत आनंदे । वर्ततिये ॥ १ ॥ विषय व्यालेमिठी । दीधलेया उठणें नाहीं ताठि । तूझेनिवो गुरुद्रिष्टी । होये माये ॥ २॥ तरीताप कोणते पोली । कैसे निसोसुजाली । जरि प्रसादरस कल्लोलीं । पूरे येसि तूं ॥ ३ ॥ योगसुखाचे सोहळे । सेवका दाबीसितूं कौतुकिं । सोहं-सिद्धींचें ललें । पालीसितूं ॥ ४ ॥ आधार शक्तीच्याअंकि । वाढविसि तूं कौतुकिं। हृदयकोशपालकीं । हालविसि पै ॥ ५ ॥ प्रत्यग् जोतीची वोवालणी । करिसि मनपवनाचि खेळणीं । रिद्धी सिद्धींची बाललेणी । लेववीसि माये ॥ ६ ॥ सतरावियेचे स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरूंगासी । समाधिबोधे निजविसी । बुझाऊनि ॥ ७ ॥ म्हणौनि साधका तू माऊली । पीकें सारस्वत तूझा पाऊलीं । याकारणें साऊली । नसंडी तूझी ॥ ८ ॥ आवोसद्गुरुचिये दिठी । तूझें कारुण्य जे याते आधिष्ठि । तो सकल विद्याचियेश्रृष्टी । धात्रा होये ॥ ९ ॥ म्हणोनि

अंबेश्रीमंते । निजजन कल्पलते । आज्ञा देया माते । निरुपणी ॥ १० ॥" असें म्हणून त्यांनीं गुरुकृपा झाल्यावर ती काय करूं शकते याचें थोडक्यांत स्वरूप सांगितलें आहे. तेराव्या अध्यायाच्या प्रारंभीं ते म्हणतात, " केलेया स्मरण । सकल विद्यांचें अधिकरण । ते वंदू चरण । श्रीगुरुंचे ॥ १ ॥ जेयाचेनि आठवे । शब्दसृष्टिआंगवे । सारस्वत आघवें । जीभेसिये ॥ २ ॥ वक्तृत्व गोडपणें । अमृतानें पारू म्हणे । रस होती ऊ्लगणें । अक्षरांचें ॥ ३ ॥ भावांचें अवतरण । अवतरवीति खुण । हातीं संपूर्ण । तत्त्वभेदु ॥ ४ ॥ श्रीगुरुचे पाय । हृदय गवसूनि ठाए । पै एवढे भाग्य होय । उन्मेयासि ॥ ५ ॥" या उद्‌गारांवरून श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या गुरुची थोरवी काय हें ओघानें या ठिकाणीं सांगितलें आहे. व त्यांच्या कृपेनें संपूर्ण साहित्याचा गाभा आपल्या हातीं आल्यानें गीतेसारख्या ग्रंथावर टीका करण्याचें सामर्थ्य आलें असेंहि एका ठिकाणीं म्हटलें आहे. १४ व्या अध्यायांत त्यांनीं प्रारंभींच्या नमनांत म्हटल्याप्रमाणें " तूं जया प्रति लपसि । ते या जग हे दाविसि । प्रकट तै करिसी । आघवें तूं ॥ " असें म्हणून अनेक ओव्यांनीं श्रीसद्‌गुरूंची स्तुति करून शेवटीं " बा गुरुराया ! तुझें वर्णन करणें हें दुर्घट आहे. तूं जसा असशील तसा ऐस; मी तुला अनन्य भावें शरण आलों, आतां माझ्यावर कृपा कर " अशी करुणा भाकिली आहे. पंधराव्या अध्यायाच्या नमनाच्या ओव्या पाहिल्या म्हणजे ज्ञानदेवांचें अंतःकरण सद्‌गुरुकृपेनें किती भारावून गेलें होतें हें सहृदय वाचकांस कळेल व त्याच्या ठिकाणीं भक्तिरसाचा ओलावा ज्या प्रमाणांत असेल त्या प्रमाणांत त्याचें भक्तिप्रेम ओसंडून बाहेर पडेल असें आम्हांस वाटतें. पंधराव्या अध्यायांत ते म्हणतात, " आतां हृदय हें आपुलें । चौफलौनि भलें । वरि बैसऊं पाऊलें । श्रीगुरूंची ॥ १ ॥ ऐक्य भावाची आंगुली । सर्वेंद्रिय कुड्मलिं । भरौनि पुष्पांजलि । अर्घ्यु दे ऊ ॥ २ ॥ अनन्योदक धुवट । वासना जे तन्निष्ठ । ते लागलेसे अवोट । चंदनाचे ॥ ३ ॥ प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळूनि ने पुरें । लेवऊ सुकुमारें । पदें तिथें ॥ ४ ॥ घनावलि आवडी । अव्यभिचारें चोखडीं । तिये घालू जोडी । आंगुलिया ॥ ५ ॥ आनंद मोदबहल । सात्त्विकाचें मुकुल । ते उमललें अष्टदल । ठेऊं वरि ॥ ६ ॥ तेथ अहंधूप जाळूं । सोहं तेजें ॐ वाळूं । सामरस्य पोटाळूं । निरंतर ॥ ७ ॥ माझे तनु आणि प्राण । इया दोन्ही पाऊवा लेवऊं श्रीचरण । करूं भोग मोक्षी निंबलोण । पायांतेयां ॥८॥

इया गुरुचरण सेवा। ते पात्र तेया दैवा। जे सकलार्थांचा मेळावा। पाटु बांधो ॥ ९ ॥ ब्राह्मिचें विरुवणें वेऱ्हीं। उन्मेखु लाहे उजरि। जे वाचेते इयेकरि। सुधा सिंधु ॥ १० ॥ पूर्ण चंद्राचा कोडी। वक्तृत्वा घापे कुरौंडी। तैसी आणी गोडी। अक्षरातें ॥ ११ ॥ सूर्ये अधिष्ठिली प्राची। जगा राणीव दे प्रकाशाची। तैसी वाचा श्रोतेया ज्ञानाची। दिवाली करी ॥ १२ ॥" हें सर्व कोणाच्या कृपेमुळें लाधलें तर तें "एव्हडे एक सौभग। वलघे वाचेचें आंग। गुरुपद पद्म पराग। लाहे जै कां" ॥ १७ ॥ तेव्हां गुरुपदाचा केव्हडा चमत्कार आहे असें सांगून श्रीज्ञानेश्वरमाउली पुढील १६ व्या अध्यायांत म्हणते "बाप हो। श्रीगुरुदेव म्हणजे केवळ चैतन्य. त्या चित् सूर्याची महति काय सांगूं? महाराज! सूर्याचा उदय झाल्यावर जगाचा भास नाहींसा होतो. अद्वैतरूपी कमलाला तो उमलवितो असा हा चमत्कारिक सूर्योदय आहे. अशाला माझा प्राणिपात असो. जो सूर्य उगवल्यावर अज्ञानरूपीं रात्रीचा नाश करून ज्ञानाज्ञानरूपी चांदण्या नाहींशा करून ज्ञानी लोकांस आत्मबोधाचा सुदिन करतो. जो सूर्य उदय पावल्यामुळें आत्मज्ञानाचा प्रकाश होऊन जीवरूपी पक्षी देहाभिमान रूप घरटी सोडून जातात. वासनात्मक सूक्ष्म देहरूपी कमलांत जीवचैतन्यरूपी भ्रमर जो अडकला तो या सूर्याचा उदय झाल्याबरोबर बाहेर पडतो! शास्त्रादिकांच्या शब्दरूप अडचणीमुळें सांपडतांच अज्ञानरूप सायंकाळ झाल्यामुळें ज्या बुद्धि व ज्ञान या चक्रवाक पक्ष्यांच्या जोड्याची फुटाफूट होऊन तीं उभयतां जीवेश्वर भेदरूप नदीच्या दोन्हीं कांठावर वियोगदुःखानें ओरडत असतात, त्या बुद्धिबोधरूपी चक्रवाक पक्ष्याचे जोडपें ब्रह्मरूप आकाशांत या सूर्योदयाच्या प्रकाशामुळें एकत्र होऊन समाधान पावतें. ज्या श्रीगुरुरूपी सूर्याचा उदय झाल्यावर भेदरूपी चोरांची भीति नाहींशी होऊन योगी हेच पांथस्थ आत्मानुभव रूप वाट चालावयास लागतात, ज्या सूर्याच्या विवेकरूप किरणानें ज्ञानरूपी सूर्यकांत प्रदीप्त होऊन संसाररूपी वनें जाळून टाकतो, ज्या सूर्याच्या प्रखर किरणांनीं आत्मस्वरूपीं माळजमिनीवर मृगजळाप्रमाणें महासिद्धीचा पूर आलेला दिसतो. जो आत्मबोधाच्या माथ्यावर सोहंरूपी माध्यान्हाच्या वेळीं आल्यामुळें देहात्मभावाची म्हणजे "मी देह आहे," ही भ्रांतीची छाया पायाखालीं नाहींशी होते. त्यावेळेस मायारूपी रात्र नाहींशी झाल्यामुळें विश्वरूपी स्वप्नासह विपरीत ज्ञानरूपी निद्रेची आठवण कोठून राहणार? म्हणून अद्वय बोधरूपी नगरांत महानंदाची गर्दी होऊन आनंद

भुवनाची देवघेवहि मंद होऊं लागते. किंबहुना याप्रमाणें मोक्षकैवल्य-सुदिन नेहमीं ज्या सूर्याच्या तेजामुळें प्रकाशित होतो, तो सूर्य आत्मस्वरूपी आकाशाचा राजा असून नेहमीं बोधाचा उदय करणारा आहे; तो पूर्वादि दिशासह उदय व अस्त यांचें अस्तित्व नाहींसें करतो. ज्ञानासकट अज्ञान नाहींसें करून शेवटीं ज्ञानाचाहि लोप करून आत्मज्ञानाचा उजेड करतो. फार काय सांगावें, तो कांहीं निराळाच आहे. असा जो चैतन्यरूपीं श्रीनिवृत्तिमहाराज यांना वारंवार प्रणाम असो. " असे आत्मतृप्तीचे उद्गार काढून आपलें प्रेम प्रगट केलें आहे. अशाप्रकारे ज्या ज्या ठिकाणीं श्रीगुरूंची आठवण होईल त्या त्या प्रसंगीं श्रीज्ञानेश्वरमाऊलींनीं आपल्या शुद्ध भक्तिभावानें गुरुंची महती वर्णन केली आहे. हें पाहिलें म्हणजे परमार्थाचा अवलंब करतांना श्रीगुरुच्या मार्गदर्शनाची किती आवश्यकता असते हें सहज लक्षांत येईल. श्रीएकनाथमहाराजांनीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पावलावर पाऊल टाकून परमार्थाच्या सोपानपरंपरेकडे ज्या साधकाची जाण्याची मनीषा आहे त्यानें श्रीसद्गुरुचाच आश्रय केला पाहिजे. श्रीमद्भगवद्गीतेच्या वाचकांनी श्रीकृष्णांनी अर्जुनास जें बजावलें तें आपण आपल्या हृदयांत सांठवून त्याचें मनन केल्यास परमार्थपथ चालून जाण्यास त्रास पडणार नाहीं. श्रीतुकाराम, श्रीनामदेव, श्रीनिळोबा, श्रीसमर्थरामदास यांनीहि परोपरीनें सद्गुरूंचा महिमा आपल्या काव्यांतून गाईला आहे. या संतांना व पूर्वाचार्यांना गुरुचें इतकें महत्त्व वाटतें तर मग आमच्यासारख्या संसारांत लोळणाऱ्या जंतूंना त्याची किती गरज असेल हें सांगणें नलगे.

आज जडवादाचा सारा डोळयावर चढला आहे. त्यामुळें आपल्यास जगांतील नियामकशक्तीसंबंधानें कांहीं शोध घ्यावा असें वाटेनासे झालें आहे. साधे लोक सुद्धां "ईश्वर आहे तरी कोठें" येथूनच आजच्या घटकेस सुरवात करतात !! तो कोणाला कोठे प्रतीतच होत नाहीं. आज सारें जीवन विकारवश झालेलें असल्यानें लोकांत भोगलिप्सा दिवसें दिवस वाढत आहे. जीवनच सर्वतोपरी विकारमय, विषयलोलुप आणि शंकेनें ग्रासलेलें असें दिसून येतें. जगांतील महान् तत्त्वज्ञानी यांना सुद्धां मानाने जगतां येत नसल्याचें अनुभवास आलें आहे. आपल्यांतील अनेकांना आज खावयास मिळत नाहीं. एक वेळसुद्धा अत्यंत व प्रयासानें खावयास मिळतें !! अमेरिकेसारख्या अत्यंत संपन्न देशांत सुद्धां दारिद्य नांदतें असें एका तत्रस्थ ग्रंथकारानें आपल्या " पॉव्हर्टी इन प्लेंटी " या ग्रंथांत

म्हटलें आहे. अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्रांतील लोकांना अन्न भरपूर मिळेल कां नाहीं यासंबंधी चिंता वाटतें असे तो ग्रंथकार म्हणतो. आपल्या राष्ट्रांत दारिद्य किती शतपटीनें नांदत आहे याचा गेल्या १५०।१७५ वर्षांचा आर्थिक इतिहास तपासून पहावा म्हणजे आज किती लोकांना दोनहि वेळां भरपूर अन्न मिळतें हें पाहणें उद्बोधक होईल. महागाई तर घर धरून बसली आहे. तेव्हां सर्व राष्ट्रांचा तौलनिक अभ्यास करून कांहीं तरी तोड काढून याच्या मुळांशीं कोणतें तत्त्व आहे याचें संशोधन झालें पाहिजे. सर्व लोक धर्माधिष्ठित झालें म्हणजे सर्व कांहीं सुधारेल असें म्हणण्याचा आमचा मानस नाहीं. परंतु शाश्वत मूल्यांचा अवमान केल्यामुळें आपण या दशेस येऊन पोहोंचलों. यास अनेक आर्थिक, राजकीय, सामाजिक कारणें आहेत. त्यांचा राष्ट्रदृष्ट्या अभ्यास होणें अत्यंत आवश्यक आहे. धर्माच्या बंधनानें आज युगानुयुगें जें स्थैर्य निर्माण झालें होतें तें आज आपल्या प्रत्ययास येत नाहीं. धर्माचीं बंधनें शिथिल झालीं म्हणजे राष्ट्र केव्हांहि मरत नाहीं. पण शाश्वत व चिरंतन मूल्यें आचरणांतून सुटलीं म्हणजे राष्ट्र नाहींसें होतें असा एका पाश्चिमात्य तत्त्वज्ञानें सिद्धांत प्रस्थापित केला आहे. तो आजच्या घटकस लागू पडतो असें आम्हांस वाटतें. तेव्हा समाजधुरीणांनी व राष्ट्रांतील राज्यकर्त्यांनी या प्रश्नाकडे डोळेझाक करूं नये असें आम्ही सुचवितो. आज " भाकरीची " घोर समस्या जनतेपुढे आहे. ही कशी सुटेल यामध्यें सर्व अक्कल व बुद्धि विचारवंतांना खर्चावी लागते ! **सायणाचार्यांनी** " बुभुक्षमाणः रुद्ररूपेण अवतिष्ठते " अशी रुद्राची व्याख्या केली आहे. भुकेलेले लोक म्हणजेच रुद्राचाच प्रत्यक्ष अवतार. त्यांच्या क्षुधा-तृतीसाठी तत्त्वज्ञानें, नाना मताचें वाद, नाना तऱ्हेचीं राजकारणें उभीं राहिलीं आहेत. या चक्रांतून बाहेर पडण्यास आज अवसर नाहीं. एकमेकांशीं न तंडतां दोन सुखाचे घांस मोकळ्या मनाने व निर्वेधपणें कसें घेतां येतील याचा विचार करण्यांत राष्ट्रांत प्रयत्नांची शिकस्त होऊन राहिली आहे. अशा या चमत्कारिक समाजसंघटनेच्या जंजाळांत ईश्वरप्राप्तीची साधी गोष्ट अधिक कठीण होऊन बसल्यास आश्चर्य नाहीं. तेव्हां समर्थ अशा प्रसंगास उद्देशून म्हणतात, " बाबारे ! जो त्रिविधतापानें पोळला, संसाराच्या दुःखानें होरपळून गेला, तोच एक परमार्थाचा अधिकारी होतो " म्हणून " धीर धरा, हडबडूं गडबडूं नका " असा इषारा देऊन साधकास पुढील सूचना देऊन सावध करतात. ते म्हणतात,

" संसार तरुन जाणें ही गोष्ट खरोखरीच अतिशय कठीण आहे. " संसार म्हणजे सवेंच स्वार । नाही मरणास उधार । मापी लागलें शरीर । घडीनें घडी ॥ " म्हणून सद्‌गुरूंच्या उपासनेची कास धरावी म्हणजे तुम्ही तरून जाल " समर्थ म्हणतात, " उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेविण निराश्रयो। उदंड केलें तरी जयो । प्राप्त नाहीं ॥ समर्थांची नाहीं पाठीं । त्यास भलताच कुटी । या कारणें उठाउठीं । भजन करावें ॥ " असा मूलग्राही सिद्धान्त त्यांनीं मांडला आहे. याचें विचारवान पुरुषानें गंभीरपणें मनन करावें.

श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांनीं अशाच स्वरूपांत त्यांच्याकडे येणाऱ्या मुमुक्षूंना असेंच तत्त्वज्ञान पण निराळ्याच शब्दांत सांगून, वाटेवार आणलें आहे. श्रीगुरुलीलामृताचें आपण विवेक जागृत ठेवून पारायण केल्यास आम्ही जें म्हणतों त्याचें मर्म ध्यानांत येईल. बाबा रे ! " येचक्षणीं मरोन जासी। तरी रघुनाथीं अंतरलासी । माझें माझें म्हणोनिया ॥ " तेव्हां समर्थांच्यासारखे महात्में " अरे विचार कर विचार कर, अविचार सोडून दे, कांहीं तरी आगंतुक गुणांची सोय धरून या संसारचक्रांतून तरून जा " असा उपदेश आपल्या शिष्यांना आवर्जून सांगतात. तिकडे आमचें दुर्लक्ष झाल्यानें श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांच्यासारखे प्रत्यक्ष परब्रह्मच जवळ असतांना साधकांनीं त्यांच्या सान्निध्याचा व सहवासाचा फायदा करून घेतला नाहीं. ही गोष्ट जरी खरी असली तरी साधकाच्या पात्रतेप्रमाणें महाराजांचें बोलणें ज्यास समजलें त्याचा फायदाच झाला. श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्रकारांनीं साधकांच्या व महाराजांच्या संवादाची थोडी पद्धतशीर मांडणी केली असती तर पुष्कळांना त्याचा फायदा मिळाला असता. महाराजांच्या दर्शनार्थ आर्त, मुमुक्षू, जिज्ञासू व ज्ञानी अशा भक्तांचा मेळावा मधून मधून अक्कलकोटास दर्शनास येत असे. त्यांचें अनुभव सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास श्रीस्वामीमहाराजांचें चरित्र या वेळीं अनेक महत्त्वाच्या घटनांनी भरल्याचें चांगल्या साधकास समजून येईल. महाराज कोणास उपदेश देण्याच्या भानगडींत पडत नसत. त्यांच्या भेटीच्या इच्छेनें जे लोक येत त्यांची योग्यता पाहून ते त्यांच्या मनांतील आशय जाणून त्यांचीं समर्पक उत्तरें देऊन त्यांचे मनोरथ पूर्ण करीत असत. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्यांच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. परमार्थमार्गांत ज्यांनीं आपलें आयुष्य वेचलें व जे खरोखरी ज्ञानी होते त्यांना त्यांच्या खुणा सांगून

त्यांचें मनोगत उघडे करून त्यावर अचूक उपाय स्वतः सांगत असत. जे केवळ पोटार्थी अगर संसारत्रासानें त्रस्त झाले असत त्यांचीं दुःखें ऐकून घेऊन दयार्द्र बुद्धीनें दूर करीत. प्रापंचिक अडचणींत सांपडलेल्यास त्यांना त्यांच्या अडचणी-बद्दल परिहार सांगून त्या दूर करण्याचा उपाय सांगत. अशा अनेकविध प्रसंगानें त्यांनीं आपल्या वास्तव्यामध्यें अनेक लीला करून दाखविल्या. त्यांच्या चरित्राचें बारकाईनें निरीक्षण केले तर आपल्यास या आजच्या दुःखदायक व कष्टमय स्थितींतून बाहेर पडतां येईल. कारण त्यांची वाणी फलदायी असल्यानें साधकांनी निर्मल अंतःकरणानें त्यांच्या बोलण्यापासून काय तो बोध घ्यावा.

● ● ●

## अध्याय अकरावा

# सद्‌गुरूंची भाषा कोणाला कळेल ?

श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांचीं अनेकांनीं चरित्रें लिहिलीं आहेत. त्यांतील कित्येक आख्यायिका व श्रींचे उद्‌गार पुष्कळ लोकांना पटणार नाहींत. ब्राह्मण्य व कर्मठपणा यांच्या अभिमान्यांस श्रींचें चरित्र मानवणार नाहीं असा कांहीं लोकांनीं आक्षेप घेतला आहे. महाराज कोणाची गुह्य गोष्ट केव्हां बाहेर फोडतील याचा धाक सर्वांना वाटत असल्यानें त्यांच्या दर्शनार्थ जाणारा इसम मग तो पुरुष अगर स्त्री असो चांगल्या आचरणाचे व शुद्ध वर्तनाचे असतील तरच निभाव लागे. मंगळवेढ्याचे संतश्रेष्ठ श्रीसीताराममहाराज यांच्यावर महाराजांची पूर्ण कृपादृष्टि झाल्यानें तेहि श्रीमहाराजांप्रमाणें अगदीं स्पष्ट बोलत असल्याचें वै. वा. सुप्रसिद्ध रामभक्त **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर** यांनीं आपल्या आत्मचरित्रांत म्हटलें आहे तें वाचकांनीं अवश्यमेव नजरेखालीं घालावें. श्रीसीताराममहाराज यांच्यासंबंधानें त्यांनीं दोन प्रसंग पंढरपूर मुक्कामीं आपल्यासमोर घडल्याचें स्पष्टपणें निवेदिलें आहे. कोणाची बाकी न ठेवतां दर्शनार्थ येणाऱ्याचें चारित्र्य श्रीसीताराम महाराज त्या मनुष्याकडे न पाहतांच दुसऱ्यापुढें उघडें करीत. याचें कारण काय असावें असा कांहींनीं प्रश्न केला आहे. त्यावर महाराजांचें असें उत्तर असें कीं, " परमेश्वरानें मानवाला जो जन्म दिला आहे तो व्यसनाधीन होण्यासाठीं दिला नाहीं. ज्याचा भाग्योदय होण्याचा असेल असाच एखादा विरळागत इसम पूर्वपुण्याईनें भेटतो व तो उद्धरून जातो असा या मार्गातील अनेक अधिकारी व्यक्तींनीं खुलासा केला आहे. जगांत आपणास असे कांहीं लोक भेटतात कीं त्यांचें पूर्वचरित्र अतिशय चारित्र्यहीन दशेंत व्यतीत झालेलें दिसून येतें. परंतु दैवानें कलाटणी दिली

म्हणजे तोच मनुष्य दैवी कृपेस पात्र होतो. ही सर्व स्थिति आपल्या नजरेस येते. त्यावरून अधिकारी पुरुषांस सर्व लीला समजून येत असल्यानें ते त्या मनुष्याची वृत्ति पालटावी व त्यानें योग्य मार्गावर यावें अशासाठीं ही कटु अक्षरें बोलण्याचा त्यांना प्रसंग येतो असें विचारांतीं आपल्यास पटेल. अशीच हकीकत औरंगाबादचे दोन संतश्रेष्ठ श्रीविनायकमहाराज व श्रीबनेमियासाहेब यासंबंधानें होती. हे उभयतां अत्यंत स्पष्टवक्ते असल्यानें त्यांचा धाक अव्यवस्थित वागणाऱ्यांना होता. स. भ. सर्वश्री **कुर्डूकर योगी** व स. भ. सर्वश्री **बाबा-साहेब दाभोळकर** हे गृहस्थ आज हयात आहेत. त्यांनीं त्यांस प्रत्यक्ष पाहिलें होतें व त्यांचा सहवासहि या उभयतांना चांगलाच घडला होता. श्री. कुर्डूकर व दाभोळकर हे या मार्गांतील चांगले अधिकारी असल्यानें त्यांना जो प्रत्यय आला त्यासंबंधीची माहिती आम्हांस उभयतांनीं दिली आहे. तेव्हां अशा उच्चकोटीस गेलेल्या संत महंत व वली यांचा जीवनक्रम कसा असू शकतो याची थोडीशी कल्पना आम्हाला येते. म्हणूनच या गोष्टींचा उल्लेख येथें केला आहे. औरंगाबादेच्या दोन वरील संतश्रेष्ठांपुढें खोटें लपविण्याची सोय नव्हती. औरंगाबादेंतील नागरिकांनीं त्यांच्या फटकळ बोलण्यावर कोणी आक्षेप घेतले नाहींत. अक्कलकोटास महाराजांच्या दर्शनार्थ येणाऱ्या कांहीं नास्तिक लोकांनी महाराजांच्या बोलण्यासंबंधानें आक्षेप घेतल्याचें त्यांच्या एका चरित्रलेखकानें नमूद केलें आहे. असे आक्षेप घेणें अत्यंत मूर्खपणाचें आहे असें आम्हास वाटतें. अक्कलकोट येथील वास्तव्यांत अत्यंत पाजी लोकांपासून तों अत्यंत सत्त्वशील अशा अनेक लोकांनीं महाराजांचें दर्शन घेतलें आहे. महाराजांनीं पाजी लोकांचीं बिंगें दाखवून त्यांस पस्तावलें! व जे सत्त्वशील व चांगल्या आचरणाचे होते त्यांना साधकांच्या दशेंतून वर नेलें. ज्या व्यभिचारी लोकांना खरोखरी मनापासून पश्चात्ताप झाला त्यांच्यावर कृपेची पाखर घालून त्यांचें जीवन त्यांनी सुखी केलें. अशी द्विविध कामगिरी झाली. या दृष्टीनें कै. मुळेकर आदि लोकांनीं लिहिलेल्या चरित्राकडे पहावें. त्यांनीं कांहीं अवाच्य शब्द महाराजांच्या तोंडीं घातले आहेत तें वाचून बिचकून जाण्याचें कारण नाहीं. एका मुत्सद्द्याचा फोटो काढण्यासाठीं एक फोटोग्राफर त्याच्याकडे गेला तेव्हां त्यास त्यानें असें बजावलें कीं, "बाबा रे, मी जसा दिसतों तसाच मला रंगीव. माझ्या चाहत्यांना अगर मला खूष करण्यासाठीं नसतें सौंदर्य माझ्यावर लादूं नकोस."

या न्यायानें श्रींच्या चरित्राचें परिशीलन केल्यास फणसासारखे वरवर खडबडीत दिसणारे स्वामीमहाराजाचे खडे तात्त्विक बोल आंतील गऱ्याप्रमाणें अमृततुल्य गोडच गोड लागतील हें निश्चित. तेव्हां सारग्रहण करून योग्य तो बोध घेतल्यास बरें अशी विनम्रप्रभावानें आम्ही सूचना करीत आहोंत. तेव्हां थोर पुरुषांचीं चरित्रें लिहितांना त्यांच्या बारीकसारीक गोष्टींचें मनन करणें आवश्यक असतें. त्याशिवाय त्यांच्या विचारांची खोली समजून येत नाहीं. श्रीस्वामीमहाराजांसारखे महान् आत्मे अगदीं सामान्यजनाप्रमाणें सविस्तर चर्चा करून सांगत नाहींत. केवळ जरूरीपुरतीच गोष्ट समजावून देतात. ग्रहण करणारा ज्या योग्यतेचा असतो त्याप्रमाणें बोध घेतो व टाकाऊ जो असतो त्यास श्रींच्या म्हणण्याचा अर्थहि समजत नसे! तेव्हां महाराजांचेजवळ जे लोक असत व ज्यांना श्रींच्या कृपेनें महाराजांच्या बोलण्याचा अर्थ अवगत होई ते महाराजांच्या शब्दांचा अर्थ उलगडून सांगत याबद्दलची माहिती महाराजांच्या चरित्रकारांनीं दिली आहे. त्यावरून आमचें म्हणणें पटेल.

अक्कलकोटास एक म्हातारी सोनारीण वेडसर दिसे. पण तिला स्वामींची भाषा कळत असे. एका गृहस्थानें महाराजांस प्रश्न विचारला, " स्वामिन, आपण कोण आहां ? " तेव्हां श्रीसमर्थ म्हणाले, " मूळ पुरुष, वडाचें झाड, दत्तनगर " हें ऐकून ती म्हातारी म्हणाली, " वटपत्रशयनी मूळ पुरुष श्रीदत्तात्रय रूपानें अवतरले आहेत. " त्यावर कर्वे नांवाच्या एका गृहस्थानें आतां जें सांगण्यांत आलें तें महाराजांचे सत्यार्थरूप वचन आहे काय ? परंतु आपली ज्ञाति कोण ?" तेव्हां लगेच श्रींनीं उत्तर दिलें " आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण, आमचें नांव नृसिंहभान, काश्यपगोत्र, आमची मीन रास, पुनः विचारल्यास टाळक्यांत पायपोस. पण काय रे तुझी फक्कड मुलगी पुण्यांत रात्रंदिवस ××× फिरते तिची ज्ञाति कोणती ? " हें बोलणें ऐकून तो गृहस्थ ढेपाळला!!

एकदां कोणी एक मुसलमान गृहस्थ महाराजांच्या भेटीस आला होता. तो आपल्या धर्माचा अत्यंत अभिमानी व पैगंबराचा परमभक्त होता. त्यानें कुराणादि पवित्रग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यामुळें त्याची बुद्धि तरल होती. परंतु जगाच्या दृष्टीनें हें जरी ज्ञान त्यानें मिळविलें होतें तरी त्यास आध्यात्मिक ज्ञानाची भूक असल्यानें त्याचें मन अस्वस्थ असे. या गृहस्थास श्रीस्वामी मोठे अवलिया असल्याचें कळल्यावरून तो मोंगलाईतून अक्कलकोटास

श्रींच्या दर्शनास आला. मठाच्या द्वारापाशीं आल्यावर त्यानें महाराजांची चौकशी केली. स्वारी तेथेंच होती. महाराजांनीं त्यास पाहून मोठे गमतीदार शब्द उच्चारले. ते शब्द ऐकून तो मुसलमान गृहस्थ तेथेच थबकला, महाराज पुनः म्हणाले, " स्वामी तो अक्कलकोटमें हैं, ह्यां क्यां देखता है " या उत्तरानें सय्यदसाहेब जागच्याजागीं तटस्थ राहिला. देहभान विसरून त्यास समाधि लागली ! या स्थितींत कांहीं काळ गेल्यावर त्याची समाधि उतरली. समाधि सुखाचें अभिनव स्वरूप पाहून तो महाराजांकडे पाहून अत्यंत आनंदित झाला. महाराजांना साष्टांग नमस्कार घालून तो म्हणाला, " आज साक्षात् खुदाचेंच दर्शन झालें. और उसीलीये अकलके अंदर हरदेमें साहेबकू सच्चा देख लिया. सब जनमका सार्थक हुवा. पलखमे दर्यामाफक हो गया. किसमतकी बात है. में आपका बंदा हूं." असें म्हणून त्यानें आपल्या यावनी भाषेंत अत्यंत मनोभावाने स्तुति केली. पुढें महाराजांची आज्ञा घेऊन तो तेथून गेला. पुढें त्याचा विशेष पत्ताहि कोणास मिळूं शकला नाहीं. हा मनुष्य तेथून निघून गेल्यावर एका मनुष्यानें या बोधवचनावर कोटी करून असे उद्गार काढले कीं " अक्कलसे खुदा पछानना. " अक्कल मनुष्याच्या डोकींत असते. यावरून महाराज "श्रीप्रज्ञापुरीस" कां आले याचाहि त्या मनुष्यानें अन्वयार्थ लावला. "प्रज्ञा" बुद्धि वा "अक्कल" म्हणून अक्कलकोटासच महाराज कां आले याचा बोध होईल. याच ठिकाणीं ( अक्कलकोटास ) श्री. पांडोबा पुराणिक म्हणून राजेसाहेबांचे एक आश्रित होते. अक्कलकोटचे मालोजीराजे यांचे वडील शहाजीराजे यांनीं आपल्या संस्थानचा अधिकार सातारकर छत्रपति बुवासाहेब यांच्याकडून मिळेल तर तुम्हांस एक हजार उत्पन्नाची जमीन देणगीदाखल देईन अशा अर्थाचा एक कागद लिहून दिला होता. शहाजीमहाराजांस अधिकार मिळाला पण आपल्या वचनाची आठवण त्यांना राहिली नाहीं. पुराणिकांना कांहीं मिळालें नाहीं. त्यांनीं " आपल्या वचनाची पूर्तता झाली नाहीं " असेंहि सुचविलें पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. कांहीं दिवसांनीं शहाजीराजे कालवश झाले तेव्हां पांडोबा पुराणिक हताश झाले !! श्रीस्वामीमहाराजांवर त्यांची भक्ति असल्यानें ते नेहमीं त्यांच्या दर्शनासाठीं जात. एके दिवशीं ते दर्शनास आले असतां महाराजांच्या मनांत त्यांची आत्यंतिक निष्ठा पाहून त्यावर कृपा करण्याचें मनांत आलें. महाराज या पुराणिकास "लठ्या" या नांवानें हांका मारीत असत. एके दिवशीं

ते दर्शनास आले असतां महाराज त्यांस म्हणाले, " तुजला आम्ही लिंग दिलें आहे, जा. " या म्हणण्याचा पुराणिकांना कांहीएक अर्थ समजला नाहीं. मग अर्थबोध तो कसला ! पुढें शहाजीराजांचा मुलगा रीतसर गादीवर आल्यावर वडिलांचे दशदानांत कांहीं देणग्या संस्थानिक देतात त्या रिवाजास अनुसरून कारभारी चिंतोपंत टोळ यांनी नूतन महाराजांस वडिलांच्या ऋणांतून मुक्त व्हावें असा सल्ला दिला. त्याप्रमाणें राजेसाहेबांनीं मौजे शिरवळ येथील साडेचारशें रुपये आकाराची आपली शेरीजमीन पुराणिकांना वंशपरंपरेने इनाम करून दिली. सदर जमिनींत महादेवाचें स्थान होतें. तें पाहून पांडोबांना व त्यांच्या स्नेह्यांना महाराजांच्या बोलण्यांतील अर्थाचा बोध झाला.

श्रीमंत मालोजीराव भोसले—त्या वेळच्या अक्कलकोट राजांचे तीर्थरूप. यांची महाराजांच्या चरणीं अत्यंत उत्कट भक्ति होती. त्यांना पुत्रसंतान नव्हते. त्यांनी महाराजांस आपली इच्छा बोलून दाखविली. पण महाराजांनीं एकदां " बांगडी लाव " व दुसऱ्या खेपेस चुलीजवळ जाऊन " फुंकणी " घेऊन बसले. यावरून जवळच्या लोकांनीं " महाराजांना " कन्यारत्नें राजेसाहेबांस होतील असें सुचविलें. पुढें त्याप्रमाणें दोन कन्यका झाल्या. राणीसाहेब तिसऱ्या खेपेस गरोदर असतां राजेसाहेबांनीं व त्यांच्या आश्रितांनीं महाराजांना " काय होईल ? " असा प्रश्न केला. या वेळीं मात्र महाराजांनीं मांडीवर चापट मारून " लगाव सरबत्ती " तोफा सोडून आनंद करा असे उद्‌गार काढले. पुढें श्रीच्याकृपेने पुत्ररत्न झालें.

श्रींची स्वारी आपल्या आसनावरून केव्हां उठेल याचा नेम नसे. खासबागेंत श्रींची स्वारी एक दिवस पांचपन्नास लोकांसह मजेंत बसली होती. भर दोन प्रहरचें ऊन; तशा तळपत्या उन्हांत स्वारी एकदम उठली. " चला तुम्हांस मोठा मनुष्य दाखवितों. " जवळच्या लोकांना कांहीं समजलें नाहीं. महाराज वरीलप्रमाणें बोलून चालूहि लागले. लोक त्यांच्यामागें गेले. थोड्या वेळानें महाराज एका मोठ्या वारुळाजवळ उभे राहिले. तितक्यांत त्या वारुळांतून एक भला मोठा नाग बाहेर पडला. त्यानें महाराजांकडे पाहिलें व तो तसाच पुढें चालू लागला. महाराज त्यास पोंचविण्यास पांचपन्नास पावलें चालून गेले. पुढें कांहीं वेळाने ते लोकांना म्हणाले, " अरे, हा मोठा मनुष्य आहे बरें ! " लोकांना अत्यंत आश्चर्य वाटलें व त्यांनीं त्या नागास नमस्कार केला व महाराजांबरोबर ते सर्व पुनः खासबागेंत आले. श्रीविश्वासराव तथा अप्पासाहेब माने हे

मूळचे सातारा जिल्ह्यांतील रहिमतपूरचे रहिवाशी. अक्कलकोटच्या राजेसाहेबांचे ते मानकरी असल्यानें ते अक्कलकोटास येऊन राहिले होते. त्यांची कन्या जमनाबाई उपवर झाली. पण चांगलें स्थळ त्यांना मिळेना. कन्या अत्यंत रूपवान. आपल्या योग्यतेनुरूप व मुलीच्या रूपाप्रमाणें वर मिळावा अशी अप्पासाहेबांची साहजिकच इच्छा होती. ते नेहमीं राजेसाहेबांकडील नोकरी संपल्यावर श्रींच्या भेटीस येत. एकें दिवशीं श्रीस्वामीसमर्थ यांची मर्जी सुप्रसन्न असलेली पाहून त्यांनीं श्रींना विनंती केली कीं, "महाराज, मुलीस चांगलें स्थळ मिळत नाहीं. तेव्हां महाराजांनीं कृपा करावी." "अरे, काळजी करूं नकोस, आम्ही तिला "खंड्या" नेमला आहे." आप्पासाहेबास याचा अर्थबोध झाला नाहीं. पण जवळच्या माणसांनीं "महाराजांनीं योग्य माणसाची निवड केली असल्याचें त्यांनीं तसें सूचित केलें असावें." असें श्री. माने मानकरी यांना समजाऊन सांगितलें. कांहीं दिवस गेल्यावर बडोद्याचे मानकरी श्रीमंत खंडेराव महाराज यांना वधू पाहण्यासाठीं योगायोगानें अक्कलकोटास आले. तेथें त्यांना माने मानकरी यांची मुलगी अत्यंत रूपवान व कुलशीलसंपन्न असल्याची माहिती लागली. लगेच त्यानीं शोध करून लग्न ठरविलें! शेवटीं माने यांच्या मुलीचें खंडेराव महाराज, बडोदें, यांच्याशीं मोठ्या थाटानें लग्न झालें. तेव्हां महाराजांच्या भाषेचा लोकांना अर्थ कळला! असे अनेक गमतीदार प्रसंग अक्कलकोटास घडले. गुरुलीलामृतकार श्री. वामनबुवा ब्रह्मचारी यांनी आपल्या या ग्रंथांत अनेक प्रसंग दिले आहेत. महाराज फार पाल्हाळिक बोलत नसत. एरव्ही ते आपल्याशींच कांहींतरी गुणगुणत असत, व प्रसंगविशेषीं भजनहि करीत. "शिवहरशंकरनमामिशंकर शिवशंकर शंभो। हे गिरिजापते भवानीशंकर शिवशंकरशंभो ।। संतमहंता होता भेटी हर्षे नाचूं वाळवंटी" असेंहि रात्रीच्यावेळीं मोठ्यानें म्हणत. यावरून गीताकारांनी सूचित केल्याप्रमाणे "या निशा सर्व भूतानां यस्याम् जागृति संयमि" अशी वृत्ति असल्यानें ते रात्रीं झोंपेचें सोंग करीत असें विनोदानें म्हणतां येईल. ज्या महात्म्यास सर्व जगाची काळजी असते तो क्वचितच झोंप घेतो. परमेश्वर सदा सर्वदा जागा आहे. एरव्ही त्यास "स्मर्तृगामी" असे संतांनीं म्हटलें नसतें. श्रीगुरुदेवदत्तात्रेयांनीं आपल्या मातेस "माझें स्मरण केल्याबरोबर मी येईन" असें आश्वासन दिल्याचें श्रीगुरुचरित्रांतील अध्याय पांचवा यांत वाचावयास मिळेल. श्रीकृष्ण द्रौपदीचा धांवा ऐकून तिच्या साहाय्यार्थ धांवला. गजेंद्र महान संकटांत सापडला

तेव्हां भगवान श्रीविष्णूनें त्याची नक्राच्या तावडींतून सुटका केल्याचें भागवत-कारांनीं नमूद केलें आहे. अशा लीला पुराणांतरीं महान ऋषींनी लिहून ठेविल्या आहेत त्या खोट्या आहेत असें म्हणणें अत्यंत पाप होय असें आम्हास वाटतें. श्रीगुरुदेवांवर ज्यांचा विश्वास नसेल अशांनीं पुराणांतील या गोष्टी खोट्या व दिशाभूल करण्याच्या आहेत असें खुशाल म्हणावें. श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं आपल्या उपास्यदैवतेसंबंधीं अनेकविध अनुभव दिले आहेत. ते खोटे म्हणण्यास आमची जिव्हा धजत नाहीं. नामदेवांनीं श्रीविठ्ठलाची करुणा भाकिली तेव्हां मृत गाय उठविण्यास श्रीपांडुरंग प्रत्यक्ष धांवून आले असें स्वतः नामदेवमहाराज आपल्या अभंगांत म्हणतात. तेव्हां साधकांनीं शंकाकुशंका न घेतां ‘ त्वमेवशरणम्-मम ’ या पवित्र भावनेने श्रीसद्गुरुना अनन्यभावानें शरण जावें कारण समर्थ म्हणतात “ साधक भावे नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली । सुगम-पंथें नेऊन घाली । जेथील तेथें ॥ ” तेव्हां पुढे काय, याचा विचार साधकांनीं करूं नये. या ठिकाणीं एका गोष्टीचा विचार होणें अत्यावश्यक आहे. अवतारी पुरुषांचा देह संकल्पात्मक असतो. कांहीं कार्य पडल्यास परमेश्वर त्यांना आज्ञा करतो त्या अन्वयें असे अंशावतारी पुरुष कोणत्याहि स्वरूपांत व कोठेंहि व केव्हांहि प्रगट होतात. त्यांना पाश्चिमात्य संतवाङ्मयकार “ मल्टिपल पर्सनॅलिटीज ” म्हणतात. सबब सर्व कर्तृत्व अशा असामान्य विभूतींच्या ठिकाणीं असतें. असो आजचा इतिहासहि असेंच सांगतो. तेव्हां साधकानें अशा विशिष्ट आविष्करणाचें आस्तिक बुद्धि ठेवून चिंतन व मनन करून इतरांना आलेला अनुभव पडताळून पाहावा हेंच योग्य होईल. “ जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो स्वयेंचि कष्टत गेला । तोचि भला ॥ ” या समर्थोक्तिप्रमाणें आपणच कष्ट करून खात्री करून घ्यावी म्हणजे बरें. समर्थ म्हणतात, “ परीक्षे-वीण घेतलें नाणें । तें सत्य किंवा खोटे ” हें पारखूनच घेतल्यास फसण्याची भीति नाहीं. हाच न्याय आपल्या बुद्धीसामर्थ्यास लावून कौल घ्यावा. अवतारी पुरुष केवळ लोकांवर उपकार करण्यासाठींच भूतलावर अवतीर्ण होतात हें श्रींच्या चरित्रावरून भक्ताच्या ध्यानीं आल्यास पुष्कळच गोष्टींचा उलगडा होईल.

● ● ●

अध्याय बारावा

# महाराजांकडे आलेल्या विभूति

मागील एका प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें श्रीस्वामीमहाराज अक्कलकोटला आल्यानंतरच त्यांची माहिती इतरांना झाली. आसेतु हिमाचल महाराजांनीं अनेक ठिकाणीं संचार करून भारतांतील बहुतेक सर्व मोठीं तीर्थें, क्षेत्रें व शहरें पावन केल्याचें त्यांच्या इतिवृत्तावरून दिसतें. श्रीगुरुलीलामृतकर्ते श्रीवामनबुवा ब्रह्मचारी यांनीं अत्यंत साक्षेपानें महाराजांची स्वारी कुठें कुठें गेली होती व कुणाला भेटी दिल्या यासंबंधीची हकीकत दिली असल्यानें महाराजांनीं भारत-भ्रमंतीनें लोकोद्धाराचें कार्य कसें केलें हें कळून येण्यास सुलभ झालें आहे. महाराजांनीं आपल्या प्रवासांत ठिकठिकाणच्या साधकांना उपदेश करून व अनुग्रह देऊन त्यांना कृतार्थ केलें. निरनिराळ्या ठिकाणीं त्यांनीं निरनिराळीं नांवें धारण केलीं तीं कां केलीं यासंबंधानें चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं. असें करण्यांत त्यांचा कांहींएक विशिष्ट हेतूच होता हें दिसून येतें. ज्या ज्या साधकाची जसजशी उपासना व निष्ठा होती त्या सर्वांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें अनुग्रह दिला व त्याप्रमाणें त्यांना अनुभवहि आल्याचें त्यांच्या चरित्रावरून दिसतें. या सर्वांची जंत्री कोणत्याहि चरित्रांत सांपडणार नाहीं. चरित्रकार झाले तरी त्यांची कक्षा मर्यादितच असते. जी सामुग्री हातीं येईल तिची छाननी करूनच चरित्रकार लिहिणार तेव्हां सर्व माहिती उपलब्ध होईल अशी आशा करूं नये हें चांगलें. महाराजांच्या चरित्रकारांना जेवढी साधनसामुग्री उपलब्ध झाली—मग ती ऐकीव असो सांगीव असो त्या माहितीचा त्यांनीं जो उपयोग करून जीं चरित्रें लिहिलीं त्यावरून साधकांनीं जो बोध घ्यावयाचा तो घेतला तरी त्यांचें कार्य होईल. या दृष्टीनें जे साधुसंत, योगी, जपी, तपी, संन्यासी, सिद्ध,

जे जे त्यांच्या दर्शनार्थ आले त्यांना महाराजांनीं कृतार्थ केलें असें अनेक चरित्रलेखकांनीं म्हटलें आहे. शिवाय महाराज श्रीदत्तात्रेयांचेच अवतार होत अशीहि त्या लोकांनीं (अनुग्रहीत) ग्वाही दिली असल्यानें संशय घेण्यास जागा नाहीं. आळंदीचे सुप्रसिद्ध योगीराज श्रीनरसिंहसरस्वती, यशवंतमहाराज, श्रीसीताराममहाराज, श्रीकृष्णसरस्वतीमहाराज, श्रीअवधूतस्वामीमहाराजांचे गुरु, श्रीबाळकृष्ण महाराज, माटेबुवा, गवेस्वामी, बोटेस्वामी, बिडकरमहाराज, महर्षि अण्णासाहेब, ब्रह्मचारी विष्णुबुवा गोखले, देव मामलेदार, ब्रह्मनिष्ठ वामनबुवा वगैरे महान् व्यक्तींनीं महाराज हे दत्तावतारीच होते असें अनुभवांतीं आपलें मत दिलें आहे. ब्रह्मचारी विष्णुबुवा हे कट्टर सनातनी होते. ते स्पष्टवक्ते असल्याचें सर्वश्रुत आहे. वेदान्त विषयांत त्या वेळीं त्यांचा हात धरणारा कोणीहि विद्वान नव्हता. पाद्र्यांचें बंड त्या वेळी मुंबईत फार होतें. ते फार माजले होते. हिंदु देवतांची मनसोक्त निंदा करीत त्यामुळें लोकांना त्यांच्याबद्दल अत्यंत तिरस्कार वाटत असे. परंतु त्यांचा समाचार घेण्यायोग्य पुरुष नसल्यामुळें ख्रिस्ती धर्मोपदेशक वाटेल तसे बडकत. हिंदूंच्या पुराणांची नालस्ती करून जगांत ख्रिस्ती धर्मच श्रेष्ठ असें सांगून ते लोकांची दिशाभूल करीत. या लोकांची खोडकी मोडण्याचें ठरवून ब्रह्मचारी विष्णुबुवांनीं मिशनऱ्यांशीं वादविवाद करून त्यांची फटफजिती केली. विष्णुबुवा यांचें त्रोटक चरित्र कै. प्रो. माटे यांनी लिहिलें आहे त्यावरून विष्णुबुवा नुसतेच वेदान्तीच नव्हते ते राष्ट्रीय वृत्तीचे वीर होते. महाराज ज्या वेळीं अक्कलकोटास होते त्या वेळीं हे विष्णुबुवा मुंबईस व्याख्यानांच्या द्वारें वेदांतील दुर्गम स्थळें लोकांना समजावून सांगून त्यांना वेदान्ताची महती समजावून सांगण्यांत निष्णात होते. ते उत्तम वक्ते असल्याची ख्याति अक्कलकोटच्या राजेसाहेबास समजल्यामुळें त्यांनीं बुवांना पाचारण करून अक्कलकोटास आणविलें. राजवाड्यांत नित्य त्यांचीं वेदान्त विषयावर विद्वत्ताप्रचूर भाषणें होत. वेदान्ताच्या अभ्यासामुळें त्यांना आपण अध्यात्मविद्येंत पूर्ण आहों अशी थोडी ‘ग’ची बाधा झाली. ज्ञानाच्या घमेंडीमुळें ते इतरांस तुच्छ लेखत. मुंबईस असतांना बुवानीं अक्कलकोट महाराजांची कीर्ति ऐकिली होती. त्यांना भेटण्याची ही संधि आयती आल्यामुळें राजवाड्यांतील प्रवचनें झाल्यावर विष्णुबुवा महाराजांना भेटावयास येत. बुवांच्या बरोबर एक पारशी गृहस्थहि राजेसाहेबांचा पाहुणा म्हणून आला होता. तोहि

बुवांच्या समवेत महाराजांना भेटावयास येई. उभयतां राजवाड्यांत राहात. विष्णुबुवांना आपल्या ज्ञानाची घमेंड असल्यानें ते महाराजांबरोबर वेदान्तांतील चर्चा करून "ब्रह्मपद व तदाकारवृत्ति म्हणजे काय?" अशी पृच्छा बुवांनी महाराजांना केली. महाराज त्यांची चर्चा व इतर बडबड शांतपणें ऐकून घेत. उत्तर देत नसत. फक्त हंसून गंमत करीत. खो खो हंसण्याचा क्रम दोन चार दिवस चालला. तेव्हां बुवांना वाटलें कीं श्रीस्वामीमहाराज हे नुसते "बुवा" आहेत. वेडेलोक उगीच त्यांच्या नादीं लागल्यामुळें महिमा वाढला अशीच त्यांची समजूत झाली!! बुवाहि बाहेर लोकांशीं बोलतांना महाराजांच्यावरहि आपली जीभ सैल सोडीत!!

नित्यक्रम झाल्यावर विष्णुबुवा व त्यांच्या बरोबरचे पार्शी गृहस्थ एके दिवशीं महाराजांच्या दर्शनार्थ गेले. नेहमींप्रमाणें बडबड करून बुवा परत बिऱ्हाडीं गेले. त्याच रात्रीं बुवांना एक गमतीदार स्वप्न पडलें. स्वप्नांत अंगावर शेंकडों विंचू चढले व एकानें तर त्यांना दंश केल्याचा भास झाला. बुवांची त्रेधा उडाली, वाचा बसली आणि जोराने "मेलों; मेलों" असे बडबडले. तेव्हां त्यांच्या शेजारींच झोपलेले पारशी गृहस्थ जागे झाले. त्यांनीं बुवाना काय झालें म्हणून विचारलें! बुवा शुद्धीवर आल्यानें त्यांनीं त्या गृहस्थास वरीलस्वप्न सांगितलें. बुवांची स्थिति पाहण्यासारखी झाली होती. अंगांतील सदरा भीतीनें गाळण उडाल्यामुळें भिजून चिंब झाला होता!! मनांत अशी शंका आली, आपण महाराजांस नांवें ठेविलीं त्याचें तर हें प्रायश्चित्त नाहीं ना! पारशी गृहस्थानें त्यांना स्वप्नामुळें इतकें भिण्याचें कारण नाहीं, जाग्रतावस्थेंत विंचू कोठें आहे व एक तरी दिसतो काय पाहा असें म्हणून त्यांना धीर दिला. पुढे नित्याप्रमाणें प्रवचन झाल्यावर उभयतां महाराजांच्या भेटीसाठीं गेले. रात्रीची गोष्ट विसरून गेले होते. बुवांनीं पुनः परब्रह्मपद व तदाकारवृत्ती यासंबंधानें प्रश्न विचारून वेदांतील कांहीं ऋचांचे अर्थहि सांगण्याबद्दल त्यांनी महाराजांच्या जवळ आग्रह धरला. महाराज एकदम उत्तरले, "हात गाढवा! स्वप्नांत हजारों इंगळ्या अंगावर चढल्या म्हणून तूं घाबरतोस! स्वप्नांत इंगळी चावली तर बोंबा मारीत उठतोस! आणि गोष्टी तर वेदान्ताच्या सांगतोस!! सबब तूं केवळ पढतमूर्खच आहेस. तदाकारवृत्ति होणें का वाटेवर पडली आहे काय? पुष्कळ वाचाळपणा करून ब्रह्मपदाच्या वल्गना करून, कोट्यावर कोट्या करून वेदान्ताची भाषा

बोलूं लागलास म्हणजे तूं का स्वतःला योगी समजतोस ? चालता हो येथून." बुवा मनांत खजिल झाले, आपल्या बिऱ्हाडी परत हिरमुसलें होऊन गेले ! घरीं आल्यावर अतोनात पश्चात्ताप होऊन परत महाराजांकडे गेले. महाराजांच्या अंतर साक्षित्वाची खात्री पटल्यानें बुवांनीं महाराजांना साष्टांग नमस्कार घालून क्षमेची याचना केली. महाराजांनीं त्यांस त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्यांच्यावर पूर्ण कृपाकरून योगमार्गाची दीक्षा देऊन अधिकारी केलें.

मुंबईस ठाकूरदास तथा कृष्णदासबुवा नांवाचें एक स्वामीभक्त होऊन गेले. लहानपणापासून त्यांची वृत्ति देवादिकाकडे होती. दत्तभक्तीचा त्यांनीं ध्यास घेतला. हे बुवा कीर्तन फार उत्तम करीत असत. पुढें प्रारब्धयोगेंकरून या ठाकूरदासबुवांच्या अंगावर कोड उत्पन्न झालें, या प्रकारामुळें त्यांस अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं पुष्कळ उपाय केले पण त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. चित्तउदास होऊन देह काशीस विसर्जन करण्यापूर्वीं एकदां श्रीगाणगापुरास श्रीदत्त-रांयाचें दर्शन घेऊन श्रीपादुकांस कस्तुरी लावावी हें मनांत आणून बुवा गाणगापुरास गेले. तेथें त्यांना अक्कलकोटास जाऊन दर्शन घे, दर्शन होतांच मुक्त होशील असा दृष्टान्त झाला. दृष्टान्त झाल्यामुळें बुवांस साहजिकच अतिशय आनंद झाला. स्नानादि सर्व आटोपून व प्रसाद घेऊन स्वारी पादुकांचें दर्शन घेऊन तेथून निघाली व थेट अक्कलकोटास येऊन दाखल झाली. अक्कलकोटास आल्यावर त्यांनीं श्रीस्वामींचा तपास केला. महाराज एका वेश्येच्या घरीं असल्याचें कळलें. तेव्हां हे बुवा लगबगीनें तेथें गेले. त्यांनी स्वामीमहाराजांत लोटांगण घातले व हात जोडून उभे राहिले. श्रीस्वामींनीं त्यांस लगेच " हमारी कस्तुरी अबीके अबी लाव " अशी आज्ञा केली. बुवा गाणगापुरास गेलें असतांना त्यांनीं श्रीपादुकांस कस्तुरी लावण्याचें योजिलें होतें. पण ही गोष्ट ते अजिबात विसरून गेले !! महाराजांनीं त्यांना बरोबर आठवण दिली. दृष्टान्ताचा पडताळा आल्याची खात्री होऊन ते परत बिऱ्हाडीं गेले. कस्तुरीची पुडी घेऊन महाराजांची भेट घेऊन त्यांच्या पुढें ती ठेविली. महाराजांनी सदर कस्तुरी तेथें मुलें जमलीं होती त्यांस वांटून टाकली ! ठाकूरदासबुवा कांहीं काल तेथेंच सेवेस राहिले. एके दिवशीं धुनींतलें एक जळकें लाकूड महाराजांनीं बुवाच्या अंगावर टाकलें. सेवेकऱ्यांनीं कार्य झालें, लांकूड उगाळून लावा म्हणजे रोग जाईल असें सुचविलें ! काष्ठाचें गंध व त्यांत श्रीगाणगापूरचें भस्म असें मिश्रण करून महाराजांच्या आज्ञेप्रमाणें लावण्यास

सुरवात केली. पुढें श्वेतकुष्ठ श्रीकृपेनें नाहींसें झालें !! महाराजांची आज्ञा घेऊन ते परत मुंबईस गेले व कांहीं दिवसांनीं महाराजांचा मंत्रोपदेश घेण्यासाठीं परत अक्कलकोटास आले. महाराजांनीं त्यांचा मनोदय जाणून त्यांस " आम्ही पंतोजीपणा करीत नाहीं. गाटके गुरु बाटके चेले हम करते नाहीं " असें हिंदीतून उत्तर दिलें. मुम्बईस बुवा यानंतर गेले. कांहीं दिवसांनीं ' श्रीरघुनाथ मंदिरापाशीं ' हमकूं नाचनेकू जगा रखो ' अशी त्यांस आज्ञा झाली त्याप्रमाणें बुवांनीं श्रीहनुमंताचें देवालय उभें केलें. बुवांनाहि महाराजांनीं कृपार्थ करून त्यांस ब्रह्मपदाचा अधिकारी केलें.

सुप्रसिद्ध क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनीं अक्कलकोटास जाऊन श्रींची भेट घेतल्याचें त्यांच्या चरित्रावरून दिसतें. श्री. फडके हे महान दत्तभक्त होते. पुण्यास त्यांनीं नरसोबाच्या देवालयांत अश्वत्थ वृक्षास प्रदक्षणा घालून श्रीदत्तमाला स्तोत्राचीं पुष्कळच पारायणें केलीं. श्रींची सेवा अति उत्तम प्रकारें करीत असतां त्यांचें लक्ष हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याकडे वेधले. देश स्वतंत्र व्हावा यासाठीं ते मनोभावानें देवाचा धांवा करीत. आपल्या कार्याच्या मागें परमेश्वरी अधिष्ठान असल्या शिवाय कोणत्याहि चळवळीस यश येणार नाहीं असें त्यांचें ठाम मत असल्यानें त्यांनीं बेलापूरचे स्वामी श्रीविद्यानंद याची भेट घेतली. पण त्यांनीं त्यांस अक्कलकोटमहाराजांची भेट घेण्यास सांगितलें. त्याबरोबर आतां कांहीं उपयोग होणार नाहीं असेंहि बजावलें. श्री. फडके यांच्या मनांत आपण दिलेली तलवार महाराजांनीं स्पर्श करून दिल्यास यश येईल असें वाटून ती त्यांच्यापुढें ठेवली तेव्हां त्यांनीं वरीलप्रमाणें उत्तर दिलें. विद्यानंदस्वामी-महाराजांनी त्यांना " परमेश्वरास हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याची काळजी आहे. तो वेळेवर सर्व कांहीं करील असाहि उपदेश केला, पण फडके यांची समजूत न पटल्यामुळे ते तेथून अक्कलकोटास महाराजांच्या दर्शनासाठीं गेले. महाराजांचे दर्शन घेऊन त्यांची मनोमय प्रार्थना करून आणलेली तलवार महाराजांच्या पुढें ठेविली. महाराजांनी सदर तलवार सेवेकऱ्याच्या हातून जवळच्या झाडावर फेकून देवविली. फडके यांच्या मनांतून वरदी हाताने तलवार मिळावें असें फार होतें. महाराज म्हणाले, " आम्हास काळजी आहे. आतां वेळ निघून गेली आहे. कांहीं कराल तर गोत्यांत याल " असें निक्षून सांगितलें. फडके निराश

होऊन तेथून निघून गेले. पुढें त्यांचा शेवट कसा झाला हें सर्वांनाच विदित आहे. अट्टाहासानें कांहीं करूं नये असा महाराजांचा आग्रह होता, परंतु ते महाराजांचे अत्यंत भक्त असल्यानें महाराज या कार्यांत आपल्यास यश देतील असें त्यांना वाटल्यामुळें त्यांनीं आपलाच हेका चालविला. असें म्हटलें पाहिजे. त्रिकालज्ञ महामनी श्रीस्वामीमहाराज त्यांस भलतेंच कसें करूं देतील. शेवटीं भवितव्यता बलीयसी ठरली. महाराजांच्या मनांत त्यांना परावृत्त करण्याचें सामर्थ्य होतें परंतु त्यांची भावना दृढ दिसून आली नाहीं म्हणूनच त्यांचा शेवट शोकपर्यवसायी झाला ! ही गोष्ट साधकांनीं ध्यानीं घेणें जरूर आहे. श्री. फडके मात्र दत्तभक्त असामान्य होते हें त्यांच्या चरित्रावरून सहज दिसून येईल. त्या दृष्टीनें त्यांच्या चरित्राचें अवलोकन साधकांनीं अवश्यमेव करावें.

बडोद्यास एक अलवणीबुवा नांवाचें अत्यंत विरक्त, विद्वान व तपस्वी गृहस्थ होते. ते कोणाची उपाधि होऊं नये म्हणून बालोन्मत पिशाचवृत्तीनें राहत असत. ते एकदां चारी धामाच्या यात्रा करण्याच्या उद्देशानें जगन्नाथपुरीच्या बाजूस फिरत फिरत गेले. तेथें बुवांची प्रकृति बिघडली. त्यांच्याबरोबर जे त्यांचे सहकारी होते त्यांच्याहि प्रकृतींत बिघाड झाला. त्यामुळें रसोई सिद्ध करण्यासाठीं शिधासामुग्री आणण्याची पंचाईत पडूं लागली. बुवा महाराज अक्कलकोट यांचे परमभक्त होते. त्यांनी महाराजांची अत्यंत मनोभावानें करुणा भाकिली. बुवांची स्थिति लक्षांत घेऊन श्रीनृसिंहतीर्थ या नांवानें महाराजांची स्वारी त्यांच्या बिऱ्हाडीं कमरेवर दोन्ही हात ठेवून त्यांच्यापुढें उभी राहिली ! बुवा हें पाहून गडबडीनें एकदम उभे राहिले. महाराजांस साष्टांगनमस्कार घालून त्यांनीं गीर्वाण भाषेंत महाराजांची स्तुति केली. महाराजांनीं त्यांची आजारांतून मुक्तता करून सर्वांना आरोग्यसंपन्न केलें; बुवांची व वामनबुवा वैद्य यांची पुढें बडोद्यास भेट झाल्यावर त्यांनीं ही वरील सर्व हकीकत सांगितली. वामनबुवांनी आपल्या "श्रीसद्गुरुलीलामृतां"त या गोष्टीची हकीकत देऊन वाचकांवर उपकारच केला. यामुळें तरी साधकांची मनोवृत्ति निवळून महाराज म्हणजे "श्रीनरसिंहसरस्वती"च होत एवढें पटेल अशी खात्री आहे. बुवांनीं वामनबुवा ब्रह्मचारी यांस पुढील हकीकत सांगितली. महाराजांना उद्देशून बुवांनीं पुढील उद्गार काढले. ते म्हणाले, "हे ब्रह्मन्, आपण साक्षात् अवतारी असून अंतरसाक्षी आहां. पुराणांतरीं आपल्यास भक्तकामकल्पतरु असें म्हणतात तें सर्वथैव सत्य आहे. महाराज आपलें

...३३६८५... वि: चरित्र
...१०६५८... नों० दि: २८७५५


वास्तव्य दक्षिणेंत आहे असें ऐकितों तेव्हां तें कोणत्या ठिकाणीं, अशी पृच्छा म्यां केली. तेव्हां श्रीमहाराज म्हणाले, बाबारे ! सर्व स्थानें आमचींच आहेत. त्यांत मातापूर, गिरनार, कोल्हापूर, गाणगापूर, औदुंबर-वाडी, आदि स्थानें विशेष होत. त्या गाणगापुरांत आम्ही फिरत फिरत संचार करतों असें म्हणून महाराज एकदम अदृश्य झाले. पुढें एकदम आम्हा भुकेलेल्या लोकांपुढें पंचपक्वान्नाचीं ताटें एकदम आलीं. बुवांनी शिष्यांसहित तो अमृततुल्य सिद्ध-अन्नाचा प्रसाद भक्षण केला हें सांगण्यास नलगे. प्रसाद पोटांत गेल्यावर भुके-बरोबर सर्वांची प्रकृतीहि सुधारली. त्यासमयीं श्रीनृसिंहसरस्वतींनीं कांहीं जपीतपी संन्यासी भेट घेण्यासाठीं तेथें उपस्थित होते त्यांनाहि त्यांनीं दर्शन देऊन धन्य केलें. अलवणीबुवांनीं आपल्यास प्रत्यय आल्याचें ब्रह्मनिष्ठ वामनबुवा यांना समक्ष सांगितलें असल्यानें संशयास कांहींच जागा रहात नाहीं. अलवणी बुवा पुढें यात्रा करून कांहीं दिवसांनीं बडोद्यास परत आले. तेव्हां वामनबुवांनी त्यांची भेट घेतली होती. ही ऐतिहासिक घटना घडून आली. बुवांना श्रीवामनबुवांना " श्रीदत्तअवधूत श्री. नृसिंहसरस्वती अक्कलकोट मै बैठे है । असें मोठ्या प्रेमानें सांगितलें. कंठ सद्गदित होऊन बुवांना पुढें बोलतां येईना अशी त्यांची स्थिति झाली असें वामनबुवांनी नमूद केलें आहे. श्रीस्वामी महाराजांनीं आपल्या परि-भ्रमणांत या बुवावर अनुग्रह करून त्यांना योग्य मार्गास लावल्याचें गुरुलीलामृता-वरून दिसून येतें, असें ब्रह्मनिष्ठबुवा समर्थांच्या सेवेंत कांहीं काल होते.

सातारा जिल्ह्यांतील एकनाथबुवा तांदुळवाडीकरनांवाचे एकभगवद्भक्त होते. ते उत्तम भजन करीत. ते पंढपूरचे वारकरी होते. अत्यंत नेमनिष्ट असल्यानें त्यांनी पंढरीची यात्रा चुकविली नाहीं. हे बुवा अत्यंत प्रेमळ व सत्त्वशील असल्यानें पंढरीरायांनी त्यास दोनदां दर्शन देऊन धन्य केलें होतें त्यामुळें ते कृतार्थ झाल्यानें समाधानी होते. त्यांनी अक्कलकोटच्या नागरिकांकडून श्रीस्वामीमहाराजांची कीर्ति पुष्कळ ऐकिली होती. अशा सत्पुरुषांची आपण भेट घेऊन तेथें त्यांच्यापुढे भजन करावें अशी मनांत योजना करून ते अक्कलकोटास गेले. तेथें श्री. गणपतराव जोशी यांच्या घरीं नानाबुवा उतरले होते. महाराजांची चौकशी करतां ते चोळाप्पाच्या घरीं असल्याचें कळलें. लगेच नानाबुवा त्यांच्या दर्शनार्थ गेले. महाराजांची ती दिव्य व तेजोमय मूर्ति पाहून त्यांना अत्यंत हर्ष झाला. अजानाबाहू व दिव्य

कांति पाहून अष्ट सात्त्विकभाव उदित होऊन नानाबुवांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले. महाराजांचें दर्शन घेऊन ते परत आपल्या बिऱ्हाडीं दाखल झाले. अक्कलकोटास त्यांनीं एक आठवडा मुक्काम केला होता. महाराजांच्यापुढें आपलें भजन व्हावें असा हेतु होता. तो अचानकपणें सफल झाला. एके दिवशीं महाराजांची स्वारी अचानकपणें गणपतरावांच्या घरीं आली. त्यांना पाहून नानाबुवांनीं लगेच मृदंग वीणा वगैरे आणून भजनास प्रारंभ केला. बुवा अत्यंत प्रेमळ व भक्तिमान व महाराज त्यांच्यासमोर तेव्हां त्यांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला, भजन अत्यंत रंगले. भजन ऐन रंगांत आले असतां बुवा एकदम तटस्थ होऊन समाधिअवस्थेंत गेले. दोन्ही डोळ्यांतून प्रेमाश्रूंचा प्रपात येत होता. बुवांचें देहभान उडून गेलें ! देहभान हरपलें. अशा स्थितींत त्यांची तंद्री लागून एकदीड घटका राहिले. पुढें समाधि उतरून बुवा देहभानावर आलें. त्यांनीं महाराजांची यथासांग आरती वगैरे करून " आपण धन्य झालों " असें म्हणून बसले. पुढें श्री. गणपतराव जोशी यांनीं बुवांना तटस्थ कां राहिला वगैरेसंबंधानें विचारलें. तेव्हां त्यांनीं महाराजांनीं आपल्यास विठ्ठलाच्या रूपांत दर्शन देऊन धन्य केलें त्यामुळें देहभान विसरून गेल्यामुळें तटस्थ राहिलो असें त्यांनीं उत्तर दिलें. महाराजांची तेजःपुंज व मनमोहन करणारी देहयष्टि पाहून समाधि लागली असेंहि त्यांनीं सांगितलें. ज्याची जशी योग्यता असते त्याप्रमाणें महाराज साधकावर कृपा करून कृतार्थ करतात हेंच खरें.

पुण्यांत माटेबुवा नांवाचें एक प्रख्यात वेदान्ती होते. ते अत्यंत स्वामिभक्त होते. " ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैवभजाम्यहं " या वचनाप्रमाणें महाराजांनीं त्यांची भक्ति जाणून त्यांच्यावर कृपा केली होती. माटेबुवा हे चांगले पुराणिक होते. बुवा महाराजांना भेटण्यासाठीं अक्कलकोटास गेले होते. तेथें त्यांनीं भागवताचा सप्ताह केला. सातहि दिवस श्रींची स्वारी पुराणश्रवणास बसली होती. महाराज असे क्वचितच बसत परंतु माटेबुवांची रसाळवाणी ऐकून महाराजांनाहि त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटला. भक्तिमार्गाचें अचरण करणारा निगर्वी असावा असा संकेत आहे. या रूढ संकेतानुरुप माटे बुवांचें आचरण असल्यानें महाराजांनीं त्यांच्यावर अनुग्रह केला. एके दिवशीं माटेबुवांच्या कीर्तनसमयीं श्रींची स्वारी तयार केलेल्या उंच सिंहासनावर आरूढ झाली होती. निरूपण करतांना माटेबुवा म्हणाले, " या भवसागरांतून कोणते चरण आम्हांस पार

९२८५५

पाडतील ? " त्यांच्या तोंडांतून हें वाक्य निघतांच महाराजांनीं आपला एक पाय खालीं सोडला. सव्यपाद खालीं आलेला पाहून भाटे बुवा सद्‌गदित झाले व तो पाय हृदयाशीं घट्ट धरून त्यावर प्रेमाश्रूंनीं अभिषेक केला. तितक्यांत महाराजांनीं दुसरा पाय खालीं सोडला. बुवा काय समजावयाचें तें समजले. महाराजांचे भक्तच त्यांचें मनोगत जाणत.

याच्या उलट एक प्रसंग घडला त्याचे वाचकांनीं मनन करणें योग्य होईल. तडवळकर आबाजी बुवा नांवाचे एक रामदासी सोलापूर भागांत नांवाजलेले होते. अंगांत विद्वत्तेची घमेंड व गुर्मी होती. मन शुद्ध नसल्यानें वाटेल त्या मनुष्यावर ते तोंडसुख घेत असत. हे रामदासी बुवा अक्कलकोटास महाराजांचें दर्शन घेण्याच्या इराद्यानें गेले. महाराजांच्या मनांत कोणास दर्शन द्यावयाचें नसलें म्हणजे ते झोंपेचें सोंग करीत. किंवा ' चल हट ' असें एकदम ओरडून सांगत. अगर बसल्या जागेवरून ते कुठें तरी निघून जात. एके दिवशीं आबाजी बुवा सायंकाळच्या सुमारास महाराजांच्या दर्शनार्थ गेले. महाराज निद्रिस्त असल्यानें बुवांना दर्शन झालें नाहीं. बराच वेळ बसले व शेवटीं कंटाळून निघून गेले. सेवेकऱ्यांनीं ' तुम्हांस दर्शन देण्याचें श्रींचें मनांत नाहीं ' असें सांगितलें पण बुवा अहंमन्य असल्यानें हट्टास पेटले. दर्शन घेतल्याशिवाय यापुढें जाणार नाहीं असें म्हणून एके दिवशीं ते महाराजांच्या जवळच बसून राहिले. झोंपेचें सोंग घेतलें असल्यानें महाराजांनीं बुवाकडे पाहिलें नाहीं. कंटाळून हे रामदासीबुवा परत आपल्या बिऱ्हाडीं गेले ! एके दिवशीं महाराज एका उकिरड्यावरच प्रातःकाळीं जाऊन बसल्यामुळें बुवाहि त्यांना समजल्यावरून तिकडे गेले. लगबग करून ते थेट तसेच गेलें व तेथें त्यांनीं महाराजांचें दर्शन घेतलें. त्याबरोबर महाराजांनीं जवळ असलेल्या सेवेकऱ्यांस " दोन घागरी पाणी " आणण्यास सांगितलें. सेवेकऱ्यांनीं पाणी आणल्यावर त्या बुवापुढें पालथ्या घाला अशी आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या कृतीनें " उपड्या घड्यावर पाणी " असें सुचविलें. महाराज त्यास म्हणाले " बाबारे ! व्यर्थ भाराभर केलें पाठांतर । जोंवरीं अंतर शुद्ध नाहीं ॥ तेव्हां व्यर्थ खटाटोप कां करतोस ? मनाची एकाग्रता होऊन परमेश्वरस्वरूपीं ध्यान लागलें नाहीं व जोंवर आपण दुसऱ्याचा उपहास करून स्वतः कोरडा पाषाण राहतो त्यास कांहीं प्राप्त व्हावयाचें नाहीं. तेव्हां केलेलें सर्व वाक्‌पांडित्य पालथ्या घड्यावरील पाण्याप्रमाणें आहे. "

असें महाराजांनीं त्यास सुनावलें. याशिवाय त्या रामदासीबुवांच्या अंतरंगांतील कांहीं गुह्यगोष्टी श्रींनीं त्यांस सुनावल्या. बुवा सूज्ञच होते. त्यांना आपल्या कृतीचा पश्चात्ताप झाला व त्यांनीं महाराजांची क्षमा मागून सेवेसाठीं कांहीं दिवस राहण्याची परवानगी द्या अशी करुणा भाकिली. महाराजांनींहि त्याची परीक्षा पाहून त्यांना सेवेसाठीं राहण्यास सांगितले. बुवा १५ दिवस महाराजांच्या सन्निध राहिले. खराखुरा पश्चात्ताप झाल्याचें पाहून महाराजांनीं त्याजवर कृपा-कटाक्ष फेकून कृतार्थ केलें. बुवांना महाराजांनीं आपल्या खडावाचा प्रसाद दिला. पूजाअर्चा करून बुवाहि पुढे मोठे अधिकारी झाले. समर्थ लीला अगाध आहे. साधक या गोष्टीचें तात्पर्य लक्षांत घेतीलच.

● ● ●

अध्याय तेरावा

## महाराजांच्याकडे आलेल्या विभूति ( पुढें चालू )

पुणें येथील श्रीरामानंद बिडकरमहाराज हे स्वामीभक्त कसे झाले याबद्दल त्यांचें शिष्य श्री. ल. ग. बापट यांनी त्यांचें सविस्तर चरित्र लिहिलें आहे. त्यावरून बिडकरांची वृत्ति कशी होती व ती कशी पालटली यासंबंधीचें विवेचन त्या ग्रंथांत कै. बापट यांनीं चांगल्या प्रकारें रेखाटलें असल्यानें तो भाग येथें देण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. भगवद्गीतेंतील एक श्लोक येथें आठवतो– "अपिचेत्सुदुराचारो भजते मामन्यभाक्। साधुरेव समन्तव्यः सम्यगव्यवसितो हि सः ॥" (९–३०) या श्लोकावर कै. गुरुदेव **रामभाऊ रानडे** यांची टीका अत्यंत सुविचारपरिप्लुत अशी आहे. परमेश्वर कोणत्या भक्तांना आपल्या-जवळ करतो यासंबंधीचें विवेचन त्यांनी लिहिलेल्या 'दि भगवद्गीता–फिलॉसोफी ऑफ गॉड रियलायझेशन" या इंग्रजी पुस्तकांत केलें आहे–ही विचारसंपन्न टीका निराश झालेल्या साधकांना मार्गदर्शक होईल म्हणून ती पुढें दिली आहे. "घर बनाया, तैयार यह जब घर हुआ। मौतका डंका बजा, बेहद दिलमें डर हुआ॥" यावरील भाष्य "In that way an unprecedented terror takes hold of the heart of a man when he reaches at the age of 70 not to speak of the age 80. For the very reason these people are afraid of 'Jara' and 'Maran', old age and death, as is so often emphasised by the above Hindi Couplet. So Jara (जरा) and Maran (मरण) constitute, like miseries of Life, powerfu incenl-

tives for turning a man's attention towards God. This is the second catagory of those people, who go in search of God. (3) The third is the catagory of the end Seekars. Those who have got a particular desire to be fulfilled. A man might wish to go into the I. A. S., a man might desire to be Hitler or Roosevelt & so on. All these are end seekers. The catagory of end seekers may also include those who propitiate god for the fulfilment of a particular end. Even the great Shivaji was prompted to follow the path of spirit in accordance with the instructions of Ramdas with a national and political end in view, because he thought that the life of spirit alone would come to his help. We have considered these three catogories so for, namely to unrepentant sinners, the miserables and the end seekers. (4) The forth is the catagory of the repentant sinners. The Bhagawatgita has got a very open heart and is very charitable towards those people. It seems that the Bhagwatgita has repented for the repented sinners. Show me a man, says the passage from a sacred Book, who has never looked at another man's woman, with an eye of lust. It does not matter if you sin, but repent you must."

यावरून गीतेचा दृष्टिकोन आपल्यास कळून येईल. मनुष्यानें प्रारब्ध भोगानें आपलें आयुष्य वाईट व्यसनांत घालविलें असलें आणि कांहीं कालानें उपरती होऊन त्यास कृतकर्मांचा मनापासून पश्चात्ताप झाला असेल तर त्यासहि श्रीकृष्णांनीं ग्वाही दिली आहे. बाबारे ! तुला पश्चात्ताप झाला असेल तर निराश

होऊं नकोस ! मी तुला खात्रीनें तारून नेईन. श्री. बिडकरमहाराजांच्या चरित्रांत असा प्रकार असल्याचें चरित्रकारांनीं म्हटलें आहे. तेव्हां असा इसम सुद्धां चांगल्या पदवीस पोंहोंचतो व पोहोंचू शकतो. तेव्हां साधकानें निराश होण्याचें कारण दिसत नाहीं. महाराजांची व बिडकरांची भेट झाल्यावर त्यांच्या पूर्व-कर्मानुसार, महाराजांनीं त्यांची पारख करून त्यांच्यावर कृपा केली. "भक्तीला वश मी" असें श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. महाराज झाले तरी त्यांचेंच स्वरूप. तेव्हां त्यांच्या हृदयांत दयेचा पाझर फुटला व त्यांनीं बिडकर यांना मार्गदर्शन करून त्यांस मोक्षमार्गाचे अधिकारी केलें. सद्‌गुरुच्या ठिकाणीं निष्ठा, प्रेम, आज्ञाधारकपणा हे गुण शिष्यास असतील तरच कार्य होते. या सर्व गुणांचा समुच्चय असल्याची महाराजांची खात्री झाली म्हणूनच त्यांनी श्री रामानंद बिडकर यांचेवर कृपा केली हें ओघानेंच आलें. बिडकरमहाराज यांनीं चार वेळां श्रीस्वामीरायांची भेट घेतली. महाराजांनीं गुरुदक्षणा म्हणून किमयेचा उद्योग करू नकोस असा आदेश दिला. पुढें श्री रामानंद बिडकर हे पुण्यास मेहेंदळे यांच्या मारुतीजवळ मठ करून राहिले. त्यांचा शिष्यसंप्रदाय आज पुष्कळच आहे. नुकतेच ब्रह्मीभूत झालेले रावसाहेब **बाबा सहस्त्रबुद्धे** हे त्यांचे अनुगृहीत होते. हेंहि महान अधिकारी होते.

बेळगांव जिल्ह्यांतील होडवाड येथें राहणारे श्री. काशीनाथ यज्ञेश्वर जोशी या सद्‌गृहस्थांनीं गुर्लहोसूर येथील सत्पुरुष श्रीकैवल्याश्रमस्वामी तथा बोटेस्वामी यांच्यावर अनुग्रह कसा झाला याची माहिती दिली आहे. त्यावरून बोटे-स्वामीनीं महाराजांना प्रत्यक्ष पाहिलें होतें व प्रत्यक्ष कृपा संपादून आल्याचें सांगितलें. या कैवल्याश्रमस्वामीचे पूर्वाश्रमातील नांव "राम" असें होतें. लहानपणापासून त्यांचा ओढा देवादिकांकडे असल्यानें ते कथापुराणांत रंगून जात असत. लहानपणीं तें मुरगोड येथें आपल्या बंधूजवळ राहात होते. तेथें श्रीअक्कलकोटस्वामीमहाराजांची कीर्ति ऐकून त्यांची भेट घेण्याचें त्यांच्या मनानें घेतलें. मुरगोड ग्रामांतील कांहींनीं श्रींच्या लीला अवलोकन केल्या होत्या, त्याचीहि माहिती रामला होती. तेव्हां या लोकोत्तर पुरुषाची भेट घेण्याचा निश्चय केला. रामच्या वडिलांनीहि महाराजांच्या कांहीं अलौकिक गोष्टी सांगितल्या होत्या. या सर्वांचा त्याच्या बालमनावर परिणाम झाला असल्यास नवल नाहीं. ही गोष्ट वडिलांस सांगितली तर ते जाण्यास परवानगी देणार नाहींत. तेव्हां

आपल्या वडील भावाच्या नांवानें एक पत्र लिहून ते गांवांतून निसटले. जवळ कांहींहि नाहीं अशा स्थितींत ते बाहेर निघाले होते त्यामुळें त्यांना बराच त्रास झाला. वाटेंत हिपरगी येथें श्रीमार्तंडभैरवाचें दर्शन घेऊन ते थेट श्रीगाणगापुरास गेले. तेथें श्रीदत्तात्रेयांचें दर्शन घेऊन त्यांनी पुढें अक्कलकोटचा मार्ग चोखाळला. वाटेवरील एका खेड्यांत ते वस्तीस राहिले असतांना त्यांना स्वप्नांत महाराजांनीं दिगंबर स्वरूपांत दर्शन दिलें. पुढें त्यांचेंच रूपांतर लगेच एका सुंदर बालकांत होऊन असें दर्शविलें गेलें कीं श्रीचिदंबर व श्रीस्वामी एकच होत!

अक्कलकोटास पोंचल्यावर रिक्तहस्तानें महात्म्याचें दर्शन घेऊं नये म्हणून या बालरामानें दोन पैशाचा एक पेढा बरोबर नेला. स्वामींची ती भव्य मूर्ति पाहून त्याचें भान हरपलें व अत्यंत सद्भावानें महाराजांपुढें त्यानें लोटांगण घातलें. "आपले पावन पाय पुढें करून या दीनावर कृपा करावी" अशी मनोमय प्रार्थना केली. साष्टांग नमस्कार घातल्यावर पेढा पुढें ठेवण्याचें राहून गेलें! महाराज त्यास लगेच म्हणाले 'बेटा, पेढा लाव.' हे शब्द ऐकून त्यास आश्चर्य वाटून त्यानें महाराजांपुढें आणलेला पेढा ठेविला. या वेळीं या मुलाचे वडील त्याला शोधीत शोधीत अक्कलकोटास आले होते. वडिलांनीं, मुलाची भेट झाल्यास स्वामीस साखर देईन असा संकल्प केला होता. वडीलहि विसरले. महाराजांची भेट झाली त्या वेळी महाराजांनीं "नवसाची साखर कोठें आहे?" अशी पृच्छा केली. सर्वांनाच मनोमय आनंद झाला. 'अनन्य भक्त जे आहेत त्यांची समर्थ कधींहि उपेक्षा करीत नाहींत' हा बोध यावरून घेता येतो.

दुसरा एक प्रसंग असाच गमतीदार घडला. राम आपल्या वडिलांच्या आग्रहावरून ट्रेनिंग कॉलेजांत शिक्षणासाठीं राहिले होते. परीक्षा झाल्यावर प्रशस्तिपत्र घेऊन नोकरीवर जाण्याच्यापूर्वी अक्कलकोटास जाऊन एक वार महाराजांची भेट घ्यावी असें त्याच्या मनांत आलें. त्या वेळीं देशांत भयंकर दुष्काळ होता. जीवितच सुरक्षित नव्हतें तर वित्ताची कथा काय! अशा वेळीं राम हा गुर्लहोसूरहून निघाला. श्रीचिदंबरेश्वरावर विश्वास ठेवून स्वारी मजल दरमजल करीत अक्कलकोटास दाखल झाली.

गांवांत तपास करून श्रींना भेटावें असें त्यांनीं ठरविलें. पण तेथें पोंहचल्यावर त्यांचा तपास लागेना. वाटेंत एका सद्गृहस्थाची गांठ पडली. तो दर्शन

घेऊन नुकताच आला होता. त्याला विचारतां त्यानें महाराज गांवाबाहेर तीन मैलांवर एका झाडाखालीं बसले आहेत असें त्या गृहस्थानें सांगितलें. राम हा लगेच तिकडे निघाला. महाराज व्याघ्रासनावर बसलेले त्यास दिसले. मनोभावानें त्यानें महाराजांची आपल्यावर कृपा व्हावी व पदकमलावर मस्तक ठेवण्याची इच्छा आहे तेवढी पूर्ण करावी अशी प्रार्थना केली. महाराजांनीं त्याचा शुद्ध भाव ओळखून त्यांनीं आपला उजवा पाय त्याच्यापुढें केला. अत्यंत प्रेमभावानें रामानें श्रींच्या चरणकमलांवर आपलें मस्तक नत करून आनंदाश्रूंनीं ते अक्षरशः भिजविले. व बरोबर आणलेले पांच रुपये ठेवले. महाराजांनीं ते रुपये आपल्या हातांत घेऊन घोळविले व म्हणाले, " पाणी फार खोल आहे. भिऊं नकोस मी तुझ्याबरोबर येतों. लाख, लाख, लाख ब्राह्मण भोजन " अध्यात्मविद्या ही अत्यंत गूढ असल्यानें त्याचें रहस्य तुला कळणार नाहीं, तथापि मी तुझ्या-बरोबर असल्यानें कांहीं काळजी करूं नये असा अभिप्राय श्रींनीं प्रगट केला असें म्हणावयास हरकत नाहीं. पुढें रामानें चतुर्थाश्रम स्वीकारून तो गुर्ले-होसूर येथें श्रीशिवचिंदबरेश्वराचा उत्कट उपासक बनला. वीस वर्षें उत्कृष्टपणें सेवा केली. लक्षावधि ब्राह्मणांना व इतरांना त्यानें अन्नदान केलें. यावरून महाराजांनीं त्यांस जो पूर्वी आशीर्वाद दिला होता तो सफळ झाला. या रामावर महाराजांनीं पूर्ण कृपा केली.

पुढें शके १७९४ च्या शिवचिदंबरेश्वराच्या उत्सवांत स्वामी ' राम ' ( यांनी संन्यासदीक्षा घेतली होती ) हे नित्याप्रमाणें झाडलोट करून गांवाबाहेर विहिरीवर स्नानास गेले. बरोबर त्यांची सवंगडी मंडळी होती. या उत्सवासाठीं एक अगडीचा ( जि. धारवाड ) वे. शा. सं. वेंकण्णाभट सिद्धान्ती या नांवाचा एक दशग्रंथी ब्राह्मण तेथें आला. त्यानें तेथील मंडळीस ( विहिरीवर असलेल्या ) ' रामुशिक्षक ' कुठें आहे याची चौकशी करूं लागला. कारण चतुर्थाश्रम घेण्याचे अगोदर ' राम ' हा शाळेंत नोकरीवर होता. हे सिद्धान्ती भटजी एकदां अक्कल-कोटास गेले असतांना त्यांनीं महाराजांची भेट घेऊन त्यांना पुनर्दर्शन व्हावें म्हणून प्रार्थना केली होती. त्या वेळीं महाराजांनीं त्यांस " मुरगोडास आमचा परमभक्त ' रामुशिक्षक ' आहे त्याचें दर्शन घे, म्हणजे आमचे दर्शन घेतल्यासारखे आहे. " असें सांगितलें होतें. म्हणून वेंकण्णा सिद्धान्ती गांवांत ' रामुशिक्षका 'ची चौकशी करीत होते. लोकांनी स्नानास गेल्याचें

सांगितलें. सिद्धान्ती हे लगेच विहिरीकडे गेले. त्यांनी त्यांची भेट घेतली व त्यांच्यापुढे नारळ ठेवून भक्तिभावानें नमस्कार घातला. लोकांना याबद्दल अत्यंत आश्चर्य वाटलें. कारण दशग्रंथी ब्राह्मण म्हणून त्यांची सर्वत्र प्रसिद्धि होती. लोकांनीं असें कां करतां असें विचारलें तेव्हां त्यांनी अक्कलकोटास घडलेली हकीकत कळविली. या गोष्टीवरून "आपणासारखे करिती तात्काळ" असा सत्पुरुषांचा दंडक असतो तो या गोष्टीमुळें कसा प्रचीतीस आला हें लक्षांत येईल.

महाराज, हे भक्तकामकल्पद्रुम असल्यानें अनेक सद्भक्तांनीं अक्कलकोटास जाऊन त्यांची गांठ घेतली. त्यांतच आळंदीचे महान्सिद्ध श्रीनृसिंहसरस्वती महाराज यांची प्रामुख्यानें गणना करणें अत्यावश्यक आहे. पुण्यपत्तनस्थ सुप्रसिद्ध महर्षि अण्णासाहेब पटवर्धन हे महाराजांच्या भेटीसाठीं अक्कलकोट येथें गेले होते. त्यांनींच त्यांना आळंदीच्या श्रीनृसिंहसरस्वतीस्वामींकडे पाठविलें होतें. याबद्दल निराळी हकीकत कोणा जिज्ञासूस वाचावयाची झाल्यास त्यांनी अप्रबुद्धांनीं लिहिलेले महर्षि अण्णासाहेब यांचें चरित्र वाचावें म्हणजे योग्य तें मार्गदर्शन होईल. आळंदीच्या श्रीनृसिंहसरस्वतींचा अधिकार फार मोठा होता. त्यांनीं हटयोग साध्य करून समाधिपर्यंत अभ्यास वाढविला होता. त्यांच्या चरित्रावरून त्यांस अनेक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. परंतु योगमार्गातील "समाधि" त्यांना लावतां आली नाहीं. सहज समाधि लागणें अत्यंत कठीण आहे. प्राणवायु हटयोगानें योगी कोंडूं शकतो पण 'सत्रावीचे स्तन्य पीसी। अनुहताचा हल्लरू गासी' या कोटीस ते पोंहचले नव्हते असें त्यांच्या चरित्रावरून दिसून येतें. योगी पुरुषाची दिनचर्या सामान्य जनांना विदित नसते. कारण योगाभ्यास म्हणजे काय याची माहिती नसल्यानें इतरेजनांना त्याचें महत्त्व कळून येत नाहीं. श्रीनृसिंहसरस्वतीना वर म्हटल्याप्रमाणें अनेक सिद्धि अनुकूल असल्यानें त्यांनी महाराजांच्या भेटीस जाण्याचें अगोदर अनेक चमत्कार आळंदीस करून दाखविले होते. श्री एकनाथ, श्री तुकाराम, श्री नामदेव आदि साधुसंतांनीं सिद्धींना महत्व दिलें नाहीं. श्रीज्ञानराजमाउलीनीं सिद्धींना कमीच लेखलें आहे. याची श्रीनृसिंहसरस्वतींना जाणीव होती. या उपाधींतून सुटलें पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. त्या सुमारास श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट यांची कीर्ति सर्वतोमुख झाल्यामुळें साहजिक त्यांना भेटावें असें मनानें ठरविलें व त्याप्रमाणें ते आळंदीहून अक्कलकोटास जाण्यासाठीं निघाले.

योगसिद्धीनें अंतिम साध्य जें आत्मस्वरूप त्याचें आकलन होणार नाहीं तेव्हां याचा उच्छेद करूनच पुढील मार्ग अवलंबिला पाहिजे असें त्यांना वाटणें साहजिकच होतें. श्रीनृसिंहसरस्वती ज्या वेळीं अक्कलकोटास दाखल झाले तेव्हां महाराजांची स्वारी राजवाड्याजवळील भंडारखान्यांत होती. महाराजांना आळंदीचे श्रीनरसिंहसरस्वती हे भेटावयास येणार असल्याचें माहीत होतेंच. महाराजांनीं राजेसाहेबांस एक मोठा योगी येणार आहे तेव्हां एक व्याघ्राचे कातडे रस्त्यावर अंथरण्यास आज्ञा केली ! 'मोठा योगी येणार त्यास रस्त्यावर कां आसन घालण्याची आज्ञा करतां' असा प्रश्न राजांनी केला. महाराजांनीं त्यांस त्यांच्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. ती वेळ ऐन दुपारची. रखरखीत उन्हाची. अशा वेळीं श्रीनृसिंहसरस्वती तेथें आले. त्यांनीं महाराजांचें दर्शन घेऊन त्यांस वंदन केलें. महाराजांनीं त्यांच्याकडे दृष्टिक्षेप केला आणि लगेच आज्ञाचक्रांतील भेद कसा होतो यासंबंधींचा एक योगमार्गातील संस्कृत श्लोक म्हटला. लगेच त्यांना समाधि लागली ! कूर्म दृष्टीनें अगर चाक्षुषी दृष्टीनें संतमहंतांकडून शक्तीपाताची दीक्षा होते हें योगांतील तज्ञ जाणतात. त्याच न्यायानें महाराजांनीं त्यांच्याकडे कृपाकटाक्ष फेंकून त्यांस कृतार्थ केलें. श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी हे त्या ठिकाणीं तब्बल दोन तास समाधिसुखांत होते. ब्रह्मतदाकारवृत्ती गुरुकृपेनें झाल्यानें सुखदुःखाच्या पलिकडील अनिर्वचनीय आनंदांत ते पोहत होते ! ! अशा उन्मनी अवस्थेंत असतांना श्रींनीं पुनः एकदां त्यांच्याकडे अवलोकन केलें. पुढें हळूहळू समाधि उतरून ते देहभानावर आले. अत्यानंद झाल्यानें "आपण कृतार्थ झालों व जें थोडेंबहुत साधन आजपर्यंत केलें तें श्रीस्वामीकृपेनें फलद्रुप होऊन समाधियोग साधला" असें म्हणून श्रीनृसिंहसरस्वतींनीं महाराजांना अक्षरशः लोटांगण घातलें. कांहीं काल महाराजांच्या सान्निध्यांत राहून ते महाराजांची आज्ञा घेऊन अलंकापुरास गेले. योग्य भूमी पाहून सद्गुरु उपदेश देतात व जितकी आर्तता पोटीं असेल तितक्या प्रमाणांत कृपा जास्तकमी होते हें साधकांच्या लक्षांत येईलच. अधिकाराप्रमाणें उपदेश हें या गोष्टींचें मर्म होय.

नारायणभट नांवाचा एक महान सात्विक ब्राह्मणखेड येथील राहणारा होता. त्यांस महाराजांनीं गिरीवर दर्शन दिलें. शके १७९२ आश्विनमध्यें त्रयोदशीस नारायणभटांची स्वारी गिरीवर होती. त्या ठिकाणीं महाराजांनीं त्यास तेजोरूपानें

दर्शन दिलें व पुनः प्रार्थना करतांच त्यास सगुणदर्शन घडविलें. तेव्हां त्यांनीं महाराजांस प्रश्न केला कीं आपण अक्कलकोटास असतां येथें कसें ? तेव्हां महाराज म्हणाले 'पूर्वीचें हें महान पुण्यक्षेत्र असून श्रीमहालक्ष्मीच्या उत्सवासाठीं येथें आज आलों. नेहमीं मी येथें येत असतो.' इतकें सांगून महाराज अदृश्य झाले !! ही गोष्ट नारायणभटांनीं अक्कलकोटास आल्यावर तेथील भक्तास व श्रीवामनबुवांना सांगितली. गोष्ट केव्हां घडली याचा तपशील महाराजांच्या लिहिलेल्या चरित्रांत असल्यानें संशयास जागाच नाहीं. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं विभूतींचें वर्णन करतांना परमेश्वर कोणत्या रूपानें भेटू शकतो याचें विवेचन उत्तम प्रकारें केलें आहे. तेजोरूपानें त्याचें दर्शन होतें असें श्रीज्ञानराज म्हणतात. अलिकडील संतशिरोमणी कै. **रामभाऊ रानडे** यांनींहि आपल्या "The Bhagwatgita as a philosophy of God Realisation" या पुस्तकांत परमेश्वराचें दर्शन कोणत्या कोणत्या स्वरूपानें होते या संबंधीं विस्तृत विवेचन पान २५७ ते २७९ यांमध्यें केलें आहे ते साधकांनीं व जिज्ञासूंनीं नजरेखाली घातल्यास त्यांचीहि खात्री पटेल. परमेश्वर जसा अनेक रूपें धारण करणारा आहे तसा तो साधकांची तयारी पाहून त्यांस त्यांच्या योग्यतेनुरूप निरनिराळ्या भावानें भेटतो. ही गोष्ट गुरुदेव रानडे यांच्या पुस्तकाच्या अवलोकनावरून कळून येईल.

"भक्ति प्रियः श्रीपतिः" असें अनेक संतांचे स्वानुभवाचे बोल असतात. याची प्रचीति अक्कलकोटनिवासी यांना पुष्कळदां आलीं होती. त्या गांवांत वे. शा. सं. शेषाचार्य अग्निहोत्री हे वृद्ध गृहस्थ होते. ते अत्यंत कर्मनिष्ठ होते. व धर्मनिष्ठ होते. त्यांची श्रींच्या चरणीं निस्सीम भक्ति होती. महाराजांचें दर्शन घेतल्यासशिवाय ते दुसरें कांहीं कार्य करीत नसत. महाराज किती जरी रागावले असले तरी हे अग्निहोत्रीबुवा महाराजांच्या चरणावर डोकें ठेवावयाचेच ! गांवांतील भक्तमंडळी व परगांवची भक्तमंडळी महाराजांपुढें पेढे बर्फीचा मेवा आणून ठेवीत. एके दिवशीं श्रीशेषाचार्य दर्शनार्थ गेले असतां पुष्कळ पेढे व बर्फी महाराजांपुढें आली होती. एक ताटभर मेवा होता. महाराजांनीं आलेला सर्व मेवा जमलेल्या लोकांना वांटून टाकला. वे. शा. सं. शेषाचार्यांना कांहीं मिळाला नाहीं. त्यांच्या मनांत महाराजांनीं ताटभर बर्फी आपल्यास द्यावी व ती खाऊन तृप्त व्हावें असें मनांत आलें ! ही वासना शेषाचार्यांच्या मनांत उत्पन्न होतांच महाराजांनीं त्यांना

दर्शन देण्याचेंच बंद केलें. आचार्य आले असें दिसताच महाराज, झोपेचे सोंग आणून घुंगट घेऊन पडत. दर्शनार्थ दोन दोन तीन तीन तास श्रीशेषचार्य बसून रहात. परंतु त्यांना महाराजांचें दर्शन होत नसे. महाराज स्वस्थपणें झोप घेत आहेत असें त्यांना वाटे. एके दिवशीं महाराजांची स्वारी खासबागेंत होती. तेथें अग्निहोत्री शेषाचार्य हे अग्निकुन्डांत टाकण्यासाठी शेणगोळे तयार करण्यास गेले होते. आपल्यास महाराज दर्शन कां देत नाहींत याचा विचार करतां त्यांना असें दिसून आलें कीं आपली वासना अद्यापि नाहींशी झाली नाहीं. कृपा व्हावी अशी इच्छा असेल तर वासनांचा क्षयच व्हावयास पाहिजे तेव्हां आजपासून वासना त्याग करावा असें मनानें त्यांनीं ठरविलें. महाराजांपाशीं आलेली बर्फी मिळावी अशी वासना जर धरली तर शेण खाल्ल्यासारखें अशी मनांत प्रतिज्ञा करून शेणांतील थोडे शेण त्यांनीं अक्षरशः आपल्या तोंडांत टाकलें ! यापुढें महाराजांनी आपल्यास पूर्ववत दर्शन द्यावें अशी मनोभावें तेथें बसून प्रार्थना केली. महाराज खासबागेंतच आडवे झाले होते. विश्वाच्या मनीचे जाणणारे महाराज यांनीं झोपेचे सोंग झुगारून देऊन मोठ्याने खदखदा हांसले. महाराज किती झाले तरी दयाळू अंतःकरणाचे असल्यानें भक्ताच्या मनांतील वासना नाहींशी झाली हें ओळखून त्यांनीं आचार्यास जवळ बोलावून दर्शन दिधलें. वासनांचा क्षय झाल्याशिवाय साधक मोक्षांचा अधिकारी होऊं शकत नाहीं हें महाराजांनीं आचार्यास पटवून दिलें आणि पुढील मार्ग कसा चोखाळावा या संबंधी त्यांस साधन सांगितलें. हे पुढे शेषाचार्य महान अधिकारी झाले. गुरुकृपेचा महिमा हा असा असतो.

मैंदर्गी ( अक्कलकोट जि. ) येथें एक मुसलमान जमादार रहात असे. बंदीखान्यांतील कैद्यांवर त्याची देखरेख असे. एके दिवशीं संध्याकाळीं कद्यांना कोंडतांना एक कैदी कमी आल्याचें पाहून त्याचें धाबे दणाणलें ! आतां नोकरी जाणार व आजपर्यंत केलेल्या नोकरीचें चीज होणार नाहीं व उलट शिक्षा मात्र होणार असें त्यांस वाटून मन अत्यंत उद्विग्न झालें. कैदी मिळाल्याशिवाय अधिकारी तरी कां गप्प बसतील. या जमादाराची महाराजांच्या ठायीं अतिशय भक्ति होती. त्यानें महाराजांची मनोभावें प्रार्थना करून ‘ कैदी मिळाल्यास आपण नोकरीचा राजीनामा देऊन श्रींची चरणसेवा करीन ’ असा संकल्प केला. कैदी गेल्याचें वर्तमान मामलेदारास समजलें. एक स्वार त्याच्या शोधार्थ पाठविण्यांत

आला पण सकाळपावेतों कुठें शोध लागेना. शेवटीं खंदकांत कैदी सांपडला व त्यांस स्वारानें पकडलें. त्याच्यावर खटला झाला तेव्हा मामलेदारानें त्याची जबानी घेतली, तेव्हां तो म्हणाला, "मी खंदकांतून पळून जाण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला. पण एक संन्याशी सारखा मागे होता. तो मारण्याच्या आवेशानें माझ्या भोंवतीं सारखा फिरत होता. तेव्हां नाईलाज झाला." ही हकीकत ऐकून मामलेदारास अत्यंत आश्चर्य वाटलें! संकल्पाप्रमाणें जमादारानें आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन मैंदर्गीहून अक्कलकोटास आला. तेथें श्रींची कृपा संपादन करून तो कांहीं काल तेथें राहून पुनः मैंदर्गीस परत आला. महाराजांसन्निध असतांना त्याच्यावर अनुग्रह करून एक चर्मी जोडा त्यास दिला व घरीं जाण्यास आज्ञा दिली. तो पुढे महान अवलिया झाला. अनेक व्याधिग्रस्त दृष्टान्त झाल्यामुळें त्याच्याकडे जात व महाराजांच्या कृपेनें त्याने पुष्कळांस रोगमुक्त केल्याचें चरित्रांत वर्णन आहे. हा जमादार महाराजांच्या-दर्शनास आला म्हणजे महाराज त्यास 'पीर साहेब' असे संबोधीत. जमादारानें एक देऊळ बांधून त्या ठिकाणीं पादुकांची स्थापना करून व एक ब्राह्मण पूजेस ठेऊन आपली उपासना चालू ठेविली. महाराजांची कृपा होणें अत्यंत कठीण. पण अंतःकरणांत शुद्ध भाव असेल तर ती केव्हांहि होईल. जात गोत कांहींहि आड येत नाहीं.

मुंबई येथें महालक्ष्मीवर श्री. विनायकरावजी वासुदेवजी या नांवाचे एक महान स्वामीभक्त होते. ते गव्हर्मेंट ओरिएंटल ट्रांसलेटर म्हणून प्रसिद्ध होते. हे वरचेवर अक्कलकोटास जाऊन महाराजांचें दर्शन घेत असत. महाराजांनीं त्यांची शुद्ध व विमलभक्ति लक्षांत घेऊन रावसाहेब रावजी भिकाजी ढवळे यांच्या-बरोबर आपल्या पादुका विनायकरावजी तथा काकासाहेब यांच्याकडे पाठविल्या. सन १८७८।७९ सालीं नेहमींप्रमाणें श्री विनायकरावजी हे महाराजांस भेटावयास गेले असतां, महाराज त्यांस म्हणाले, "दर्याकिनाऱ्यास आनंद कर, जा" पुढें कांहीं दिवसांनीं रावसाहेब ढवळे यांच्या मार्फत त्यांस पादुका मिळाल्यानंतर त्यांनी महालक्ष्मीवर एक मोठे टुमदार संगमरवरी पाषाणाचें देवालय बांधलें, व पूजाअर्चा करण्यासाठींहि चांगली व्यवस्था केली. काकासाहेब हे महाराजांचे पूर्वींपासूनचे भक्त होते. पूर्वीं सोलापूरपावेतों आगगाडी होती. एकदां नाताळाच्या सुटींत ते तिकडे गेले, बरोबर १००।२०० माणसें होतीं. आधीं येणार

असल्याचें अक्कलकोट दरबारास कळविलें असल्यानें श्रीमंतांनीं त्यांची सर्व व्यवस्था लवाजमा पाठवून आणण्याची तजवीज केली होती. महाराजहि तेथे ( वाड्यांतच ) बसले होते. राजेसाहेबाकडून म्याना, बग्या, गाड्या मानकऱ्याबरोबर कडबगांवापर्यंत आल्या होत्या. अक्कलकोटनिवासी श्रींनीं आपल्या भक्तांस सामोरे जावे या हेतूनें त्यांनीं राजेसाहेबांस " तट्टू भेज देव " अशी आज्ञा केली. महाराजहि एका बगींत बसून अर्ध्या वाटेपर्यंत गेले असतील नसतील तों सर्व लवाजम्यानिशी श्री. काकासाहेबांची वाटेंत गांठ पडली. काकासाहेबांनीं बगींतून खालीं उतरून महाराजांना वंदन करून चरणांवर मस्तक नमविलें. ' चलो, गाडी हकालो ' असे महाराज एकदम बोलले. तेव्हां सर्व मंडळी तेथून निघाली. इतरांनीं महाराजांचें दर्शन अक्कलकोटास आल्यावर घेतलें. काकासाहेब व त्यांच्याबरोबरची मंडळी तीनचार दिवस अक्कलकोटास राहिली. या मुक्कामांत एके दिवशीं श्रीफलाचा प्रसाद त्यांच्या पदरांत घालून महाराज म्हणाले, " शीघ्र शीघ्र शीघ्र " या शब्दाचा अर्थ कोणाच्या ध्यानांत आला नाहीं. पण ' शीघ्र ' याचा अर्थ ' जा ' असें जाणून ते कडबगांवास तात्काळ गेले. मालगाडीच त्या ठिकाणीं येत असे. काकासाहेबांच्या चिरंजीवांना राजेसाहेबांनीं आपल्या माहुतास सांगून हत्तीवर बसवून फिरावयास पाठविले होते. गाडीची कर्कश शीट ऐकून हत्ती उधळला व सोंड वर करून रानाकडे धांवत सुटला. आपला मुलगा हत्तीवर बसला आहे हें समजतांच काकासाहेबांना फार काळजी लागली. जवळच्या राजेसाहेबांच्या लोकांनी " माहुत चांगला आहे तो सुखरूप हत्तीस आणील " अशी खात्री दिल्यामुळें ते स्वस्थ राहिले. पुढें माहुतानें हत्तीस ताळ्यावर आणून मुलासह तो सुखरूप आला. तेव्हां महाराजांच्या म्हणण्याचा अर्थ त्यांना उमगला. पुढें कांहीं दिवस राहून ते मुंबईस महाराजांचा आशीर्वाद घेऊन आपल्या परिवारासह गेले. पुढें त्यांनी संकल्पाप्रमाणें श्रीदत्तजयंतीस पादुकांची स्थापना करून आपल्या कुटुंबानें केलेला संकल्प पार पाडला याबद्दल सर्वांना आनंद वाटला.

अ. वर कांहीं प्राकृत लोकांच्या झालेल्या गोष्टी दिल्या आहेत. त्या गोष्टींवरून
राजध ंत आर्तता असल्यानें ते आपली मनःकामना तृप्त करण्याच्या दृष्टीनें
दिवसांनं कडे गेले होते हें उघड होय. अशा आर्त गृहस्थांच्या–साधकांच्या–

मनांत भक्ती पूर्ण असावी असें आम्ही गृहीत धरतों आणि म्हणूनच ते सर्व महाराजांना भेटावयास गेले असावे. पण राजेरजवाडे यांच्या सामान्य व्यवहाराकडे पाहिले म्हणजे लोकांची त्यांच्याबद्दल निराळीच कल्पना होते. कांहींना अशा लोकांच्यामध्यें भक्तीचा अभाव असावा असें वाटणें साहजिक आहे. हाती अमर्याद सत्ता असल्यानें ते इहलोकाचें परमेश्वरच. त्यांना काय कमी असणार. सबब महाराजांसारख्या प्रज्ञादीपाकडे त्यांनीं कां म्हणून जावें! परंतु राजेरजवाडे झाले तरी ते मानवी प्राणीच होत. त्यांच्या कांहीं अडीअडचणी त्यांच्या मानानें असावयाच्याच. दैवी संपत्ति ही महान मोठी असल्यानें त्यांच्यावरील आपत्तीचा परिहार सामान्य जनांकडून होऊ शकत नाही हें ध्यानीं घेतल्यास अशा राजेरजवाड्यांनीं श्रींकडे धाव घेतली असावी असें म्हणण्यास महाराजांच्या चरित्रांत आधार आहे. महाराजांचें चरित्र वाचताना अशा कांहीं राजेरजवाड्यांच्या गोष्टी वाचावयास मिळाल्या. त्यावरून त्यांच्यामध्येहि कांहीं चांगले भगवद्भक्त होऊन गेले आहेत. आपल्या पुराणांतील कथानकें अशा पूर्वींच्या राजाच्या गोष्टी सांगतात. तेव्हां महाराज विद्यमान असतांना असे राजे लोक होते आणि तसें असणें हें वस्तुस्थितीस धरूनच आहे. सबब त्यांच्यासंबंधानें एकदोन गोष्टी या ठिकाणीं नमूद करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

ग्वाल्हेरचे महाराज श्रीमंत जयाजीराव शिंदे हे आपल्या लव्याजम्यानिशीं अक्कलकोटमहाराजांची कीर्ति एकून त्यांचें दर्शन घ्यावें या उद्देशानें अक्कलकोटास आले होते. साधुसंत, नाथपंथी, अवलिया व भगवद्भक्त यांची माहिती लागल्यास त्यांच्या भेटीचा लाभ श्रीमंत जयाजीराव हे घेत असत. महाराज जयाजीराव हे सत्प्रवृत्त असल्यानें ते आपले कामकाज झाल्यावर भजनपूजनांत आपला वेळ दवडीत असत. बरोबर चांगलीं माणसें असत. अक्कलकोटास येतांना सुप्रसिद्ध कीर्तनकार गोविंदबुवा नाशिककरस्वामी होते. श्रीमंत महाराज शिंदे हे आल्यावर त्यांनी श्रीस्वामीमहाराजांची चौकशी केली. तेव्हां स्वारी राजवाड्यांत होती. दोनतीन दिवसांनीं महाराज बाहेर येतील म्हणून लोकांनीं वाट पाहिली. पण पुष्कळ खटपट करून स्वारी बाहेर आली नाहीं. पण एके दिवशीं स्वामी महाराजांची स्वारी जयाजीराव शिंदे यांची तळमळ लक्षांत घेऊन बाहेर आले एका मोठ्या वृक्षाच्याखालीं विश्रांतीसाठीं बसले. ही गोष्ट श्रीमंत शिंदे यांना कळल्यावर ते लगेच सर्व परिवारासह महाराजांच्या दर्शनार्थ गेले

महाराजांनीं बोलता बोलतांच श्रीमंत जयाजीराव यांच्या मनोमन प्रश्नांची मोठ्या गमतीनें उत्तरें दिलीं. ती श्रीमंत शिंदे यांना पटल्यामुळें त्यांस अत्यंत हर्ष झाला. ते म्हणाले " महाराज, आपल्या अपूर्व दर्शनानें मी पुनीत झालों. अशी भव्य व दिव्य आणि तेजःपुंज मूर्ति महद्भाग्यानेंच लाभते ! व ती आपल्याला आज दिसली." असें म्हणून त्यांनी पुनः एकवार महाराजांस साष्टांग नमस्कार घातला. पुढें नाशिकचे श्रीगोविंदबुवा यांचें कीर्तन झालें. महाराजांनीं त्यांस आसनारूढ होण्यास सांगितलें. श्रींनीं कीर्तनकारास एक दोन प्रश्न विचारले. महाराज म्हणाले, "दंड कोठें आहे?" श्रीगोविंद उत्तरले "मनोवाक् कार्यादिदंड परमहंसास मुख्यत्वें प्राप्त झाले, म्हणजे बाह्य काष्टदंड त्याग होतो; कोणतीच अपेक्षा रहात नाहीं. परमानंद झाला, आपली पूर्ण ब्रह्मस्थिति राजारंकावर समदृष्टि आणि कारुण्य-वृष्टि पाहून मीच काय सर्वच अत्यंत प्रमुदित झाले आहेत. तसेंच व्यवहार व परमार्थ याचें अभेदत्व दिसून येतें. तथापि महाराजांपाशीं एक प्रार्थना आहे आमचे इकडची भिक्षा कृपेनें ग्रहण करावी." गुरुदेव पोट धरधरून हंसले, व म्हणाले, " तुमच्याकडे संन्याशास घरदार, परिग्रह असतो कीं नसतो ? नसल्यास भिक्षा कोणी कोठें करावी. बरें आहे मग या." नंतर सर्व मंडळी महाराजांना वंदन करून गेली. एकदोन दिवसांनीं श्रींची स्वारी एका गृहस्थाचे ओट्यावर बसली असल्याची वर्दी शिंदे सरकारास मिळाली. तेव्हां सर्व मंडळीसह महाराज जयाजीराव हे तिकडे गेले. सर्वांचे श्रीचरणीं प्रणिपात झाल्यावर महाराजांनीं दादुमियास " चपाती और बेसन लाव," अशी आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें त्यानें स्वच्छ पात्रांत सर्व आणलें. तेव्हां महाराज कीर्तनकारास उद्देशून म्हणाले " आवजी, अभेद परमहंस, भिक्षालेव, खाव " हें भाषण ऐकून कीर्तनकार अत्यंत चकित झाले, आणि म्हणाले, " आपण साक्षात् परब्रह्ममूर्तीच आहांत, कोणालाहि आपली बरोबरी बाह्यतः अगर स्वप्नांतहि करतां येणार नाहीं, क्षमा असावी." परंतु श्रींनीं त्यांचें मनोगत जाणून त्यांस अभय दिलें आणि म्हणाले, " आपण एकच आहोंत." ही अमृतमय वाणी ऐकून श्रीमंत शिंदे सरकारांनीं आपल्या सर्व परिवारासह व आश्रितांसह प्रसाद भक्षण करून महाराजांचा आशिर्वाद घेऊन निघाले. श्रींनी त्यांना " निर्भय असा " असा आशिर्वाद दिला. राजधानीस जातांना एक मध्यंतरी विघ्न आलें तें गुरुकृपेनें टळलें. पुढें कांहीं दिवसांनीं महाराजांच्या कृपाप्रसादानें शिंदे सरकारास पुत्ररत्नाचा लाभ झाला.

इंदूरचे श्रीमंत तुकोजीराव होळकर हे आपल्या दोन पुत्रासह व इतर परिवारासह श्रींचीं भेट घेण्यासाठीं अक्कलकोटास आले होते. श्रीमंतांची स्वारी सर्व परिवारासह राजेसाहेब अक्कलकोट यांच्या खास बागेंत उतरली होती. श्रींचीं स्वारी त्या वेळीं अण्णाप्पा कर्नाळकर यांच्या घराच्या पिछाडीस एका विहीरीजवळील वडाच्या झाडाखालीं झोपली होती. सेवेकरी व इतर दर्शनोत्सुक अशी शेपांचशें मंडळी तेथें होती. श्रीमंत होळकर यांची स्वारी आल्याचा भालदार चोपदार यांनीं पुकारा केला. श्रींच्या सन्निध असलेली मंडळी उठून उभी राहिली. श्रीमंत तुकोजीराव हे महाराजांच्या पायाशीं अत्यंत अदबीनें उभे राहिले. महाराज स्वस्थ पहुडले होते. समर्थांचें दर्शन घेऊन श्रीमंत होळकर यांनीं महाराजांची प्रार्थना केली. व म्हणाले, “ वडिलांच्या व अहिल्याबाईच्या पुण्याईनें आज हे चरण पुनः दिसले. अबूच्या पहाडावर मागें दर्शन देऊन धन्य केलें होतें. तेव्हां मी आपल्यास मोठा धन्य समजतो. ” महाराजांनीं तुकोजीरावांची प्रार्थना ऐकून उठून बसले व तुकोजीरावांना म्हणाले, “ तुम्हारे वहाँ आंबके झाड हैं ? ” श्रीमंतांनीं आपल्या मुलाकडे बोट दाखवून “ आपके कृपेसे दोन आंबका झाड है ” असें उत्तर दिलें. तेव्हां श्रीसमर्थांनीं आपल्या डोकीवरील भरजरी टोपी तुकोजीरावांच्या अंगावर फेकली. तो प्रसाद समजून तुकोजीरावांना अत्यानंद वाटला. राजेसाहेबांनीं श्रींच्या गळ्यांत हार घालून मेवामिठाईचीं तबकें ठेवून वंदन केलें. पुढें दर्शन घेऊन आपल्या निवासस्थानीं गेले. गांवांतील विद्वानांना पाचारून दक्षिणा देऊन त्यांचा गौरव केला. महाराजांच्या सेवेकऱ्यांनाहि देणग्या दिल्या. पुनः महाराजांचें दर्शन घेऊन राजेसाहेब परत इंदूरास गेले. श्रींचा मुक्काम येथें अक्कलकोटास असतांना अबूच्या पहाडावर केव्हां भेट दिली याबद्दल लोकांना अत्यंत आश्चर्य वाटलें ! तुकोजीराव हे अबूच्या पहाडावर श्रीदत्तपादुकांचें दर्शन घेण्यासाठीं गेले होते त्या ठिकाणीं महाराजांनीं त्यांची भक्ति पाहून दर्शन दिल्याचें त्यांच्या चरित्रकारानें नमूद केलें आहे म्हणूनच “ आंबके झाड कहां है ” असें विचारले ते त्या वेळच्या अनुसंधानारूप विचारलें हेंच खरें !

याच्या उलट दुसरें एक प्रकरण घडलें त्यावरून योग्य तो बोध साधकास घेतां येईल. व असें का होते याचें रहस्य समजून येईल. श्रीमंत सरकार जयाजीराव शिंदे व श्रीमंत तुकोजीराव होळकर उभयतां अक्कलकोटास गेले होते व

तेथें त्यांनी श्रींची भेट घेतल्याची हकीकत बडोद्याचे अधिपति श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांना कळली होती. त्यानींहि श्रींची कीर्ति अनेकांकडून ऐकिली होती. त्यांच्या मनांत श्रींना बडोद्यास आणून तेथें त्यांची सेवा चाकरी करावी अशी ईर्षा होती. अक्कलकोटास जसे महाराज येऊन राहिले तसे त्यांनीं आपल्या राजधानींत येऊन राहावें असें मल्हाररावांना वाटलें. याप्रमाणें विचार करून त्यांनीं आपल्या मनाशीं हा बेत ठरविला. पदरच्या मानकऱ्यांस अक्कलकोटास महाराजांकडे पाठविलें व त्यांच्याकडून आपलें मनोगत त्यांना कळविलें. पण सर्व खटाटोप व्यर्थ गेला. तेव्हां दुसरे एक तात्यासाहेब या नांवाचे मानकरी यांची त्या कामावर योजना झाली. तात्यासाहेब गायकवाड, सरकारच्या आज्ञेप्रमाणें अक्कलकोटास आले. त्यांनीं महाराजांची भेट घेतली. त्यांच्याजवळचे सेवेकरी होते त्यांस वश करून घेण्याचा खटाटोप चालविला ! नानापरीचीं पक्वान्नें त्यांस जेऊं घातली. महाराजांचे भक्त चोळाप्पा यांची भेट घेऊन त्यांस महाराजांस बडोद्यास आणण्याचें केलेत तर गायकवाड सरकाराकडून मोठी जहागीर देववितो असें आमिष लावलें. अशा प्रकारें भगीरथ प्रयत्न केले. तात्यासाहेबांनीं हें भलावणें चोळाप्पास लावल्यामुळें त्यांच्या तोंडास पाणी सुटलें. त्यानें महाराजांची मर्जी सुप्रसन्न पाहून एके दिवशीं गोष्ट काढली. महाराजांनीं गायकवाडांच्या विनंतीस मान दिला तर स्वतःचें कल्याण होईल व जहागीरहि मिळेल " असें सांगितलें. महाराजांनीं या गोष्टीस नकार दिला आणि म्हणाले, " त्यांच्याजवळ भक्ती नाहीं मग व्यर्थ खटाटोप तो का ? " पुढें सर्वांचीच निराशा झाली. मानकरी तात्यासाहेब यांनीं आपल्या बिऱ्हाडीं श्रीगुरुचरित्राच्या सप्ताहास ब्राह्मणाकडून प्रारंभ केला. हजारों रुपये खर्च केले. शेवटीं महाराजांना मेण्यांतून फिरावयास नेऊन पळवून नेण्याचाहि प्रयत्न तात्यासाहेबांनीं केला. महाराज हे अंतःसाक्षी असल्यानें मानकऱ्यांचा प्रयत्न वाया गेला. महाराजांनीं मेण्यांत बसावें व कांहीं वेळ झाल्यास खाली उतरूनच चालू लागावे व परत अक्कलकोटास दाखल व्हावें ! ! असा क्रम दोनतीन महिने चालला. शेवटीं हे मानकरी हात हलवीत परत बडोद्यास गेले; गायकवाडकरांनीं पुनः एकवार निराश न होतां प्रयत्न करून पाहण्याचें ठरविले. यशवंतराव नांवाच्या एका मनुष्याबरोबर उंची वस्त्रें व हिरे माणकाचें दागिने देऊन बडोद्याहून त्यांना अक्कलकोटास रवाना केले. " द्रव्येण सर्वे वशः " अशी सामान्य माणसाची नीति आरंभली. हे यशवंतराव

महाराजांचें दर्शन घेण्यासाठीं महाराजांसमोर आले असतां जवळच्या सेवेकऱ्यांस म्हणाले, "काय आहे रे, बेडी ठोका." असे तीन वेळ महाराज म्हणाले. पुढें तीन दिवसांनीं यशवंतरावास तारेने बडोद्याहून बोलावणें आले. विषप्रयोगाच्या खटल्यांत मल्हाररावांचे हस्तक म्हणून यशवंतरावास गोवण्यांत आल्यानें महाराजांच्या वचनाची प्रचीति सर्वांना आली.

श्रीसमर्थस्वामी महाराज यांच्याकडे जे अनेक गृहस्थ आले त्यांत वांबोरीचे (नगर जि.) वामनबुवा ब्रह्मचारी वैद्य यांचा प्रामुख्यानें उल्लेख करणें आमचें कर्तव्यच ठरते. अहमदनगरपासून सात कोसांवर वांबोरी म्हणून एक लहानसें गांव आहे. त्यांनीं महाराजांची सेवा अत्यंत भक्तीभावानें केली. श्रींनीहि त्यांची सेवा लक्षांत घेऊन त्यांस कृतार्थ केले. श्रीवामनबुवा वैद्य यांनीं महाराजांचें चरित्र लिहून आपलें नांव अजरामर करून ठेवल्यामुळें स्वामीभक्तांना त्यांचे ऋण कसें फेडावें असें होऊन गेल्यास नवल नाहीं. त्यांनीं लिहीलेलें "श्रीगुरुलीलामृत" हें ओवीबद्ध चरित्र ५६ अध्यायाचें आहे. या चरित्रांत प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं वेदान्तातील कांहीं विशिष्ट प्रमेयाची चर्चा करून त्या चर्चेस अनुसरून प्रत्येक अध्यायाच्या समारोपांत एका भक्ताची कथा देऊन त्यावर श्रींनीं कशी कृपा केली याची माहिती दिली आहे. कांहीं वाचकांना औपनिषदिक वेदान्ताचा भाग रुक्ष वाटेल. सामान्य माणसांना असें वाटणें साहजिक आहे. औपनिषदिक तत्त्वज्ञानाची माहिती असेल तरच त्यांस रहस्य कळून येईल. एरव्हीं त्यांत त्यांना गम्य वाटणार नाहीं. जे साधक जरा शिकले सवरले असतील त्यांना वेदान्ताची चर्चा उपकारक ठरेल. कारण पुढील गोष्टींचा व वेदान्तातील रहस्यांचा प्रश्न वामनबुवांनीं कसा हाताळला आहे याचें ज्ञान होऊं शकेल. एका विशिष्ट हेतूनेच त्यांनी वरील ग्रंथाची मांडणी केली असल्यानें लोकांना तें रुक्ष वाटेल इतकेच. पण त्यापैकीं वेदान्ताचा भाग सोडल्यास महाराजांकडे कोणत्या प्रकारचे लोक आले व त्यांच्यावर महाराजांनीं कृपेची पाखर कशी घातली हें समजून येत असल्यानें साधकांना हा ग्रंथ खरोखरीच मार्गदर्शक झाला आहे. महाराजांची जी अनेकांनीं चरित्रें लिहिलीं आहेत त्यांना या गुरुलीलामृत ग्रंथाचा बहुमोल उपयोग झाला असल्यानें हा ग्रंथ सर्वांनाच गुरुस्थानीं आहे.

श्री वामनबुवा यांनीं वांबोरीस वेदाध्ययन व शिक्षण संपादन केलें. इंग्रजी पांचवीपर्यंत खाजगीरीत्या त्यांनीं अभ्यास केला. व पुढें शाळाखात्यांत नोकरी

केली. धुळ्यास कलेक्टर कचेरींतहि कांहीं काळ ते नोकरीवर होते. नगर येथें ' वृत्तवैभव, छापखान्यांत काम करून त्यांनीं संस्कृत विद्येचा अभ्यास केला, पण या कोणत्याहि गोष्टींत त्यांचें मन रमेना. लहानपणापासून सत्संगतीचा हव्यास असल्यानें वेळ सांपडेल तेव्हां साधुसंताच्या शोधार्थ रहावें असा क्रम होता. देवादिकांकडेहि याच तन्मयतेनें आपलें मन लावीत असत. अशा आंतरिक तळमळीनें त्यांनीं बराच काळ घालविला. संत, फकीर, संन्याशी, कानफाटे वगैरेंच्या भेटीगाठी घेऊन त्यांनीं आपल्या मनाची शांती कशी होईल यासंबंधी पुष्कळ उपाय केले. पण निराशाच पदरीं पडली. पुढें नगरास असतांना अक्कलकोटमहाराजांची कीर्ति ऐकून तिकडे एकदां जावें असें त्यांच्या मनानें घेतलें. नौकरी सोडून आपल्या मातोश्रीसह ते पुण्यास आले. तेथें कांहीं खासगी काम धरलें. तुळशीबागेंत नाना नातू, यांच्याकडे ते होते. एके दिवशीं गोपाळराव दादा नातू, व्यंकटेश तेलंग, एक पुराणिक व ते स्वतःच ( वामनबुवांनींच ही हकीकत लिहून ठेविली आहे ) असें शेषशाई जवळ सत्पुरुषांच्या गोष्टी बोलत बसले असतांना एक तेजःपुंज ब्राह्मण आम्ही बसल्या ठिकाणीं आला, आणि तो म्हणाला, " बाबांनो ! सद्गुरुकृपेशिवाय सर्व व्यर्थ होय. " यावर त्या पवित्र ब्राह्मणांस वामनबुवांनी विचारले, " चित्तशुद्ध होऊन परमार्थाचें ज्ञान कोणत्या प्रकारें होईल व ज्ञान ज्याच्यापासून मिळेल त्यांस आपण सद्गुरू मानूं " यावर त्या ब्राह्मणानें उत्तर दिलें " हें पाहा ! तुला श्री गुरुदत्तात्रयस्वरूपी श्रीस्वामी श्रीअक्कलकोटास दर्शन देतील व त्यायोगें तुझें समाधान होईल. " इतकें बोलून तो विप्रवर तेथून निघून गेला. वामनबुवांना अत्यंत आश्चर्य वाटलें. व त्यास भेटून सर्व हकीकत समजाऊन घ्यावी म्हणून त्यांनीं त्याचा शोध चालविला. पण तो कांहीं फिरून दिसला नाहीं. या गोष्टीचें त्यांस अत्यंत आश्चर्य वाटलें. जवळच्या लोकांनाहि मोठें कौतुक वाटलें. बसलेल्या सर्वांनीं समक्ष अक्कलकोटास जाऊन येऊं असें कार्तिक वद्य १२ स बोलणें केलें. त्याप्रमाणें मार्गशीर्ष शु १ स पुण्याहून वामनबुवादि सर्व सोलापुरास रेल्वेनें गेले. तेथून पायवाटेनें अक्कलकोटास गेले. श्रींची स्वारी त्यावेळीं जवळच्या एका खेड्यास गेल्याचें समजलें. वामनबुवा श्रींचा शोध करीत असतां भीमातीरावरील रोडगांवमिरगी या ठिकाणीं त्यांची भेट झाली. महाराज तेथें नदींत स्नान करीत असतांना वामनबुवादि सर्व मंडळी तेथें गेली. तेव्हां त्या मंडळींना उद्देशन श्री

म्हणाले, "कां रे आमच्या ब्राह्मणाची थट्टा केली." खुणेचें वाक्य पटल्यामुळें वामनबुवांनीं पयोनदींत स्नान करून महाराजांना साष्टांग नमस्कार घातला व महाराजांची क्षमा मागितली. तेव्हां महाराज त्यांस म्हणाले "आमची नोकरी कर म्हणजे ब्रह्मनिष्ठ होशील. तुझें गाठोडें आम्हांस दे," असें म्हणून त्यांच्यावर कृपाकटाक्ष टाकून मंत्रासह अवधूतगीता त्यांस दिली. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें वामनबुवांनीं सर्व सामान श्रींच्यापुढें ठेविलें. लंगोटी नेसून उभे राहिले. महाराजांनीं पाणी भरलेला नाशिकचा तांब्या दिला व बाकीचें सामान संभाळून ठेवण्यास सांगितलें. त्यासमयीं महाराजांच्या समवेत १५।२० सेवेकरी, घोडीं वगैरे लवाजमा होता. पुण्यास भेटलेल्या ब्राह्मणानें वर्णन केल्याप्रमाणें महाराजांची तेजःपुंजकांति व तो अंगलोट पाहून त्यांना अत्यानंद झाला. व आपल्या जन्माचें सार्थक झालें असेहि त्यांना वाटल्यास नवल नाहीं. महाराजांनीं आपल्या भक्तास पावन करून पूर्णब्रह्म स्थितीस नेऊन बसविले. अशा प्रकारे पूर्वपुण्याईनें या महाभागवताचा उद्धार झाला. पुढे वामनबुवांनीं 'श्रीगुरुलीलामृ' हा ग्रंथ लिहून साधकांना योग्यतें मार्गदर्शन केलें. या ग्रंथांत महाराजांनीं अनेक लीला व अनेक लोकांवर अनुग्रह कसा केला याचें साद्यंत वर्णन करून महाराजांच्या वास्तव्यांत ज्या ज्या ऐतिहासिक घटना (काल्पनिक नव्हेत) घडल्या त्यांचें मार्मिक विवेचन केलें असल्यानें साधकांना अतिशय उपयुक्त असा हा ग्रंथ झाला आहे. श्रीगुरुचरित्राप्रमाणें हा पद्यमय ग्रंथ असल्यानें महाराजांचे भक्त हा ग्रंथ अत्यंत भक्तिभावानें वाचतात व पारायणहि करतात. महाराजांनी केलेल्या चमत्कारावरून त्यांनीं ते मुद्दाम केले असले पाहिजेत असें वाटल्याचा सुतराम संभव आहे. पण श्रीरामदासस्वामीनीं म्हटल्याप्रमाणें "अशा महान् पुरुषाचे सामर्थ्य आपोआपच चालते" असा निर्वाळा दिला आहे. परमेश्वरी अंश पूर्ण असल्यानें त्यांच्या प्रत्येक कृतींत महान् अर्थ भरलेला असतो. ज्यांना योगशास्त्राची चांगली माहिती आहे व ज्यांना औपनिषदिक तत्त्वज्ञानाची यथाशास्त्र ओळख आहे त्यांस या गोष्टी समजून येतील. सामान्यजनांनीं अशा योगी लोकांची भेट घेऊन खरी जिज्ञासा असल्यास त्यांनीं शंकांचें निरसन करून घ्यावें. असो. आम्ही जेव्हां प्रथम हा ग्रंथ वाचला तेव्हां तो आम्हास (त्याचा पूर्वार्ध) क्लिष्ट वाटला हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. वेदान्ताची आम्हांस विशेष ओळख नसल्यानें त्यांतील तद्विषयक पारिभाषिक शब्दरचना न

कळल्यामुळें थोडी दिशाभूल झाली. पण पुढें त्यांच्या कृपेने पुनः एकवार त्या ग्रंथाचें पारायण केल्यावर प्रत्येक अध्यायांत जी विवेचन पद्धती स्वीकारली गेली आहे त्याचा थोडासा बोध होऊन कथेचें अनुसंधान लक्षांत येऊं लागलें. उपनिषद वाङ्मयाची गुरुगृहीं संथा घेतल्याशिवाय त्याचें मर्म लक्षांत येणार नाहीं हें जरी खरें असलें तरी कथेचा भावार्थ लक्षांत येईल असें वाटतें. तेव्हां भगवद्भक्तांनीं त्याची पारायणें केल्यास योग्य तो बोध होईल अशी उमेद आहे. साधकाच्या पोटी खरी आर्तता व जिज्ञासा असली म्हणजे त्याच्यावर श्रीगुरुदेव कृपा करतात एवढेच नव्हे तर प्रथम त्यांस कोणत्या तरी स्वरूपांत भेट देऊन त्यांस सावध करतात हे मर्म या वामनबुवांच्या चरित्रावरून लक्षांत येईल.

## अध्याय चौदावा

# महाराजांच्याकडे आलेल्या विभूति (पुढें चालू)

धारवाड जिल्ह्यांतील करजगी तालुक्यापैकीं हावेरी या गांवीं बाळाप्पा या नांवाचे एक प्रसिद्ध सावकार होते. ते यजुर्वेदी ब्राह्मण होते. अत्यंत कर्मनिष्ठ व लहानपणापासून देवादि साधुसंतांची आवड असल्यानें त्यांचें मन संसारांत फारसें रमत नसे. घरांत चालत आलेला सराफीचा धंदाहि ते चांगल्या प्रकारें करीत. घरची पूर्वीपासून सुस्थिति असल्यानें कसलीहि ददात नव्हती. अशा समाधानी वृत्तींत असतां कथापुराणांचा छंद असल्यानें त्यांनीं या ग्रंथावरून अनेक भगवद्भक्तांच्या कथा अभ्यासिल्या होत्या. असें वाचन व त्याचे आनुषंगाने चिंतन चालू असतांना त्यांच्या वृत्तींत फरक पडत गेला. संसारांतून मुक्त होऊन भगवत्सेवा करावी असा त्यांनीं ध्यास घेतला. पूर्वपुण्याईनें त्यांच्यांत हा फरक जरी झाला तरी कोणत्याहि कार्याची वेळ यावी लागते. व तोंपावेतों वाट पाहणें भाग पडतें. असा सर्व साधकांस अनुभव आहेच. तसाच अनुभव श्री. बाळाप्पा यांना आला. उपरती होण्यासाठीं व सद्गुरूची सेवा होण्यासाठीं मनानें ठरविलें म्हणजे आयुष्यांत भलतीच कांहीं लोकविलक्षण घटना घडलीच पाहिजे असा सिद्धान्त नाहीं. मनुष्यावर भलताच दुर्धर प्रसंग घडून आलाच पाहिजे असें अध्यात्मशास्त्र सांगत नाहीं. ज्याच्या त्याच्या प्रारब्ध कर्माप्रमाणें गोष्टी घडून येतात. कर्नाटकांत संतमुकुटमणि श्रीपुरंदरदास विठ्ठल हे नवकोटनारायण होते. सासवड येथें त्यांचा जन्म झाला. घरचा सराफीचा धंदा होता. ते अत्यंत कंजूष व अंतःकरणाचे कमालीचे निष्ठूर अशी त्यांची ख्याति होती. त्यांच्या मातुश्रीनी तिरुपती बालाजीची खडतर उपासना केल्यावरून हे जन्मास आल्यानें त्यांचें नांव शिनाप्पा असें ठेवलें होतें. हे वरदीपुत्र

होते. पण वृत्तीनें मात्र अत्यंत नास्तिक. श्रीपांडुरंगाचेच मनांत त्यांना संसार करूं देण्याचें नव्हतें. संतमुकुटमणी श्रीतुकोबा यांनीं असेंच म्हटलें आहे. आपल्या आवडत्या दासाला प्रभू संसार करूं देत नाहीं. तीच गोष्ट या पुरंदरदास यांच्या बाबतींत झाली. एका नथीवरून उपरती होऊन त्यांनीं आपल्या घरावर अक्षरशः तुळशीपत्र ठेवून घराचा त्याग करून ते बाहेर पडले. पुढें कर्नाटकांत ते संतांचे अग्रणी झाले. या पुरंदरदासांची माहिती कोणा जिज्ञासूस पाहिजे असेल तर मराठी वाचकांसाठीं श्री. दामोदरपंत संगोवाम एलएल. बी. यांनीं त्यांचें एक लहानसें चरित्र लिहिलें तें अवलोकन केल्यास "नवकोटनारायण" असलेला हा शिनीप्पा पुढें दरिद्रनारायण कसा बनला हें कळून येईल. व्यवहारतः ते दरिद्रीनारायण बनले पण आध्यात्मिक दृष्ट्या ते अत्यंत उच्च पदाला पोंचलेले साक्षात्कारी महानुभाव होते हें लक्षांत घेतलें म्हणजे परमेश्वराची कशी लीला असते हें पूर्ण लक्षांत येईल. श्रीपुरंदरदास याप्रमाणें संतांचे मुकुटमाणी झाले तद्वतच श्रीबाळप्पा हे पुढें महाराजांच्या कृपेचे अधिकारी झाले.

पुरंदरदास यांच्याप्रमाणें बाळाप्पा कांहीं नवकोटनारायण नव्हते. परंतु सर्व बाजूंनीं सुखी होते. त्या वेळच्या परिस्थितींत त्यांचें बस्तान उत्तम होतें. अशा परिस्थितींत असतां यांच्या मनानें श्रीस्वामीमहाराजांची भेट अक्कलकोटास जाऊन घ्यावी असें आलें. त्यांनीं लौकिकदृष्ट्या आपल्या मुलामुलींचीं लग्नें वगैरे केलीं. कांहीं पाश ठेवला नाहीं. घरांतून केवळ सद्गुरूच्या शोधार्थच जाण्याचे निश्चित करून त्यांनीं कोणासहि न सांगतां गुपचुपपणें व्यवस्था केली. मुलांचे उपनयन वगैरे झाल्यावर हुबळीस खटल्याचें काम आहे, कोर्टकचेरी करावयाची आहे अशी सबब सांगून ते घराबाहेर पडले! हे घरांतून जे निसटले ते थेट मुरगोडास चिंदंबरदीक्षित नांवाचे एक महान पुरुष आहेत तेथें जाऊन त्यांची भेट घ्यावी असे योजून त्यांच्या भेटीसाठीं गेले. हे सत्पुरुष श्रीशंकराच्या वरदानाने मल्हारदीक्षित यांच्या पोटीं आले होते. वे. शा. सं. मल्हारदीक्षित यांनीं पुत्र व्हावा या हेतून श्रीशंकराची आराधना केली. शिवप्रभूंनीं त्यास आपणच तुमच्या पोटीं येऊं असा वर दिला व त्यास पुत्र झाला. त्याचेंच नांव चिदंबर असें होतें. हे चिदंबर शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दीत होते. बापू गोखल्याचे हे गुरु. बाजीरावसाहेब यांना भेटण्यासाठीं गेले होते. या प्रसंगाची हकीकत अत्यंत बोधप्रद असून ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. यासंबंधींची हकीकत

पेशवे दप्तरांत मिळूं शकेल. जमखंडी येथील हनुमान छापखान्याचे प्रो. श्री. पोंक्षे यांनीं श्रीचिदंबरदीक्षितमहाराज यांचें एक पद्यात्मक रसाळ चरित्र प्रसिद्ध केलें आहे. तसेच जमखंडी येथील एक नागरिक श्री. रायबागी यांनीं त्यांचे चरित्र लिहिलें आहे. हे दोन ग्रंथ साधकांनीं अवश्यमेव नजरेखालीं घालावेत अशी शिफारस आहे. या ग्रंथावरून श्रीचिदंबरमहाराजांचा काय अधिकार होता हें कळून येईल. श्रीअक्कलकोटचे महाराज व चिदंबर दीक्षित यांची भेट झाली होती व दीक्षितांच्या यज्ञांत महाराजांनीं स्वतः तूप वाढल्याची हकीकतत्यांच्या चरित्र-कारांनीं दिली आहे. श्रीवामनबुवा वैद्यांनीं आपल्या श्रीगुरुलीलामृतांतहि या गोष्टींचा अत्यंत कौतुकानें उल्लेख केला आहे. श्री. बाळाप्पा हें त्यांनी केलेल्या संकल्पाप्रमाणें मुरगोडास गेले, तेथे त्यांनीं तीन दिवस वसती केली. तेथील मुक्काम हलवून बाळाप्पा हे श्रीगाणगापुरास श्रीनरसिंहसरस्वतींची आराधना करावी या हेतूनें तिकडे निघाले. पण एका ब्राह्मणानें अक्कलकोटास श्रीदत्तगुरु आहेत तेव्हां तिकडेच जावें असें सुचविलें. पण पुनः त्या ब्राह्मणानें संकल्पाप्रमाणें प्रथम श्रीगाणगापुरास जावें व तेथें जसा दृष्टान्त होईल त्याप्रमाणें करावें असेंहि सुच-विलें. बाळाप्पाच्या मनांत अक्कलकोटास जाण्याचें होतें. पण ब्राह्मणाचा युक्तिवाद त्यास मान्य झाला व मुरगोडाहून त्यांची स्वारी श्रीगाणगापुरास दाखल झाली.

श्रीगाणगापुरास आल्यावर त्यांनी मनोभांवानी श्रींची ससेवा आरंभली भल्या पहाटेंस उठून संगमावर जाऊन स्नान व अनुष्ठान सारुन गांवांत यावें. नंतर माधुकरी मागून सेवा चालविली. त्रिकालस्नान चालू केले. घरजी श्रीमंत माधुकरी मागण्याचा जन्मांत प्रसंग नाहीं. याचनाच करण्याचा त्यांना कधींहि प्रसंग नसल्यानें माधुकरी तरी कशी काय मागावी असाहि विचार त्यांच्या मनांत डोकावून गेला. पण सेवाचाकरी निष्ठापूर्वक करावयाची असा मनोदय अस-ल्यानें मधुकरी मागण्याचे कष्ट केलेच पाहिजे असें मनानें निश्चित केलें, तेव्हां अत्यंत कष्ट करुन सेवा आरंभली. भक्तकाजकल्पद्रुम श्रीनीं त्यांच्या हांकेस ओ देऊन त्यांना कृतार्थ केलें, श्रीगाणगापुरास सेवेकरी होतेच. त्यांत अय्याराम व पंढरीनाथ यांच्याबरोबर त्यांची मैत्री जमली. बाळाप्पांना ते आपल्या घरीं जेवावयास घेऊन जात असत, गांवांत पुष्कळ ओळख असल्यानें या उभयतांना मधुकरी पुष्कळच मिळत असे. तेव्हां सर्वांचे उत्तम प्रकारें पोट भरे, पण ही गोष्ट बाळाप्पास कांहीं रुचली नाहीं. आपल्याप्रमाणेंच हे सेवेकरी आहेत तेव्हां

त्यांना आपल्यासाठीं निष्कारण त्रास होऊं नये असा विचार पुन्हां करून बाळाप्पांनी मधुकरी मागण्यास सुरवात केली. झोळी नदींत बुडवावी व तें अन्न तेथेंच संगमावर वा गांवांत शिलेदार बसून खावें असा क्रम चालू ठेविला. एक दोन महिने अशी सेवा झाल्यावर एकें दिवशीं तीन संन्याशांनीं त्यास स्वप्नांत दर्शन दिलें. यानंतर त्यांना भरपूर मधुकरी मिळूं लागली. व पोटभर अन्नहि मिळत गेलें. हा दृष्टान्त झाल्यावर पुढें १५ दिवसांनी एका ब्राम्हणानें स्वप्नांत त्यांना अक्कलकोटास जाण्यास सांगितलें. या दृष्टान्ताप्रमाणें बाळाप्पाच्या मनांत तिकडे जाण्याचें आलें. पण दुसरे दिवशीं त्यांना अंथरुणाखालीं एक कागद सांपडला त्यांत "उतावळी करूं नये" असा मजकूर पाहिल्यावर अद्यापि जाण्यास आज्ञा नाहीं असें समजून ते आणखी दोन महिने राहिले. पुढें एके दिवशीं संगमावर आंघोळीस जातांना त्यांनी आपलें धोतर औदुंबराच्या खालीं ठेवून स्नानास गेले. स्नान करुन धोतर नेसणार तों त्याच्याखालीं एक मोठा लाल रंगाचा विंचू निघाला पण त्यास न मारिता त्यानी सोडून दिले! त्याच रात्रीं श्रीस्वामीनी त्यास दिगंबर स्वरूपांत दर्शन दिलें. दुसरे दिवशीं मधुकरीस गेल्यावर त्यांना पुरणपोळींची भिक्षा मिळाली व हा शुभशकुन समजून त्यांनी महाराजांना नैवेद्य दाखवून प्रसाद भक्षण करून अक्कलकोटास प्रयाण केलें. श्रीचे दर्शन घेऊन देवळाबाहेर पडले तेव्हां त्याच्यापुढें दोन सुवासिनी स्त्रिया घागरी भरून आलेल्या दिसल्या. हाहि शुभशकून समजून बाळाप्पाची स्वारी मोठ्या आनंदाने अक्कलकोटास महाराजांच्या दर्शनार्थ निघाली. श्रीनरसिह सरस्वतींचे स्मरण करीत करीत कांहीं तास गेल्यावर त्यांना शीण येऊन त्याच्या पायास जडत्व आले. पुढें महाराजांचे स्मरण करून नेटाने चालू लागले व त्यांच्या कृपेने यांना पुढील १२ कोसाचा मार्ग चालण्यास मुळींच थकवा वाटला नाही. वाटेंत एका सुखवस्तु गृहस्थाची गाडी भेटली. त्या सद्गहस्थाने त्यांना आपल्यां गाडींत येण्याविषयीं विनंती केली पण त्यानीं फक्त आपली पडशी गाडींत ठेवली व आपण गाडीबरोबर चालतच आले. वाटेत दुधनीस मुक्काम करून अक्कलकोटास दुसरे दिवशीं म्हणजे श्रीरामनवमीच्या दिवशीं पोहोंचले. ज्याच्या गाडीतून पडशी ठेवून आले ते गृहस्थ पुण्याचें होतें. सदर गृहस्थ अक्कलकोटास आल्यावर भोजनाच्या तयारीस लागले. पण बाळाप्पाना श्रीचरण पहाण्याची उत्कंठा लागल्याने त्यानीं एका पैशाची खडीसाखर घेतली व स्वामीमहाराजांच्या

दर्शनास निघाले. समर्थांची स्वारी खासबागेत बसली होती. हे कळल्यावर बाळाप्पा तिकडे गेले. आपण स्वप्नांत जशी तेजोमय मूर्ति पाहिली तीच समोर असल्याचे पाहून त्यांना अत्यानंद होऊन श्रीचरणी दंडवत घातले. आणलेली खडीसाखर त्यांनी पुढें ठेवली. महाराजाची स्वारी भूमीवरच आडवी झाली होती. स्वारी लगेच उठली आणि त्यांनी बागेंतील प्रत्येक झाडास आलिंगन देण्यास सुरवात केली. पुण्याच्या इनामदारानीं बाळाप्पास भोजनास बोलावलें होतें. वाढलेले ताट घेऊन बाळाप्पा महाराजांच्या सन्निध जाऊन प्रसाद भक्षण करावा या हेतूने निघाले. पण महारांजाची स्वारी राजवाड्यांत असल्याने त्यांची भेट होऊं शकली नाहीं. बाळाप्पानें पारणें सोडलें ! पुढें आठ दिवसपावेतों महाराज राजवाड्यांतच होते. बाळाप्पाने अनुष्ठान सुरू केलें. महाराजांचे दर्शन एक वेळ घ्यावें तेथून अनुष्ठानास बसावें अशी दिनचर्या चालू असे. विश्वनाथ म्हणून एक सेवेकरी महाराजांपाशी असें. त्यास महाराजांनीं रोज कांहींना काहीं तरी प्रसाद द्यावा. पेढे बर्फी अगर खारका वगैरे त्याला मिळे. बाळप्पास मात्र कांहीं महाराज देत नसत. याबद्दल बाळाप्पास वाईट वाटे. एके दिवशीं बाळाप्पाने आपल्यास प्रसाद मिळावा या हेतुने एका पैशाच्या खारका नेल्या. प्रसाद महाराजांनी दिला नाही. जवळ चोळाप्पा होता. त्यांनी यास खारकेचा प्रसाद दिला. बाळाप्पास आनंद वाटला व तें जाऊं लागले. तोंच महाराज चोळाप्पास म्हणाले " अरे त्यास प्रसाद कशास दिलास परत घेऊन ये. असे म्हणतांच चोळाप्पाने धावत जाऊन त्यांच्या हातांतील खारका परत आणल्या. ज्यास आपणाजवळ ठेवून घ्यावयाचे त्यास महाराज प्रसाद वगैरे कांही देत नसत. ज्यास जाण्याची परवानगी होई त्यास ते प्रसाद देऊन वाटेला लावीत असत. पण हे बाळाप्पास ठाऊक नसल्याने तें हिरमुसले आणि कष्टी झाले ! पुढें बाळाप्पाच्या अनुष्ठानाचा कार्यक्रम चालूच होता. दोन महिने झाले. एकें दिवशी तें फूल काढीत असता त्यास काटा बोचून एक बोट सुजले. हाताचे बोट सुजल्यामुळें त्यास मधुकरी व धोतर वगैरे धुता येईनासें झाले. सात आठ दिवस अशा स्थितीत गेले.

एके दिवशीं महाराजांची स्वारी आनंदांत असता बाळाप्पांनीं आपल्या बोटामुळें त्रास होतो असें सांगितल्यावरून म्हशीचें मूत लाव म्हणजे ठणका थांबेल असें सांगितलें. त्याप्रमाणें करतांच त्याच्या बोटाचा ठणका थांबून ते बरें झालें. नित्याप्रमाणें त्यांनीं अनुष्ठान वगैरे चालू केले. पुढे त्यांनीं महाराजांची सेवा

अनेक प्रकारें केली. भक्तिभावानें केलेल्या सेवेचे चीज झालें. महाराजांनीं त्याच्या सेवेचे कौतुक करून त्याच्यावर पूर्ण अनुग्रह केला. बाळाप्पाचे चरित्र साधकांना अत्यंत मार्गदर्शक आहे. ते अनेक दृष्टीनें अभ्यसनीय आहे. साधक कसा असावा व आलेल्या कोणत्याहि प्रसंगानें न डगमगता आपले कर्तव्यकर्म पार पाडण्याच्या दृष्टीनें त्याने उपासना कशी चालू ठेवावी या बाबतींत प्रत्येकाने बाळाप्पाचा आदर्श पुढें ठेवल्यास त्याजवर गुरुकृपा होण्यास विलंब लागणार नाहीं. महाराजांनीं बाळाप्पाची अनेक प्रकारे परीक्षा घेतली. ते शंकरभक्त होते. पूर्वीच्या जन्मांत मनुष्याच्या उपासना खंडित झालेल्या असतात त्या या जन्मी पुऱ्या करून घेण्याचे असतें. व ती गोष्ट सद्‌गुरु पुरी करून घेतात असा एक अलिखित संकेत असतो. त्याप्रमाणें बाळाप्पा हे श्रीशिवप्रभूची उपासना करीत असत. ज्यावेळेस उपासना संपली व दुसरा मार्ग दाखविण्याचा काल जेव्हा येतो तेव्हां स्वामीकृपेने बाळाप्पाच्या बाबतींत झाले. बाळाप्पाची उपासना एका पातळीवर गेल्याचें श्रीच्या लक्षांत आले तेव्हा त्यास योग्य तो बोध करून एकाच गुरुची उपासना चालू ठेवण्यास आज्ञा केली, महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनीं कार्यक्रम बदलला व त्यांची निष्ठा लक्षांत घेऊन दयाघन स्वामी समर्थांनीं त्यास आचंद्रार्क तुझे नांव साधकाच्या यादींत अग्रेसरत्व पावेल असा त्यास आशिर्वाद दिला. जिज्ञासूनीं बाळाप्पाच्या मठांत (अक्कलकोट) महाराजांनीं दिलेल्या आशिर्वादाचा फलक लावला आहे तो पाहावा म्हणजे त्याची साक्ष पटेल. विद्यमान अधिकारी श्री गजानन महाराज यांना भेटून खुलासा करून घ्यावा. या ठिकाणीं बाळाप्पाचें केवळ त्रोटक चरित्र देण्याचा मानस असल्यानें फार पाल्हाळ कथानुसंधान साधण्यासाठीं केला नाहीं.

एका गोष्टीकडे लक्ष वेधणें आवश्यक असल्यानें बाळाप्पासंबधीं दोन तीन प्रसंग देणें अगत्याचे दिसून आलें. बाळाप्पा हे महाराजांची सेवा एकनिष्ठेनें करीत. ही गोष्ट कांहीं विघ्नसंतोषी लोकांना आवडली नाहीं. एका सुभाषितकारानें म्हटल्याप्रमाणें कांहीं अकारण शत्रू होतात व कांहीं अकारण मित्र होतात. या न्यायानें बाळाप्पास महाराजापासून दूर करावें असा कांहीं कुटिल लोकांनी प्रयत्न केला. परंतु त्या प्रयत्नास यश आलें नाहीं. श्रींनीं त्यांना हंसध्वज राजाचें उदाहरण सांगून गुरुसंनिध कसें वागावें हें मोठ्या गमतीनें शिकविलें. पाठीवर चापटी मारून त्याची चंचलवृत्ति नाहींशी करून मनाला स्थिरता प्राप्त

करून दिली.सुंदराबाईसारख्या खाष्ट सेविकेनें बाळाप्पास त्रास देण्याचा प्रयत्न करून पाहिला पण महाराजांनीं सेवेकऱ्यांचा कड घेऊन सुंदराबाईची खरडपट्टी काढून व प्रसंगविशेषीं गालीप्रदान करून भक्ताबद्दल आपलें प्रेम प्रकट केले. साधकास महाराज जेव्हां असत त्यावेळीं उपदेशाच्या चार गोष्टी सांगत. अर्थात ज्यांची अशी तयारी असेल त्याप्रमाणें त्याजला लाभ होई. एकदा साधू कोणास म्हणावे असें एका बुवानें महाराजांना विचारलें. त्यावर महाराज म्हणाले, "अरे, ज्याच्या दर्शनानें पाप जाऊन पुण्य प्राप्त होतें त्यासच साधू म्हणावे. ज्यांचेजवळ धर्म त्यासच जय मिळतो." ब्रह्मा विष्णु शिव यांची एकात्मता त्यांनीं आनंदानें साधकांना निरनिराळ्या उपासकांना तशीं दर्शनें देऊन पटवून दिलें. आळशाचें तोंड पाहूं नये, आयतें कुणाचे खाऊं नये, मेहनत करून अन्न खावें, शेत करावें व खावें " अशासारखी मनोहर व मूलग्राही वचनें त्यांनी साधकाला सांगून त्यांस योग्य मार्गास लावले. एवंच बाळाप्पाची एकनिष्ठा पाहून पाहून त्यास स्वानंदाश्रयी केले. आजहि अक्कलकोटास बाळाप्पाचा मठ कै. सर चिमणलाल सेटलवाड यांच्या औदार्यानें उभा आहे. विद्यमान मठाचे अधिकारी श्री गजानन महाराज हे सत्पुरुष असून अत्यंत थोर पदवीस गेले आहेत. अक्कलकोटास जाणारानीं या सत्पुरुषांची अवश्यमेव भेट घ्यावी. या मठांत महाराजांचीं अनेकविध छायाचित्रे आहेत ती पाहिल्यास कोणाच्याहि दृष्टीचे पारणें फिटल्याशिवाय राहाणार नाहीं. असें हें श्रीबाळाप्पाचे चरित्र अत्यंत उद्‌बोधक व मार्गदर्शक आहे.

याच्या उलट दुसरे एक सेवेकरी श्री. चोळप्पा यांचा परिचय करून देणें अगत्याचे आहे. चोळाप्पाची पूर्वपुण्याई जबरदस्त म्हणून श्रीस्वामीरायांचें त्यांच्या घरीं आगमन झालें. श्रींना अक्कलकोटास आणल्याचे श्री टोळ यांना जितकें श्रेय आहे तितचकें श्री. चोळाप्पा यांस आहे हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. महाराज त्यांच्या घरीं राहिले व तेथील वास्तव्यांत त्यांनीं त्यांच्या कुटुंबाची निरनिराळ्या प्रकारें परीक्षा घेतली. स्वयंपाकाचीं भांडीं खालीं उतरून ठेवणें, पीठ वगैरे लोकांना देणें आदि बरीच परीक्षा घेतली परंतु त्यांची मंडळी त्या परीक्षेंत उतरली हें भाग्यच होय. स्वतः चोळाप्पा व त्यांची भाग्यशाली पत्नी यांनी स्वामीरायांची अत्यंत मनोभावानें सेवा केली. कांहीं काल मठांत चोळप्पाशिवाय एक पानहि हलत नसे. महाराजांनीं त्यांची सेवा घेऊन त्यावर श्री.

लक्ष्मीचा कृपाप्रसाद केला. परंतु तो अध्यात्माचा वांटेकरी झाला नाहीं. श्रीमहाराजांसारखा कल्पवृक्ष घरीं असतां त्याला परविद्या साध्य करून घेतां आली असती. परंतु द्रव्येच्छा अतोनात झाल्यामुळें महाराजांनीं व्यवहार-दृष्टया त्याचें कल्याण केलें. यशईषणेपायीं तो खऱ्या शाश्वत सुखास आंचवला असें म्हणणें भाग आहे. तरी श्रीस्वामींनीं त्यास दूर लोटलें नाहीं! जन्मदारिद्र्य दूर करून त्यांस सुखी केलें. "चोळ्या तुझे मी कांहीं ऋण लागतो" असें म्हणून स्वामींनीं त्यास लोकांना हेवा वाटेल अशी अलोट संपत्ती दिली. तरी पण हाव अनावर! अग्नींत जसजसें तूप ओताल तसतशी ज्वाला अधिकच भडकते. तद्वत् त्याची धनतृष्णा वाढतच गेली. याचा परिणाम शेवटीं महाराजांनीं त्यास दूर केले. मरणसमयीं चोळाप्पास महाराजांचें दर्शन झालें नाहीं. त्याच्या कर्मानेंच श्रीचे पदकमल अंतरले. चोळाप्पाच्या मुळेंच महाराजांच्या चरणाचा लाभ अक्कलकोटवासीयांस झाला हें ऋण महाराजांचे भक्त मानतीलच. वडाखालील मठ व गांवाबाहेरील मठ चोळप्पाच्या वंशजाकडे आज चालत आहे. वडाखालील मठाची व्यवस्था विद्यमान वंशज श्री. दिगम्बर हे मनोभावानें चालवीत आहेत.

● ● ●

## अध्याय पंधरावा

# महाराजांकडे आलेल्या विभूति (पुढें चालू)

## कांदेवाडी मठाचे संस्थापक 'स्वामीसुत'

जिल्हा रत्नागिरी ता. राजापूर मौजे इलिया या खेड्यांत एक सत्शील मराठ्यांच्या वंशांत हरीभाऊंचा जन्म झाला. हें घराणें रत्नागिरी जिल्ह्यांत मोठें प्रसिद्ध होतें. हरीभाऊंच्या वडिलचें नांव दाजीसाहेब. ते आपल्या गांवचे खोत होते. हरीभाऊंना आठ भाऊ व चार बहिणी होत्या. लहानपणापासून ते निर्भीड व सत्यवक्ते होते. खेड्यांतील प्राथमिक शाळेंत त्यांनीं बाल्यावस्थेंत शिक्षण घेतलें. वयाच्या १० व्या वर्षी ते मुंबईस त्यांचें एक आप्त दाजी सुभेदार यांच्याकडे विद्याभ्यासासाठीं राहिले. पुढें त्यांनीं मुंबईच्या कार्पोरेशनमध्यें नोकरी धरली. कांहीं कालानंतर अक्कलकोटास जाण्याचा योग आल्यावर त्यांना श्रींची भेट घेण्याचा योग जुळून आला. महाराजांची भेट झाल्यावर ते विरक्तच बनले. व सुखाचा संसार सर्वस्वी लुटवून त्यांनीं कांदेवाडीस मठाची स्थापना करून महाराजांच्या आज्ञेप्रमाणें काल श्रींची सेवा करण्यांत घालविला. स्वामीसुताची हकीकत अतिशय बोधप्रद असल्यानें ती दिल्यास वाचकांना व साधकांना स्वामीकृपेचें रहस्य समजण्या ससुलभ जाईल.

मुंबईस एक लक्ष्मण विनायक पंडीत या नांवाचे एक गृहस्थ बळवंत सखाराम आणि कंपनी यांच्याकडे ते भागीदार म्हणून होते. पातीनें व्यवहार करीत असतांना व्यापारांत त्यांना ठोकर लागून ते कर्जबाजारी बनले. या कंपनीचे मालक गोविंद मावजी नांवाचे एक धनिक गृहस्थ होते. ते अत्यंत भाविक होते. याहि धनिकाची हकिकत मोठी गमतीदार आहे. हे गृहस्थ तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशानें बरोबर एक कनोजी ब्राह्मणास घेऊन निघाले. तीर्थयात्रा करीत करीत ते कांहीं दिवसांनीं श्रीक्षेत्र गाणगापुरास आले. तेथें त्यांनीं उपोषणें करून श्रीगुरु-

देवांची आराधना सुरू केली. त्यास कांहीं दिवस गेल्यावर दृष्टान्त झाला. त्यांत गुरुदेवानीं अक्कलकोटास जा, तेथें आपणच अक्कलकोटच्या महाराजांच्या रूपानें असल्यानें दर्शन घे म्हणजे तुझी कामना फलद्रुप होईल. या दृष्टान्ताप्रमाणें गोविंद मावजी हे कनोजी ब्राह्मणासह अक्कलकोटास आले. हा कनोजी ब्राह्मण स्वयंपाक करून महाराजांस नैवेद्य अर्पण करीत असे. एके दिवशीं महाराजांनीं त्यास नैवेद्याचें ताट गांवच्या बाहेर जी मशिद आहे त्या ठिकाणीं एक फकीर आहे त्यास व त्याच्याजवळ असलेल्या कुत्र्यास खावयास दे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें त्या कनोजी गृहस्थानें मागेंपुढें न पहातां सोवळ्यानें धूम ठोकून मशिदींत प्रवेश केला. या ब्राह्मणास पाहून तो फकीर म्हणाला " तुला महाराजांनीं इकडे पाठविले ना तर नैवेद्य दे " असे म्हणाला. तेव्हां या ब्राह्मणानें आणलेले ताट त्याच्यापुढें ठेविलें. नंतर फकीरानें व कुत्र्यानें तो नैवेद्य खाल्ला. एक वडा व थोडी खीर ताटांत वगळून तें ताट त्यानें परत दिलें. कनोजी ब्राह्मण हें ताट घेऊन महाराजांच्या सन्निध आला. हा प्रसाद ब्राह्मणास व त्याच्या यजमानास ( गोविंद मावजीस ) खाण्यास आज्ञा केली ! ब्राह्मणानें आज्ञेप्रमाणें तो प्रसाद खाल्ला पण गोविंद मावजी यांनीं मुसलमानाचें उष्टें कसें खावें या विकल्पानें त्यांनीं तो प्रसाद ग्रहण केला नाहीं. तेव्हां महाराजांनीं त्या ब्राह्मणास " मुंबईस जा, दहा हजार रुपये मिळतील असा आशिर्वाद दिला." गोविंदरावावर महाराज थोडे रुष्ट झाले. तुझी भक्ती कच्ची असल्यानें आणखी कांहीं काल सेवा कर असे म्हणून त्यास आपल्या पादुका प्रसाद म्हणून दिल्या व गांवीं जाण्यास सांगितलें. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें गोविंद मावजी परत मुंबईस आले. त्यांच्याबरोबर तो कनोजा ब्राह्मणहि आला. महाराजांनीं आपल्यास वर दिला आहे त्याप्रमाणें पैसे मिळणार ही खात्री वाटून तो मुंबईस गल्लोगल्लीस हिंडूं लागला. लोकांनीं यास वेड्यांत काढले. एके दिवशीं हा ब्राह्मण नित्या-प्रमाणें प्रातःकाळीं भटकण्याच्या हेतूने निघाला तेव्हां एक अशी घटना घडून आली कीं मुंबईत एक श्रीमान भाटिया मरण पावला होता. त्याच्या कुटुंबानें आपल्या नवऱ्याच्या नांवानें दहा हजार रुपयाचें दान करण्याचें योजून प्रातः-काळीं जो मनुष्य भेटेल त्यास तें द्रव्य द्यावें असें ठरविलें आणि त्याच दिवशीं हा कनोजा ब्राह्मण अकस्मात त्या घरावरून जात असतांना या बाईना दिसला. त्यानीं त्यास बोलावून वस्त्रांत गुंडाळलेलें नोटांचें पुडकें दिलें. ब्राह्मणानें तें सोडून

पाहिलें त्यांत दहा हजाराच्या नोटा होत्या. ब्राह्मण मात्र बावरला. कारण आपण दरिद्री तेव्हां नसतीच तोहमत यावयाची म्हणून तो परत त्या बाईकडे गेला व आपलें मनोगत त्यांना सांगितलें. तेव्हां त्या बाईनीं त्यास धीर देऊन आपलें नांव कोणी विचारल्यास सांगा असें त्यांस सांगितल्यामुळें तो हर्ष पावून आपल्या गांवाकडे गेला. ब्राह्मणास श्रींच्या आशिर्वादाप्रमाणें द्रव्यप्राप्ती झाल्याबद्दल आनंद वाटला हें सांगणें न लगे.

पुढें कांहीं दिवसांनीं गोविंद मावजी यांनीं तीर्थयात्रेप्रीत्यर्थ मावंदे केलें. तेव्हां लक्ष्मण पंडित आपल्या वडिलाबरोबर जेवावयास गेले होते. तेव्हां गोविंद मावजी शेटजी यांनीं श्री स्वामींच्या लीलाबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या. लक्ष्मणरावास अत्यंत समाधान वाटलें. कर्जाच्या चिंतेंत असल्यानें " महाराजांनीं आठ दिवसांत आपणांस कर्जमुक्त केलें तर आपण अक्कलकोटास जाऊन महाराजांचें दर्शन घेऊन त्यांचे अनन्य भक्त होऊं " असा मनोमय संकल्प केला. या गोष्टीस सात आठ दिवस गेले. पण कांहीं चिन्हें दिसेनात. तेव्हां आपल्या नशिबास दोष देऊन ते स्वस्थ बसले ! आठव्या दिवशीं त्यांचे इतर भागीदार हरीभाऊ व गजानन श्रीधर खत्री असें लक्ष्मणरावाकडे गेले. त्यांनीं आपण म्युनिसिपल नोकर असल्यानें दिवाळें निघण्याचा प्रसंग आल्यास उभयतांच्या नोकऱ्या जातील तेव्हां सर्व व्यवहार एकट्याच्या नांवें ठेवा, जो काय तोटा होईल तो आम्ही अुभयता भरून देऊं असें आश्वासन दिलें. लक्ष्मणरावानीं या गोष्टींस रुकार दिला. या त्रिवर्गांनीं अफूचा सट्टा केला होता त्यांत तूट येणार म्हणून सर्व हवालदिल झाले होते. पेढीवर लक्ष्मणराव एकटेच बसूं लागले. व सर्व व्यवहार ठरल्याप्रमाणें ते मालक या नात्यानें वागूं लागले. त्यांच्या पेढीचें नांव " गिरधारीलाल " असें होतें. पुढें तीन दिवसांनीं या पेढीला पैसे भरूं अशी लक्ष्मणरावानीं ग्वाही दिली. त्याच दिवशीं ईश्वरमारवाडी पंडितांकडे येऊन त्याची चौकशी करून गेला. दिवाळें निघणार या भीतीनें लक्ष्मणरावानीं त्याची भेट घेण्याचें टाळलें. तेव्हां तो मारवाडी श्री हरीभाऊ व गजानन खत्री यांना जाऊन भेटला, व लक्ष्मणरावाची भेट होऊं शकली नाहीं. तेव्हा आपण सर्वांनीं त्यास भेटून अफूच्या व्यापारांत नफा झाला असून अपल्या हिशेबाची रक्कम घेऊन जाण्यास सांगितलें. मारवाड्याने सांगितल्याप्रमाणें त्रिवर्ग त्याच्या पेढीवर गेले व त्यांनीं १९०० रुपये घेतले. नवसाप्रमाणें कर्जमुक्त होऊन

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रम 33265 वि: चरित्र
ता. 1056 नों. दि. २८/८/८८



रक्कम मिळाली तेव्हा अक्कलकोटास जाऊन श्रीचरणाचें दर्शन घेतल्याशिवाय पैशाचा स्वीकार करावयाचा नाहीं असें सर्वांनीं ठरविलें. व्यापारांत झालेल्या नफ्याची ३०० रुपये रक्कम त्रिवर्गांनीं आपल्याबरोबर घेतली व श्रीच्या दर्शनासाठीं ते सर्व अक्कलकोटास दाखल झाले. दाजीबा भोसले याच्या पत्राप्रमाणें ते श्री. गणपतराव जोशी यांच्या बिऱ्हाडीं राहिले.

अक्कलकोटास आल्यावर सर्वांनीं महाराजांची चौकशी केली व त्यावेळीं महाराजांची स्वारी चोळाप्पाच्या घरीं असल्याचें समजून आलें. तेथें जाऊन त्रिवर्गांनीं महाराजांचें दर्शन घेतलें. स्वारी मोठ्या आनंदांत झोंपाळ्यावर बसली होती. दर्शन घेऊन घरीं आले. रात्रींच एका चोरानें त्यांचे कपडे लांबविले. उठतात तो सर्वच लांबविलेलें दिसलें. पोलिसांत वर्दी दिली व सकाळीं महाराजांचें दर्शन घेऊन त्यांनाहि ही झालेली हकीकत त्यांनी निवेदली तेव्हां महाराजांनीं "सुंठीवांचून खोकला गेला" बरें झाले. असें बोलून त्यांस बाजारांत जाऊन कपडे आणण्यास सांगितलें. मात्र हरीभाऊस हातांनीं धरून ते म्हणालें "आपल्या कुळावर पाणी सोड, आणि माझा सुत हो" आणि नफ्यापैकीं तीनशें रुपये आणले आहेत त्याच्या चांदीच्या पादुका करून आणण्यास आज्ञा केली. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें पादुका तयार करण्याचें आश्वासन हरीभाऊनीं महाराजांस दिलें. महाराजांची भेट एकादशीस झाली होती. दुसरे दिवशीं पारणें करून महाराजांना नैवेद्य समर्पण करावा या हेतुने श्रीगणपतराव जोशी याना महाराजांच्या आवडीचे पदार्थ करण्याबद्दल श्री. हरीभाऊंनीं विनंती केली. स्वयंपाक तयार होतांच त्रिवर्ग राजवाड्यांत महाराजांची स्वारी असल्यानें तेथें गेले व आपला नैवेद्य त्यांनी अत्यंत प्रेमानें श्रीचरणीं अर्पण केला. महाराजांनीं भाताची मूद हरीभाऊस दिली. गजानन यास लाडू दिला. आणि लक्ष्मण पंडित यास कांद्याची भजी दिली. लक्ष्मण पंडित यांनीं बऱ्याच वर्षांपासून कांद्याचे जिन्नस वर्ज केले होते. त्यामुळें तें कांकू करूं लागले. तेव्हां महाराजांनीं त्यांस जवळ बोलविलें व बसलेल्या ठिकाणीं एक तसबिरीकडें पाहाण्यास सांगितलें. तसबीर पाहून पंडितांनी 'मारुतीची आहे' असें उत्तर दिलें. दुसरी एक तसबीर पाहाण्यास सांगितलें. लक्ष्मणरावांनीं ती रामाची असल्याचें सांगितलें व तिसरीहि एक तसबीर बघ अशी आज्ञा केली तेव्हां ती पाहून लक्ष्मणरावांनीं 'शंकराची आहे' असें उत्तर दिलें. त्यावर महाराज म्हणाले, "हेंच तुम्ही तिघेजण आहात" मारुती ब्रह्मचारी असल्यानें 'हरीभाऊ'

" मारुती " होईल. " शंकर " शुभ करणारा म्हणून " गजानन " शंकर होईल. लक्ष्मणराव यास महाराज म्हणाले " तूं राम होशील. " मी याप्रमाणें तुमच्या तिघांच्या गांठीं घातल्या आहेत. " असा प्रेमपूर्वक आशिर्वाद दिला. व पुढील-प्रमाणें त्रिवर्गास श्लोकरूपानें अनुग्रह केला. हरीभाऊस " गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवोमहेश्वरा गुरूरदेव परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ " गजानन खत्री यास पुढील श्लोक दिला. " आकाशात्ततितं तोयं यथागच्छतिसागरं । सर्व देव नमस्कारं केशवं प्रतिगच्छति ॥ " लक्ष्मण पंडित यास पुढील मंत्र देऊन त्यास अनुग्रहीत केले. तो मंत्र असा " इदमेवशिवं इदमेवशिवं । इदमेवशिवं । इदमेवशिवः ॥ " पुढें या श्लोकाचा अर्थ करण्यास लक्ष्मणास सांगून त्यास कांद्याचीं भजी खाण्यास आज्ञा केली. पुढे त्रिवर्गांनीं मुंबईस जाण्याची परवानगी महाराजांच्या चरणीं मागितली. व त्यांच्या अनुज्ञेनें ते सर्व मुंबईस सुखानें राहूं लागले.

मुंबईस आल्यावर हरिभाऊंची चित्तवृति महाराजांच्या दर्शनापासून चंचल झाली. श्रींची सेवा करण्यासाठीं ते अत्यंत उत्सुक झाले. या तळमळीनें रात्रंदिवस ते श्रींचा मनोमय धावा सारखा करूं लागले. संसारात त्यांचें मन लागेना. अक्कलकोटास जाऊन महाराजांचा अनुग्रह घ्यावा असे त्यांच्या मनानें घेतलें. शेवटीं चांदीच्या पादुका तयार करवून मुंबईस आल्यापासून १५ दिवसांच्या आंतच ते आपल्या दोन स्नेह्यांसह अक्कलकोटास गेले. महाराजाचें दर्शन घेऊन त्यांच्या समोर चांदीच्या पादुका ठेवतांच महाराजांनीं त्या पायांत घालून त्यांस पुनीत केलें. १४ दिवस त्या पादुका महाराजांच्या सान्निध्यांत सारख्या होत्या. चांदीच्या पादुका आपल्यास मिळाव्यात अशी कांहीं सेवेकऱ्यांची इच्छा होती. पण महाराजांनीं त्या कोणासहि दिल्या नाहींत. एके दिवशीं हरीभाऊस दर्शनार्थ आले असतां त्यास जवळ बोलावून " तूं माझा सुत आहेस, आपला धंदा व सर्व रोजगार सोडून, बंदर किनाऱ्यावर जाऊन मोठा किल्ला बांधून ध्वजा उभी कर–" अशी आज्ञा केली. पुढें पादुकांस स्पर्श करून हरीभाऊस उभे केले व त्यास तीन उठाबशा काढण्यास सांगितलें. हरीभाऊंनीं तसें केल्यावर " हें माझे आत्मलिंग त्या किल्ल्यांत मांडण्यासाठीं देत आहे. तूं माझा आजपासून सुत झाला आहेस–" असें म्हणून हरीभाऊस पोटावरून हात फिरविण्यास सांगून पादुका मस्तकावर धारण करण्यास सांगितलें. हरीभाऊंना अत्यानंद झाला. त्या आवेशांत ते नाचू

लागले आणि तोंडानें श्रींच्या नांवाचा जयघोष सुरू केला. हरीभाऊबरोबर आलेले त्यांचे स्नेही गजानन खत्री व लक्ष्मणराव हे परत आपल्या बिऱ्हाडीं आले. त्या सर्वांना आनंद झाला हें सांगण्याची गरज नाहीं. महाराज त्या दिवशीं गांवांत वसतीस राहिले नाहींत. गांवाबाहेर एक पिंपळाचें झाड होतें त्या ठिकाणीं वसतीस गेल्याचें कळल्यावर हरीभाऊ व त्यांचे दोन स्नेही असे मिळून तेथें गेले. अर्धरात्र होऊन गेल्यावर सर्व लोक निद्रिस्त असलेले पाहून महाराज एकटेच उठून बसले व हातांत काठी घेऊन त्या झाडाकडे पाहून म्हणाले "तूं साले ह्यांसे निकल जाव नीचे हमारे बाल गोविंद सोये हैं" याप्रमाणें त्यांनीं आज्ञा करतांच झाड एकदम खळखळ असें जोरानें हललें व त्यांतून मशालीच्या उजेडाप्रमाणें प्रज्वलित गोळा निघून गेला! हरीभाऊ व त्यांच्या स्नेह्यांना जाग आल्यानें त्यांनीं तो प्रकार पाहिला; व पडल्या ठिकाणीच ते चुप होते. पुढें कांहीं वेळानें हरीभाऊ एकटेच महाराजांच्या चरणापाशीं गेले व चरण चुरूं लागले. यावेळीं महाराजांनीं त्यास काय सांगावयाचें तें सांगितलें. आपली छाटी, कफनी हरी-भाऊंच्या अंगावर फेकून दिली. "आपला संसार सर्व लुटवून टाक" असा जातांना कानमंत्र दिला. महाराजांच्या आज्ञेप्रमाणेंपुढें सर्व मंडळी मुंबईस परत गेली.

श्री. हरीभाऊ हे घरचे सुखवस्तु होते. मुंबईच्या म्युनिसिपालटींत ते नोकरीस होते. कुटुंबाच्या अंगावर सोनेंनाणे बरेंच होतें. पगार जरी बेताचा होता तरी त्यांनीं गुरेंढोरें बाळगलीं होतीं. अशी सर्व स्थिति असतां महाराजांच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं सर्व लुटविलें. सर्व चीजवस्त्र ब्राह्मणांना दान देऊन टाकली. त्यांच्या कुटुंबाचें नांव सौ. ताराबाई होतें. त्यांनीं रडून आकांत केला. लंकेची पार्वती बनविल्यावर त्या गर्भश्रीमंत मातेला कां बरें कष्ट होणार नाहींत? परंतु आपल्या मंडळींचा विचार न घेतांच त्यांनीं हें सर्व केलें. महाराजांनीं दिलेली कफनी त्यांनीं आपल्या अंगावर चढविली व आपल्या पत्नीस एक पांढरें पातळ नेसावयास दिलें! टाळ, वीणा घेऊन भगवीं वस्त्रें परिधान करून ते श्री महाराज स्वामी समर्थ यांच्या भजनांत रंगून गेले. धन्य हरीभाऊंची! त्यांची माय अशा सुपुत्रास प्रसवली तेव्हां तीहि धन्य होय. असे स्वामीभक्त अत्यंत विरळाच होत. पूढें कांदेवाडींत त्यानीं मठ स्थापून तेथें श्रींनीं दिलेल्या पादुकांची स्थापना केली. शेकडों लोक त्या ठिकाणीं भजनानंद लुटण्यास व हरीभाऊंचें दर्शन घेण्यास

जात. भजनांत गुंग झाले म्हणजे हरीभाऊंचे देहभान हरपून जाई. शेंकडो पदेपदांतरें हरीभाऊनीं श्रीस्वामी गुणवर्णनपर केलीं आहेत. श्री. हरीभाऊ यांचें स्वतंत्र चरित्र देण्यासारखे आहे. त्यांच्याइतका निस्सीम भक्त मिळणें अत्यंत दुरापास्त होय. त्यांनीं स्वतः वेळोंवेळीं केलेलीं पदें अत्यंत मनोवेधक असून ती परिस्थितीसापेक्ष आहेत. हरीभाऊंनीं अक्कलकोटास चैत्र शुद्ध २ स जयंती साजरी केली. पुढें काहीं दिवस तेथें राहून ते परत मुंबईस गेले. असेंच मध्यंतरी अक्कलकोटास आले असतां ते पादुका घालून कीर्तन करीत असत. महाराजांच्या सेवेकऱ्यानीं त्यांच्या पादुका काढून घेतल्या. हा अपमान सहन न झाल्यानें ते मुंबईस गेले ते कायमचेच. महाराजांनीं त्यांना पुष्कळ वेळां अक्कलकोटास बोलाविलें पण ते अक्कलकोटास पुनः आले नाहींत. असो. महाराजांनीं त्यास आपला सुत असें संबोधले असल्यानें त्यांना सद्गति मिळाली हें सागणें न लगे हरीभाऊची बरीच हकीकत उपलब्ध आहे ती दिल्यास फारच विस्तार होईल म्हणून कारणापुरतीच हकीकत निवेदली आहे. स्वतंत्र चरित्र-लिहिण्यास प्रसंग आल्यास श्रींच्या कृपेनें हे कार्य होईल असा भरवंसा आहे.

● ● ●

## अध्याय सोळावा

# महाराजांच्याकडे आलेल्या विभूति ( पुढें चालू )

मागील अध्यायांत हरीभाऊंची थोडी हकीकत दिली गेली. महाराजांनीं त्यांस आपला ' सुत' असें संबोधून ' बंदरकिनाऱ्यावर जाऊन, मोठा किल्ला बांधून, ध्वजा उभी कर " अशी आज्ञा दिली. पुढें आज्ञेप्रमाणें मुंबईस आल्यावर त्यांची कीर्ति सर्वतोपरी झाली. अनेक वर्णांचे अनेक जातीचे लोक त्यांच्या दर्शनास येऊं लागले. हरीभाऊनीं अनेकावर अनुग्रह करून त्यांस श्रीस्वामीभजनीं लावलें. ऐन तारुण्यांत हरीभाऊंच्या अंगीं संन्यस्त वृत्ति बाणल्याबद्दल सर्वांनाच अत्यंत आश्चर्य वाटलें. हरीभाऊंची मातोश्री जिवंत होती. त्यांना आपल्या मुलाचा मार्ग पसंत पडेना. तसेच त्यांच्या कुटुंबाचीहि तीच गत होती. परंतु हरीभाऊंच्या वैराग्यापुढे उभयतांच्या सल्ल्याचें कांहीं चाललें नाहीं. कुटुंबासंबधानें ते अगदीं बेफिकीर होते. अशा रीतीने काल श्रीभजनांत घालवून त्यांनीं देह ठेवला. पुढे श्रीनीहि त्यांच्या बंधूंसहि दीक्षा देऊन हरीभाऊंच्या गादीवर अगदीं लहानपणींच बसविलें. यासंबंधींची हकीकत अत्यंत उद्बोधक असल्यानें जिज्ञासूनीं श्री. सुळेकर यांनी प्रसिद्ध केलेल्या श्रीस्वामीचरित्रांतून वाचावी. महाराजांच्या मनांत ज्यावर कृपा करावयाची असते तेव्हां लहानमोठा हा भेद त्यांच्याकडे नसतो. केवळ पूर्वार्जित सुकृताचा ठेवा हा जर मोठा असेल तरच ही गोष्ट घडते. एरव्ही अशक्य होय. कारणे लहान असो थोर असो त्यास ब्रह्मप्राप्ती सद्गुरुकृपाप्रसादाने होते ही गोष्ट कठोपनिषदांत नचिकेताच्या कथेवरून सिद्ध होते. यासाठींच हरीभाऊ यांच्या भावाची 'दादाबूवा'ची हकीकत ओझरती दिली आहे. त्यांनीं गादीवर आल्यावर कविता केल्या कीं काय याबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाहीं. हरीभाऊ यांच्या बंधूसच महाराज 'पाऱ्याची वीट, मोर-

पाखरूं' या नांवाने संबोधित असत. महाराजांचे ते एक अत्यंत लाडके बाल शिष्य होते. या गोष्टींवरून गृहत्याग वा राज्यत्याग किती अवघड असतो व मनांत आले तरी तसे सर्व साधने अनुकूल असता करवत नाहीं हें आपण व्यवहारांत पाहतो. केवळ श्रीकृपा असेल तर एखादाच विरळागत राज्यत्याग वा घरचा त्याग करूं शकतो. राजा गोपीचंदाची हकीकत काय सुचविते तसेच बाळ ध्रुवाचा इतिहास काय सांगतो ? यांचे मनन केल्यास हरीभाऊंच्या त्यागाचें मर्म लक्षांत येईल.

रामशास्त्री डोंगरे या नांवाचे एक गृहस्थ बडोद्यास रहात असत. बडोद्यांतील कांहीं मंडळीं कार्तिकस्वामींच्या दर्शनासाठीं निघाली. वाटेंत अक्कलकोटास उतरून श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घेऊन पुढें जावें म्हणून उतरली. त्यांच्याबरोबर हे रामशास्त्री डोंगरेहि उतरले. महाराजांची भेट घेऊन त्यांना आपण कार्तिकस्वामींच्या दर्शनास जात असल्याचें त्यांनीं सागितले. महाराजांनीं तिकडे जाऊं नकोस अशी आज्ञा केली. डोंगरे हे संशयात पडले. तेव्हां महाराजांच्याजवळ श्रीबाबासाहेब सबनीस बसले होते. त्यांनीं महाराजांची आज्ञा उल्लंघून जाणें हितावह नव्हें असा सल्ला दिला. त्यावरून श्री. रामशास्त्री डोंगरे तेथेंच राहिले. पुढें कार्तिक पौर्णिमेच्या दिवशीं डोंगरेशास्त्री हे महाराजांच्या दर्शनार्थ गेले. त्या वेळीं पुष्कळ भाविक दर्शनार्थ आले होते. सर्वांनीं श्रींची आरती केली. पुढें श्रीस्वामी महाराज उभे राहिले. कार्तिकस्वामींच्यारूपाने त्यांनीं डोंगरे यांनाहि दर्शन दिलें. डोंगरे हे कृतार्थ झाले. त्यांनीं महाराजांची प्रार्थना करून आपल्यावर अनुग्रह करावा असे विनविलें. त्यांस महाराजांनीं बोध करून स्वरूपप्राप्ती करून घेण्याचा मार्ग दाखवून साधनचतुष्टयसंपन्न करून मोक्षाचे अधिकारी बनविले. पुढें शास्त्रीबुवा श्रींच्या सान्निध दोन वर्षे सेवेसाठीं राहून पुढें बडोद्यास गेले. तेथें पुराण सांगून कालक्रमणा करीत असत. भगवद्भक्त म्हणून त्यांची मोठी ख्याती होती.

उत्तर हिंदुस्थानांतील एक संन्यासी किमया साध्य झाल्यानें मोठ्या बडेजावानें १० । १५ शिष्य बरोबर घेऊन फिरत असे. हजारों साधु, गोसावी, जती, संन्यासी यांच्या समागमामुळे आपल्यास ही विद्या मिळाली असे तो मोठ्या दिमाखानें सांगतसे. किमयेच्या नादांत यतीधर्मास फांटा देऊन तो वागत असे. जवळचे शिष्य भरपूर खावयास मिळते तेव्हां संन्याशाच्या यति धर्माच्या पावित्र्याकडे तितकेसें लक्ष देत नसत. कारण पोट त्याच्यावर अवलंबून

असे. हा सर्वसाधारण व्यवहारी नियम आहे. नसत्या फंदांत कां पडा असा शिष्यांचा पोक्त विचार होता. चार घांस मिळतात तोंपावेतों सेवा करावी. जास्त चांभारचौकशी काय करावयाची अशी वृत्ति ठेवूनच जवळचे परिचारक वागत. ही गोष्ट आजहि दृष्टोत्पत्तीस येते. पोटभरू गोसावी, बुवाबाजीस सोकावलेल्या पीठावरील महंताच्या लीला, मठाधिपतींच्या तमाशाच्या आवडी, रामदासी पंथाच्या ब्रह्मचारी म्हणविणाराची अनीतिमान वागणूक, सोळभोक कीर्तनकार इत्यादिकांचा सामाजिक नीतिनियम झिडकारून बेछूट वर्तन करणारांची माहिती नित्यशः निरनिराळ्या वृत्तपत्रांतून वाचावयास मिळते! ती लक्षपूर्वक वाचल्यास असे विद्वान, असे पदवीधर कसे बळी पडतात हें नीट लक्षांत येईल. मग बोलून चालून हा उत्तर हिंदुस्थानी किमयागार ! सुदैवानें किमयाची विद्या त्यास एका गोसाव्याकडून प्राप्त झाल्याने तो अत्यंत उद्दाम वृत्तीनें आपल्या पंडित्याचें प्रदर्शन करून दुसऱ्यास तो मूर्खांत काढीत असे. हा किमयागार हिंडत हिंडत नाशिक क्षेत्रीं आला. त्या ठिकाणीं संतश्रेष्ठ श्री घोलपस्वामी होते. त्यांचेहि कांहीं शिष्य होते. या शिष्यांची व किमयागाराची गांठ पडे. किमया ही संन्यास धर्माविरुद्ध आहे. कारण सर्व कर्मांचा न्यास केल्यावर सोनें, रुपें यांचा व्यवहार करणें यतिधर्माविरुद्ध आहे अशी सुनावणी घोलपस्वामींच्या लोकांनीं केली असतां तो उत्तर हिंदुस्थानी किमयागार त्यांना अद्वातद्वा शिव्या देऊं लागे. इतके करून तो थांबला नाहीं तर त्यानें चांगलें त्या शिष्यांना ठोकून काढलें. या गोष्टीचा नाशिक क्षेत्रांत बोभाटा झाल्यानें त्या यतिवेष धारण करणाऱ्या किमयागाराची चांगलीच फजीति करावयाची अशी स्वामीसमर्थांच्या शिष्यांनीं प्रतिज्ञा केली. किमयागारास एक सवाई किमयागार भेटला. त्यानें यास गालिप्रदानाबद्दल यथास्थित चोप देऊन त्यास कायमचें लंगडें केलें. हाहि जवान याच्याच देशाकडील होता. असा प्रकार नाशिक येथें चालू असल्यावेळीं श्री स्वामी समर्थांचे चरित्रकार श्री वामनबुवा ब्रह्मचारी ( श्री गुरुलीलामृताचे कर्ते ) वांबोरीकर हे शके १७९२ सालीं यात्रेच्या निमित्तानें त्र्यंबकेश्वरीं गेले होते. त्यांच्या एका स्नेह्याची मुंज वगैरे झाल्यावर श्रीवामनबुवा हे नाशिकास आले. वर सांगितल्याप्रमाणें नाशिक येथील श्रीकपालेश्वराच्या देवालयांत श्रीघोलपस्वामी होते. त्यांची त्यांनीं भेट घेतली. तेव्हां घोलपस्वामींनीं वामनबुवास " किमयागाराची भेट झाल्याचें सांगून, त्यास एकदां पाहून या आणि काय झालें तें कळविण्यास

या " असा आदेश दिला. वामनबुवांनीं त्याची भेट घेतली. त्या वेळी तेथें नाशिकमधील नागरिक नारायणशास्त्री आचार्य, विंचूरकर, शौचे, गायधनी वगैरे विद्वान मंडळी होती. या मंडळींनीं किमयागाराबरोबर कांहीं वेदान्त विषयावर चर्चा केली. संन्याशाचें भांडवल फुटल्यामुळे तो पुनश्च आपल्या मूळ स्वभावावर येऊन वाटेल ते भकूं लागला. अकटोपासून विकटोपर्यंत ज्ञान असलेला हा उद्धट किमयागार ' शेषं कोपेन पूरयेत ' या न्यायानें वरील विद्वान शास्त्रीबुवांची टवाळी करून वामनबुवाहि नवीन आलेल्या मंडळींशीं बोलूं लागला. किमयागारानें आपल्यास किमया कशी मिळाली वगैरे सांगून खरें ब्रह्मज्ञान जाणणारा किमया उत्तमप्रकारें जाणतो अशी चर्पटपंजरी सुरू केली. सर्व अवतार ( देवादिकांचे ) हे किमयेसाठींच होते, ज्यांच्यावर परमेश्वराची कृपा होते त्यास झोळीं घेऊन भीक मागण्याची पाळी येत नाहीं. वामनबुवांनी या स्वामीबुवाची चांगलीच हजेरी घेऊन संन्याशाला असली उठाठेव कां असावी असा रोखठोक प्रश्न केला. तेव्हां बुवा चिडला आणि म्हणाला "तुमचे गुरु कोण ? " तेव्हां वामनबुवांचे स्नेही यांनीं " आमचे गुरु श्रीदत्तावतार योगीराज अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीमहाराज आहेत व आम्ही सर्व त्यांचे सेवेकरी आहोंत " असें निवेदिलें. बुवानें त्यांना " अक्कलकोटका स्वामी देखा है " असें म्हणून " वह कहाँ है " असें मोठ्या दिमाखानें विचारलें. तेव्हां वामनबुवांनीं व त्यांच्या मित्रांनीं अखंडानंदाद्वितीय स्वरूप स्वामी महाराजांची लीला त्यास सुनावली आणि महाराजांच्या नांवाचा मोठ्यानें जयजयकार केला. हें ऐकून त्या बुवाचे चित्त खवळलें व तो म्हणाला " तुम्ही गद्धे आहांत. तुमचा गुरु सोनें करतो काय ? " असा उलट सवाल केला. तेव्हां बाष्कळ बडबड न करतां अक्कलकोटास जाऊन पाहा म्हणजे तुला जिकडे तिकडे सुवर्णच सुवर्ण दिसेल असें खडसावून सांगितलें. हें ऐकून " तुमचे गुरु खरे असतील तर मला त्यांनीं येथेच चमत्कार करून दाखविला तर मी खरें मानीन " असें आढ्यतेनें उत्तर दिलें. वामनबुवांनी प्रचीती येईल असें सांगून त्याचा निरोप घेतला, आणि झालेली हकीकत घोलपस्वामींना कळविली. पुढें ही मंडळी गेल्यावर बुवा नित्याप्रमाणें सोनें करण्यास बसला पण सोनें होण्याच्या ऐवजीं कोळसे झाले. या प्रकारामुळें तो क्रोधाविष्ट होऊन जवळच्या परिवारांवर आग पाखडून त्यांस घालवून दिलें. व ज्यांनी स्वामींची कीर्ति ऐकविली त्यांचा कपाळमोक्ष करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. घोलपस्वामींनीं

वामनबुवास व इतरांना धीर दिला. स्वामीभक्तांचे कांहींएक तो वांकडे करूं शकणार नाहीं असेंहि सांगितलें. नित्याप्रमाणें गंगेवर ही सर्व मंडळीं स्नानासाठीं गेली असतां हा किमयागार वामनबुवाहि लोकांस मारण्यासाठीं एक मोठा दगड घेऊन आला. तोंडानें अपशब्द बोलत बोलत दगड त्यांच्या अंगावर टाकणार इतक्यांत तोच दगड त्याच्या डोकीवर पडून तो बेशुद्ध झाला. वामनबुवादि भजनाचा तोंडानें तडाखा लावून आपलें मरण कसें टळेल या विचारांत होते. इतक्यांत असा प्रकार झाल्याचें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. हा किमयागार पुढें कांहीं वेळानें सावध झाला, व त्या लोकांची त्यानें क्षमा मागून “ अक्कलकोट महाराज सच्चा है ” असें म्हणून त्यांना शरण आला. पुढें हा बुवा अक्कलकोटास गेला व महाराजांचे दर्शनार्थ गेला असतां स्वामीमहाराज त्यास म्हणाले “ का रे माजलास का इतका. घाल दगड डोक्यांत. कोळसे झाले तर जीव दे, तें झाड पाहा, बोडक्यांत पथ्थर मारून आंख खोल किमया दिसेल. ” असें बोलून पोट धरून हसूं लागले!! लिंबाच्या झाडांतून सुवर्णाचे पाझर पाहिल्यावर त्याची धुंदी उतरली व त्यानें महाराजांची क्षमा मागून अनुग्रह करण्यास प्रार्थना केली. पुढें स्वामींनीं त्यास माहुरगडावर जाण्यास सांगितलें व त्याप्रमाणें तो गेला. या सत्यकथेचें वर्म वाचकांच्या ध्यानांत येईलच. वृथा अभिनिवेश मनुष्यानें धरू नये व श्रीरामदासस्वामीसमर्थांनी श्रीमत् दासबोधांत म्हटल्याप्रमाणें “ स्वामीद्रोह जया घडे। तो यावच्चंद्र नरकीं पडे। तयास उपावचि न घडे। स्वामीतुष्टल्या वांचुनी ॥ ” हेंच खरें.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33६५८ वि: ...
क्रमांक १०६५ नों: दि: २१०५.५२

अध्याय सतरावा

# उपसंहार

येथपर्यंत श्रीस्वामी महाराज अक्कलकोटास आल्यापासून त्यांच्या चरित्रांतील महत्त्वाचा भाग सहृदय वाचकांपुढें ठेवला आहे. महाराजांच्या तेथील २०।२१ वर्षांच्या वास्तव्यांत सहस्त्रावधि लोक येऊन गेले. गीतेंत म्हटल्याप्रमाणें, " आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानीच भरतर्षभ " असे चार प्रकारचे भक्त येऊन गेले. त्यांची आजपर्यंतचीं जीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत, त्या लोकांची यादीहि सांपडेल. ती सर्व यादी देणें झाल्यास ग्रंथाचा विस्तार करूनच तें काम करावें लागेल. तसें न करतां महत्त्वाच्या प्रसंगांचें निरूपण यथामति केलें आहे. अगदीं लहान, खेडवळ मनुष्यापासून सर्व जातींतील अधिकारसंपन्न जीव श्रीस्वामीचरणीं लीन झालेले दिसून येतें. उद्दाम अधिकारी, राजेरजवाडे, जहागीरदार, दरकदार, मानकरी, धारकरी, वारकरी, धनाढ्य सावकार, कीर्तनकार, जपीतपी संन्यासी, योगाभ्यासी अशा अनंत लोकांनीं महाराजांच्या चरणीं मान विनम्र करून त्यांच्या आशिर्वादाची अपेक्षा केली. कांहीं आपलीं सुखदुःखें निवारण करण्याविषयीं प्रार्थना करून महाराजांच्या कृपाप्रसादें त्यांचीं दुःखें निर्मूल झाली. असलेल्या आर्तावर महाराजांनीं सदय अंतःकरणानें कृपेची पाखरच केली. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें त्यांस उपदेश करून मोक्षाचे अधिकारी केले. विष्णुबुवा गोखले, नृसिंहसरस्वती आळंदी, माटेबुवा, घोलपस्वामी, बाळाप्पा, तडवळेकरबुवा, राजेरायरायन, वामनबुवा, ठाकूरदासबुवा, चिंतोपंत टोळ, काळबुवा, सीतारामबुवा मंगळवेढे, गवेस्वामी, कृष्णगिरीबुवा, कृष्णसरस्वातीस्वामी, कोल्हापूर, भारतीबुवा, रामपुरीबुवा, अलवणीबुवा, रामजोशी अक्कलकोटकर, अक्कलकोटचे राजेसाहेब, बडोद्याचे पोलिस कमिशनर श्री. घाटगे, दादासाहेब विंचूरकर, बिड-

कर महाराज, अक्कलकोटचे पुराणिक, हिरळीकरशास्त्री अक्कलकोट, सोलापूरचे धनाढय कै. वारद, ॲडमिनिस्ट्रेटर, बंबगार्डन धारवाडचे दोन पंडितशास्त्री बोटेस्वामी, भाऊदाजी, शेषाचार्य असे शेकडों लोक महाराजांच्या अनुग्रहानें पावन झाले आहेत. महाराजांचें सर्व भाविक भक्तांवर मनापासून प्रेम असें चुकलें तर समजावून सांगत. महाराज फटकळ बोलत असत असे जवळचे लोक म्हणत पण त्यांत पुष्कळ अर्थ असे. महाराज शिस्तीचे अत्यंत भोक्ते होते. कोणीहि त्यांच्याकडे यावें आणि कसें तरी वागावें असें होत नसें. अडाणी मनुष्यास वागण्याचे पाठ देत. ज्ञानी मनुष्यास वेदान्तांतील प्रमेयें नीट रीतीनें कळतील असें बोलत. योगीजनांना योगमार्गातील अडचणींचा परिहार कसा करावा लागेल हें सांगत, पुराणिकांस पुराणाच्या प्रसंगानें कोणत्या विषयाचें विवेचन कशाप्रकारें करावें याचेहि धडे देत, जवळच्या सेवेकऱ्यांचीं दुःखें निवारलीं, अपमृत्यु दूर तर केलेच पण जे खरोखर आर्त व जिज्ञासू होते त्यांना भक्तिमार्गास लावलें. एवंच ज्याच्याकडून जशी सेवा घ्यावयाची तशी त्यांनीं सेवा करवून घेतली. यामुळें महाराजांच्याबद्दल सर्वांचा आदर असे. महाराज अत्यंत धिप्पाड व दिसण्यांत उग्र असल्यानें दर्शनार्थ येणारे जरा बिचकत असत. पण वरून खडबडीत दिसणारे महाराज अंतर्यामीं आर्तांचे त्राते व भक्तकाजकल्पतरु असल्याचा प्रत्यय सर्वांना येत असे. लहानापासून थोरांपर्यंत सर्व वर्णांच्या बाया–बापडया व इतर जनता यांचा लोभ महाराजांच्या चरणीं अत्यंत जडला होता. लौकिक दृष्टया आपला देह सोडण्याचें त्यांनीं ठरविलें व तशी कुणकुण सेवेकरी यांना लागली तेव्हां सर्व आतां पुढें काय होतें या फिकिरींत होते. पण महाराजांनीं आगाऊच ठरविल्याप्रमाणें शके १८०० मध्यें आपण जाणार असें सांगून निजानंदांत लीन झाले. जातांना तीन खसखसीच्या आकाराचे तेजस्वी दाणे त्यांच्या मुखांतून बाहेर पडले. 'शिवहरशंकर नमामिशंकर शिवशंकरशंभो । हे गिरिजापते भवानीशंकर, शिवशंकरशंभो ॥ " असें नेहमींचें महाराजांचे भजन त्यांच्या सेवेकऱ्यांनीं केलें. यथासांग यतिधर्माप्रमाणें महाराजांनीं आपला पार्थिव देह लौकिकरीत्या विसर्जन करून अक्कलकोटनिवासीयांना अत्यंत दुःखांत लोटून दिलें. सर्व लोक हळहळले. त्याचे वर्णन करणें अशक्य होय असें त्यांच्या चरित्रकारांनीं लिहीलें आहे. आम्ही स्वतः महाराज निराळ्या स्वरूपांत आहेत असे मानणारे असल्यानें ते 'सदासर्वदा देवसन्निध आहे' या समर्थांच्या भक्तीप्रमाणें

निकटवर्ति आहेत. दूर नाहींत. भगवंतांनीं अर्जुनास सांगितल्याप्रमाणें हृदय-कोशांतच आहेत. तेव्हां अत्यंत असीम भावनेने महाराजांस शरण जाऊन दर्शनाची याचना केली तर ते दर्शन देतील असा अनेकांचा विश्वास याहि कालांत असल्यानें आपण त्यांची प्रार्थना करून दर्शन देऊन राष्ट्रावर आलेलें धर्म-ग्लानीचें संकट दूर करण्यासाठीं निग्रहानें उपासना केली तर ते बिघडलेली घडी-नीट सुधारून देतील अशी बळकट उमेद आहे. महाराजांच्या नांवाचा मनोमानसीं त्रिवार गजर करून हें चरित्र त्यांच्या चरणीं अर्पण करण्याचें सद्‌भाग्य आम्हाला लाभलें याबद्दल आम्ही खरोखरीच त्यांचें सर्वथैव ऋणी आहोंत. महाराजांनीं आम्हावर कृपा करावी व योग्य वाट दाखवून पारमार्थिक सुखाची जोड करून द्यावी अशी अत्यंत विनम्र भावानें प्रार्थना करून लेखणीस विराम देतों.

॥ इति शम् ॥

REFBK-0012434
REFBK-0012434

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33६८५ विः चरित्र
क्रमांक 90६८ नों दि

क्र. क्र. 92836